संदर्भ विभाग
ठाणे
ग्रंथालय

0 MAR 1991 27 SEP 1989 6 MAR 19

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

8 SEP 1985
13 OCT 1985
24 NOV 1985
2 DEC 1985
2 JUL 1986
4 SEP 1986
9 NOV 1986
28 FEB 1988

5 JAN 19
26 FEB 19
19 MAR 19
18 MAY 1986
23 JUL 19
27 JUL 1986
17 AUG 1986
17 SEP 1986
(क्र. मा. पहा)
3 DEC 1986

संक्रमण

सरोजिनी वैद्य

REFBK-0024668

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ
पुणे ४११०३०

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
१ जुलै १९८५

मुखपृष्ठ : कमल शेडगे

© सर्व हक्क सुरक्षित

मूल्य साठ रुपये फक्त

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

ती० मधुसूदन, चि. यशवंत
व
चि. अशोक
या माझ्या भावंडांना —

निवेदन

'संक्रमण' मध्ये संग्रहित झालेल्या लेखांसंबंधात काही खुलासे करणे आवश्यक असल्याने हे लहानसे प्रास्ताविक मी लिहिते आहे.

'मौजे'च्या एकोणीसशे सत्तर सालच्या दिवाळी अंकात 'एका सामाजिक शोकनाट्याची नायिका' हा माझा पं. रमाबाईसंबंधीचा लेख प्रसिद्ध झाला. त्यानंतर गेल्या पंधरा वर्षांत एकोणिसाव्या शतकातील व्यक्ती, घटना, चळवळी, विचारप्रवाह, नियतकालिके इत्यादींच्या संदर्भात अधूनमधून एका विशिष्ट पद्धतीने मी लिहीत गेले. या लेखनापैकी 'गोपाळराव हरी' व 'श्रीमती काशीबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र' ही पुस्तके यापूर्वीच प्रसिद्ध झालेली असून आज 'संक्रमण'मध्ये या कालखंडाशी संबंधित असलेले उर्वरित लेखन एकत्रित स्वरूपात प्रसिद्ध होत आहे.

काहीतरी निमित्ताने हे लेख जेव्हा सलगतेने मी वाचले तेव्हा त्यांना एकमेकांशी जोडणारी अनेक सूत्रे आहेत, त्यांतील काही लेख एकमेकांना पूरकही होत आहेत हे लक्षात आले आणि त्यांचा संग्रह काढण्याची कल्पना मनात दृढ होत गेली. श्रीविद्या प्रकाशनाचे श्री. मधुकाका कुलकर्णी यांनी या कालखंडासंबंधीची वैचारिक व ललित स्वरूपाची अनेक पुस्तके यापूर्वी प्रकाशित केलेली असल्याने त्यांनी 'संक्रमण' प्रकाशित करणे हे मला औचित्यपूर्णही वाटले. या सहकार्याबद्दल मी त्यांची फार आभारी आहे.

या पुस्तकातील पहिले पाच लेख यापूर्वी वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. संग्रहात समाविष्ट करताना मी त्यात काही ठिकाणी नव्याने अवगत झालेल्या माहितीची अधिक भर घातली आहे आणि क्वचित काही ठिकाणी लेखन-शैलीच्या दृष्टीने त्यांचे पुनर्लेखन केले आहे. 'त्रिदल' हा सत्यकथेत प्रथम प्रसिद्ध झालेला लेख नंतरच्या काळात 'श्रीमती काशीबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र' या पुस्तकाला जे मी चरित्रात्मक उत्तरायण जोडले त्यात काही प्रमाणात समाविष्ट झाला आहे. तथापि, या लेखाला स्वतंत्रपणाने, एकोणिसाव्या शतकातील स्त्री-पुरुषांच्या सांस्कृतिक जीवनाच्या संदर्भात वेगळे महत्त्व आहे असे वाटल्यामुळे 'संक्रमण' मध्ये त्याचा अंतर्भाव करीत आहे. शेवटचा 'पुणे पाठशाळापत्रका'-संबंधीचा लेख या पुस्तकात प्रथमच प्रकाशित होतो आहे. तो संशोधनात्मक लेखाच्या मूळ स्वरुपात मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे यथावकाश प्रसिद्ध होणार आहे.

'हिंदुपंच' व 'शाळापत्रक' या दोहोंवद्दल लिहिताना त्या नियतकालिकांतील उतान्यांवर माझा थोडा अधिक भर पडलेला आहे. ह्याचे कारण दुर्मिळतेमुळे ही नियतकालिके वाचकांना स्वतःला पाहावयास मिळणे फारच कठीण आहे.

'उपासनेला दृढ चालवावे' हा प्रार्थनासमाजविषयक लेख ज्यांच्या मुलाखतींच्या आधारावर लिहिला, त्या श्री. ग. ल. चंदावरकरांचे २१ एप्रिल १९८३ रोजी दुःखद निधन झाले. प्रस्तुत लेखात प्रार्थनासमाजातील वेदीचा उल्लेख मी संपूर्ण प्रार्थना-समाजाचे प्रतीक म्हणून केलेला आहे. (पृ. २) प्रत्यक्ष इमारत १८७४ मध्ये म्हणजे स्थापनेनंतरही सात वर्षांनी बांधली गेली हे प्रार्थनासमाजाच्या इतिहासात द्वा. गो. वैद्य यांनी सविस्तर दिलेलेच आहे. चंदावरकरांच्या मुलाखतींइतकाच द्वा. गो. वैद्य यांनी लिहिलेला 'प्रार्थनासमाजाचा इतिहास' (१९२७) हा ग्रंथ प्रस्तुत लेख लिहिताना मला उपयुक्त ठरलेला आहे.

दुसरा लेख 'एका सामाजिक शोकनाट्याची नायिका' मी प्रथम १९७० मध्ये लिहिला; त्या वेळी दे. ना. टिळक यांचे 'महाराष्ट्राची तेजस्विनी – पंडिता रमाबाई' हे पुस्तक माझ्या वाचनात आलेले होते. पंडिताबाईंचा चरित्रात्मक तपशील मी बराचसा त्यावरूनच घेतलेला होता. वाचकाला रमाबाईंच्या घडणीची व व्यक्तित्वाची ओळख होण्याच्या दृष्टीने तो त्या वेळी फार आवश्यकही होता. नंतरच्या काळात त्यांच्या आयुष्यावर बरेच लिहिले गेल्याने आज तो भाग कदाचित परिचित असल्याचे जाणवेल; पुढे पंडिताबाईंची काही इंग्रजी चरित्रे, त्यांचा पत्रव्यवहार व त्यांच्या स्वतःच्या लेखनाच्या परदेशात निघालेल्या आवृत्त्या माझ्या पाहण्यात आल्या. पुनर्लेखन करताना रमाबाईंच्या व्यक्तित्वाची कल्पना देण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटलेले तपशील मी या पुस्तकांतूनही घेतलेले आहेत. मात्र इंदुप्रकाश, सुबोधपत्रिका, केसरी आदी साप्ताहिकांतील उतारे प्राधान्याने दे. ना. टिळकांच्या पुस्तकातून उद्धृत केलेले आहेत. श्री. दे. ना. टिळक, द्वा. गो. वैद्य या दिवंगत लेखकांची मी विशेष ऋणी आहे.

गेल्या पस्तीस वर्षांत म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात, महाराष्ट्राच्या इतिहासातील एकोणिसावे शतक अभ्यासकांकडून वेगवेगळ्या प्रकारे अभ्यासिले जाते आहे. दुर्मिळ व अधिकृत कागदपत्रांची उपलब्धी करून घेण्यापासून तो आजच्या आपल्या बऱ्यावाईट जीवनस्थितीची कारणे मागच्या शतकात कुठे व कशी रुजलेली आढळतात याचा शोध घेण्यापर्यंत त्याचा पल्ला आहे. अभ्यासकांच्या या महत्त्वपूर्ण, विविधांगी उपक्रमामध्ये माझी भूमिका राहिली आहे ती गतकाळातील काही अर्थपूर्ण घटितांचा स्वतःच्या अनुभवांतून बौद्धिक व भावनिक दृष्ट्या वेध घेण्याची; त्यामुळे विशुद्ध व

वस्तुनिष्ठ संशोधनाच्या बंदिस्त चौकटीत राहून हे लेखन मी केलेले नाही. ते जितके गतकालाबद्दल आहे तितकेच वर्तमानाचा संदर्भ असलेलेही आहे. त्याला आजवर इतर अनेकांनी केलेल्या संशोधनाचा आधार आहे; त्याचप्रमाणे मी मिळविलेल्या नवनवीन माहितीची जोडही लाभलेली आहे. ही माहिती इतर अनेक व्यक्तींच्या प्रत्यक्ष गाठीभेटींतून वा त्यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहारातून जशी हाती लागली आहे तशीच अपरिचित पुस्तके व नियतकालिके यांमधूनही उपलब्ध झाली आहे. यांपैकी काहींचा उल्लेख मूळ लेखांमध्ये स्पष्टपणाने येऊन जातो पण काहींचा मी स्वीकारलेल्या लेखनपद्धतीमुळे तिथल्या तिथेच करणे शक्य होत नाही. एखाद्या अनुभवाचे, बाह्य वा आंतरिक असे अनेकांगी स्वरूप, एकात्मतेने शब्दबद्ध करताना किंवा केल्यावर, त्यातील प्रत्येक घटक नेमका कुठून व कसा आला हे उकलून दाखविणे शक्य नसते हे सुज्ञ वाचक जाणतीलच. तथापि लेखांतून उल्लेखिलेल्या व न उल्लेखिलेल्या महत्त्वाच्या संदर्भांची एक नोंद पुस्तकाच्या अखेरीस, ऋण व्यक्त करण्याच्या हेतूने मी दिलेली आहे.

हे सर्व काम प्रायः मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय व मुंबई विद्यापीठ ग्रंथालय येथे बसून मी केलेले आहे. तेथील कर्मचारी मंडळींनी केलेल्या सहकार्याचे स्मरण मला नेहमीच राहील.

पंडिता रमाबाईंच्या विषयीचा माझा पहिला लेख लिहिला गेला तो श्री. श्यामसुंदर आढाव यांनी उपलब्ध करून दिलेल्या पंडिताबाईंच्या अप्रकाशित पत्रांच्या चार खंडांच्यामुळे. आढावांच्या संग्रहातील समग्र पत्रे वाचल्यानंतर पंडिताबाईंच्या असामान्य व्यक्तित्वाची, आयुष्यातील वजनदार आंतरिक संघर्षांची, मला विशेष तीव्रतेने जाणीव झाली. तथापि १९७० मध्ये लिहिलेल्या लेखात त्याचा मी फार थोडाच उपयोग करू शकले होते. पुनर्लेखनात तो थोडा अधिक केलेला आहे. श्री. आढावांच्याकडील हा इंग्रजी पत्रसंग्रह आता कै. अ. भि. शहा यांच्या प्रस्तावनेसह महाराष्ट्र सरकारच्या साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेला आहे. त्याचे मराठी भाषांतर करण्याचे काम माझ्याकडे आलेले असून त्या कामी स्नेहपूर्ण सहकार्य देणाऱ्या श्री. कमलाकर कदम यांचीही मी ऋणी आहे. रमाबाईंवरील लेखात उपयोगात आणलेली इंग्रजी पत्रांची भाषांतरे त्या आगामी ग्रंथातील आहेत.

'माझा समुद्रप्रवास' ही गोपाळराव जोशी यांची लेखमाला कै. रा. बा. कुलकर्णी व श्री. प्रसन्नकुमार अकलूजकर यांच्या मदतीने उतरवून घेणे शक्य झाले. पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करण्याच्या कामी विद्यार्थी मंडळी आत्मीयतेने साहाय्याला आली. फार अमोल सहकार्य झाले ते श्री. राम पटवर्धन यांचे. त्यांनी पाठपुरावा केला नसता

तर हे लेखन लिहून झाले असते की नाही ह्याचीच मला शंका वाटते. त्यांच्याशी होणाऱ्या वादसंवादातून लेख प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्यातील विचार पारखून घेता येत गेले. लेख कोणत्याही मासिकासाठी लिहावयाचा असला तरी पटवर्धनांची आस्था कधी कणभरही उणावली नाही.

माझे ज्येष्ठ स्नेही आणि अर्थशास्त्राचे मान्यवर प्राध्यापक डॉ. स. ह. देशपांडे यांनी, माझ्या विनंतीला मान देऊन आपल्या नेहमीच्या प्रवृत्तीनुसार मनःपूर्वक, चिकित्सक आणि अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना लिहून देऊन या ग्रंथाचे मोल विशेष वाढविले आहे. साहित्य व समाजशास्त्र या दोहोंमध्येही अर्थशास्त्राइतकीच त्यांना रुची असल्याने मला त्यांच्या प्रस्तावनेची या ग्रंथाच्या संदर्भात नितांत गरजच वाटली. या सर्व सुहृदांना मनःपूर्वक धन्यवाद.

'संक्रमण' हे पुस्तकाचे शीर्षक डॉ. अनिल अवचट यांनी सुचविले. कमल शेडगे यांनी त्याला अर्थसूचक मुखपृष्ठाची जोड दिली आणि कल्पना मुद्रणालयाचे मालक श्री. अण्णासाहेब लाटकर व मुद्रित-शोधक श्री. य. ए. धायगुडे यांनी पुस्तकाच्या छपाईबाबतच्या सर्व सोपस्कारांमध्ये पूर्ण सहकार्य दिले; या सर्वांना माझे मनःपूर्वक धन्यवाद.

सरोजिनी वैद्य

प्रस्तावना

एकोणिसावे शतक हे भारताच्या इतिहासातील एक अपूर्व शतक आहे. नवी राजवट, नव्या संस्था, धर्म आणि समाज-व्यवस्थेची नवी मूल्ये, नवी जागतिक स्वरूप असलेली अर्थव्यवस्था, नव्या विचारपद्धती, नव्या यातना आणि नव्या आकांक्षा ह्या सर्वांची एकच घुसळण या शतकात घडून आली. जीवनाचा वेगच पाहायचा तर विसाव्या शतकात तो अधिक आहे; पण मूलभूत मूल्यांच्या व विचारांच्या स्तरावर घडणाऱ्या घटनांचे नवेपण लक्षात घेतले तर ते एकोणिसाव्या शतकात अधिक मोठे होते असे म्हणावे लागेल. चार्ल्स डिकन्सने फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळाचे 'It was the best of times, it was the worst of times' असे वर्णन केलेले आहे, तोच प्रकार थोडाबहुत आपल्याकडच्या एकोणिसाव्या शतकाचा आहे.

एकोणिसाव्या शतकाचे आणखी एक वेगळे महत्त्व असे आहे की, आपल्या आजच्या जीवनाचा पाया त्याने घातलेला आहे. अगदी अशाच स्वरूपाची एखादी प्रचंड उलथापालथ भविष्यात घडून येईपर्यंत बऱ्याच दूरवरच्या काळाचाही तो पाया राहील. शिवाय अशी एखादी जोराची वावटळ पुढे आली तरी एकोणिसाव्या शतकाने ज्या विचारांची बीजे पेरली ती सर्वस्वी बाऱ्यावर उधळून जातील असे नाही. त्या शतकासमोरचे प्रश्न व आज आपल्यासमोर असणारे प्रश्न बऱ्याच बाबतीत एक आहेत. अनेक नव्या गोष्टींच्या प्रारंभाचा हा काळ असल्याने त्यांपैकी अनेक स्थित्यंतरे अजून पुरी व्हावयाची असल्याने तो तसा इतिहासजमा झालेला नाही; ती स्थित्यंतरे पुढील काळात पुरी होतील ही आशा आज आपण धरून आहोत.

समाजाचा बदल कसा होतो हा समाजशास्त्राचा एक विषय आहे भारतीय समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आज आपण सगळे कटिबद्ध झालो आहोत. त्यासाठी समाज कसा बदलतो आणि विशेषतः भारतीय समाज कसा बदलतो ह्याचे अधिक सूक्ष्म ज्ञान झाले तरच भारतीय समाजशास्त्र आपल्या हाती अधिक नीटपणाने लागेल व आपले परिवर्तनविषयक व्यूहही अधिक परिणामकारक ठरतील. हे समाजशास्त्र सिद्ध करण्याची सामग्री म्हणजेच समाजाचा इतिहास असून तो 'संक्रमण' या डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या नव्या पुस्तकात प्रगट झालेला आपल्याला दिसेल. सरोजिनी वैद्य मुंबई विद्यापीठात मराठीच्या प्राध्यापिका आहेत. एकोणिसाव्या शतकामधील स्थित्यंतरांमध्ये त्यांना जे स्वारस्य आहे ते त्यांच्या यापूर्वीच्या दोन

ग्रंथांतून ('गोपाळराव हरी' व 'श्रीमती काशीबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र') वाचकांच्या नजरेस आलेलेच आहे. आता या नव्या पुस्तकाच्या रूपाने त्या त्या शतकात पुन्हा एकदा अवगाहन करीत आहेत.

जुने आणि नवे किंवा परंपरा आणि आधुनिकता ह्यांचा जो झगडा एकोणिसाव्या शतकात सुरू झाला त्याचे प्रतिबिंब व्यक्तींच्या, कुटुंबांच्या जीवनात कसे पडले, मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात कसे उमटले हे शोधणे हा सरोजिनीबाईंच्या या पुस्तकातील सहाही प्रदीर्घ लेखांमागील हेतू आहे. यांपैकी पहिले चार लेख वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वे आणि त्यांची कुटुंबे ह्यांच्यावर अधिक लक्ष केंद्रित करून लिहिलेले तर शेवटचे दोन आजच्या अभ्यासकांना पुष्कळशा अपरिचित राहिलेल्या, दोन वाङ्मयीन नियतकालिकांसंबंधीचे आहेत. मात्र एकोणिसाव्या शतकातील 'नवे' हे या सर्व लेखांना जोडणारे समान सूत्र आहे.

हे लेख रूढ अर्थाने सामाजिक किंवा वैचारिक इतिहास सांगणारे नाहीत. वैचारिक क्षेत्रात बदल घडवून आणण्यात ज्यांनी पुढाकार घेतला किंवा बदलांचे ज्यांच्यावर परिणाम झाले अशा व्यक्तींच्या जीवनात खोलवर डोकावून पाहता-पाहता, समाजस्थितीवर किंवा तिच्या एखाद्या भागावर प्रकाश टाकणे हा या लेखांचा उद्देश आहे. त्यामुळे सरळ सरळ इतिहासपर लेखनात जी समग्रता किंवा ज्या तार्किक पद्धतीची मांडणी अभिप्रेत असते ती इथे अपेक्षिता येत नाही; पण त्याचबरोबर माणसांच्या जीवनात नवे काय येत होते, ती त्याला कशी सामोरी जात होती, जुन्या-नव्यांचे संघर्ष त्यांच्या मनात आणि आचरणात कसे चालले होते, नवे स्वीकारताना व आचरताना त्यांना कोणत्या स्वरूपाच्या समस्या पडत होत्या व त्या ती कशी सोडवीत होती, कौटुंबिक आणि सामाजिक संबंधांवर त्यांचे काय परिणाम होत होते, त्यांतून कोणती सुखे व कोणत्या वेदना आणि प्रसंगी कोणत्या शोकात्मिका त्यांना अनुभवाव्या लागत होत्या, ह्या सर्वांचे हृद्य व विषयानुरोधाने क्वचित नाट्यमय असे चित्र या लेखांमध्ये आढळते. एका अर्थाने असे म्हणता येईल की एखाद्या उत्तम दर्जाच्या सामाजिक कादंबरीत ज्या प्रकारच्या घटना आपण अपेक्षित असतो त्याच प्रकारच्या म्हणजे व्यक्तिकेन्द्रित आणि कुटुंबकेन्द्रित घटना या लेखांतून प्रगट-लेल्या आहेत. पण फरक एवढाच आहे की, या लेखांतील व्यक्ती काल्पनिक नाहीत. त्या स्वतःचे जन्मजात गुणदोष घेऊन आलेल्या व त्यांच्या काळातील परिस्थितीशी कमी-जास्त प्रमाणात गुंतलेल्या आहेत. आपल्या लेखनामध्ये अशा वास्तवातील विशिष्ट व्यक्तींच्या जीवनात खोलवर उतरायचे असल्याने सरोजिनीबाईंनाही इतिहासाच्या

खोल पाण्यात उतरण्याखेरीज गत्यंतर राहिलेले नाही. त्यांना स्वातंत्र्य घेता आले आहे ते मांडणीचेच.

विशिष्ट व्यक्तींच्या आयुष्यात जे जे घडलेले असते ते सर्वच काही भोवतालच्या सामाजिकाचा परिणाम म्हणून घडलेले नसते. डॉ. आत्माराम पांडुरंग ह्यांच्या कन्या माणकबाई ह्यांचा बॅरिस्टर बहादूरजी या पार्शी गृहस्थांशी विवाह होतो ही घटना प्रार्थनासमाजाच्या 'सामाजिका'ने संदर्भित झालेली आहे; पण दोन लहान अपत्यांच्या लागोपाठ झालेल्या निधनातून निर्माण झालेले त्यांचे वेड हे पूर्णपणाने वैयक्तिक म्हणावे लागेल. लेखक एकदा एखाद्या विशिष्ट जीवनात शिरू लागला की, एक घ्यायचे व दुसरे टाळायचे असे त्याला करता येत नाही. 'त्रिशंकू' मधील गोपाळराव जोश्यांचा स्त्रीशिक्षणाचा आग्रह हा सामाजिकतेतून आलेला आहे; पण त्यांचा विक्षिप्तपणा पुष्कळसा वैयक्तिकच आहे, किंवा असे म्हणता येईल की त्यांची सामाजिकता त्यांच्या चमत्कारिक मानसिकेतेने लिप्ताळलेलीच आहे. शिवाय जन्मतः किंवा प्रकृतीने व्यक्तीसुद्धा कमी-अधिक 'सामाजिक' असू शकतात. ज्या व्यक्तिजीवनात सामाजिक संदर्भ अधिक तेवढे त्यांचे जीवनचित्रण सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे. सरोजिनीबाईंनी निवडलेल्या व्यक्तींच्या जीवनात असा सामाजिक संदर्भ कमी-अधिक प्रमाणात आहे; म्हणून या लिखाणाचा विचार करताना त्या आणि आपणही सहजपणेच अनेक अडवणाऱ्या तात्त्विक प्रश्नांशी झुंज खेळत जातो; व्यक्तिविचारातून समाजविचाराकडे नकळतच वळतो.

अशा प्रकारच्या लेखनातील सामाजिकाच्या संदर्भातील ही एक मर्यादा वाचकांनी जशी लक्षात ठेवली पाहिजे तशीच सामाजिक इतिहासाला एक तिसरे 'खोली'चे परिमाण देण्याची त्याची ताकदही लक्षात घ्यायला हवी. सामाजिक महत्त्वाच्या घटना माणसांच्या रोजच्या जीवनात कशा अवतरतात व त्यांच्या सुखदुःखांशी कशा क्रीडा करतात ह्याचा प्रत्यक्ष आणि जिवंत अनुभव आपण इथे घेऊ शकतो. रूढ पद्धतीच्या इतिहासलेखनाला हे परिमाण लाभत नाही.

अशा लेखनाचा यापेक्षा महत्त्वाचा उपयोग म्हणजे इतिहास घडण्याची नेमकी प्रक्रिया त्यामधून कळते. शेवटी समाजात बदल होतात ह्याचा अर्थ ते व्यक्तींच्या व कुटुंबांच्या जीवनातच होतात. व्यक्ती ह्याच अखेरीस वैचारिक व सामाजिक इतिहासाची वाहने असतात.

अशा व्यक्तिकेंद्रित व कुटुंबकेंद्रित लेखनामध्ये फार स्वाभाविकपणेच ललितलेखन पद्धतीला अवसर निर्माण होतो. चरित्र–आत्मचरित्र साहित्यात हे अनेकदा आपण अनुभवतोच. 'संक्रमण'मधील लेखन सरोजिनीबाईंच्या लेखनशैलीने आणि एकेका

लेखासाठी त्यांनी स्वीकारलेल्या विशिष्ट आकृतिबंधामुळे अधिकच रम्य झाले आहे. ही शैली आशयानुरोधाने व त्यांच्या मनातील लेखनसूत्राच्या अनुषंगाने वेगवेगळी मनोज्ञ रूपेही घेते. त्यांचा पहिला 'उपासनेला दृढ चालवावे' हा लेख प्रार्थनासमाज ह्या विषयाच्या अनुरोधाने एका सुप्रशिक्षित संवेदनाशील आणि प्रगल्भ व्यक्तीने वाचकांशी केलेल्या संभाषणांसारखा उद्‌बोधक, वजनदार आणि सुघटित बांधणीचा आहे. 'त्रिशंकू' आणि 'पंचआजोबा' सूक्ष्म अशा मिष्किल शैलीत हळूहळू उलगडत गेलेले आहेत आणि 'त्रिदल' हा गोविंदराव, काशीबाई कानिटकर आणि हरिभाऊ आपटे यांच्या स्नेहसंबंधाबद्दलचा लेख मानवी नातेसंबंधातील लहानसहान सुख दुःखात्मक घटनांचा सूचक भावपूर्णतेने सुंदर वेध घेणारा आहे.... तेव्हा या लेखसमूहाचे वर्णन 'सामाजिक इतिहासातील ललितविहार' असे करावयास हरकत नाही. वेगवेगळ्या काळातील, प्रातिनिधिक कुटुंबचित्रे न्याहाळून समाजशास्त्राची गुंफण करण्याची पद्धती अलीकडे अमेरिकेतील समाजशास्त्रज्ञ विशेष हाताळू लागले आहेत. काहीसा त्यांच्यासारखाच असणारा हा आपल्याकडील एक महत्त्वाचा आविष्कार आहे.

मात्र 'ललितविहार' असे म्हटल्याने निर्माण होणाऱ्या एका संभाव्य गैरसमजाचे निराकरण करावयास हवे. हे लेख वरवरचे किंवा हलकेफुलके नाहीत. त्यांना अभ्यासाचे भरपूर पाठबळ आहे. शिवाय हा अभ्यास नुसता पुस्तकी नाही. सर्व उपलब्ध आणि उपलभ्य पुराव्यांचा छडा लावून, त्यासाठी भ्रमंती करून, एकेका वातावरणात मनाने शिरून त्यांनी हे लेखन सिद्धीला नेलेले आहे. म्हणूनच हे लेख एकाच वेळी आशयसमृद्ध आणि ललितही झालेले आहेत. सरोजिनीबाई प्रार्थनासमाजाच्या इमारतीत पहिल्यांदा शिरतात तेव्हा ती जुनी एकशे सहा वर्षांची वास्तू हस्तांतरित करण्याची पूर्वतयारी चालू असते. त्या वास्तूतील अखेरच्या प्रार्थनेलाही त्या हजर राहतात. ही जड वास्तू नाहीशी होणे हे सरोजिनीबाईंनी प्रार्थनासमाजाच्या हळूहळू वाढतच गेलेल्या चैतन्यहीनतेशी प्रतीकात्मकतेने जोडलेले आहे..एकाच वेळी दोन इमले खचत चालल्याचा प्रत्यय जेव्हा या लेखातील अनेक तपशील जिवंतपणाने देतात तेव्हा वाचकाचे मन उदास होऊन जाते. हा उदासभाव प्रार्थनासमाजिस्टांच्या स्मशानभूमीच्या वर्णनात तर अधिकच गडद होतो. श्री. चंदावरकरांशी बोलताना 'समाजा'शी संबंधित असलेल्या अनेक व्यक्तींचे अनोखे, घरगुती आणि सार्वजनिक स्वरूपाचे तपशील सरोजिनीबाईंना कळतात व त्यांतूनच वाचनातील, स्मृतींतील अनेक तपशिलांची उजळणी त्यांच्या मनात होऊ लागते; मग त्या कधी चंदावरकरांबरोबर तर कधी त्यांच्याशिवाय भूतकाळात मागे जातात; पूरक स्वरूपाची वाङ्मयीन

माहिती हजर करतात आणि परत सहजतेने एखाद्या वर्तमानातल्या किंवा समोर चाललेल्या घटनेकडे येतात. समाजाच्या यशाच्या आणि अपयशाच्या विश्लेषणाचे मधूनच नजर वळविणारे चिंतन या येरझारांत त्यांचे चालूच असते. निरनिराळ्या तसविरींच्या माध्यमातून वाचकाच्या मनावर एक कथानक एखाद्या चित्रपटासारखे मोठ्या देखणेपणाने उमटते. या चित्रपटात सहिष्णू वृत्तीचे न्या. रानडे आहेत; 'भारदस्त पिवळी इंदुरी साडी नेसलेल्या' आणि 'लखलखणाऱ्या हिऱ्याच्या कुड्या घालणाऱ्या' 'मिसेस' वसुंधराबाई चंदावरकर आहेत; अज्ञाताचा वेध घेऊ इच्छिणारे शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस आहेत आणि आपल्या मानलेल्या अंत्यज मुलीचे प्रार्थना-समाजाच्या विधींनुसार कन्यादान करताना गहिवरून अश्रुपात करणारे जयप्रकाश नारायणही... फार अनपेक्षितपणे आहेत.

प्रार्थनासमाजाने एक पुढारलेली, पश्चिमोन्मुख, बहुरंगी आणि उच्चभ्रू खानदान असलेली नवी संस्कृती निर्माण केली; तिने घेतलेली धाव अजूनही भारतीय समाजाला अलभ्यच आहे; पण एखाद्या स्वप्ननगरीसारखी तिच्या ठिकाणी असणारी खुणावणारी आकर्षणशक्ती सरोजिनीबाईंनी वाचकांपर्यंत पुरेपूर पोहोचविलेली आहे. प्रार्थनासमाजाच्या अस्ताविषयीची त्यांची हळहळही विदारकपणे व्यक्त झाली आहे. लेखाच्या शेवटाकडे येताना त्या म्हणतात, 'प्रार्थनासमाज हे आज मुंबईतील एका बसस्टॉपचे नाव आहे'. 'गेली उज्जयिनी'सारखाच व्यथित करणारा हा विचार आहे.

मला विशेष आवडलेल्या या लेखाबद्दल त्यातील लालित्य नीट लक्षात यावे यासाठी मी जरा सविस्तरच लिहिले पण लालित्य हे केवळ ह्याच एका लेखाचे वैशिष्ट्य नाही. पहिल्या चारही लेखांना एखाद्या आभरणासारखे ते व्यापून आहे. सरोजिनीबाईंची लेखणी फार स्वाभाविकपणेच एका समर्थ ललित-गद्य-लेखिकेची लेखणी कशी आहे ते या पुस्तकात प्रकर्षाने लक्षात येते.

'त्रिशंकू' मधील गोपाळराव जोशी हे एक मानसशास्त्रीय आव्हान आहे. त्याचप्रमाणे गेल्या शतकातील गंभीर, सामाजिक नाटकातला गोपाळराव हा एक 'रिलिफ' आहे आणि काहीसा 'व्हिलन'ही आहे. हा गोपाळराव एकदा नीटपणे वाचकांच्या समोर उभा करावा ह्या लेखिकेच्या चाललेल्या धडपडीला यश येत नाही; कारण गोपाळराव पायांनी चालणाऱ्या सामान्य मर्त्य माणसांच्या जगात डोक्यावर चालावे, निदान कोलांट्या उड्या मारीत प्रवास करावा अशी दुर्दम्य प्रेरणा असलेला आहे. गोपाळरावांचा अस्थिरपणा आपल्यालाही एकसारखा अस्थिर करीत राहतो असा त्यांच्याबाबत लेखिकेचा निष्कर्ष आहे. (पृ. ९२) हा अस्थिरपणा खरे म्हणजे,

भोवळ आणणारा आहे. त्याच्यापुढे लेखिकेच्या विश्लेषक लेखणीनेसुद्धा शरणागती पत्करलेली असून ती भोवळ अनुभवणे मोठे मजेचे आहे.

'त्रिदळ' मधील थोडसे विसाव्या शतकावर ओठंगलेले कानिटकर–आपटे-संबंधाचे कुटुंबचित्र पाहताना प्रथम मोकळ्या भावसंबंधातील त्याचे विश्रब्धपण आल्हादकारक रीतीने आपण अनुभवतो आणि अखेरीअखेरीस त्यांच्यात निर्माण झालेल्या दुराव्यामुळे खिन्नही होत जातो. लेख वाचून संपल्यावर स्त्री-पुरुषांच्या कलाविश्वातील निर्मितीशी संबंधित असलेले आणि प्रत्यक्ष जीवनातील मानवी नात्यां-बद्दलचे अनेक प्रश्न आपल्याला घेरून टाकतात.

'संक्रमण' मधील शेवटचे दोन लेख म्हणजे नवे वाङ्मयीन संशोधनच आहे. 'हिंदु-पंच'वर लिहिताना मराठी विनोदाचा प्रारंभ श्री.कृ. कोल्हटकरांच्या 'सुदाम्याचे पोहे' ह्या पुस्तकाच्या आधीचा आहे हे सरोजिनीबाईंनी दाखविलेले असून त्या विनोदाची थोडी चवही वाचकांस दिलेली आहे. प्रारंभीचा हा विनोद बराचसा उथळ, बालिश आणि काहीसा ग्राम्यही आहे. पण तो विनोद काय दर्जाचा आहे यापेक्षा त्याचे विषय काय आहेत हे ध्यानात आणून देऊन सरोजिनीबाईंनी त्यातील काळाचे प्रतिबिंब स्पष्ट केले आहे. नवी राजवट 'कायद्या'ची राजवट आहे हे तिचे नाविन्य तत्कालीनांना उमगले आहे. त्यामुळे पंचआजोबांनी विनोदनिर्मितीसाठी कायदेबाज भाषेचा आधार घेतलेला आहे. 'कॉन्ट्रॅक्ट' हे आधुनिक युगाचेच एक महत्त्वाचे लक्षण आहे. सर हेन्री मेन ह्यांनी 'फ्रॉम स्टेटस टू कॉन्ट्रॅक्ट' ह्या शब्दसंहतीत जगाचा 'मध्ययुग ते अर्वाचीन युग' हा प्रवास अल्पाक्षरबद्ध करून ठेवलेला आहे. हिंदुपंचने हे कराराचे आधुनिक तत्त्व विवाहासारख्या खाजगी व पवित्र व्यवहारात प्रविष्ट करून दिले आहे. ब्रिटिश राज्यामुळे आपण परतंत्र झालो हे खरे; पण एका अत्यंत मूलभूत अर्थाने स्वतंत्रही झालो. हे स्वातंत्र्य अनिर्बंध विचारांचे, रूढि-मुक्ततेचे होते. त्या काळातले विचार-स्वातंत्र्य विचारांच्या रूपाने तत्कालीन गंभीर, वैचारिक वाङ्मयात प्रकट झालेले आहेच. पण वृत्तीतला नवा उत्फुल्लपणा, उन्माद, उल्हास, निर्भयपणा, क्वचित बेडरपणा...आणि कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळण्याचा आचरटपणासुद्धा आविष्कृत झालेला दिसतो तो इथे 'हिंदुपंच'मध्ये कायद्याची भाषा वापरून एक तान्हे मूल आपल्या वडिलांना सॉलिसिटरमार्फत नोटीस देते...त्यांच्या अधीरपणामुळे आपले मातृस्तनातील दूध तुटल्याची तक्रार करते! रामजन्म एका आधुनिक सूतिकागृहात आधुनिक वैद्यकीय उपकरणांच्या साहाय्याने होतो; दहापाच किल्ल्या, चार-पाच अंगठ्या, व कधी प्रसंगी किल्ल्यांसच अडकलेली एक-दोन कुलुपे इतके धरून ठेवण्या-साठी पुरेशी बळकट कातडी जानवी तयार करण्याची जाहिरात, खिस्ती, पारशी व

मुसलमान ह्यांची संयुक्त कंपनी देते. सगळ्यात जहरी घोट आहे तो सटवाबाई या बालविधवेने दिलेला. विधवांच्या दुःस्थितीने न कळवळता वेगळ्याच हिरवटपणाने सटवाबाई स्वतःच्या जगण्याच्या कौशल्याबद्दल बोलतात तेव्हा वाचकांच्या डोळ्यांत चांगले झणझणीत अंजनच घातले जाते !

'पुणे पाठशालापत्रका 'तही येऊ घातलेल्या नवयुगाचा ध्वनी आहे. पण तो प्राधान्याने शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील आहे. त्याचे संपादक कृष्णशास्त्री चिपळूणकर, अठराशे पासष्ट मध्येच जुने ब्रह्म वगैरेविषयीचे ज्ञान व नवे ज्ञान यांमधील फरक स्पष्ट करताना लिहितात, 'तद्विषयी कोट्यावधी वादविवाद करून तरी फळ काय ?... इंद्रियगोचर पदार्थांचे गुण समजून त्यापासून आपली ऐहिक सुखे वाढवावी असा सांप्रतच्या विद्येचा उद्देश आहे.' ही ऐहिकतेची प्रतिष्ठापना 'कीर्तीची आवड' अशा छोट्या निबंधातील लेखकही उचलून धरतो. माणसांच्या सर्व मनोविकारांत त्यांना आयुष्यात पुरुषार्थ करायला लावण्याची प्रेरणा असते या अर्थाचे तत्त्व मध्ययुगीन नीतिशास्त्राच्या चौकटीतून सुटून तो सांगतो.

बर्नार्ड मँडेव्हिल ह्यांनी सतराशे चौदा साली 'ए फेबल ऑफ द बीज' ह्या नावाचे एक रूपक काव्य लिहून 'खाजगी दुर्गुण हे सार्वजनिक सद्गुण असतात' अशा प्रकारचे सूचक प्रतिपादन केले होते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत माणसे स्वार्थी हेतूने व्यवहार करतात पण त्यांच्या क्रियांचा परिणाम परार्थी म्हणजे समाजाच्या हिताचाच होतो ह्या ॲडॅम स्मिथच्या सुप्रसिद्ध विचारसरणीचे मूळ या 'फेबल'शी कधी कधी जोडले जाते. 'कीर्तीची आवड' लिहिणारा लेखक त्याची आठवण करून देतो. पुढील काळातील आपली जीवनदृष्टी ह्याच दिशेने वळलेली आपण अनुभवतोही आहोत.

या काळात ललित निबंधाच्या आणि वाङ्मयीन समीक्षेच्या क्षेत्रात जे नवीन आकाराला येत होते त्याची काहीशी चुणूकही शालापत्रकात कशी दिसते हे सरोजिनीबाईंनी त्यांच्या समीक्षात्मक भाष्यांसह चांगल्या रीतीने स्पष्ट केले आहे. विष्णुशास्त्र्यांच्या 'समुद्र' या सुंदर ललितनिबंधातील आत्मपरता काहीशी त्रुटित स्वरूपात प्रगटते; कारण त्यातील 'मी' पुरेसा मोकळा झालेलाच नसतो ... हे मोकळे होणे त्यांच्या दृष्टीने नव्या राजवटीत सुरू झालेल्या सामाजिक प्रक्रियेचाच एक भाग असते; छंद आणि अलंकार ह्यांच्याशी निगडित असणारी मुळची पंडिती काव्यपरंपरा बदलण्यासाठी कृष्णशास्त्र्यांनी शिक्षकांचे केलेले उद्बोधन वाचताना पुढील केशवसुत युगाची चाहूल वाचकाला ऐकू आल्याखेरीज राहात नाही... इंग्रजी साहित्याच्या वाचनाचा कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री या पितापुत्रांच्या वाङ्मयीन अभिरुचीवर झालेला परिणाम त्यांच्या समीक्षा-लेखनात स्पष्टपणे आढळतो. 'काव्यातील अर्थ उपयुक्त किंवा

बोधपर असला तर असेल परंतु तो तसा असलाच पाहिजे असा नियम नाही' (पृ. १६१) असे सांगून शालापत्रकाने अगदी आजच्या अशा एका जिवंत वादातच प्रवेश केलेला आहे.

'संक्रमण'मधील समाजविचारविषयक लेख वाचताना एक गोष्ट मनावर ठसते ती अशी की, प्रबोधनाच्या प्रारंभकाळातील विचारवंत वृत्तीने धार्मिक आणि सश्रद्ध आहेत; निदान असे म्हणता येईल की, आपली धर्मश्रद्धा ते मोकळेपणाने जाहीर करतात. आजच्या सर्वच विचारवंतांच्या मनातून धर्म समूळ नाहीसा झाला आहे असे नाही; पण धार्मिक असणे म्हणजे प्रतिगामी किंवा विज्ञानपूर्व युगातील असणे अशी भावना असल्यामुळे तिची उघड कबुली देणे काहीसे अप्रतिष्ठेचे गणले गेले आहे. (मात्र धार्मिक भावनाच मनात नसणाऱ्या विचारवंतांचे प्रमाण आज आधीच्या शतकातल्यापेक्षा मोठे आहे असेही म्हणता येईल.)

आपल्या समाजाची ऐहिक अवनती ज्यांना व्यथित करीत होती त्या सर्वांचीच अशी खात्री होती की, आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी धर्मभावनेची गरज आहे. हिंदुधर्म अधिक विशुद्ध करून समाजपरिवर्तन करता येईल असे काहींना वाटत होते तर हिंदुधर्म त्यागून आणि ख्रिस्तीधर्म स्वीकारूनच ते परिवर्तन साध्य होईल असे काहींचे मत होते. पण दोन्ही प्रकारच्या मंडळींना धर्माचे अधिष्ठान ही गोष्ट आवश्यकच वाटली होती.

आज समाजसुधारणेचा पाया धर्म नसून सार्वजनिक स्वरूपाची व म्हणूनच धर्मातीत अशी मानवी मूल्ये आहेत असे समजले जाते. विचारवंतांच्या मनोवृत्तीत आणि सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याच्या दृष्टीत हा जो मध्यंतरी फरक पडला त्याची बरीचशी कारणे सांगता येतात. एक तर त्या काळात विज्ञानयुगाचा भारतात केवळ प्रारंभच झालेला होता. पुढे सृष्टीची रहस्ये जसजशी अधिक खुली झाली तसतशी धर्मभावनेची पीछेहाट होत गेली. मार्क्सवादाचा, एकोणिसशे सतराच्या रशियन साम्यवादी क्रांतीनंतर जो परिणाम झाला त्यातून 'धर्मविचार हे शोषित वर्गाच्या हातातील एक हत्यार' ही कल्पना विचारवंतांमधे प्रसृत झाली आणि तिचाही प्रभाव पडला. (ही मीमांसा सर्वसामान्य जनतेने मान्य केलेली आहे असे मात्र नाही.) आणखी एक कारण या पुस्तकातील लेखांतून प्रगट झालेले आहे. ते अनेक बाजूंनी विचाराला चालना देणारे आहे.

ब्रिटिश राजवटीबरोबर जे एक सांस्कृतिक आक्रमणही झालेले होते त्याचा एक भाग ख्रिश्चन धर्माचे आक्रमण हा होता. सरोजिनीबाईंच्या पहिल्या तीनही लेखांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे त्या आक्रमणाचे प्रतिध्वनी उमटलेले आहेत. प्रार्थनासमाज

ही ख्रिश्चन धर्माच्या छापेतून निर्माण झालेली प्रतिक्रिया होती तर हिंदू-ख्रिस्ती यांमधील समर हा पंडिता रमाबाईंच्या चरित्रातील जीवनाची व कार्याची दिशा आणि दशा बदलून टाकणाराच घटक झालेला आहे. गोपाळराव जोशी ख्रिस्ती आणि हिंदुधर्माच्या गड-सासवडात लोंबकळून त्रिशंकुत्व पावलेले आहेत. अशा रीतीने धार्मिक आक्रमणाच्या काळात धार्मिक भावना अधिक प्रज्वलित व्हावी हे साहजिकच म्हणायला हवे. परंतु ख्रिस्ती धर्माच्या आक्रमणाचे हे वातावरण क्षणभर मनातून काढून टाकून त्या आणि आजच्या काळाचा विचार केल्यास असेही लक्षात येते की मानवी जीविताची अशाश्वतता ही माणसाला धर्मभावनेकडे वळविणारी एक फार महत्त्वाची गोष्ट आहे. जुन्या काळात अनेक तेजस्वी माणसे अल्पायुषी होऊन गेली हे आपणास माहीत आहेच. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी आपला 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' बयाच्या चाळिसाव्या वर्षी लिहिला आणि तो मी 'उतारवयात' लिहीत आहे असे म्हटले आहे! व्यक्तिमात्रांची संसारातील अनेक दुःखे आणि धर्मभावना ह्यांचा अगदी स्पष्ट संबंध सरोजिनीबाईंच्या पहिल्या चारही लेखांत पदोपदी जाणवतो. प्रार्थनासमाजिस्ट डॉ. भांडारकर व डॉ. आत्माराम पांडुरंग, ख्रिश्चन पंडिता रमाबाई आणि थिऑसॉफिस्ट काशीबाई कानिटकर धर्मसंबंधीच्या विविध अवस्थांतून जेव्हा जातात तेव्हा ते जाणे त्यांच्या आयुष्यातील सुखदुःखांशी अत्यंत जवळून संबंधित असते. अशाश्वततेवर थोडेसे वर्चस्व मिळताच धर्मभावनेवरही मर्यादा पडत गेल्या असाव्यात. या अशाश्वततेत संवेदनाशील माणसाला जे एकाकीपण वाटत राहते त्याचा पंडिता रमाबाईंच्या आयुष्यातील आलेख त्यांचे चरित्र सविस्तर रीतीने सांगताना सरोजिनीबाईंनी क्षणभरही दृष्टिआड होऊ दिलेला नाही.

धर्मविचारापासून समाजविचारांची फारकत झाली ह्याचे आणखी एक कारण असे दिसते की, धर्मविचारातून नीतिमूल्ये उपपादित करणे विचारवंतांना जरूरीचे वाटेनासे झाले. किंबहुना तशी ती उपपादित करणे बुद्धिवादी दृष्टिकोणाशी विसंगत आहे असे त्यांना दिसून आले. परमेश्वर एक आहे, सर्व माणसे त्याची लेकरे आहेत व म्हणून त्यांच्यात मातृभाव असावा हे उपपादन तर्काला पटणारे नाही. शिवाय सर्वच मानवी मूल्ये परमेश्वरविचारातून निष्पादित होत नाहीत. उलट व्यक्तिस्वातंत्र्यादी मूल्ये आणि सर्वसत्ताधान ईश्वर ह्यांमध्ये विसंगती व विरोधही आढळून येतो. आजच्या बुद्धिवादी मंडळींनी विचाराचे हे वळण स्वीकारलेले आहे.

धर्मसापेक्ष समाजविचार करावयाचा म्हटले की तो साहजिकच एखाद्या विशिष्ट धर्माच्या चौकटीत म्हणजेच एका विशिष्ट समाजगटापुरता होणार. प्रबोधनाच्या पूर्वसूरींनी हा विचार हिंदुधर्माच्या चौकटीत राहून केला; कारण हे सर्व नवे विचारवंत

बव्हंशी हिंदू होते व भारत हा हिंदुबहुसंख्याक असलेलाच देश होता (व आहेही); पण पुढे स्वातंत्र्यलढ्याच्या काळात वेगवेगळ्या धार्मिक गटांच्या ऐक्याची जरूर भासत गेली व त्या अनुरोधाने एक सर्वसमावेशक राष्ट्रवादाचा विचार साकारत गेला. मग हिंदूंचा वेगळा, मुसलमानांचा वेगळा असा विचार करणे निषिद्ध ठरू लागले. हे निषिद्धत्व, हे परिवर्तन, एका दृष्टीने फारसे फलदायी ठरलेले नाही असे मला वाटते. वैश्विक मूल्यांच्या आधारे परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न हा काहीसा निर्वात पोकळीत केलेल्या प्रयोगासारखा असतो. उलट अशा प्रयत्नाला एखाद्या विशिष्ट धार्मिक समूहाच्या चौकटीत काम करावयास लावले तर तो अधिक फलदायी होतो. कोणत्याही समूहाची संघटितता ही अंतर्गत ऐकात्म्यावर व समतेवर अवलंबून असते; अंतर्गत सामाजिक किंवा आर्थिक विषमता जेवढी कमी तेवढी समाजाची शक्ती मोठी; ही शक्ती वाढविण्यासाठी अंतर्गत अन्यायनिर्मूलनाचे आवाहन केले तर त्या अन्यायनिर्मूलनाच्या प्रयत्नामागे धर्माचे आणखी एक बळ उभे राहते. उदाहरण घेऊन असे म्हणता येईल की, अस्पृश्यता हा मानव्यावरील कलंक तर आहेच; पण हिंदू समाजाने शक्तिशाली बनावयास हवे आणि त्यासाठी अस्पृश्यता नाहीशी होणे अवश्य आहे असेही प्रतिपादन केले तर अस्पृश्यता-निवारणाच्या प्रयत्नांना अधिक धार येते; येणे शक्य आहे. हिंदू समाज म्हणून वेगळा संघटित करणे म्हणजे भारतीय राष्ट्रवादाच्या मार्गात अडसर आणणे ही समजूत अकारणच करून घेण्यात आलेली आहे. ह्याबाबतीतला एकोणिसाव्या शतकातील सुधारकांचा दृष्टिकोण जास्त उपयुक्त व अनुकरणीय आहे असे मला वाटते. ह्यामुळे पुन्हा एकदा अंधश्रद्धा, कर्मकांड, अवैज्ञानिकता ह्यांना आमंत्रण होईल का? या प्रश्नाला असे उत्तर देणे शक्य आहे की, समाजपरिवर्तनात 'हे किंवा ते' असे परस्परव्यावर्तक पर्याय सहसा कार्यान्वित होत नाहीत. कोणत्याही विशिष्ट काळातील समाजविषयक दृष्टिकोणात श्रद्धा आणि विवेकवाद ह्यांचे मिश्रण असते. हे मिश्रण बदलून अधिक विवेकोन्मुख करीत राहणे हाच परिवर्तनाचा व्यवहार्य मार्ग ठरतो.

हा व्यवहार्य मार्ग आज त्याज्य ठरतो आहे हे चिंतनीय आहे.

दुसरा एक व्यवहार्य मार्ग पूर्णपणाने बुद्धिवादी व विवेकवादी असणाऱ्या आगरकरांनी पंडिता रमाबाईंची साथसंगत सोडताना आत्मविसंगती पत्करून स्वीकारलेला आपल्याला स्पष्टपणाने दिसतो. पंडिता रमाबाईंनी व्यक्तिगत रीतीने केलेल्या ख्रिस्ती धर्माच्या स्वीकाराला व्यक्तिस्वातंत्र्याच्या मुद्द्यावर त्यांची हरकत नव्हती; परंतु त्यांच्या संस्थेत ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कार्य चालावे हे त्यांना (व इतर धार्मिक वृत्तीच्या सुधारकांनाही) अमान्य होते. शारदासदनाचा निरोप घेताना आगरकरांनी केलेले विधान

असे आहे. 'मुमुक्षू मर्त्यांनी धर्मावाचून मरू नये हे खरोखरीच इष्ट असल्यास 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' हे गीतावचनातील रहस्य आम्हास पूर्णपणे मान्य आहे.' (पृ. ५८) – म्हणजे प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य आहे परंतु तिच्या उद्धाराची दिशा आणि शक्यता तिला जन्मतः प्राप्त झालेल्या धर्माच्या चौकटीत तिने अवलंबावयाची आहे !

– आगरकरांच्या या दृष्टिकोणाचाही अधिक विचार व्हायला हवा असे मला वाटते.

या संदर्भातच सरोजिनीबाईंचे पंडिता रमाबाईंच्या आयुष्यातील नाट्यासंबंधीचे विवेचन अनेक प्रश्न उपस्थित करणारे परंतु त्याची उत्तरे कधी सुचविणारे तर कधी फार संदिग्ध असलेले असे झाले आहे. अंगीकृत कार्याच्या दृष्टीने ख्रिस्ती धर्मप्रचाराची भूमिका हानिकारक आहे हे पंडिताबाईंच्या स्वत:च्या ध्यानात यावयास हवे होते. दुःखी स्त्रियांची सेवा करणे एवढेच त्यांचे कार्य नव्हते तर स्त्रियांमध्ये व एकूण समाजामध्येच प्रबोधन घडवून आणणे हे होते. पण हे कार्य बाजूला सारूनत्या तथाकथित नीच वर्णीयांकडे, तळागाळाकडे वळल्या. या निर्माण झालेल्या स्थितीबद्दल लेखिकेने इतरांना दोष देण्याऐवजी रमाबाईनाच दोष द्यावयास हवा. किंवा रमाबाईंच्या त्या दृष्टिकोणामुळे कार्यहानी झाली नाही व त्यांची भूमिका चुकीची ठरली असे स्पष्टपणे तिने म्हणावयास हवे. रमाबाईंनी स्वधर्मप्रचार करावयाचे टाळले असते तर एक नवीन अभूतपूर्व प्रयोग, कदाचित साकार झाला असता. ख्रिस्ती धर्माचे भारतीयत्व रमाबाईंनी गृहीत धरलेले होते. पण भारतात सर्वसमावेशक अशी जी भारतीय म्हणून परंपरा आहे ती (असल्यास) बहुसंख्याक असलेल्या हिंदूंचीच नाही का? त्या हिंदू परंपरेचा वाससुद्धा नको म्हणून रमाबाईंनी बायबलचे भाषांतर करताना 'परमेश्वर' किंवा 'पुत्र' हे शब्द हिंदू कल्पनांनी संपृक्त आहेत म्हणून टाळले आणि त्याऐवजी 'येहोवा' व 'मुलगा' असे शब्द वापरले. या विषयाचा समारोप करताना सरोजिनीबाईंच एक वाक्य लिहून गेलेल्या आहेत – 'एखाद्या भूमीची नकोशी परंपरा नाकारताना तेथील हवामान बदलण्याचा प्रयोग करण्यासारखेच हे अस्वाभाविक कृत्य होते.'. (पृ. ६५) याहून अधिक चांगले शब्द या प्रयोगाच्या वर्णनासाठी वापरणे कठीण आहे. परंपरा बदलावयाची असते आणि राखावयाची असते. एक परंपरा पूर्णपणाने उद्ध्वस्त करून दुसरी तिच्या जागी आणून ठेवण्याचे प्रयोग मुळातच अपयशी किंवा कालांतराने अस्थिर होतात. कारण परंपरा तोडणे ह्याचा अर्थ अस्मितेवर आघात करणे असा होतो व अस्मिता संपुष्टात आली की सुधारणाच काय कोणतेच चलनवलन कठीण होते. ह्याच अर्थाने काहीशा विरोधाभासात्मक शब्दांत असे म्हटले गेले आहे की 'परंपरेशिवाय आधुनिकता अशक्य आहे'.

परंपरा मोडावयाचीही असते पण किती मोडल्यावर ती परंपरा म्हणून राहते आणि किती मोडल्यावर ती राहात नाही ह्याचा अंदाज आणि विवेक त्या त्या परिस्थितीतील समाजधुरिणांनी करावयाचा असतो. रमाबाईंचा याबाबतचा अंदाज चुकलेला आहे एवढे म्हणावयास हवे.

मनात विचार असा येतो की रानडे, भांडारकर, रमाबाई ही सगळीच माणसे धार्मिक खरी, पण त्यांच्या धार्मिकपणाच्या जाती वेगवेगळ्या असल्या पाहिजेत. रमाबाईंचे वडील त्या सोळा वर्षांच्या असताना अन्नान्नदशेत वारले, सहा महिन्यांनी आई गेली व त्यानंतर थोड्याच दिवसांनी बहीण निवर्तली (पृ. ३०) यानंतर सहा वर्षांनी बंधू श्रीनिवासशास्त्री आणि पती मेधावी मृत्यू पावले. म्हणजे सात-आठ वर्षांच्या अवधीत आणि तेविसावे वर्ष संपण्याच्या आत, आपले सगळे आप्त काळाआड झाल्याच्या अवस्थेत रमाबाई रिक्त हातांनी व रिक्त मनाने एकट्या उभ्या आहेत. शिवाय ह्या वेळेपर्यंतचा त्यांचा सर्व जीवनप्रवास दारिद्र्याच्या आणि तज्जन्य दुःखांच्या खाईमधून झालेला आहे. मनाच्या ह्या अवस्थेत त्यांना त्यांचा करुणासागर जीझस भेटला आणि आर्ततेने त्यांनी त्याचे चरण कवटाळले अशी खरी वस्तुस्थिती असावी ही ईश्वरतृष्णा म्हणजेच (फ्रॉयडियन) पितृतृष्णा, वाढत्या वयात लौकिकाच्या अतीत जावी हे साहजिक दिसते. मग शेवटी नुसताच खिस्त राहिला आणि खिस्तीपणाचा अंगभूत लौकिक अंश अशी ' सेवा ' तो कायम राहिली. प्रबोधन आणि उत्थापन हातातून निसटून गेले. रानड्यांसारख्यांची लौकिकता व व्यवहारदृष्टी अभंग राहिली आणि ' थंड गोळ्याला ऊब ' आणण्याचा त्यांचा प्रवृत्तिवाद अखंडित चालू राहिला; उलट रमाबाईंची धार्मिकता त्यांना येशूचरणी निवृत्त करती झाली.

आपण आपल्या ' सामाजिक ' अपेक्षा माणसांवर लादीत असतो; पण त्या-त्या व्यक्तींचे 'सामाजिक' असे अनेकदा त्यांच्या ' खाजगी 'नेच नियमित झालेले असते. समाजशास्त्राचा हाही एक शिकवण्याजोगा धडा म्हणावयास हवा.

ज्या बाबतीत आजचा हिंदू समाज त्या काळाशी सातत्य राखून आहे ती म्हणजे सरोजिनीबाईंनी उल्लेखिलेली त्याची ' बधिरता '. रमाबाईंच्या धर्मांतराबाबत आणि धर्मप्रसाराबाबत सनातनी हिंदूंनी खूप आदळ-आपट केली आणि सुधारकांनीही विरोध दर्शविला, पण स्त्रीबंधमुक्ततेचे रमाबाईंचे जे कार्य होते त्याच्याकडे दुर्लक्ष केले. " रमाबाईंचे जे काम चालू राहिले त्याकडे व त्यांच्याकडेही हिंदू समाजाने एक खिस्ती धर्मप्रसार करणारी बाई एवढ्याच नजरेने पाहिले. किंबहुना त्यांच्या खिस्ती धर्मप्रचाराकडेही जेवढ्या गंभीरपणे पाहायला हवे होते तेवढे पाहिले नाही. रमाबाईंना मध्यम, उच्च वर्गीयांपासून दूर करून त्यांची ताकद आपण काढून घेतली आहे या

समाधानात हिंदू पुन्हा एकदा त्यांच्या मूळ स्वभावानुसार स्वस्थ राहिले. काही दिवसांपुरतीच जाग आलेला अजगर पुन्हा निद्रिस्त झाला " (पृ. ५९) प्लेगच्या दिवसांत, दुष्काळाच्या दिवसांत, शेकडो–हजारो भुकेल्यांना रमाबाईंनी आश्रय दिला, पण " रमाबाईंच्या या लोकसेवेत धर्मान्तराचा हेतू होता. " असे समजून ह्याही घटनेची हिंदू समाजाने दखल घेतली नाही (पृ. ६६). " धर्मांतरित होऊन ते जगले त्यापेक्षाही हिंदू धर्मात राहून मेले असते तरीही ह्या सर्वांना ते हुतात्मे झाले असे कदाचित वाटले असते. " अशा जहरी शब्दांत त्या वृत्तीची सरोजिनीबाईंनी संभावना केली आहे. परिणामी रमाबाईंचे कार्य आरंभापासून आतापर्यंतही परदेशी पैशांवरच चाललेले आहे.

ही बधिरता आजही जवळजवळ तशीच चालू आहे. भारतातसर्वत्रच, पण विशेषतः महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश ह्या राज्यांत आज अनेक स्वयंसेवी व्यक्ती किंवा संस्था ग्रामीण भागात, दलित वस्त्यांत, आदिवासी विभागात सेवेची किंवा विकासाची कामे करीत आहेत. एका बाजूने ही खूप दिलासा देणारी गोष्ट आहे आणि हिंदू समाजाच्या मनोवृत्तीत शांतपणे घडून आलेल्या एका क्रांतीची सूचक आहे. पण दुसऱ्या बाजूने पाहता उद्विग्न करणारी गोष्ट म्हणजे ह्यांपैकी कित्येक संस्थांचा संसार आजही परदेशी मदतसंस्थांच्या द्रव्यांवर चालू आहे. (ऑक्सफॅम, स्विसएड, तेरे दस होम्स, सीएए आणि इतर अनेक.) भारतीय किंवा हिंदू धनिक वर्ग या बाबतीत उदासीन आहे.

ह्याचा अर्थ असा की हिंदू समाजाला 'समाजा'चे (कम्युनिटी) स्वरूप त्या काळीही नव्हते आणि आजही नाही. हा समाज जाति-जातींत विच्छिन्न झालेला आहे; एकीची दुसरीशी जवळीक नाही. हिंदू समाजातील उपेक्षित गटांचे लचके त्या काळीही इतर धर्मीयांनी तोडले आणि आजही तोडले जात आहेत. जातिभिन्न हिंदू समाज हे ह्या बधिरतेचे कारण आहे.

जातीचे आणि तदनुषंगिक फुटीरपणाचे हे वास्तव ह्या पुस्तकात इतरत्रही दृग्गोचर होते. प्रार्थनासमाजाला अपयश का आले ? तर त्याची चळवळ वरच्या जातींपुरतीच मर्यादित राहिली. त्याचा व्याप " काही कुटुंबांच्या मिळून बनलेल्या एका मोठ्या कुटुंबाइतपतच विस्तारला. " (पृ. १०) प्रार्थनासमाजिस्टांची वेगळी स्मशानभूमी का ? – असाही सूचक प्रश्न लेखिकेने विचारला आहे (पृ. १२).

हिंदू समाजाच्या संशयित समाज–स्वरूपावर प्रकाश पाडणाऱ्या म्हणून गोपाळराव जोशांच्या काही विचारलहरी उद्धृत करण्यासारख्या आहेत. समुद्रप्रवासाचे वर्णन करताना गोपाळराव म्हणतात : " राहून राहून वाटते अशा मोठ्या बोटी आम्हा

ब्राह्मणांच्या हातात येतील तर वरे! मग आम्ही सर्व ब्राह्मणमय करून टाकू...वाढपे व स्वयंपाकी ब्राह्मणी पोषाख केलेले! व जेवणारी मंडळी सगळी ब्राह्मण! त्या लहान लहान शेंड्या, शुभ्र यज्ञोपवीते, असा दिवस येईल काय? आणि मग सगळे हिंदुस्थान ब्राह्मणमय!" (पृ. ९१) गोपाळराव 'हिंदुमय-' हिंदुस्थान का करून टाकीत नाहीत? कारण असे की जसा ब्राह्मण डोळ्यांपुढे उभा करता येतो तसा प्रातिनिधिक 'हिंदू' उभा करता येत नाही. तसा तो जवळजवळ अस्तित्वात नसतोच. एखाद्या गोष्टीचे 'हिंदूकरण' करायचे म्हणजे काय करायचे ह्या प्रश्नाला तसे सोपे उत्तर नाही. म्हणूनच परधर्मातून एखाद्या माणसाला हिंदुत्वात स्वीकारणे म्हणजे नेमके काय ह्या प्रश्नालाही समाधानकारक उत्तर नाही.

हिंदू समाजाच्या संवेदनाहीनतेचे वर्णन करताना प्रा. माटे म्हणत की म्हशीच्या अंगाला छत्रीच्या टोकाने टोचले तर तिची साधारणपणे एक चौरस इंच कातडी थरथरते, बाकीच्या म्हशीला वेदनेचा पत्ता नसतो; तसे हिंदू समाजाचे आहे. परिणामी हिंदू समाजाच्या प्रगतीचा वेग मंद राहिला आहे. हिंदुत्व म्हणजे मंदत्व हे समीकरण इतके झालेले आहे की, गेल्या पस्तीस-छत्तीस वर्षांतील आपल्या अत्यंत मंद अशा आर्थिक विकासाच्या गतीला नुकतेच दिवंगत झालेले अर्थशास्त्रज्ञ डॉ. राजकृष्ण ह्यांनी 'हिंदु रेट ऑफ ग्रोथ' असे नाव दिले होते!

महाराष्ट्रातील समाजजीवनाचा आजपर्यंत जो विचार झालेला आहे तो प्राधान्याने मराठीच्या प्राध्यापकांनीच केलेला आढळतो. प्रा. श्री. म. माटे, पु. ग. सहस्रबुद्धे, गं. बा. सरदार, रा. शं. वाळिंबे, अ. का. प्रियोळकर, स. गं. मालशे इत्यादींची नावे या संदर्भात वाचकांना लगेचच आठवतील. प्रा. सरोजिनी वैद्य यांनी त्या समृद्ध दालनात एका वेगळ्या आणि मनोरम प्रवेशद्वारातून दमदारपणे प्रवेश केलेला आहे. साहित्य व समाजेतिहासाच्या अभ्यासकांनी त्यांच्या त्या प्रवेशाचे पूर्वीच स्वागत केलेले आहे. आता समग्र आणि व्यापक समाजेतिहासाचे दर्शन घडविण्याच्या दिशेने त्यांनी पावले वळवली तर मला आश्चर्य वाटणार नाही. ते त्यांच्याकडून अपेक्षित आहेच.

१६ जून १९८५

स. ह. देशपां

पूर्वप्रसिद्धी

उपासनेला दृढ चालवावे
महाराष्ट्र टाइम्स्, दिवाळी अंक १९८१

एका सामाजिक शोकनाट्याची नायिका
मौज दिवाळी अंक १९७०

त्रिशंकू
'दीपावली' दिवाळी अंक १९७८

त्रिदल
सत्यकथा, एप्रिल १९८०

पंचआजोबा
ललित दिवाळी अंक १९७८

पुणे पाठशाळापत्रक
अप्रकाशित १९८०



श्री. ग. ल. चंदावरकर

१

उपासनेला दृढ चालवावे

प्रार्थनासमाजाच्या बसस्टॉपवर उतरून मी तिच्या इमारतीपाशी पोहोचले तेव्हा वेळ रविवार संध्याकाळची पाच-साडेपाचची होती. रस्त्यावरच्या दुथडी वाहणाऱ्या गर्दीस पार करीत इमारतीच्या एकच फळी उघड्या असलेल्या दरवाजाशी मी आले तेव्हा तिथल्या शांतपणाने मला अगदी हायसे वाटले. भोवतालच्या वेगाने धावत सुटलेल्या जगात आणि कर्णकटू कोलाहलात अशी एखादी शांत जागा इतक्या जवळपास असेल असे वाटलेही नव्हते. थोडीशी दबकत, आत कोणा माणसाची चाहूल लागते का ते पाहात, मी दरवाजाच्या फटीतूनच आतल्या सभागृहात आले सभागृह लहानसेच होते. पण तीन बाजूंच्या भिंतींना लागून असलेली सुंदर काळी-कुळकुळीत शिसवी लाकडाची नक्षीदार गॅलरी आणि समोरच्या एका भिंतीजवळ असलेली शुभ्र संगमरवरी वेदी यांमुळे भव्यतेचा भास चांगलाच तयार होत होता. वेदीपाठीमागच्या रंगीत काचांच्या खिडक्यांतून झिरपणाऱ्या मंद संधिप्रकाशात ती जुनी वास्तू माझ्या मनाला अगदी गूढ आणि गंभीर वाटली. थोडा वेळ आत उभे राहिल्यावर हळूहळू अंधारातील आणखीही गोष्टी नजरेला स्पष्ट होऊ लागल्या. कोपऱ्यात सरकवलेली चार सहा आडवी बाके, भिंतीला लागून असलेली पुस्तकांची तीन-चार कपाटे आणि एखाद्या शाळेच्या सभागृहात लिहिलेली असावीत तशी चोहोबाजूंना दिसणारी सुवाच्य अक्षरांतील बोधवचने—'आचार्य देवो भव।', 'अमुचे ते धन। भगवंताचे नाम।', 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु।'

शाळेच्या वयात अशी बोधवचने कधी मी हौसेने वाचली होती की नाही ते मला आज आठवत नाही; पण अलीकडे-अलीकडे ते सरळ, भाबडे, सुविचार अगदी अधाशासारखे वाचत असते. ते अस्वस्थ करतात आणि अंगावर निर्मळ पाण्याचा

शिडकावा व्हावा असे ताजेतवानेही करतात...

खाली तळमजल्यावर कोणीतरी आल्याची चाहूल वरच्या मजल्यावर असलेल्या कार्यालयाला बहुधा लागली असावी. वरच्या गॅलरीत एक प्रौढ गृहस्थ येऊन उभे राहिले. 'साहेब वरती आहेत. वरतीच या तुम्ही' शांत आवाजात खाली पाहात ते हणाले. त्यांचे ते वाक्य मंदिरात घुमून कसे गंभीरपणे ऐकू आले! सामुदायिक प्रार्थनेला खरेच चांगली जागा आहे ही!

वरच्या मजल्यावर नेणारा कोपऱ्यातला अर्धचंद्राकृती लाकडी जिना अंधारात थोडासा चाचपडतच चढून मी वरच्या गॅलरीत आले तेव्हा पुन्हा एकदा तळमजल्यावरच्या त्या वेदीकडे माझे लक्ष गेले. आता ती अधिकच समग्रतेने दिसत होती. मध्यावर एक रिकामी, ऐसपैस अशी काळीभोर नक्षीदार खुर्ची, तिच्यासमोर थोडे उंच, शुभ्र संगमरवरी टेबल आणि त्या दोहोंच्या भोवताली तीन बाजूंनी उभा केलेला तसाच शुभ्र नक्षीदार संगमरवरी कठडा...साधकांच्या सान्निध्यात उपासकाच्या मनाला आपल्या जीवननिष्ठांचा विचार आणि उच्चार करताना येणारे एकात्मपण आणि अलिप्तपणाही...

याच वेदीपाशी उभे राहून शंभराहून अधिक वर्षांपूर्वी डॉ. आत्माराम पांडुरंग, न्यायमूर्ती म. गो. रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर, वामन आबाजी मोडक यांनी धर्मचिंतन केलेले, सामुदायिक प्रार्थना म्हटलेल्या आणि विशिष्ट समारंभानिमित्त उपासना चालवलेल्या...याच वेदीच्या आसपास नुकतीच अक्षरओळख होऊ लागलेल्या स्त्रियांनी स्त्रीजीवनस्थितीसंबंधात आपले तोडके-मोडके विचार भीत भीत कसेबसे मांडलेले; इथेच डॉ. सखाराम अर्जुनांनी 'ग्रहण कसे लागते' व 'मुलांचे आरोग्य कसे सांभाळावे' हे स्त्री-पुरुषांना समजावून दिलेले, इथेच काही विधवा-पुनर्विवाहांची खलबते झालेली व ब्राह्म पद्धतीने विवाहही लागलेले; या वेदीच्या साक्षीनेच बाबू प्रतापचंद्र मुजुमदार यांनी बंगालचे आणि महाराष्ट्राचे नाते जोडताना ब्राह्मोसमाजाच्या संस्थापकांचा—राजा राममोहन रॉय यांचा—महिमा वर्णन करून सांगितलेला...इथेच सर्वांगीण सांस्कृतिक जीवनाचा अंतर्मुखतेने विचार करताना ऋषीसमान भांडारकर-रानड्यांसारख्यांकडून परमेश्वराच्या व्यापक आणि निराकार स्वरूपाला अंतश्चक्षूंनी पाहण्याचा यत्न झालेला...तशी आजच्या काळाच्या तुलनेने ही एक लहानशीच वस्तू आणि वास्तू पण आपल्या सामाजिक जीवनात गतानुगतिकतेने जगू न इच्छिणाऱ्या इंग्रजी अमदानीतील, अनेक लहानथोरांच्या मानसिक संघर्षांची महत्त्वाची साक्षीदार असलेली व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकासात विशुद्ध धर्मविचाराचे स्थान प्राणभूत महत्त्वाचे आहे असे गृहीत धरून 'हिंदू प्रॉटेस्टंट चळवळ' उभी राहावी यासाठी दीर्घकाळ धडपडलेली...

कार्यालयातील मोठ्या टेबलाशी, प्रार्थनासमाजाचे आजचे वयोवृद्ध अध्यक्ष

एकटेच काही पत्रव्यवहार पाहात बसलेले होते. ते श्री. ग. ल. चंदावरकर असावेत हे मी तर्कानेच जाणले. आज सकाळीच फोनवरून 'सुबोधपत्रिके'च्या काही अंकांची चौकशी मी त्यांच्याकडे केली होती आणि ते वाचण्याकरता, संध्याकाळी, त्यांच्या सांगण्यावरून, इथे येऊन ठेपले होते. श्री. चंदावरकरांच्या टेबलावर मला हव्या असलेल्या अंकांच्या फायली आधीच आणून नीटनेटक्या, एकावर एक ठेवल्या गेलेल्या दिसत होत्या. अगदी लखलखीत गोऱ्यापान रंगाचे, बंद गळ्याचा पांढरा स्वच्छ शॉर्ट कोट घातलेले आणि नितळ रेखीव चेहऱ्यावर विशेष खानदानी रुबाब असलेले चंदावरकर रूपाला शोभेशा अदबीने, मोठ्या मृदू आवाजात माझी चौकशी करीत होते आणि मला हवी होती ती माहितीही सांगत होते, त्यांच्या वागण्या-बोलण्यात पाश्चात्त्य पद्धतीची औपचारिकता आणि अभिजात भारतीय रीतिरिवाज यांचे अगदी अनौपचारिक वाटावे असे सहज मिश्रण होते. गेल्या शतकातल्या वैशिष्ट्यपूर्ण 'प्रार्थनासमाजिस्टांचा' मनोमन प्रत्यय देणारे प्रार्थनासमाजाचे हे आजचे एक प्रतिनिधी, या समाजाचे अध्यक्ष. शिवाय सुबोधपत्रिका या शंभराहून अधिक वर्षे चाललेल्या प्रार्थनासमाजाच्या मुखपत्राचे श्री. चंदावरकर हे संपादकही आहेत. सध्या प्रतिकूल परिस्थितीत वर्षातून काही ठरावीक अंक सायक्लोस्टाईल स्वरूपात ते काढतात आणि प्रार्थनासमाजिस्टांच्या व समाजाच्या हितचिंतकांच्या घरी आपली चालू असलेली शैक्षणिक, धार्मिक कामे कोठपर्यंत आलेली आहेत हे आत्मीयतेने कळवीत राहतात... 'हे देवाचे कार्य' — या भावनेने.

संध्याकाळच्या त्या पहिल्या बैठकीत माझे काम जसे आटोपले नाही तसेच चंदावरकरांचे समाज व समाजिस्ट मंडळी यांच्याबद्दलचे सांगणेही संपले नाही. थोड्याच वेळात तेथे श्री. चंदावरकरांच्या पत्नीही आल्या. रुंद चेहऱ्याच्या आणि उंच-निंच अंगकाठी असलेल्या गोऱ्यापान रंगाच्या मिसेस वसुंधराबाई चंदावरकरांच्या अंगावर भारदस्त पिवळी इंदुरी नऊवारी साडी होती, कानात लखलखणाऱ्या हिऱ्याच्या कुड्या होत्या आणि मोठ्या अंबाड्यावर माळलेली पिवळ्या टपोऱ्या गुलाबाची सुंदर फुलेही होती. त्यांना पाहताच चरित्रग्रंथातून दिसलेल्या सर नारायण चंदावरकर, सर विठ्ठल चंदावरकर यांच्या घरातील लेडी लक्ष्मीबाई, लेडी विद्यागौरी इत्यादींची मला पटकनच आठवण झाली. ग. ल. चंदावरकर हे सर नारायणांचे पुतणे आणि सर विठ्ठलांच्या—आपल्या चुलतभावाच्या—सहवासात लहानाचे मोठे झालेले! ब्रिटिश अमदानीत अशा काही प्रतिष्ठित कुटुंबांनी निर्माण केलेली एक वेगळीच संस्कृती मुंबई-कलकत्त्यात होती. पूर्व-पश्चिमेचा संगम साधीत घडविलेली त्यांची अशी एक वेगळी शान असलेली जीवनपद्धतीही होती. ग. ल. आणि वसुंधराबाई पुष्कळसे त्या वातावरणातले आणि जन्मभर शिक्षणव्यवसायातच राहिल्या-मुळे थोडेसे त्याबाहेर पडलेलेही.

...त्या संध्याकाळी सौ. चंदावरकर संध्याकाळच्या सामुदायिक प्रार्थनेसाठीच मंदिरात आलेल्या होत्या. त्यांच्या पाठोपाठ आणखी पाचसात प्रौढ–वृद्ध स्त्री-पुरुषही आले. मग आम्ही सर्वजण खालच्या सभागृहात आलो. कार्यालयाच्या थोड्या वेळापूर्वी भेटलेल्या प्रौढ सेवकाने आता खालची बाके नीट लावून, हार्मोनियमची पेटी टेबलावर काढून ठेवलेली होती. व्यासपीठावरील फुलदाणीत शुभ्र फुले खोचली होती. श्री. चंदावरकरांनी वेदीच्या खालच्या बाजूला ठेवलेल्या खुर्चीवर बसून उपासनेला सुरुवात केली. प्रथम शांतपणे डोळे झाकून उद्‌बोधनाचे पद झाले, आवाहन झाले, प्रभुस्तवन झाले आणि नंतर समाजाने प्रसिद्ध केलेले प्रार्थनासंगीताचे पुस्तक काढून एकेक पृष्ठ–क्रमांक सांगत ते त्या गीताचे चरण सांगू लागले. आवाजातील कंपाला सुरेलपणापेक्षा शांत मनःपूर्वकतेची जोड होती. समोरच्या मंडळींच्या हातातही पुस्तके होती. 'हृदया धाव रसभरे। जेथे परमेश्वर नित्य सखा तव। प्रिय सुखकर रे' या गीताच्या ध्रुपदाशी गीत म्हणणाऱ्या सर्वांचा दबलेला आवाज थोडा अधिक खुला होत होता. गीत प्राच्यविद्याविशारद डॉ. भांडारकरांचे होते...

प्रार्थना मनापासून चालली होती; पण वारकरी भजनासारखी किंवा कीर्तनासारखी ती रंगत नव्हती. मी होते त्या वेळेपर्यंत तरी हॉलमध्ये ती तेवढीच पाच–सात माणसे होती...कसले तरी सुनेपण सगळीकडेच जाणवत होते.

सुबोधपत्रिकेचे अंक वाचण्यासाठी प्रार्थनासमाजात मग आणखीही काही वेळा माझे जाणे झाले. वाचनाइतकीच चंदावरकरांच्या तोंडून नाट्यमय हकीगती ऐकण्याचीही मला गोडी वाटू लागलेली होती. पुष्कळ जुने जुने फोटो, जुनी पुस्तके आणि जुन्या परिचित व्यक्तींचे काही नवे संदर्भ त्यांच्याकडे पाहायला–ऐकायला मिळत होते. एक दिवस तर श्री. चंदावरकरांनी माझ्यासमोरच्या टेबलावर लहानशी दागिन्यांची पेटी ठेवावी तशी वस्त्रात गुंडाळलेली एक मखमली पेटीच ठेवली. ती उघडीत ते म्हणाले, एका काचेच्या लॉकेटमध्ये घालून या पेटीत राजा राममोहन रॉय यांच्या केसांची एक बट ठेवलेली आहे. राममोहन १८८३ साली इंग्लंडमध्ये वारले. तिथे कारपेन्टर या नावाचे युनिटेरियन पंथाचे एक ख्रिस्ती धर्मोपदेशक होते. आपल्या भारतातील स्त्रीशिक्षणाशी जवळून संबंधित असलेल्या मेरी कारपेन्टरचे ते वडील! (१८०७–१८७७) राममोहनांचे दफन करण्यापूर्वी त्यांच्या केसाची ही बट पाश्चात्त्य पद्धतीनुसार कारपेन्टर कुटुंबाने स्मृतिचिन्ह म्हणून कापून घेतली होती. आमच्या प्रार्थनासमाजाचे एक मिशनरी विठ्ठल रामजी शिंदे जेव्हा १८९८–९९मध्ये इंग्लंडला गेलेले होते तेव्हा या कारपेन्टर कुटुंबाशी त्यांचा स्नेह जुळला. त्यांनी विठ्ठल रामजींना हे लॉकेट भारतात नेण्यासाठी दिले. त्याच सुमारास आमच्या प्रार्थना-समाजाच्या डॉक्टर कृष्णाबाई केळवकर याही तिकडे गेलेल्या होत्या. राममोहनांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी त्या ब्रिस्टलला जाऊन आल्या हे विठ्ठल रामजींना

त्यांच्याकडून कळले तेव्हा त्यांची श्रद्धा ओळखून त्यांनी ते लॉकेट कृष्णाबाईंना दिले. पुढे कालांतराने वार्धक्यावस्थेत आलेल्या कृष्णाबाईंनी ही ठेव ब्राह्मसमाजाचा आणि प्रार्थनासमाजाचा संबंध जाणून जपून ठेवण्यासाठी माझ्या हाती सोपवली.

आपल्या तळहातावर राजा राममोहन रॉय यांच्या मस्तकावरचे केस ? क्षणभर माझे सर्वांग केवळ थरारून गेले ! राममोहनांचा जन्म पेशवाईच्या अस्तापूर्वीचा, १७७२ मधला. म्हणजे थोरले माधवराव पेशवे यांच्या काळातला. त्यांच्या बंगाल-मधील कार्यापासूनच भारताच्या इतिहासातील आधुनिक कालखंडाचा प्रारंभ होतो असे इतिहासकारांनी लिहिलेले ! बेंटिंगकडून सतीबंदीचा मनुष्यत्वाला साजेसा कायदा घडवून आणणारा हा माणूस ! या सुंदर सोनेरी किनारीच्या काचेच्या लॉकेटमधील वस्तूला स्पर्श करताना आपले हात किती दूरवर पोहोचत आहेत याची माझ्या मनाला कल्पना करता येईना ! प्रवास करीत करीत गंगोत्री–जम्नोत्रीपर्यंत पोहोचणाऱ्या यात्रेकरूला त्या उगमापाशी पोहोचल्यावर जे भरभरून येत असेल तसेच काही मलाही होत होते. शिवाय गतकाळातील वस्तू फोटो आणि हस्ताक्षरादी गोष्टींपेक्षा माणसाचे केस केवढे जिवंत वाटतात हे मला त्याक्षणी पहिल्यांदाच कळत होते. भुऱ्या रंगाची मऊ केसांची ती गोलाकृती बट काचेच्या आच्छादनामुळे जेवढी जवळची तेवढीच दूरचीही होती.

—गिरगावातील प्रार्थनासमाजाच्या आसपास गेल्या शतकात कोण कुठे राहात होते ते चंदावरकरांनी असेच एक दिवस मला एका झपाट्यात समजावून सांगितले ! आपल्या वसायच्या खुर्चीच्या मागेच खिडकीबाहेर हात दाखवीत ते म्हणाले...'आज गिरगावात जिथं बॉम्बे बुक डेपो आहे त्याच्याजवळ मामा परमानंद राहात. त्यांच्या घरासमोर शंकर पांडुरंग पंडित राहात. परमानंदांच्या वरच्या मजल्यावर त्यांचे भाचे बाबण बापू कोरगावकर राहात, (मध्येच सर चंदावरकर त्या वेळी खोताच्या वाडीत राहात होते.) रॉक्सी सिनेमा आहे तिथे माडगावकर आणि विठ्ठलभाई पटेल रोडवर श्रीधरपंत भांडारकर हे डॉ. भांडारकरांचे चिरंजीव आणि त्याच्याजवळच राम बाळकृष्ण यांचा बंगला !—हे दादोबा पांडुरंगांबरोबर परमहंससभा स्थापन करण्यात होते; पण दुर्दैवाने अल्पायुषी झाले. पुढे त्यांच्या कुटुंबाकडे डॉ. आत्मारामांनी चांगलं लक्ष दिलं...दादोबा ठाकुरद्वाराशी राहात—समोर शंकरशेठ, पण त्यांचा प्रार्थनासमाजाशी तसा प्रत्यक्ष संबंध नव्हता...'

गिरगावच्या आजच्या गिचमिड गर्दीतही आपली घरे चंदावरकरांना अगदी स्पष्टपणे दिसतात ! प्रार्थनासमाज हे एक विशाल कुटुंबच होतं. गेली काही वर्षे 'गुरुकुल' संस्थेच्या निमित्ताने आठवड्यातील काही दिवस चंदावरकर लोणावळ्याला असतात. तिथेही सुधारक आणि प्रार्थनासमाजिस्ट मंडळींनी असेच शेजारी शेजारी प्लॉटस घेऊन आपली एक वसाहतच उभी केलेली होती ! वरचेवर येणाऱ्या प्लेगच्या

साथीमुळे आणि उन्हाळ्याच्या दिवसांत मिळणाऱ्या सुट्यांमध्ये कुठेतरी जाऊन राहावे असे वाटायचे तेव्हा ही मंडळी बहुधा खंडाळा–लोणावळ्यातच एकत्र भेटत असत. भांडारकर बंधू, रानडे, तेलंग, चंदावरकर, वाळ मंगेश वागळे, कीर्तिकर आणि काहीजण प्रार्थनासमाजाचे सभासद नसलेलेही. सगळे सुधारक वर्गातले, अत्यंत विद्वान आणि मुख्य म्हणजे सदैव विविधप्रकारे कार्यमग्न. सकाळ–संध्याकाळ फिरण्याच्या निमित्ताने जेव्हा एका ठरलेल्या जागी हे 'बंधू' एकत्र भेटत तेव्हा ज्या चर्चा होत त्याही त्यांच्या अनेकविध कार्यासंबंधातच असत. सर नारायण चंदावरकरांचे चरित्रकार द्वा. गो. वैद्य यांनी नारायणरावांनी त्या वेळची डायरीत टिपलेली काही संभाषणे जशीच्या तशीच त्या चरित्राच्या अखेरीस दिलेली आहेत...

एकदा प्रार्थनेसंबंधी बोलणे चालले असताना वयोवृद्ध डॉ. रामकृष्ण भांडारकर सर नारायणांना म्हणाले, 'संसारातील विकट प्रसंगामुळे दुःखाचा माझ्या मनावर पगडा असतो तेव्हा 'हा तो नव्हे काही निराशेचा ठाव' व इंदुप्रकाश प्रतीतील ह्याच्यापूर्वीचे सहा-सात अभंग ह्यांच्याद्वारे मनाला कितीतरी शांती आणि समाधान प्राप्त होते!...आता तुम्हीच माझ्या आजच्या स्थितीकडे पाहा. मी आता लोणावळ्याला आलो आहे आणि ह्या घरात एकटाच राहतो आहे, ह्याच माझ्या घरात काही वर्षांपूर्वी मी, माझे कुटुंब, माझे मुलगे, मुली, त्यांची मुलेबाळे अशी राहात होतो. पाहा, आता माझे कुटुंब गेले, माझी ज्येष्ठ कन्या निवर्तली, माझा ज्येष्ठ पुत्रही माझ्या समोर गेला...हे विचार मनात आले म्हणजे ते (मन) दुःखाने व्याप्त होते, पण देवाचा विचार मनात आला, त्याला शरण गेलो, त्याची प्रार्थना केली म्हणजे मनाला शांती प्राप्त होते असा माझा अनुभव आहे.'

भांडारकरांचे हे उद्‌गार प्रौढ चंदावरकरांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. कारण एका प्रगल्भ मनाने केलेले ते अनुभवकथन त्यांनाही चिंतनीय वाटत होते...'मनुष्यजात सकल। स्वभावतः भजनशील' असे ज्ञानेश्वरांनी म्हटलेच आहे.

सर्व प्रार्थनासमाजिस्टांना संतसाहित्य विशेष प्रिय होते. प्रार्थनासमाजाची चळवळ म्हणजे 'नव्या भागवत धर्माची चळवळ' असे न्या. रानड्यांनी म्हटले होते. समाजानेच माडगावकरांची ज्ञानेश्वरी, शंकर पांडुरंग पंडितांची तुकारामाची गाथा' सुशिक्षितांच्या घरी पोहोचवली होती आणि पुण्याच्या प्रार्थनासमाजाने तर अर्थदृष्ट्या सोपा दिसणारा तुकारामासारखा कवी वस्तुतः तसा सोपा नाही हे जाणून एक 'तुकाराम चर्चा मंडळ'ही काढले होते. उपनिषदांतील विचारांचा अनुवाद ज्या पद्धतीने संतकवितेत झाला तिचा मोह वाटणाऱ्या भांडारकर–रानडे यांनी प्रार्थनासमाजाचे नाव 'ब्राह्मोसमाज' करायचे नाकारले होते ते या संतांच्या कार्याच्या आधारावर! मात्र हे नवे वारकरी सुटाबुटात, वावरणारे, पुष्कळसे इंग्रजीतूनच लेखन-वाचन करणारे, इंग्रज माणसांच्या बरोबरीने जबाबदारीच्या आणि मानाच्या

जागांवर काम करणारे, उत्तरकाळात कारणपरत्वे परदेशच्या वाऱ्या करणारे असल्याने हातात टाळ-चिपळ्या घेत होते ते फक्त 'उपासना' चालवीत असतानाच! महाराष्ट्रातील निरक्षर बहुजनांमध्ये त्यांच्यातील एक होऊन, जीवनक्रम बदलून वावरणे त्यांना शक्यच नव्हते. म्हणून आपले प्रचारकार्य करण्यासाठी त्यांनी 'मिशनरी' नेमले. 'समाजा'ला दरमहा पगाराच्या दोन टक्के रक्कम आयुष्यभर दिली. पण लोकमानसात ग्यानबा-तुकारामांसह त्यांचे नाव काही जोडले गेले नाही!

ब्राह्मोसमाजापासून स्फूर्ती घेऊन निघालेल्या प्रार्थनासमाजाने प्रारंभापासूनच एकेश्वरी भूमिकेला आणि अमूर्ताच्या उपासनेला स्वीकारलेले होते. अशी पहिली प्रार्थना त्यांनी केली होती ती डॉ. आत्माराम पांडुरंगांच्या दवाखान्यात (३१ मार्च १८६७). समाज-स्थापनेसाठी निवडलेला दिवस हा पापमोचनी एकादशीचा दिवस होता–!

अगदी ह्याच प्रारंभकालातील एका प्रार्थनेचा वृत्तान्त त्या काळच्या 'ज्ञानोदयात' आलेला आहे. कारण सर्व धर्मीयांना तिथे खुला प्रवेश होता. संपादक मि. शाहूराव कुकडे स्वतःच प्रार्थनेस हजर होते. ख्रिश्चन चर्चमधील प्रार्थनेच्या तुलनेने पाहताना भिकोबा चव्हाणांनी चालविलेली ती काहीशी अनौपचारिक पद्धतीची उपासना त्यांना फारच खटकली. चारचौघांसारखे धोतर, अंगारखा, पागोटे घालणारे भंडारी जातीचे चव्हाण समाजिस्टांमध्ये त्यांच्या ईश्वरनिष्ठेमुळे अधिकारी मानले गेलेले होते आणि पुढे तर सर्व लहान-थोरांकडून ते 'आचार्य' म्हणूनही गौरविले गेले. पण शाहूरावांनी त्यांच्याबद्दल लिहिले—'हे काम चालविण्याकरिता ह्या जमणाऱ्या मंडळींसारखा कोणी विद्वान, सुधारक, बजनदार मनुष्य नेमावा... पूर्वोक्त भंडारी मनुष्य असल्या मंडळीत शोभत नाही! जो व्याख्यान देतो तोही पोशाख, भाषण वगैरे गोष्टींनी संभावीत असला पाहिजे.' प्रार्थनासमाजिस्टांनी या टीकेकडे दुर्लक्ष केले. बाह्यरूप पोशाख, जात, भाषा या सर्वांपलीकडे जाऊन अंतरीचा अधिकार महत्त्वाचा आहे हे ओळखून ते भक्तीचा वसा घेत होते. 'बाह्य भलतैसे असावे। परि अंतर भगवंती लावावे।' असे तुकारामाप्रमाणे त्यांनाही वाटत होते. मात्र त्या 'भलतैसे' मध्ये पूर्णपणे पाश्चात्त्य पोशाखही वर्ज्य नव्हता, ख्रिश्चनांचे अनुकरण त्यांना नको होते, पण खाईस्ट हवा होता. त्याची माणुसकीला जाग आणणारी वचने हिंदू समाजजीवनातील नेमक्या उणिवांवर बोट ठेवीत होती.

पण या परिस्थितीतूनच प्रार्थनासमाजाच्या जन्मापासून त्याचे दोन विरोधकही जन्माला आले होते. मुलींनी सुस्वर गळ्यांनी पदे म्हणणे, एका उपदेशकाने सर्वांसाठी प्रार्थना करणे, शेवटी 'तथास्तु' म्हणणे हे सर्व सुधारलेल्या लोकांच्या बाष्कळ पोरचेष्टांत जमा करून 'ज्ञानप्रकाश' ने इशारा दिला होता की, हा ख्रिश्चन धर्माकडे जाण्याचा एक मार्गच आहे. आणि रूढिग्रस्त हिंदू धर्माचे सुधारलेले प्रार्थनासमाजी

रूप पाहताना हा आपल्या धर्मप्रसारातील अडथळाच वाटत राहिल्याने ख्रिश्चनांनी मात्र इशारा दिला होता की, प्रार्थनासमाज हा नवसुशिक्षितांचा ख्रिश्चन धर्मस्वीकार टाळण्यासाठी आलेला एक पर्याय आहे. तो 'खरा मार्ग' शोधणारांची भूक कधीही भागवू शकणार नाही...

वरचेवर अशा लहानमोठ्या वादंगाच्या वादळात सापडणाऱ्या प्रार्थनासमाजाला तत्त्वज्ञान आणि आचारधर्मासंबंधात एक निश्चित रूप घेणे आवश्यकच होते. त्या अभावी उपासना चालविणारी व्यक्ती कधी श्रावणी करणे आवश्यक आहे असे सांगत होती, तर कधी ज्ञानोबा–तुकोबांची 'सुंदर ते ध्यान' वर्णन करणारी मूर्तिपूजाही व्यासपीठावरून गौरवीत होती! प्रार्थनासमाजाला संतसाहित्य हवे होते, पण त्याच्या नव्या धर्मदृष्टीशी सुसंगत असेल तेवढेच हवे होते. त्यासाठी काही अभंगांतील मूर्तिपूजादी तत्त्वांचा संदर्भ असलेले शब्द वगळून प्रार्थनेमध्ये त्याचा अंतर्भाव केला जात होता. असे करण्यात रानडे–भांडारकरांसारख्या ऐतिहासिक दृष्टीने धर्मविषयाचा अभ्यास केलेल्या मंडळींना काही गैरही वाटत नव्हते. धर्म ही माणसाच्या अत्यंत स्वाभाविक गरजेतून निर्माण झालेली गोष्ट असून ती वेळोवेळी मूलतः नसली तरी बाह्यतः पुष्कळ बदलत गेलेली गोष्ट आहे हे मान्य करून ह्याच काळात रानड्यांनी 'A Theist's Confession of Faith' हे पुस्तक लिहिले. पुस्तकाच्या प्रारंभीच रानड्यांनी म्हटले आहे की जगाच्या सर्व भागात आज ज्या एकेश्वर मताच्या धर्मसंस्था उदय पावत आहेत, त्या भविष्यकाळी प्रचलित होणाऱ्या सार्वत्रिक धर्माची पूर्वचिन्हेच आहेत. डॉ. भांडारकरांनी प्रार्थनासमाजाच्या नव्या भागवत धर्माचे प्रतिज्ञापत्रक तयार करण्यात आणि वेळोवेळी निर्माण झालेल्या धर्मकर्मविषयक शंकांचे निरसन करण्यात हयातभर निष्ठेने साह्य केले. त्याद्वारे सर्व ब्रह्मांड निर्माण करणारा एकमेवाद्वितीय परमेश्वर व त्याच्या मानसिक उपासनेतून इह–परलोकी साधणारे 'शुभ' त्यांनी गौरवून सांगितले. ईश्वराचे पितृत्व आणि माणसाचे भ्रातृत्व सांगताना हिंदूंची अवतारकल्पनेची ईश्वरनिर्मित धर्मग्रंथांची समजूत साहजिकच त्यांनी खोडून काढली. त्यांच्यामुळे एका विशिष्ट तात्त्विक भूमिकेच्या बाबतीत कागदोपत्री प्रार्थनासमाजाला स्थैर्य आले. पण पुढील काळात महाराष्ट्रात प्रार्थनासमाजाच्या तात्त्विक भूमिकेची फारशी चिकित्सा कोणीच केली नाही! कारण सुशिक्षितांमधील अधार्मिकता, नास्तिकता आणि ख्रिस्तीधर्मप्रसार या तिहींनाही थोडाफार आळा घालावयास तो उपयुक्त ठरत गेल्याचे परंपरावादी मंडळींनी जाणले! चर्चा झाली ती प्रार्थनासमाजिस्टांच्या आचरणाची आणि जीवितक्रमाची!

...कधी न्या. रानड्यांनी विधवेशी पुनर्विवाह करण्याची संधी चालून आलेली असताना एका अल्पवयीन कुमारिकेशी विवाह केला, हे चर्चेचे कारण, तर कधी वाळीत पडण्याचे प्रसंग ओढवले असता भित्रेपणाने प्रायश्चित्ते घेतली हे कारण! कधी

THANA SAMAJ प्रार्थना समाज
RAM MOHAN ENGLISH SCHOOL
राम मोहन इंग्लिश स्कूल

उच्चपदस्थ प्रार्थनासमाजिस्टांची ब्रिटिश विरोधात–टिळकांच्या जहाल राजकारणाच्या काळात व्यक्त झालेली मवाळ राजकीय भूमिका हेही कारण !

त्या प्रसिद्ध हकिगती सांगता–सांगता एक दिवस चंदावरकरांनी मला सांगितले, आपल्या तत्त्वानुसार कृती व्हावी म्हणून सर्व सभासदांनी एकत्र राहावे किंवा जवळ जवळ राहावे असाही विचार एकदा झाला होता; पण तोही प्रत्यक्षात आला नाही. 'नारायणी घडे जेणे अंतराय। हो का बाप माय। त्याजावे ते।' ही वृत्ती असणारे सभासद अगदी हाताच्या बोटावर मोजावे एवढेच होते. प्रार्थनासमाजाचा मूर्तिपूजेला विरोध म्हणून आमच्यातील एका सभासदाने वडिलांच्या पूजेच्या देव्हाऱ्यात पादत्राणे नेऊन ठेवली ! पण अशांचा गौरव कोण करणार ? एका पुनर्विवाहाची चर्चा रानड्यांच्या अध्यक्षतेखाली चाललेली असताना गजानन भास्कर वैद्यांनी सरळच त्यांना विचारले होते की तुम्हाला अधिकारच काय या सभेचे अध्यक्ष असण्याचा ? रानडे म्हणाले होते की तुम्ही म्हणता ते बरोबरच आहे. हा अधिकार स्वतः पुनर्विवाह केलेल्या सदाशिवराव केळकरांचा आहे...आता हा सदाशिवरावांचा पुनर्विवाहसुद्धा रानड्यांनीच स्वतः लावून दिलेला आणि पुढे जन्मभर पुनर्विवाह चळवळीसाठी कामही केलेले ! अशा गुंतागुंतीची परिस्थिती होती म्हणून उत्तरकाळात गजाननरावांनाच आपण रानड्यांचा अधिक्षेप केला याबद्दल फार वाईट वाटे !

चंदावरकरांचे म्हणणे ऐकताना प्रार्थनासमाजाच्या इतिहासात द्वा. गो. वैद्य यांनी (१९२७) समाजाच्या यशापयशाची केलेली मीमांसाही मला आठवत होती. मूर्तिपूजा करावयाची नाही हे समाजाचे पहिलेच प्रतिपाद्य बहुतांशी सभासदांना आपल्याला कुटुंबात स्वीकारता आलेले नव्हते. बहुतेकांचे वागणे वडील पिढीच्या नावाखाली यावावत दुहेरीच होते. स्त्रीशिक्षणाच्या कार्याला सभासदांनी जे महत्त्व दिले त्याचा उत्तम परिणाम समाजजीवनात दिसला. पण त्याच हिरीरीने जातिभेदाचा विचारमात्र त्यांच्याकडून झाला नाही. बऱ्याच सभासदांच्या घरातील विवाहसंबंध सामाजिक, आर्थिक दर्जा, जात, गोत्र, प्रवर पाहूनच होत राहिले. अज्ञान, अनास्था दूर करण्यासाठी जी प्रचारकार्याची मोहीम प्रार्थनासमाजाच्या मिशनऱ्यांनी सुरू केली होती, ती पैशाच्या अभावी कधीच पुरती जीव धरू शकली नाही. काहींनी अस्पृश्यांसाठी रात्रीच्या शाळा चालविल्या, वसतिगृहे काढली पण त्याचा शिक्षणापलीकडे देवधर्म, समाजविषयक विचारांमध्ये स्थित्यंतर होण्याइतपत दृश्य असा परिणाम झाला नाही. समाजाने नव्या धर्मकल्पनेसाठी नवे संस्कारविधी तयार केलेले होते तेही सभासदांनी कटाक्षाने पाळले नाहीत. म्हणून ते बाहेरच्या समाजातही रुजले नाहीत. सारांश इतकाच की प्रार्थनासमाजाची तत्त्वे काही कुटुंबांपुरती राहिली आणि समाजात अगदी मूलभूत स्वरूपाचे धार्मिक, मानसिक स्थित्यंतर घडवून आणण्याच्या प्रेरणेतून जन्मलेल्या या संस्थेचा व्याप काही कुटुंबांच्या मिळून बनलेल्या एका

मोठ्या कुटुंबाइतपतच फक्त विस्तारला. काहींनी कौटुंबिक प्रार्थनासुद्धा काही दिवसच केल्या. सामुदायिक प्रार्थना करताना परमेश्वरावरील श्रद्धा बळकट होईल आणि नीतिमूल्यांचा उत्कर्ष होऊन विशिष्ट सामाजिक ध्येयवाद असणारे एकजिनसी समाज-मन तयार होऊ लागेल अशी अपेक्षा होती. पण सामुदायिक प्रार्थनेस प्रथमपासूनच फार थोडी माणसे येत गेली. रानडे-भांडारकरांच्या उपासनांनाही गर्दी करून लोक आले ते त्यांचे माहितीपूर्ण विवेचन ऐकण्यासाठी, त्यांच्या विचारांचे आचरण करण्यासाठी नाही. मात्र द्वा. गो. वैद्यांसारख्या एका निष्ठावंत प्रार्थनासमाजिस्टाने खंतीने केलेले हे परखड आत्मपरीक्षण 'अद्यापही समाजाचे अवतारकार्य संपलेच नाही,' या भावनेतून पुस्तकात मांडले गेलेले आहे!

कुठेही प्रार्थनासमाजाचे नाव निघाले की डॉ. आत्माराम, वा. बा. नवरंगे, वा. आ. मोडक, सर नारायण चंदावरकर व स. पां. केळकर अशा काही थोड्याच लोकांची नावे 'बोले तैसा चाले' या वृत्तीची माणसे म्हणून घेतली जात असतात. एक दिवस चंदावरकरांनी मला यांपैकी काही माणसांचे मोठे विलक्षण असे दर्शन घडविले...

भर दुपारची बाराची वेळ आहे. दिवस पावसाळ्याचे आहेत. त्यामुळे थोड्या वेळापूर्वी बरसून गेलेले आकाश अजूनही अभ्राच्छादित आहे. एका उंच टेकडीवरील स्मशानभूमीत मध्यभागी मी आहे आणि लहानमोठ्या आकारांच्या काही संगमरवरी स्मृतिशिला, अनेक लहानथोरांचे पार्थिव अवशेष आपल्या उरात सांभाळून माझ्या अवतीभोवती उभ्या आहेत. ओल्या ओल्या हिरव्या झुडुपांचे आणि पांढऱ्या तांबड्या नेवाळीच्या, जास्वंदीच्या फुलांचे मंद वास हवेत दरवळलेले आहेत.

प्रार्थनासमाजिस्ट चंदावरकरांच्याबरोबर मी या ठिकाणी आले आहे. आपण एखाद्या स्मशानभूमीत आहोत असे आम्हाला वाटतच नाही. थोडी आडव्या आकाराची बाके इथे असती तर हवा खायला बागेत आलेल्या स्त्री-पुरुषांसारखे आम्ही इथे थोडे टेकलोही असतो...पण हे वाटणे तसे पूर्णपणाने खरे नाही. समोरच्या पेरूच्या झाडाखाली एक भला मोठा पेरू पडलेला आहे, पण तो कोणी उचललेला नाही...ही लहानशी जागाच केवळ स्मशानभूमी आहे असे नाही तर आजूबाजूचा पाच-सहा फर्लांगाचा सगळा परिसरच मुंबई म्युनिसिपालिटीने पूर्वीपासूनच स्मशान-भूमी म्हणून राखून ठेवलेला परिसर आहे. प्रार्थनासमाजिस्टांच्या या स्मशानभूमी-शेजारी चिनी लोकांची, त्याच्या अलीकडे बहाई-अर्मेनियांची आणि त्याच्याही अलीकडे सुनी मुस्लिमांची...आम्ही त्या सगळ्या ओलांडत ओलांडतच टेकडीवरील या उंच जागी येऊन पोहोचलो. प्रत्येकाच्या राखीव जागेभोवती इथेही दिसणारी ती आखीव कुंपणे मनातल्या मनात मला थोडे हसूही आणीत आहेत.

आम्ही जेव्हा Brahmo Burial and Burning Ground अशी फाटकावरची

इंग्रजी पाटी वाचून थांबलो, तेव्हा पायऱ्यांवर लोळत पडलेल्या तीन चार कुत्र्यांनी भुंकून एकच कलकलाट आरंभला. बऱ्याच वर्षांत इकडे कोणी फिरकलेले नसल्याने अशी माणसे येण्याची–जाण्याची सवय त्यांना राहिलेली नसावी! पण फाटकाच्या दाराशी–पत्र्याच्या झोपडीत घर करून राहणाऱ्या पाहरेकऱ्यांनी त्यांच्या 'साहेबांना' ओळखलेले आहे. शांतपणाने आता कुत्री स्मृतिशिलांच्या गारव्याला जाऊन विसावलेली आहेत.

'प्रार्थनासमाजिस्ट' मला एकेक दाखवत, सांगत आहेत; ही समोरची जागा डॉ. आत्माराम पांडुरंग यांच्या कुटुंबातील मंडळींची; डाव्या बाजूला ही इथे नवरंगे, गद्रे, भांडारकर, देवल, मोडक, सिरुर यांची आणि ही उजव्या बाजूला इकडे सर नारायण चंदावरकरांच्या कुटुंबियांची. पलीकडे असलेली शेठ दामोदरदास सुखडवाला, इंदूरचे पाटील यांची...आणि आपण आत आलो तेव्हा डाव्या हाताला पहिली स्मृतिशिला दिसली ती आमच्या प्रार्थनासमाजाचा इतिहास लिहिणाऱ्या आणि सर्वस्वानं समाजासाठी झिजलेल्या द्वारकानाथ गोविंद वैद्य यांची...सुबोधपत्रिकेचं संपादन त्यांनी चाळीस वर्षे केलं तेव्हा शिलेवर सुबोधपत्रिका अशी अक्षरं कोरलेली आहेत. पाहिलीत?...वैद्यांनी आपली विमा पॉलिसीसुद्धा समाजाच्या नावे केली होती. सर नारायणांनी त्यांचं वर्णन 'एक लहान आणि महान मनुष्य' असं केलेलं होतं...

हे ऐकता ऐकता स्वतःच्याही नकळत सराबाने अक्षर वाचत निघालेले माझे डोळे आणखीही काही तपशील टिपू लागलेले आहेत. अनेक शिलांवर फक्त 'ब्रह्मकृपाहि केवलम्' लिहिलेले, तुकारामांची वचने तर बरीच दिसत आहेत. 'ज्याचे निर्मळ अंतर। तेथे राहे विश्वंभर।', 'कृपावंत किती। दीने बहु आवडती। त्यांचा भार वाहे माथा। करी योगक्षेम चिंता।', 'बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले।' पण काहींच्यावर इंग्रजी मजकूरही आहे— 'In the loving memory of... Thy Will Be Done'...

ही सगळी वचने, ही स्मृतिशिलांवरची नावे अनेक संदर्भांना मनात जाग आणणारी आहेत. प्रार्थनासमाजिस्टांशी आतापर्यंत झालेल्या काही गाठीभेटींत त्यांची बरीच उजळणीही झालेली आहे. अशी उजळणी करताना चंदावरकरांना भूतकाळ आणि वर्तमानकाळ एकमेकांपासून विलग करावे लागतच नाहीत. सदैव कार्यरत असणे फक्त ते जाणतात, त्यामुळे एका श्वासात ते जुन्या काळातील डॉ. आत्माराम पांडुरंगाच्या किंवा सर नारायणांच्या घरादाराबद्दल बोलतात आणि दुसऱ्या श्वासात लोणावळ्याच्या आजच्या 'गुरुकुला'बद्दल किंवा पंढरपूरच्या अनाथ बालकाश्रमाबद्दलही बोलतात. काही क्षणी रामकृष्ण गोपाळ भांडारकरांनी काढून दिलेली वैदिक मंत्राची संहिता उच्चारणे, आंतरजातीय–आंतरधर्मीय विवाह लावणारे ते उपाध्याय असतात आणि काही क्षणी वर्डस्वर्थ, टेनिसन, रवींद्रनाथांच्या कविता म्हणून दाखविणारे ते काव्य-

रसिक असतात.

शहरात नव्याने शिकायला आलेल्या एखाद्या मुलाची जेवण्या-राहण्याची व्यवस्था लावता-लावता टेलिफोनवरून शांतपणाने त्यांचे निमंत्रण देणे चाललेले असते, ते परमानंद, माडगावकर, नवरंगे, गद्रे यांच्या नातवा-पणतवांना आणि समाजाच्या इष्टमित्रांना निमंत्रण असते. एकशेसात वर्षांच्या जुन्या प्रार्थनासमाजाच्या इमारतीत काही दिवसांनी होणाऱ्या अखेरच्या प्रार्थनेस उपस्थित राहण्याबद्दल ! एखाद्या बृहत्कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसाप्रमाणे समाजाच्या जुन्या इमारतीच्या संबंधात केलेला नवा व्यवहार मुळीच भावविवश न होता ते त्यांना समजावून सांगत असतात. 'आपली ही इमारत आता बरीच मोडकळीला आली आहे— नव्या होणाऱ्या सहा मजली इमारतीत एक मोठे डिपार्टमेंटल स्टोअर असेल आणि आपल्यासाठी प्रार्थनेचा हॉलही असेल. पण येत्या रविवारची प्रार्थना ही या मंदिरातली अखेरची प्रार्थना आहे. तेव्हा यायचं तुम्ही सर्वांनी. सकाळी आठ वाजता...' पंचाहत्तराव्या वर्षी दिसणारी चंदावरकरांची ही कार्यपद्धती आणि वृत्तीही मला गेल्या शतकातील विशिष्ट जीवन-निष्ठेचा वारसा घेऊन आलेल्या सामाजिक कार्यकर्त्यांचीच वाटते.

स्मशानभूमीमधील त्या संगमरवरी शिला मला ख्रिश्चन धर्मीयांची आठवण अनवरतेने आणतात—येताना फुले आणायला आपण विसरलो, हे त्यामुळेच ओशाळून माझ्या लक्षात येते. दर रविवारची सामुदायिक प्रार्थना, मूर्ती नसलेले मंदिर आणि चर्चमधील आल्टरची आठवण करून देणारी प्रार्थनामंदिरातील ती वेदी झरकन् डोळ्यांपुढून निघून जाते. मालाकार चिपळूणकरांपासून अनेकांनी प्रार्थना-समाजावर ख्रिश्चन धर्माच्या अनुकरणाचा केलेला, वादविषय झालेला आरोप पुन्हा आठवतो.

ही दफनभूमी ? दहनभूमी ? की दोन्ही ? वेगळी कशासाठी ? आपल्याच बांधवां-कडून वाळीत पडल्यास अवशेषांच्या निरवानिरवीची काही सोय असावी म्हणून ? की कलकत्त्याच्या ब्राह्मोसमाजाशी असलेल्या आपुलकीच्या भावनेतून ? की पुढील पिढीला या स्मृतिस्थलाची प्रेरकता वाटावी यासाठी ? हिंदूब्राह्मोंचे हे 'वेगळेपण' माझ्या मनाला अस्वस्थ करते आणि नेहमीच्या परिचित रूढीप्रमाणे तीर्थक्षेत्री न विसावलेले ते अनेक थोरामोठ्यांचे अवशेष खिळवूनही ठेवतात. शिवाय इथे संस्थापकां-पैकी रानडे-भांडारकर तर नसतातच ! चंदावरकरांनाही ह्या गोष्टीचे नेमके स्पष्टीकरण सांगता येत नाही. 'इथे दफन झाले ते फक्त एका व्यक्तीचे-वासुदेव बाबाजी नवरंगे यांचे त्यांनी तसे लिहूनच ठेवले होते (१८२८-१९०७). 'समाजाच्या संस्थापकां'पैकी ते एक. वासुदेवराव लहान होते तेव्हाच त्यांचे वडील संन्यासी होऊन बसलेले होते. घरी गरिबी होती, म्हणून माधुकरी मागून ते शिकले. दादाभाई नौरोजींनी पुढे त्यांना हाताशी धरले. व्यापाराला साह्य केले. ते विलायतेला असताना (१८६३) इंग्लंड-

मधल्या मॉर्गन नावाच्या धातू गाळण्याच्या मुशी तयार करणाऱ्या एका व्यापाऱ्याशी त्यांची ओळख झाली. ते त्या व्यापारात शिरले. परत हिंदुस्थानात आल्यावर त्यांना चांगला पैसा मिळत गेला. १८७० मध्ये कोणा पांडुरंगभटाची मुलगी आणि सदाशिवभटाची गतभर्तृका असलेल्या एका ब्राह्मण विधवा स्त्रीशी त्यांनी ब्राह्म-पद्धतीनं उघडपणे विवाह केला! त्यासाठी खास कलकत्त्याहून या विवाहविधींची माहिती आणवली. पुढे आपल्या पहिल्या मुलाचा पहिला विवाहही त्यांनी विधवेशीच लावून दिला. जुन्या पिढीतील सुप्रसिद्ध डॉक्टर काशीबाई नवरंगे या त्यांच्याच कन्या. नवरंग्यांच्या मृत्यूपूर्वी फक्त काही दिवसच काशीबाईंच्या दवाखान्याचं उद्घाटन झालेलं होतं. काशीबाईंनी आपल्या वडिलांची परंपरा—कृतिशील सुधारणेची—अखेरपर्यंत चालवली. डॉक्टर म्हणून त्यांना जो पैसा मिळाला तो सर्व आसेष्टांच्या आणि प्रार्थनासमाजाच्या भल्यासाठी खर्च झाला. त्यांचं मुंबईतलं घर जाती, धर्म, भाषा व भेदांच्या पलीकडं गेलेलं अगदी वेगळं असं घर होतं. एकेका वेळी दहा-अकरा वेगवेगळी आडनावं असलेली माणसं स्वतःचं घर म्हणूनच त्या घरात राहात. त्यात खिश्चन होते, गुजराथी होते आणि कऱ्हाडे-कोकणस्थ ब्राह्मणही होते. सर्व समाजसंबंधात व्यापक कौटुंबिक भाव असावा हे प्रार्थनासमाजाचं एक स्वप्न असल्यानं बऱ्याच सभासदांची कुटुंबं अशी मोठीच होती. रानडे, भांडारकर, चंदावरकर, स. पां. केळकर...पहिल्यापासूनच आमच्या सभासदांची संख्या काही शेकड्यांतच. एकूण चाहते मात्र हजाराच्या घरात आणि मुख्य म्हणजे तेही सर्व जातिधर्मातले. त्यामुळं घरीदारी पुष्कळच मोकळं वातावरण..' केळकर, पाटील, सुखडवाला, बहादुरजी एकमेकांच्या शेजारी विसावलेले आहेत हे समोरच्या स्मृतिशिला दाखवीत होत्या. एखाद्या सार्वजनिक बागेत पक्ष्यांनी दाणापाणी निवारा मिळावा यासाठी बांधलेली अशी थोडी मोठ्या आकाराची घरे असतात तशाच आकाराचे डॉ. आत्माराम पांडुरंगाच्या घरातील मंडळींचे एक सर्वधर्मीय संगमरवरी घर इथेही दिसत होते. घराच्या दर्शनी भागावर लिहिले होते—Here Repose The Ashes of Dr. Atmaram Pandurang, G. G. M. C., Founder of The Prarthana Samaj (23 Dec. 1823–26 April 1898). आत्माराम यांच्या नावाखाली पत्नीचे नाव व आजूबाजूला घरातील अनेकांच्या जन्ममृत्यूच्या नोंदी. कोणाचे वय अकरा महिने तर कोणाचे नव्वद वर्षे! दुर्गा, राधा, खुशरु, मनू, मिनी अशी नावे...आणि बहादुरजी असे एक पारशी आडनावही!

त्या समाधिगृहाकडे पाहताना मला डॉ. आत्मारामांच्या चरित्राची आठवण झाली. डॉ. आत्माराम हे वैयाकरणी दादोबा पांडुरंगांचे एक धाकटे भाऊ. ग्रँट मेडिकलमधून डॉक्टरांची जी पहिली तुकडी बाहेर पडली त्यातील एक (१८५१). पुढे व्यवसायात पैसाही उत्तम मिळवलेला आणि तसाच सार्वजनिक कार्यासाठी

दानही केलेला. यांच्याच घरात प्रार्थनासमाजाची पहिली बैठक झालेली. आत्मारामांनी आपल्या पत्नीला आणि तीनही मुलींना उत्तम इंग्रजी शिक्षण दिलेले. १८६६ मध्ये मेरी कारपेन्टर इंग्लंडमधून स्त्री-शिक्षणाच्या कार्यासाठी जेव्हा भारतात आली त्या वेळी अगदी दुसऱ्याच दिवशी दुर्गा, अन्नपूर्णा, माणक या तीनही मुलींसह आत्माराम तिला भेटायला गेले होते. साध्या आणि नीटनेटक्या पोशाखातील त्या शाळकरी हिंदू मुली सहजतेने इंग्रजी बोलत होत्या. साता समुद्रापलीकडच्या इंग्लंड-बद्दल कुतूहलाने मेरीला प्रश्न विचारीत होत्या. त्यांच्या या भेटीनंतर मेरीला वाटायला लागले—'भारतातील स्त्रियांच्या मागासलेपणाबद्दलची आपली समजूत चुकीची तर नाही?' पुढील सहा महिन्यांच्या भारत-भ्रमणाच्या काळात तिच्या लक्षात आले की हा केवळ सुखद अपवादच होता!

आत्मारामांची आणि रवींद्रनाथ टागोरांचे मोठे बंधू सत्येंद्रनाथ टागोर यांची मैत्री होती. सतरा वर्षे वयाच्या रवीन्द्रनाथांना इंग्लंडला पहिल्यांदा पाठविण्यापूर्वी इंग्रजी भाषेची व पाश्चात्त्य रीतिरिवाजांची माहिती व्हावी म्हणून याच घरात त्यांनी आणून ठेवलेले होते (१८७८). इथेच रवीन्द्रनाथांना अविस्मरणीय अशी ॲना (अन्नपूर्णा) तर्खड ही एक अवखळ, धीट, कलासंपन्न मैत्रीण भेटली होती. रवींद्र-नाथांनी तिला 'नलिनी' असे नवे नाव देऊन 'शुन। नलिनी खोलो गो आखि।' अशी एक सुंदर कविताही लिहिली होती. ही कविता ॲनाला इतकी आवडली की ती ऐकून ॲना म्हणाली होती, 'Poet, I think that ever if I were on my death bed, your songs would call me back to life...' पण तसे घडायचे नव्हते. ॲनाचे, तिच्या आयरिश नवऱ्याचे आणि त्यांच्या सुंदर मुलीचे फोटो चंदावरकरांच्या संग्रहात मी यापूर्वीच पाहिले होते. आता मी शोधत होते तिथे तिच्या पार्थिव अवशेषांना...पण तर्खड कुटुंबाच्या नामावळीत इथे ॲना हॅरॉल्ड लिट्ल्डेल् दिसत नाही. इथे आहे माणक बहाद्दुरजी. ही आत्मारामांची सर्वांत धाकटी कन्या. आपल्या सर्व परिवारासहच ती इथं राहते आहे. दीर्घायुषी माणक व दीर्घायुषी बहाद्दुरजी आणि त्यांची दोन वर्षे आणि अकरा महिने वयाची दोन अल्पायुषी लहान मुले! या दोन मुलांच्या मृत्यूच्या तारखांमध्ये फक्त चार दिवसांचे अंतर!

माणकबाईची हकीगत सांगताना चंदावरकर म्हणाले, 'माणकबाईही ॲना-सारखीच खूप सुंदर आणि हुशार होती. ती डॉक्टर (L. M. S. L. & C. P.) झाली होती. तिच्याच कॉलेजात बहाद्दुरजी नावाचा एक पारशी मुलगा होता. त्याच्या वकील असलेल्या भावाशी तिची मैत्री जमली होती. प्लेगच्या दिवसांत माणकबाईंनी लोकसेवेचे मोठं काम केलं म्हणून सर जमशेटजीकडून तिला चांदीचं पदकही मिळालं होतं; पण माणकनं आणि बॅ. डी. एम. बहाद्दुरजींनी विवाह करायचं ठरवलं तेव्हा

मात्र पारशी समाजानं त्याला कसून विरोध केला. दोघांनीही विरोधाची पर्वा केली नाही. लग्न केलं. त्यांना दोन सुंदर मुलं झाली, त्यात ते रमून गेले. पण अचानक ती दोन्ही मुलं फक्त चारच दिवसांच्या अंतराने झटकापटकी वारली ! काही घातपात झाला असाही संशय होता. त्यानंतर माणकबाई दुःखानं वेड्याच झाल्या...बॅ. बहादुरजींचं घर मलबार हिलवर होतं...त्यांनी आपल्या पत्नीला शेवटपर्यंत काळजीपूर्वक सांभाळलं, पण कधी कधी वेडाच्या झटक्यात त्या घरातून सकाळी-सकाळीच बडबडत बाहेर पडायच्या; मोकळे केस, अस्ताव्यस्त कपडे आणि हातात कसलीतरी रंगीबेरंगी फुले ! पायवाटेनं चालत-पळत अशा मलबार हिलपासून विल्सन कॉलेजजवळील डॉ. आत्मारामांच्या जुन्या बंगल्यापाशी त्या यायच्या. दारात उभं राहून. बराच वेळ आत पाहायच्या आणि फुलं पायरीशी ठेवून निघून जायच्या !

हे घर या काळापर्यंत कोणा गुजराती माणसाला विकलं गेलेलं होतं. १९६७ मध्ये प्रार्थनासमाजाची शताब्दी झाली तेव्हा मी या गुजराती गृहस्थांना भेटायला गेलो होतो. शताब्दीनिमित्तानं चौपटीवरील बालभवनापासून प्रार्थनासमाजाच्या इमारतीपर्यंत आम्ही एक प्रज्वलित ज्योत मिरवणुकीने आणली. तिथं समाजाची स्थापना झाली, पहिली प्रार्थना झाली, त्या जागेला वंदन करून ही ज्योत आम्ही प्रार्थना-समाजात आणली. आमच्या स्वागताला ते नवे मालक दाराशी हजर होते...गप्पा-गोष्टींत ही हकीगत त्यांच्याकडून कळली. मग मी सांगितलेल्या हकिगतीतून त्यांना सगळा उलगडा झाला. पण तोपर्यंत माणकबाई दिवंगत झालेल्या होत्या...

या घटनेपूर्वीच एकदा बॅ. बहादुरजींना भेटण्याचा योग मला आला होता. अगदी वृद्धापकाळात त्यांचं एक ऑपरेशन व्हायचं ठरलं होतं. ऑपरेशनमध्ये काही बरं-वाईट झाल्यास प्रार्थनासमाजाच्या पद्धतीनं आपलं दहन व्हावं असं त्यांनी मृत्युपत्रात लिहून ठेवलं होतं, त्यामुळे ऑपरेशन होण्यापूर्वीच एक दिवस त्यांचे सॉलिसिटर 'आर. एस्. कॅप्टन आणि वैद्य' कंपनीचे कॅप्टन, मला भेटायला आले. आम्ही दोघे–तिघे इथं अँटॉप हिलवरील या स्मशानभूमीत आलो, पण तोपर्यंत इथं इंडियन ऑईल कंपनीच्या मोठमोठ्या तेलटाक्या उभ्या राहिलेल्या होत्या आणि त्यामुळं प्रेतदहन करायला बंदी झालेली होती. मग आम्ही सर्वजण सोनापूर स्मशानभूमीत गेलो. तिथे फक्त हिंदू धर्मीयांची सोय होती, पारशी व्यक्तीला मज्जाव होता. मग तसेच पुढे कॉर्पोरेशनच्या हेल्थ ऑफिसरला भेटायला गेलो...तो हेल्थ ऑफिसर पारशी निघाला. कोणासाठी ही चौकशी चालली आहे हे त्याला सॉलिसिटर कॅप्टन यांच्याकडून कळताच त्यानं पारशी पंचायतीला बातमी देऊन टाकली ! झालं ! त्यामुळं मी प्रार्थनासमाजात परततो आहे तो पारशी पंचायतीची दहा मंडळी माझ्या कार्यालयात निषेधासाठी दाखल झालेली ! अखेर बॅ. बहादुरजींनीच आम्हाला या संकटातून सोडवलं ! म्हणजे ते त्या ऑपरेशनमधून सुखरूप बाहेर पडले आणि पेच-

प्रसंग टळला ! ते पुढं १९५२ मध्ये दिवंगत झाले. तोपर्यंत सुदैवानं सर्व धर्मीयांना खुली असणारी ' महालक्ष्मी ' मधली स्मशानभूमी तयार झाली होती. बहादूरजींचं दहन तिथं झाल्यानंतर त्यांच्या मृत्युपत्राप्रमाणं त्यांचे अवशेष त्यांच्या दोन लहानग्या मुलांजवळ, इतर तर्खडकर कुटुंबियांसमवेत इथं आम्ही आणून ठेवले...ॲ. बहादूरजींचं हे बागणं अगदी त्यांचे सासरे डॉ. आत्मारामांच्यासारखंच होतं. त्यांनीही आपले मित्र नवरंगे यांना स्वतःच्या अंत्यक्रियेबद्दल सांगून ठेवलं होतं, ' आपल्या वहिवाटीप्रमाणं माझ्या शरीरास ताटीवरून नेऊ नका. एका पेटीत घालून वडाळ्याच्या ब्राह्मो स्मशानभूमीत न्या–तिथं दहन करा आणि प्रेतयात्रेस येणारांनी उघडेबोडके न येता नेहमीप्रमाणे नीटनेटकी वस्त्रे परिधान करून या... '

...बरीच पुढची पण एका विचित्र योगायोगाची हकीगतही तुम्हाला सांगतो. आत्मारामांचा एक मुलगा सुरेन्द्र कुठेतरी नाहीसा झाला होता. त्यांची मुलगी म्हणजे आपल्याकडची एकेकाळची नावाजलेली अभिनेत्री नलिनी तर्खड ! तिने जेव्हा प्रभात फिल्म कंपनीच्या धायबरांशी लग्न केलं तेव्हा आपली आई—ताराबाई हिलाही स्वतःच्या घरी नेलं. पण नलिनी लवकरच वारली. तेव्हा ताराबाईंना कुठं राहावं हे कळेना. काही दिवस त्या त्यांच्या माहेरी गेल्या. तिथून त्यांनी मला मोठ्या संकोचानं एक दिवस पत्र लिहिलं—' माझी कुठे राहण्याची सोय होईल का ? ' असं विचारलं. मी लगेचच त्यांना जाऊन भेटलो. त्या वेळी त्या सत्तरीला आल्या होत्या. प्रार्थनासमाजावरचा त्यांचा कौटुंबिक हक्क मी त्यांना सांगितला आणि पंढरपूरच्या आमच्या वृद्धाश्रमामध्ये त्यांची सोय केली. त्या मला धाकटा भाऊ मानीत. दरवर्षी नारळीपौर्णिमेला न चुकता राखी पाठवीत. आमच्या या आश्रमातच नंतर पाच-सात वर्षांनी त्या वारल्या. '

या हकीगती ऐकताना समोरच्या समाधीवरच्या ' शान्तिः शान्तिः शान्तिः ' या शब्दांचा अर्थ माझ्या मनाला काही वेगळाच कळू लागला आहे. चंदावरकरांच्या चेहेऱ्यावर कर्तव्य चांगल्या रीतीने पार पाडल्याचे कुटुंबप्रमुखाचे समाधान आहे...

डॉ. आत्मारामांचे एक लहानसे चरित्र प्रार्थनासमाजाच्या इतिहासात वाचायला मिळते. धर्मविचाराच्या संदर्भात किती वेगवेगळ्या अवस्थांतून संवेदनाशील मनुष्य जाऊ शकतो याचा प्रत्ययच त्या लहानशा चरित्रात येतो. आत्मारामांच्या लहानपणी त्यांचे मोठे बंधू दादोबा मूर्तिपूजेचा निषेध म्हणून घरातल्या गणपतीच्या आरतीसाठी उपस्थित राहात नसत; तेव्हा आत्मारामांना फार वाईट वाटे. मनातल्या मनात ते म्हणत, ' मला पैसा मिळू लागला म्हणजे चांगली सहा दिवसांची गणपतिपूजा करीत जाईन. ' पण तरुण वयातच दादोबांच्या गुप्तपणे चाललेल्या परमहंससभेत ते सामील झाले आणि कालांतराने तेच कार्य उघडपणे करण्यासाठी प्रार्थनासमाजाची संस्थापना करण्यात त्यांनी धिटाईने भाग घेतला. समाजाचे ते तहहयात अध्यक्षच होते.



प्रार्थनासमाजाचे सभागृह

डॉक्टरी व्यवसायाच्या गडबडीतही त्यांची प्रार्थना कधी चुकली नाही. त्यांच्या डोळ्यादेखत त्यांची गोड, सुंदर, प्रगल्भ मुलगी ॲना गेली आणि इतर दोन मुलगेही गेले. तेव्हा अतीव दुःखाने त्यांच्या पत्नीला काही काळ वेड लागले. मग धर्मांतर न करता पण बायबलचा आधार घेऊन मनःस्वास्थ्य मिळविण्याच्या मागे आत्माराम लागले. मुलांना, मुलींना परदेशात पाठवून शिक्षण देण्यात त्यांचा खूप पैसा खर्च झाला होता तरी उत्तरकाळात प्रॅक्टिस बंद करून, शांतपणाने ते फक्त धर्मकार्य— 'समाजकार्य' करीत राहिले. १८९८ मध्ये ते वारले; तेव्हा बंगालमधल्या प्रतापचंद्र मुजुमदारांनी त्यांच्याविषयी लिहिलं आहे—'डॉ. आत्माराम हे मुंबईतील विविध धर्मीय मंडळींचे एक जिव्हाळ्याचे, वडीलधारे स्नेही होते. मुंबईतील त्यांची पारशी–ख्रिश्चन स्नेही मंडळीसुद्धा त्यांना 'दादा' असे संबोधत. इंग्रजांनी त्यांना शेरीफपद देऊ केले, पण त्यांची राहणी चार सर्वसामान्य हिंदूंसारखीच राहिली. धोतर, कोट, पगडी अशा साध्या पोषाखात ते वावरले. हिंदू पद्धतीच्या ताटवाटीतून जेवले आणि स्वतःच्या कोकणी मातृभाषेतून मोकळेपणाने बोलताना विशेष सुखावले—'That Dada we have lost. Will Bombay be the same? Bombay without him?'

आधुनिक युगाला साजेशा पद्धतीने जगून गेलेला एक उमदा आधुनिक माणूस आज दिसला असे ॲटॉप हिलवरील स्मशानभूमीतून आम्ही परत निघालो तेव्हा माझ्या मनात येत होते. या स्मशानभूमीत अगदी अलीकडे म्हणजे १९७३ मध्ये डहाणू कोसबाडमधील आदिवासींच्या माता झालेल्या शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडकांची स्मृतिशिला उभी राहिलेली आहे. इथे चिरनिद्रा घेत असणारांपैकी ताराबाईंना एकटीलाच मी प्रत्यक्ष असे पाहिले होते. आज त्यांच्या सासर-माहेरच्या सर्व गोतावळ्यासहच त्या इथे भेटल्या असे वाटले; आणि त्यांच्या जीवितकार्याचा वेगळा अन्वयार्थ मनात घुटमळत राहिला...

आमच्या भेटीगाठीत सहज बोलता-बोलता एखाद्या व्यक्तीबद्दल किंवा घटनेबद्दल जे काही बारीकसेच तपशील चंदावरकर मला सांगत असत त्यांचीही मला अनेकदा मोठी मजा वाटायची. प्रार्थनासमाजाच्या वातावरणात तयार झालेल्या सुशिक्षित, व्यक्तित्व-संपन्न स्त्रिया हा असाच त्यांच्या कौतुकाचा एक विषय! शिवाय या विषयाचे माझ्या मनात महाराष्ट्रातील स्त्रीजीवनाच्या विकासाशी नाते होतेच. अशा स्त्रियांची बाह्य जगाला फारशी परिचित नसलेली पण त्यांच्या अंतरंगातील संवेदनशीलता दाखविणारी वैशिष्ट्यपूर्ण भावसृष्टी चंदावरकर मोठ्या तन्मयतेने स्वतःशी घोळवीत आणि अनुभवत मला सांगत. एक दिवस त्यांनी मला विचारलं, 'कल्याणीबाई सय्यद हे नाव कधी तुम्ही ऐकलंय का? त्यांची गोष्ट सांगतो तुम्हाला. या मूळच्या मंगलोरकडच्या सारस्वत कुटुंबातील, 'गोकर्ण' आडनावाच्या. लहान वयात त्यांचं लग्न झालं होतं. तीन मुलं

झाली आणि एवढ्यात यजमान वारले. आता मुलं कशी वाढवायची, हा त्यांना प्रश्न पडला. मग मंगलोरचे एक सामाजिक कार्यकर्ते के. रंगराव यांनी त्यांना मुंबईला पाठवलं; कारण तेव्हा मुंबईत सेवासदनचं काम नुकतचं सुरू झालं होतं. त्या सर नारायण चंदावरकरांकडे आल्या. त्यांनी मुलांची सोय पंढरपूरच्या बालकाश्रमात केली आणि कल्याणीबाईंना नर्सिंगचं शिक्षण घेण्यासाठी पाठवलं. ते झाल्यावर डॉ. अजिक्यांच्या हॉस्पिटलमध्ये त्यांनी काही वर्षे नर्सचं कामही केलं. पुढे त्यांची आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंद्यांची ओळख झाली. महर्षींच्या दलितवर्गासाठी चालू असणाऱ्या कामात त्या शिरल्या. विठ्ठल रामजींचे एक मुस्लिम सहकारी अब्दुल कादर सय्यद हे प्रार्थना-समाजाचे निष्ठावंत अनुयायी होते. कल्याणीबाई आणि अब्दुल सय्यद यांचा प्रेमसंबंध तिथेच जुळला. मग महर्षींनी त्यांचं प्रार्थनासमाजाच्या पद्धतीनं लग्नही लावलं. कल्याणीबाईंना नंतर दोन मुली झाल्या. दिलशाद सय्यद एकीचं नाव ! पुढे तिनं हिंदूशी विवाह केला. कालांतरानं सय्यदांच्या मृत्यूनंतर कल्याणीबाईंनी, सँडहर्स्ट रोडवर कम्युनिस्ट मंडळी एक कम्यून चालवीत असत, तिथंच कार्यकर्त्री म्हणून कायमचं जाऊन राहायचं ठरवलं. त्या कम्यूनमध्येच त्यांचा शेवट झाला. आज कल्याणी-बाईंच्या दोन्ही प्रपंचातील हिंदू-मुस्लिम-हिंदू अशी वारस मंडळी एकमेकांची भांवडे म्हणून समाजात वावरत असतात; प्रसंगी एकत्र जमत असतात. आमच्या एखाद्या प्रार्थनासमाजिस्टांच्या घरी काही समारंभ असला की असे गमतीदार विविधधर्मीय विविध भाषिक मंडळींचे संमेलन तुम्हाला दिसणारच.'

हे दृश्य साठ वर्षांपूर्वीचे की साठ वर्षांनंतरचे ? ते अपवादात्मक असेल पण केवढा सुंदर आणि मोकळा आहे हा अपवाद !

—'अशीच आमच्या कुटुंबातली दुसरी धैर्यशील स्त्री मालिनी खान. ती डॉ. भांडारकरांची नात – मुलीची मुलगी. मालिनी पाणंदीकर तिचं मूळ नाव. तिनं मुसलमानाशी प्रेमविवाह ठरविला तेव्हा महाराष्ट्रात बरीच खळबळ झाली, पण पाणंदीकरांच्या घरातल्या मंडळींनी तिला अजिबातच विरोध केला नाही. मालिनी खान आणि तिचे यजमान – दोघंही–पुढे शिक्षणक्षेत्रात नोकरी करीत होते. नंतर तिच्या दोन्ही मुलींनी भिन्न प्रांतीय हिंदूंशी प्रेमविवाह केले आहेत. काही वर्षांपूर्वीच मालिनी खान वारल्या. तेव्हा त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या मुलीनं—सुरैय्या टंडननं —हिंदू पद्धतीनं त्यांचं दहन केलं. मला मालिनीबाईंनी कळवून ठेवलं होतं की माझ्या मृत्यूची बातमी तुम्हाला कळविली गेली म्हणजे ब्राह्म पद्धतीनं माझं दहन करा. एवढी हकीगत सांगितल्यावर चंदावरकर स्वतःशीच पुटपुटले, 'लहानपणापासूनच अनुभवलेल्या संस्कारामुळं की आधुनिक वैज्ञानिक दृष्टीमुळं त्यांना असं वाटलं ते मला माहीत नाही...'

अद्यापही आंतरधर्मीय विवाह ही कुटुंबाकुटुंबांतून एक स्फोटक गोष्टच आहे.

...प्रार्थनासमाजाच्या या धार्मिक उदारतेचा वारसा अजूनही आपल्या समाजात रुजलेला नाही. आणि त्याचा शंभर वर्षे पुरस्कार करणारा प्रार्थनासमाज मात्र हळूहळू अस्तंगतच होत चाललेला आहे...

चंदावरकर पोशाखाने आणि रूपाने एखाद्या खुज्या इंग्रज माणसासारखे दिसतात. पण त्यांच्या घरातील छायाचित्रांच्या संग्रहात त्यांचे हिंदू उपाध्यायाच्या पोशाखातील फोटो मोठे बघण्यासारखे आहेत. खिस्ती नवरा आणि हिंदू नवरी, पारशी युवक आणि खिस्ती युवती...आपापल्या रूढीप्रमाणे पोशाख करून आलेले; भोवती थोडीशी फुलांची सजावट आणि दोघांच्यामध्ये टोपी-उपरण्याच्या ब्राह्मणी पोशाखातले, कृतार्थ भावनेने आनंदित झालेले, वर–वधूच्या जन्मभाषेमध्ये विवाहाचा अन्वयार्थ समजून सांगणारे ताठ चंदावरकर ! काही वर्षांपूर्वीच जयप्रकाश नारायणांना, मुंबईत आपल्या एका अस्पृश्य मानसकन्येचे लग्न लावायचे होते. लग्न नोंदणीपद्धतीने नको होते. 'विवाहसंस्कार' हवा होता. अचूकपणे प्रार्थनासमाजाची त्यांना आठवण झाली आणि पौरोहित्य करण्यासाठी चंदावरकरच गेले. चंदावरकर गहिवरून सांगत होते— 'कन्यादानाचे मंत्र उच्चारताना हळवे जयप्रकाशजी सारखे अश्रू ढाळत होते. अखेर त्यांना मंत्रोच्चार करता यावा म्हणून मधूनमधून थांबलो मी...'

कुटुंब या समाज-घटकांकडे प्रार्थनासमाजाने विशेष गंभीरपणे लक्ष पुरविल्याने महाराष्ट्रात प्रार्थनासमाजिस्टांचे म्हणून एक वातावरण तयार झालेले आजही कुठे कुठे आपल्याला दिसते. धर्मसंबंधात उदार भूमिका, नीटनेटकी घरेदारे, कलात्मक राहणी, सुशिक्षित स्त्रीपुरुषांचे अधिक मोकळे संबंध अशा काही त्याच्या पटकन लक्षात येणाऱ्या खुणाही असतात. प्रार्थनासमाजिस्ट घर त्यामुळे ओळखू येते. परंतु सामान्यतः हे चित्र आर्थिकदृष्ट्या उच्च मध्यमवर्गीयांतच दिसत असल्यामुळे प्रार्थनासमाजाची सांगड उच्च स्तराशी घातली गेलेली आहे. आजच्या तळागाळातील माणसाचा किंवा कनिष्ठ मध्यमवर्गीयाचा व त्यांचा काही नातेसंबंध नाहीच असे लोक त्यामुळेही मानतात. (सदाशिवराव केळकरांचे कामगारवर्गातील किंवा औद्योगिक क्षेत्रातील कार्य, विठ्ठल रामजींचे दलितोद्धाराचे कार्य आणि वामनराव सोहोनींचे परळ भागातील अस्पृश्यांसंबंधीचे कार्य...हे नव्या युगाची नांदी असावी तसे असूनही...) महाराष्ट्रातील एक चळवळे विचारवंत डॉ. ग. य. चिटणीस यांनी 'माझ्या आठवणी' मध्ये ते जेव्हा प्रार्थनासमाजाचे मिशनरी होते त्या काळातील काही आठवणी सांगितलेल्या आहेत. चिटणीस प्रथम कलकत्त्याच्या ब्राह्मसमाजाचे सभासद होते. प्रार्थनासमाज आणि ब्राह्मसमाज यांचा सगळाच जीवनप्रवास कसा एकसारखा झाला हे त्या आठवणींवरून लक्षात येते. चिटणीस लिहितात, 'ब्राह्मसमाजात मी ज्या वेळी प्रवेश

केला त्या वेळी विचारस्वातंत्र्य हे ब्राह्मधर्माचं मुख्य अधिष्ठान आहे असा माझा समज होता. परंतु पुढं मला आढळून आलं की, ब्राह्मसमाजामध्ये प्रथम जे वैचारिक व सामाजिक क्रांतीचं वारं खेळत होतं ते नंतर समूळ नष्ट झालं; इतकंच नव्हे तर आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या ज्यांची परिस्थिती सर्वस्वी अनुकूल होती, त्यांच्या हातातील ब्राह्मसमाज हे खेळणं बनलं. ब्राह्मधर्मावरील माझा विश्वास उडायला हे बळकट कारण आहे असं म्हणायला हरकत नाही.'

कलकत्त्याहून परतल्यानंतर डॉ. चिटणीस मुंबईच्या प्रार्थनासमाजाचे प्रचारक म्हणून चौदा-पंधरा वर्षे काम करीत होते. ह्या काळात सुबोधपत्रिकेतून ते तत्त्वज्ञानावर लेख लिहीत. देशीविदेशी चालणाऱ्या धर्मचर्चांना उपस्थित राहात आणि दुष्काळ, संप आदी प्रसंगी साह्य करण्याची योग्य ती कृतिशीलताही दाखवीत; परंतु १९२० मध्ये लोकमान्यांच्या मृत्यूनंतर त्यांनी प्रार्थनामंदिरात दुखवट्याची सभा घेतली तेव्हा सर नारायणांसारखे मवाळ, प्रागतिक नेते राजकीय अवकृपेच्या भयाने अस्वस्थ होऊन गेले. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या गुप्त क्रांतिकारी संघटनेशी चिटणिसांचा संबंध आला तेव्हा तर सर विठ्ठल चंदावरकरांनी, चिटणिसांना प्रार्थनासमाजाचा त्यागच करायला लावला... अशा आणखी काही घटना सांगून चिटणीस सुचवतात ते प्रार्थनासमाजाला हळूहळू येत गेलेली चैतन्यहीनता; लोकजीवन व लोकभावनेपासून आलेले दूरत्व...

पण समाजाची सुरुवात अशी नव्हती. राजकीय मवाळपण असले तरी स्त्रीशिक्षणाच्या प्रारंभीच्या काळात सर नारायणांसारखी अत्यंत कार्यमग्न माणसेही मुलींच्या शाळेतील मॅट्रिकच्या वर्गाला दर शनिवारी जाऊन शिकवणे हे आपले एक कर्तव्य मानत होती. समाजाच्या मंदिरात वेळ खर्चून बौद्धिक वर्ग घेत होती. प्रार्थनासमाजाबद्दल माझ्याशी बोलणाऱ्या ग. ल. चंदावरकरांनीही शिक्षणक्षेत्रात मोठेच काम केलेले आहे. अनेक संस्थांचे ते निर्माते, चालक, पालक, सेवक-सर्व काही आहेत. साहजिकच स्त्रीशिक्षण आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेले काही वैयक्तिक आणि अधूनमधून काही सामाजिक प्रश्न त्यांना आठवत असतात. हे सारे जसे काही त्यांच्या घरातच घडलेले असावे अशा पद्धतीने ते सांगतात. केळवकर, भांडारकर, मोडक आदी कुटुंबांचा इतिहास सांगताना स्त्री-शिक्षणाच्या खोलवर व दूरवर झालेल्या परिणामांची गोळाबेरीज त्यांच्या मनात असते. मी कधी न पाहिलेली ती माणसे मग मलाही परिचयाचीच वाटू लागतात...

अशा संभाषणात डॉ. रखमाबाई, डॉ. कृष्णाबाई, ताराबाई मोडक, सरोजिनी नायडू, लेडी अबला बोस, सरला रे अशी मोठीमोठी प्रांतीय-आंतरप्रांतीय नावे सहजतेने येत असतात.

डॉ. कृष्णाबाई या जुन्या पिढीतील एक प्रख्यात स्त्रीरोगतज्ज्ञ. त्यांचे वडील प्रार्थना-समाजाचे सदस्य; त्यांनी आपल्या चारही मुलींना खूप शिकवून, जन्मभर अविवाहित

ठेवून समाजसेवा करायला लावायची असे पक्के ठरवले होते. पण सर्वांत मोठ्या शारदाबाई यांनीच वडिलांच्या बेताला प्रथम सुरुंग लावला ! कमळाकर आडनावाच्या माणसाशी चक्क लग्न केले ! वडील फारच भडकले तेव्हा कृष्णाबाई त्यांना म्हणाल्या, 'आम्ही तिघीजणी तुमची इच्छा नक्की पूर्ण करू. विषाद मानू नका.' पुढे सगळ्याजणी शिकल्या आणि पैसाही मिळवू लागल्या. वडील वारले किंवा वृद्ध झाले असावेत, वयस्क झालेल्या कृष्णाबाईंनी आपल्या बहिणींच्या विवाहाचा विचार करायला सुरुवात केली. नेमके त्याच सुमारास हैदराबाद संस्थानातील एका सरकारी डॉक्टरांचे त्यांना पत्र आले. स्वतःसाठी सुशिक्षित मुलगी सुचविण्याबद्दल ! कृष्णाबाईंनी आपली धाकटी बहीण द्वारकाबाई हिलाच लग्नाला तयार केली. हैदराबादहून डॉ. मल्लाण्णा श्रीनागेश लग्नासाठी कोल्हापूरला आले. पण द्वारकाबाईंनी त्यांचा काळाकभिन्न वर्ण पाहिला आणि लग्न करायचे साफ नाकारले ! मग कृष्णाबाईंनी धाकट्या अहिल्याबाईंना लग्नाला उभे केले; (किंवा त्या तयार झाल्या असाव्यात.) महत्त्वाचे असे की या अहिल्याबाईंचा आणि डॉ. मल्लाण्णा श्रीनागेश यांचा मुलगा म्हणजेच आपले माजी सेनाप्रमुख जनरल सत्यवंत श्रीनागेश ! चंदावरकरांच्या प्रार्थनासमाजाशी असलेले श्रीनागेशांचे हे नाते असे नातवा–पणतवाचे आहे ! पुढे द्वारकाबाईंचेही लग्न पंजाबातील प्रसिद्ध पुढारी लाला हरकिशनलाल यांच्याशी झाले. पंजाब सरकारमधले ते एक नामवंत मंत्री. ही हकीगत सांगताना चंदावरकरांना आनंद असतो तो आपल्या विशाल कुटुंबाच्या सन्मानाचा- कर्तबगारीचा !

...इंदूरच्या अहल्याश्रमाच्या प्रमुख, अहल्याबाई भांडारकर या डॉ. भांडारकर यांची नात. त्यांनी ती शाळा केवढी तरी नावारूपाला आणलेली...चंदावरकरांमधील शिक्षक संभाषणात त्यांच्या शैक्षणिक दृष्टीचे कौतुक करीत राहतो...मुलांचे मानसशास्त्र ओळखून सतत प्रसन्नपणाने कार्यरत राहिलेल्या अहल्याबाई ही चंदावरकरांच्या दृष्टीने प्रार्थनासमाजाचीच देणगी असते...सर नारायणांच्या आणि सर विठ्ठलांच्या कारकीर्दीत चंदावरकरांच्या कुटुंबात पुष्कळच मोठमोठी आंतरप्रांतीय स्त्रीपुरुष मंडळी आलेली–गेलेली. लहान वयामध्येच सरोजिनी नायडूंच्या बरोबर घरी आलेले तरुण कवी रवींद्रनाथही त्यांनी अगदी जवळून पाहिलेले; रवींद्रनाथांची स्वाक्षरी घेण्यासाठी बहिणीने दोन पक्ष्यांचे एक चित्र काढलेले होते–तोच कागद चंदावरकरांनी त्यांच्यापुढे ठेवला. सही करण्यापूर्वी रवींद्रनाथांनी एकदा चित्राकडे पाहिले व भरभर आठ ओळी लिहिल्या–त्या ओळी त्या चित्राचा संदर्भ घेऊनच होत्या. तो कागद आज सापडत कसा नाही म्हणून चंदावरकर फार हळहळत आहेत...काही आंतरराष्ट्रीय समित्यांच्या कामांसाठी सुप्रसिद्ध भारतीय शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस आणि त्यांची पत्नी लेडी अबला बोस वरचेवर पाश्चात्त्य देशांना भेटी द्यायला जात. ती दोघे जाताना आणि येताना ह्यांच्याच घरी उतरत. शास्त्रज्ञ जगदीशचंद्रांनी छोट्या चंदावरकरांना एका सुंदर

अल्बममध्ये स्वाक्षरी देताना लिहिले आहे – ' The lights which we see are few; but the invisible lights are many and we groap in an ocean of darkness perfectly blind.' वृद्ध चंदावरकरांना हे उद्‌गार एखाद्या कवितेसारखे सुंदर रीतीने सत्य सांगणारे वाटतात; अगदी तरुण वयात जगदीशचंद्र आणि अबला बोस यांना कार्ल्याची लेणी दाखवायला ते घेऊन गेले होते. जगदीशचंद्रांना मधुमेह असल्यामुळे गोड खायची बंदी होती; वाटेत सर्वांनी करवंदे घेतली तेव्हा अबलाबाईंनी करवंदे चाखून नेमकी आंबट करंवदे तेवढी जगदीशचंद्रांना दिली !—ही हकीगत सांगून चंदावरकरांनी मला विचारले—' कशी आहे ही आमची आधुनिक शबरीची गोष्ट ? '

...या लेडी अबला बोसांचीच धाकटी बहीण म्हणजे सुप्रसिद्ध सरला रे; दोघीही दुर्गामोहनदास या सुधारकांच्या कन्या. गोपाळ कृष्ण गोखल्यांचा आणि या कुटुंबाचा विशेष स्नेह. श्री. गोखले, सरला रे आणि काही मित्रमंडळी एका क्लबमध्ये बसलेली असताना स्त्रियांच्या समाजस्थितीबाबत चर्चा सुरू झाली. सरला रे यांनी त्यासंबंधात पुरुषांच्यावर सुधारणाशून्यतेचा आरोप करताना गोखल्यांना 'You hypocrat' म्हणून संबोधले–...गोखले कडकपणे त्यांना म्हणाले, ' तुम्ही केलेला आरोप तुम्हाला सिद्ध करावा लागेल.' लगेच सरला रे यांनी गोखल्यांना विचारले, ' तुमच्या गळ्यात जानवे आहे ना ? तुमचा विश्वास आहे ते घालण्यावर ? मग झाले तर ! ढोंग म्हणतात ते हेच ! '

त्या वेळेपर्यंत गोखल्यांच्या गळ्यात खरोखरच जानवे होते ! दुसऱ्या दिवशी एका पाकिटात ते घालून त्यांनी सरला रे यांच्याकडे पाठवून दिले. सोबत चिठ्ठी होती ' I plead guilty '. ही गोष्ट सरला रे यांच्या मुलीनेच चंदावरकरांना सांगितली ! तिने पुढे असेही म्हटले की ही गोष्ट जुनी नाहीच. आमच्या घरातील जेवणाच्या टेबलावर एका चांदीच्या डबीत ती वस्तू आम्ही अजून जपून ठेवलेली आहे !

द्वा. गो. वैद्यांनी लिहिलेल्या प्रार्थनासमाजाच्या इतिहासाचे सहानुभूतिपूर्वक पण चोखंदळपणे परीक्षण करताना प्रसिद्ध कादंबरीकार वामन मल्हार जोशी यांनी आधुनिक काळातील विवेकवादी विचारसरणीच्या संदर्भात त्या ग्रंथातील विवेचनाकडे, अनुभवांकडे पाहात, आपले काही वेगळे विचार व्यक्त केले आहेत. ते लिहितात—' देवाला, उदाहरणार्थ मारुतीला, एक लांब शेपटी आहे असे एखाद्याने मानले तर ही देवाची कल्पना अज्ञानमूलक व भोळसटपणाची आहे असे प्रार्थनासमाजिस्ट वगैरे एकेश्वरी लोक म्हणतात. कबूल आहे, पण हे त्यांनी कसे ठरविले ? विवेकबुद्धीच्या आधारेच ना ? मग ही विवेकबुद्धीच ईश्वर हा मायाळू आहे, तो दयाघन आहे या विधानासंबंधी

संशय घेऊ लागेल तर तिला गप्प बसविण्याइतका पुरावा—या जगात—दुःखाने गांजलेली हजारो माणसे ज्यात विव्हळत आहेत...आहे काय ? नसेल तर देवावद्दलची चार तोंडाची कल्पना जशी प्रार्थनासमाजिस्टाने सोडली तशी ही दयाघनत्वाची कल्पना सोडण्यास तो तयार आहे काय ?

...मौज अशी की प्रार्थनासमाजिस्टांचा देव निर्गुण आहे असे त्यांच्याच लेखात आपण वाचतो पण क्षणार्धात हा निर्गुण देव कसा काय कुणास ठाऊक सगुण होतो व तो अनादी, अनंत, चैतन्ययुक्त, सर्वसाक्षी, आनंदमुक्त इतकेच नव्हे तर सर्वैश्वर्यपूर्ण होतो !

जगात जशी सुव्यवस्था आहे तशी कुव्यवस्थाही आहे. सौंदर्य आहे तशी कुरूपताही आहे...मग...कुव्यवस्थादिकांचा कर्ता सैतान मानावयाचा की काय ? '

यापुढे वामनरावांनी भीती, भयाकुलता आदी अनेक गोष्टींशी जोडला जाणारा देवकल्पनेचा विचार सांगून, स्वतःचा निष्कर्ष असा सांगितला आहे—' आपापले ध्येय ' जे असेल त्याची काया, वाचा, मने करून पूजा करणाऱ्यांना मी आस्तिक समजतो...सश्रद्ध जर कोणी असतील तर ते आगरकरांसारखे लोक. '

धर्मविचाराच्या बाबतीत शिक्षितांच्या विश्वात काळ या दिशेनेही बदलत गेला...

प्रार्थनेसाठी मी पुन्हा प्रार्थनासमाजात आले आहे. वेळ सकाळची आहे. इमारतीची सर्व दारे आज उघडलेली आहेत...एकशेसहा–सात वर्षांची ही जुनी इमारत आता पाडली जाणार आहे. तिला निरोप देण्यासाठी म्हणून हा आजचा या इमारतीतील प्रार्थनेचा अखेरचा सोहळा....

श्री. व सौ. चंदावरकर दारात उभे राहून हसतमुखाने सर्वांचे स्वागत करीत आहेत. दारात येताच पाहुण्यांना टपोरी-टपोरी गुलाबाची फुले दिली जातात; प्रौढ आणि वृद्ध वयाचे माडगावकर, भांडारकर, गद्रे, नवरंगे, श्रीखंडे, विद्वांस, परमानंद, केळकर... सगळे आपापल्या पत्नी, मुला-नातवंडांसह आलेले...मंदिर गच्च भरले आहे. आज या निमित्ताने कितीतरी दिवसांनी केळकरांची आणि परमानंदांची, भांडारकरांची आणि माडगावकरांची गाठभेट झाली. ' गणेशभाऊ ' चंदावरकरांना त्यासाठी सतत दुवा दिला जात आहे.

इमारतीच्या निरोपसमारंभाला गंभीरपणाने सुरुवात झाली. आज ती कोपऱ्यातील शुभ्र संगमरवरी वेदी फुलांनी विशेषच शृंगारलेली आहे आणि प्रार्थना करणारी मंडळी तिच्यासमोरच तात्पुरत्या तयार केलेल्या व्यासपीठावर विनम्रपणे स्थानापन्न होत आहेत...तुकारामाच्या आर्त ओळी पेटी-तंबोऱ्याच्या साथीने आणि अधूनमधून झांजचिपळ्यासहही कानी येत आहेत...

चंदावरकरांचे भाषण छोटेच पण भावपूर्ण आहे. एकशेसहा वर्षांपूर्वी ही इमारत बांधून झाली तेव्हा बाबू प्रतापचंद्र मुजुमदारांनी जे म्हटले होते ते चंदावरकरांना आज आठवते. 'आपण उभी केलेली इमारत काही वर्षांनंतर कदाचित पुन्हा ज्या मातीवर ती उभी राहिली तिला जाऊन मिळेल...काही वर्षांनंतर आजची पिढी अस्तंगत झालेली असेल. आणि आपली नावे लोकांच्या स्मृतिपटलावरून पुसलीही गेली असतील...पण प्रार्थनासमाज चिरंतन असेल. आपल्या मुलाबाळांवर त्याची मायेची पाखर असेल...शुभाशीर्वाद असतील...

बाबू प्रतापचंद्रांच्या या भविष्यवाणीवर चंदावरकर काहीच भाष्य करीत नाहीत. 'परमेश्वराच्या पायापासून वाहत आलेल्या धर्मगंगेचा ओघ प्रेमाचा असून त्याने प्रफुल्लित झालेल्या वृक्षावरील भागवतधर्म हे अत्यंत सुवासिक फूल व मधुर फळ आहे.' या न्या. रानडे यांच्या पूर्वकालीन उद्‌गारांचा आधार घेऊन ते सांगतात. 'त्या भागवतधर्माने धारण केलेले आधुनिक स्वरूप म्हणजेच प्रार्थनासमाज...त्याच्या शाखा गिरगाव, भायखळा, दादर, विलेपार्ले, पंढरपूर येथील आमच्या चालणाऱ्या सेवा-कार्यामधून विस्तारलेल्या आहेत...प्रार्थनासमाजाची ही अविनाशी, शाश्वत परंपरा पुढे अधिक भव्य स्वरूपात दृश्यमान व्हावी...प्रार्थना हे आमचे व्रत आहे...सत्य-संकल्पाचा दाता असलेल्या भगवंताने आमचे मनोरथ पूर्ण करावेत...'

प्रार्थनासमाज हे आज मुंबईतील एका बसस्टॉपचे नाव आहे. गिरगावातील अनेक घरमालकांची आणि दुकानदारांची आपले घर किंवा दुकान नेमके कुठे आहे हे सांगण्याची ती खूण आहे आणि काही थोड्या लोकांच्या मनात ती एक महाराष्ट्रा-तील शैक्षणिक, सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांची जन्मदात्री संस्था आहे.

समाजाने सुरू केलेले धार्मिक परिवर्तनाचे काम प्रारंभापासूनच एका संथ गतीने चालले. विश्वात्मक परमेश्वराची मानसिक उपासना आणि 'सत्कर्मे आचरावयाची व असत्कर्मापासून दूर राहायचे, तसे न झाल्यास पश्चात्ताप भावना व्यक्त करायची' ही समाजाची जीवनपद्धती काही निवडक व्यक्तींनीच स्वीकारलेली होती..ती सर्व समाजाचा–बहुजनांचा–स्वभावविशेष व्हावा हा टप्पा दृष्टिपथात अजूनही नाही.... पुढे विचारांची दिशाच बदलली. मधल्या काळात ज्याचा त्याचा धर्मविचार ही वैयक्तिक बाब मानून मानवहितैषी बुद्धीच्या अनेक विचारवंतांनी, कार्यकर्त्यांनी आपल्या सेवाकार्याचा विस्तार बराच केला. जीवनविचाराचे केन्द्र कोणत्याही एका विशिष्ट धर्मभावनेशी निगडित न ठेवता, सुरू झालेली ही वाटचाल लोकजीवनाचे चित्र चांगल्या स्वरूपात बदलताना कधी कधी दिसते; तेव्हा ही नवी दिशाच योग्य असे बहुतेकांना वाटते...पण अधूनमधून 'आधुनिक' शिक्षित, संपन्न माणसांच्या

कल्पनातीत अनीतिमय आणि निर्घृण जीवनव्यवहाराची चिकित्सा करायला जेव्हा माणसे बसतात तेव्हा अनुभवाला येणारे छोटेमोठे आंतरिक भूकंपाचे धक्के पचविताना पुन्हा धर्मकल्पनेच्या परिवर्तनाचा मागोवा घ्यायला हवा की काय असे त्यांच्या मनात येऊन जातेच...

ग. ल. चंदावरकर सांगतात की प्रार्थनासमाजाची इमारत बांधली गेली तेव्हा तिच्या पायामध्ये, एका कलशात न्या. रानडे यांच्या 'एका साधकाची कैफियत' या ग्रंथाची प्रत ठेवण्यात आलेली होती. नवी इमारत बांधताना असा कोणता ग्रंथ आपल्याला ठेवता येईल? मला वाटते, आपली न कळणारी शोकांतिका हीच असेल की याबाबत आपण काहीच ठरवू शकणार नाही...

२

एका सामाजिक शोकनाट्याची नायिका

नुकतीच मी केडगावला जाऊन आले. पंडिता रमाबाई सरस्वती मेधावी (डोंगरे) यांची ही कर्मभूमी.

केडगाव पुण्यापासून फक्त चाळीस मैलांवर आहे. केव्हाही मनात आले तर सकाळी जाऊन संध्याकाळी परत यावे इतके ते जवळ आहे. पण गेली बीस वर्षे केडगावला जाण्याचे कुतूहल मी केवळ मनातच बाळगून होते. शाळेच्या दिवसांत दर सुट्टीला पुण्याहून अकलूजकडे जायला निघाले की यवतच्या पुढे चौक या ठिकाणी सर्व्हिस मोटार थांबायची आणि पुण्यापासून गाडीत बरोबर असलेल्या लाल-बुंद गोऱ्या मडमा तिथे पटापट खाली उतरून जायच्या. त्या चौकात बाजूच्या एका झाडाखाली त्यांच्यासाठी एक शानदार, रंगीबेरंगी घमणी उभी असायची आणि आमची मोटार अजून सुटते आहे तोच घमणीत बसून त्या 'केडगावकडे' असे लिहिलेल्या पाटीच्या दिशेने निघालेल्याही असायच्या. आमच्या गाडीतल्या सगळ्या अनगड मंडळींच्यामध्ये गोऱ्या रंगामुळे आणि राहणीतील नीटनेटकेपणामुळे त्या एकदम उठून दिसत असत. त्या आत चढल्या की लोक त्यांना पटकन बसायला जागा करून देत. एका हातातल्या वेताच्या रंगीबेरंगी टोपल्या नीट व्यवस्थित ठेवताना दुसऱ्या हातातील छोटी छोटी बायबलची पुस्तके त्या अगदी सहजतेने सांभाळीत. त्या कधी आपापसात बोलल्या तरी ते अगदी हळू आवाजात असे आणि इतरांशी जे मराठी बोलत ते मराठी न वाटण्याइतके वेगळे असे. तो वाचल्यासारखा बोलण्याचा सूर, ती अगदी आखूड-आखूड शब्दोच्चार करण्याची पद्धती आणि शब्दांइतकीच आविर्भावाने

बोलण्याची ती त्यांची धडपड सगळेच प्रवासी डोळे विस्फारून बघत. चौकात त्या उतरून गेल्या की कोणी ना कोणीतरी त्यांची माहिती इतरांना सांगे : 'अमेरिकेतनं आल्यात म्हणं–दहा वर्षांपूर्वी...इथं जवळच खिस्ती बायांत राहतात–बराच जमीन-जुमला आहे त्यांचा इकडंऽ...' आणि मग जमीनजुमल्यावरून विषय हमखास केडगावच्या नारायणमहाराजांकडे वळे; त्याही बाबतीत माहिती असलेला कोणीतरी प्रवासी असेच. त्या मडमा गेलेल्या असत त्यांच्याबरोबर उलट दिशेला बोट दाखवून तो सांगे, 'ह्येऽऽह्ये असं दोन कोस गेलं की ओढ्यापलीकडं वेटच लागतं महाराजांचं...पुष्कळ जातात अजून तिकडं...पण पूर्वी फारच जायची बघा... म्हणजे अगदी वऱ्हाडातले, मुंबईतले शेटे, आपल्या मोटारी घेऊ–घेऊ यायचे महाराजांच्या दर्शनाला. एकदा तर महाराजांनी एकशेआठ सत्यनारायण केले तेव्हा तर बघाऽ...' ही संभाषणे ऐकताना मला त्या ओढ्यापलीकडच्या वेटावर जावेसे वाटे आणि त्या गेलेल्या मडमांच्याही मागे जावेसे वाटे. आपल्या गावाकडच्या या रस्त्याच्या दोन्ही बाजूला कसलेतरी अद्‌भुत जग आहे; पण ते आपण पाहिलेले मात्र नाही अशी हुरहुर मला लागे. तरी कधीमधी बराच वेळ मोटार थांबली की, अंगा-वरची धूळ झटकण्यापुरती, पाय मोकळे करण्यापुरतीच मी त्या चौकात उतरले आणि पुढच्या प्रवासात मनातले हे सगळे मागे टाकत गेले.

परवा मात्र मी थेट मुंबईहूनच केडगावला गेले. पंडिता रमाबाईंच्या जीवनकथेने मला असे बेचैन केले होते की केव्हा एकदा त्यांचे ते गाव, त्यांची ती वास्तू मी डोळ्यांनी पाहते असे होऊन गेले. असे वाटले, की हे सारे पाहिल्याखेरीज आपण आपल्या मनातल्या मनात गतकालातला जो एक गुंतागुंतीचा अनुभव घेतो आहोत त्याला पूर्णताच येणार नाही. पुण्याच्या पलीकडे दिसणारी ती रेताड माळराने पाहात —खरे तर पायाने तुडवीतच—आपण केडगावला. जायला हवे—त्या जमिनीत, त्या हवेत, त्या कुठून कुठून तिथे एकत्र जमा झालेल्या माणसांच्यामध्ये असणाऱ्या त्या लोकविलक्षण रमाबाईंना एकदा भेटायला हवे...

मी स्टेशनवर उतरले तेव्हा ती पूर्वीची रंगीबेरंगी धमणी समोरच झाडाखाली उभी होती. आज ती माझ्यासाठी आली होती. म्हणजे मुक्ति-मिशनला भेट द्यायला येणाऱ्या कोणाही पाहुण्यासाठी ती इथे अशीच उभी असते. पण हे मला माहीतच नव्हते. मी आपली पत्ता विचारीत-विचारीतच मुक्तिमिशनमध्ये पोहोचले.

केडगावच्या ह्या परिसरात आयुष्यातील अखेरची बीस बावीस वर्षे रमाबाई वास्तव्य करून होत्या. ह्या ओसाड माळरानावर स्वतः लावलेल्या हिरव्यागार वृक्ष-राजीत ही मोठी वसाहत त्यांनीच उभी केली आणि इथेच त्यांनी अखेरचा श्वासही

घेतला. हे असे एके ठिकाणी इतका दीर्घकाळ स्थिर राहणे त्यांच्या पूर्वीच्या आयुष्यात त्यांना कधी माहीतच नव्हते. त्या सहा महिन्यांच्या झाल्या होत्या नव्हत्या (१८५८) तेव्हापासूनच वेताच्या एका टोपलीत त्यांना घालून त्यांच्या आईवडलांनी पूर्वीपासून चालूच असलेली त्यांची भ्रमंती तशीच चालू ठेवली होती. रमाबाईंचे वडील अनंतशास्त्री डोंगरे ज्ञानाच्या संपादनार्थ आणि शोधार्थ वयाच्या बाराव्या वर्षापासून सारी धर्मक्षेत्रे भटकले होते. रमाबाईंची आई–लक्ष्मीबाई–हीही त्यांना अशीच एका प्रवासात पैठणला भेटली होती. लग्न करून त्यांनी तिला घरी आणली (१८४०) आणि स्त्रियांना संस्कृत शिकवायचे या तत्त्वनिष्ठेने तिला शिकवायला प्रारंभ केला; पण घरातील इतर मंडळी या वेताला अनुकूल नव्हती. म्हणून मंगरूळजवळच्या गंगामूळ नावाच्या एका डोंगरावर दाट अरण्यात जाऊन वस्ती केली. स्वसमाजापेक्षा हिंस्र श्वापदांचा सहवास स्वखुषीने पत्करला आणि तिथेच एक गुरुकुल उभे केले. त्यात स्वतःच्या बायकोमुलांसह अनेक विद्यार्थ्यांना धर्मशास्त्र, काव्य, व्याकरण ते शिकवीत राहिले. हेही वास्तव्य भीषण दुष्काळामुळे संपुष्टात आले, तेव्हा पत्नी लक्ष्मीबाई, पुत्र श्रीनिवास आणि कन्या कृष्णाबाई व पंधरा वर्षांच्या रमाबाई यांच्यासह त्यांच्या भारतयात्रेला पुन्हा प्रारंभ झाला. या यात्रेत बोटीच्या लांबलांब प्रवासासारखे, नव्यानव्या संस्कृत पाठांतरासारखे, स्वतःचा फोटो काढून घेण्यासारखे, अगदी नावीन्यपूर्ण अनुभव जसे होते, तसेच दारिद्र्याचे भाजणारे तीव्र चटकेही होते. वाघ, साप, रानटी पशू यांनी खाल्ले म्हणजे यातनांतून सुटू असे भुकेच्या पोटी वाटावे, इतकी आग पोटात जिरवावी लागत होती व अशक्तपणामुळे पाऊलही पुढे टाकता येऊ नये अशी असहाय्यताही आलेली होती. कुठेही गेले तरी परिस्थितीचे व मानवी वृत्तीचेही दुष्काळी जग छायेसारखे पाठपुरावा करीत आलेले होते.

अशाच काळात रमाबाई सोळा वर्षांच्या असताना, मद्रासजवळ एका गावी अनंतशास्त्री अन्नान्नदशेत वारले (१८७४). केवळ धार्मिक शिक्षणाऐवजी पोटापाण्याचा एखादा धंदा येत असता तर आपले कुटुंब वाचवले असते असे पुढील काळात रमाबाईंना वाटे. पाठोपाठ सहा महिन्यांनी आई गेली आणि थोड्याच दिवसात लग्न झालेली परंतु नांदायला न गेलेली बहीण कृष्णाबाईही कॉलऱ्याने गेली. (१८७५) हा प्रत्येक मृत्यूचा प्रसंग असा की प्रेत न्यायला चार माणसेही मिळण्याची भ्रांत. अनंतशास्त्र्यांनी शेवटी संन्यास घेतलेला; तेव्हा त्यांचे प्रेत तर एकट्या भावानेच घोतराने पाठीला बांधून नेऊन दोन मैल लांब असणाऱ्या रानात पुरले ! बाकी तिघेजण त्याच्यामागे चालत राहिली. आईच्या वेळेस एक माणूस कमी पडले तेव्हा सतरा वर्षांच्या रमाबाईनीच तीन मैल खांदा दिला ! पुन्हा भावासह रमाबाईंचा पुढचा प्रवास पायी सुरू झाला. सहा वर्षांत ही बहीण-भांवडे चारपाच हजार मैल तरी चालली असतील. वाटचालीत स्वतःच्या संस्कृत विद्येच्या जोरावर मानाने जगायचा त्यांनी प्रयत्न

केला. पण तो साधेना; तेव्हा कधी श्रीनिवासशास्त्र्यांनी मोलमजुरीही केली. तरीही पायात काही नाही, अंथरायला–पांघरायला काही नाही आणि खायला मीठ घालून उकडलेल्या पालेभाजीखेरीज काही नाही, असे कित्येक दिवस निभवावे लागले. पुढील काळात जुन्या आठवणींनी रमाबाईंचा ऊर फुटून जाई. काश्मीरच्या थंडीत थंडीपासून बचाव व्हावा म्हणून कानापर्यंत वाळूत गाडून घेऊन त्या राहिल्या. पण ब्राह्मणधर्म म्हणून अंगावर एकच वस्त्र होते ते अर्धे धुऊन अर्धे वाळवूनही नेसल्या. विशेष हे की या सर्व हालअपेष्टांतच मानवी जगण्याची विविध रूपे न्याहाळताना व देवदर्शन, तीर्थस्नान, धार्मिक पुस्तकांतून सांगितलेला मंत्रपठनादी आचारधर्म करीत असताना, त्यांचे एक मन देवाधर्माच्या मूळ स्वरूपाचा कानोसा सतत घेत होते. हिंदुधर्मशास्त्रांतून ऐहिक व पारमार्थिक बाबतीत स्त्री-जीवनाची जी आशाशून्य अवस्था वर्णन केली आहे ती त्यांना तीव्रतेने दुःखी करीत होती. त्या धर्माचरणाने मनःशांतीचा हवा असलेला अनुभवही येत नव्हता. रमाबाईंच्या मनाला शब्दांपलीकडचे, शास्त्रांपलीकडचे असे काही तरी एक प्रेरणादायी चैतन्य हवे होते, पण ते नेमके कसे लाभेल हे मात्र कळत नव्हते. अशा दिशाहीन वाटचालीतच १८७८ साली वयाच्या विसाव्या वर्षी आपल्या उत्साहाच्या व सौंदर्याच्या ऐन वैभवासह रमाबाई कलकत्ता शहरात आल्या; आणि द्वारकानाथ गांगुली, शेषपाद बॅनर्जी, केशवचंद्र सेन, महाराज ज्योतींद्रमोहन टागोर, आनंदमोहन बोस, डॉ. जगदीशचंद्र बोस यांच्यासारख्या सुधारक, पंडित, शास्त्रज्ञ मंडळींच्यामध्ये, त्यांच्या सुशिक्षित स्त्रिया-मुलींमध्ये, त्यांनी संस्कृत विद्येच्या जोरावर एकच खळबळ उडवून दिली. मोठ्या उत्स्फूर्तपणे काही थोर विद्याप्रेमी लोकांनी कलकत्ता विद्यापीठातर्फे रमाबाईंचा सत्कार करून त्यांना 'पंडिता', 'सरस्वती' अशा पदव्या बहाल केल्या. त्यांना थैल्याही अर्पण केल्या. स्वतःच्या घरीदारी मोठ्या कौतुकाने मिरविले आणि प्राचीनतम काळातील प्रगतिशील हिंदुधर्म सभोवतालच्या अज्ञ स्त्रियांना सांगण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविली. कलकत्त्यात 'आर्य वंशाचा विकास व ऱ्हास', 'प्राचीन काळातील प्रतिष्ठित स्त्री-जीवन' अशा विषयांवर रमाबाई बंगालीच्या ज्ञानाअभावी संस्कृतमधूनच बोलत होत्या व अनेक थोर मंडळी त्यांच्या दुभाष्याचे काम हौसेने करीत होती. यापूर्वीच सात भाषा येणाऱ्या रमाबाईंनी काही काळात बंगालीही चांगली आत्मसात केली. रमाबाईंच्या या सर्व पराक्रमांची वार्ता महाराष्ट्रात प्रार्थनासमाजाचे मुखपत्र असणाऱ्या 'सुबोधपत्रिके'तून जाहीर झाली, तेव्हा महाराष्ट्रातील सुधारकांनी रमाबाई मूळच्या 'आपल्या' आहेत या मुद्द्यावर त्यांना आपल्याकडे येण्याचे निमंत्रण दिले. महाराष्ट्रातील काही श्रीमंत, पदवीधर सुशिक्षितांनी त्यांच्या बुद्धिमत्तेवर व सौंदर्यावर लुब्ध होऊन लग्नाच्या मागण्याही त्यांच्यापर्यंत पोहोचवल्या; पण कलकत्त्यातील ब्राह्मो समाजाच्या, स्त्री शूद्रांवरील अन्याय दूर करू पाहणाऱ्या मोकळ्या वातावरणाने

उल्हसित झालेल्या रमाबाईंनी तिथेच स्त्री-सुधारणांसाठी स्वतःची हयात वेचायची असे ठरवून लग्नाचा प्रश्न मनावर घेतला नाही. यानंतर आसाममधल्या सिल्हट गावी त्या व श्रीनिवासशास्त्री दहा महिने वास्तव्य करून राहिले. ह्याच वेळी बिपिन बिहारी मेधावी या एका सुशिक्षित, शूद्र जातीतल्या तरुण गृहस्थाशी दोघांची मैत्री झाली. मेधावींनीही रमाबाईंना लग्नाचे विचारले; पहिले काही महिने त्याबाबत रमाबाईंच्या मनात अनिश्चितीच होती. पण आसाममधून त्या डाक्क्याला गेल्या आणि अगदी अचानकपणे निवासशास्त्रींचा श्री कॉलेऱ्याने बळी घेतला (१८८०). आता मात्र रमाबाई अगदीच एकट्या राहिल्या. वंस जगात रक्ताच्या नात्याचे असे त्यांना कोणीच उरले नाही. स्वतःचे असे गाव तर जन्मापासून नव्हतेच. या दुःखद घटनेनंतर पुन्हा मेधावींची गाठभेट झाली तेव्हा रमाबाईंनी त्यांच्याशी लग्न करण्याचे ठरवून टाकले व दि. १३ नोव्हेंबर १८८० ह्या दिवशी, धर्मदृष्ट्या ब्राह्मोसमाजाकडे झुकणाऱ्या या वधूवरांनी हिंदू स्मृतिकारांनी सांगितलेला कोणताच विधी न करता नोंदणी पद्धतीने विवाह केला. या घटनेमुळे शूद्र मेधावींना त्यांच्या जातीकडून वाळीत टाकले गेले व महाराष्ट्राने रमाबाई आपल्याकडे येण्याची आशा सोडून दिली. पण हे विवाहसुखसुद्धा फक्त एकोणीस महिनेच रमाबाईंना लाभले. भल्या धिप्पाड देहाचे मेधावी एका दिवसाच्या आजारात अचानकपणे उलट्या जुलाब होऊन दिवंगत झाले! रमाबाईंनी आपल्या नवऱ्यालाही खाऊन टाकले अशी जाचक, क्लेशकारक जाणीव अवतीभोवती जेव्हा पसरली तेव्हा चार महिन्यांच्या आपल्या कन्येला–मनोरमेला घेऊन आता कोठे जायचे, काय करायचे, हा प्रश्न रमाबाईंपुढे तीव्रपणे उभा राहिला.

अशा या आपत्तीच्या विदीर्ण करणाऱ्या काळात न्यायमूर्ती रानडे आदी प्रार्थना-समाजिस्ट सुधारकांनी रमाबाईंना महाराष्ट्रात येण्याची पुन्हा एकदा विनंती केली. मग नवऱ्याचे कर्ज फेडून ३१ मे १८८२ रोजी मद्रासमार्गे रमाबाई पुणे शहरात आल्या. पुण्यातल्या सुधारकांनी, स्त्रीशिक्षणाच्या आपल्या कार्याला त्यांचा चांगला हातभार लागणार आहे हे जाणून, मोठ्या सहानुभूतीने रमाबाईंना वागविले. त्यांच्या स्वतंत्र बुद्धीचे, धीट वृत्तीचे, सत्‌चारित्र्याचे, सुबोध वक्तृत्वशैलीचे व कामातील झपाट्याचे मनःपूर्वक जाहीर रीतीने कौतुक केले. रमाबाईंनीही महाराष्ट्रातील सर्व प्रमुख गावी दौरे काढून, वातावरणात चैतन्य आणून, आर्य महिला समाज स्थापन केले. पण त्यांना समोर दिसणारे स्त्री-सुधारणेचे कार्य एवढे प्रचंड होते की अशा एखाद्या दुसऱ्या होणाऱ्या सुधारकी कृतीने त्यांचे समाधान होईना. ह्याच काळात ज्ञानाच्या हव्यासातून व न्यायमूर्तींच्या प्रेरणेने सौ. रमाबाई रानड्यांच्या बरोबर पंडिता रमाबाईही इंग्रजी शिकू लागल्या; परंतु इंग्रजीच्या होणाऱ्या त्या तुटपुंज्या ओळखीनेही त्यांचे समाधान होईना. अशा असमाधानात पुण्यातील मिशनरी मंडळींशी व खिस्ती झालेल्या अनेक सुशिक्षित हिंदू स्त्री पुरुषांशी त्यांचा परिचय झाला. त्यांच्यापैकीच मिसेस

सोराबजी या इंग्लंडमध्ये राहून आलेल्या एका शाळेच्या प्रिन्सिपॉल बाईंनी, केवळ संस्कृतच्या ज्ञानावर ज्या प्रकारचा मूलगामी बदल स्त्रीजीवनात रमाबाई करू इच्छितात तो होऊ शकणार नाही, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले; तेव्हा त्यासाठी आधुनिक जगातील अद्ययावत शास्त्रे स्त्रियांनी शिकायला हवीत, याचाही ध्यास रमाबाईंना लागला. मग पुष्कळ सुधारक मित्रांचा विरोध असतानाही स्वतःच्या कामासाठी अधिक लायक होण्याच्या हेतूने रमाबाईंनी अखेरीस मोठ्या धाडसाने इंग्लंडला जाण्याचे ठरवले. 'स्त्रीधर्मनीति' हे पुस्तक लिहून स्वतःच्या व मुलीच्या प्रवासाचा पुष्कळसा खर्च त्यांनी उभा केला. स्त्रियांसाठी एक उपयुक्त पुस्तक म्हणून इंग्रज सरकारनेच त्याच्या बहुतेक सर्व प्रती विकत घेतल्या. उरलेली थोडी फार मदत मिशनरी मंडळींनी केली. २० एप्रिल १८८३ रोजी वैद्यकीय शिक्षण घेण्याच्या इराद्याने आपल्या अडीच वर्षाच्या कन्येसह रमाबाईंनी बोटीवर पाऊल ठेवले. जाण्यापूर्वी सरकारने शिक्षणविषयक नेमलेल्या हंटर कमिशनपुढे त्यांनी आपली साक्ष दिलेली होती व ती बरीच गाजलेलीही होती. त्या साक्षीत १८८१ च्या सरकारी खानेसुमारीनुसार भारतातील ९ कोटी ९७ लाख स्त्रियांच्या शिक्षणाची सोय भारतातील बालविवाहासारख्या अनिष्ट रूढीतूनच मार्ग काढीत, कसकशी करावयास हवी, हे त्यांनी सविस्तर मांडलेले होते. त्याचप्रमाणे स्त्रियांचे आजार व अपमृत्यू टाळण्यासाठी त्यांच्याकरिता उपलब्ध करून द्यावयाच्या वैद्यकीय शिक्षणाचे महत्त्व आवर्जून सांगितलेले होते. रमाबाईंच्या या मराठी साक्षीचे इंग्रजी भाषांतर झाले होते व त्या आधारे हंटरसाहेबाने 'रमाबाई' या विषयावर एडिंबरो येथे एक गौरवपूर्ण भाषणही केले होते. अशा रीतीने इंग्लंडला जाण्यास निघण्यापूर्वीच पाश्चात्त्य जगाला त्यांच्या लोकविलक्षण आयुष्याची व बुद्धिमत्तेची थोडी ओळखही झालेली होती.

इंग्लंडमधून मिशनरी म्हणून हिंदुस्थानात येणाऱ्या स्त्रियांना मराठी शिकवायचे काम करून आपण आपला चरितार्थ तेथे चालवायचा अशी रमाबाईंची प्रारंभी योजना होती. १८८३ च्या मे महिन्यात लंडनजवळच्या 'सेंट मेरीज होम' या कॉन्व्हेंटमध्ये पुण्यातील मिशनऱ्यांच्या ओळखीने त्या जाऊन उतरल्या. 'कोणत्याही परिस्थितीत आपण धर्मांतर करणार नाही' असे प्रवासास निघताना म्हणणाऱ्या रमाबाईंनी तिथे जेव्हा ख्रिस्तीधर्मीयांची भूतदयेची कामे पाहिली, फादर नीलकंठशास्त्री ऊर्फ नेहम्या गोन्हे यांच्याशी पत्रांतून धर्मविषयक चर्चा केली तेव्हा स्वतःचा विचार बदलला व सहा महिन्यांच्या आतच बाप्तिस्मा घेतला (२३ सप्टेंबर १८८३). आपल्या धर्मांतराने आपले स्वदेशबांधव किती नाराज होतील याची त्यांना कल्पना होती. तरीही ख्रिस्तामध्ये त्यांच्या एकाकी जीवनाला व जीवनप्रवृत्तीस आधार वाटावा असा एक मित्र लाभल्यामुळे मानसिक दृष्ट्या धर्मांतराखेरीज त्यांना गत्यंतर उरले नसावे. 'धर्मांतराची घटना अंतःप्रतीतीशी निगडित असते', एवढेच याबाबतचे स्पष्टीकरण रमाबाई देऊ

शकल्या. लंडनमध्ये प्रथम त्यांनी प्रिंटिंगचा अभ्यास केला; आणि इंग्रजी भाषा आत्मसात केली. नंतर १८८४च्या जानेवारीत त्या चेल्टनहॅमच्या स्त्रियांच्या कॉलेजात संस्कृतच्या प्राध्यापिका म्हणून व गणित, शास्त्र, इंग्रजी या विषयांच्या विद्यार्थिनी म्हणून रुजू झाल्या. प्रथमपासूनच रमाबाईंना कमी ऐकू येत असे, त्यामुळे त्यांच्या वैद्यकीय शिक्षणाचे इंग्लंडमध्ये जमू शकले नाही. आरंभकाळातील खर्चही वॉंटेज मिशननेच त्यांच्यासाठी केला. लंडनमध्ये असतानाच 'संस्कृतबद्दल व भारताबद्दल प्रेम' या जोडणाऱ्या भाव-बंधातून प्राच्यविद्याविशारद मॅक्समुल्लरशी त्यांचा जिव्हाळ्याचा स्नेह झाला. 'राजा राम-मोहन रॉय यांच्याइतकी महत्त्वाची ही व्यक्ती आहे' असे मॅक्समुल्लरचे रमाबाईंच्याबद्दल मत झालेले होते ! परंतु ख्रिस्ती धर्म स्वीकारूनही रमाबाईंची मानसिक अस्वस्थता मात्र संपली नव्हती. किंबहुना ख्रिस्ती लोकांनाही त्यांचे कर्मकांड आहे व ते हिंदूधर्मीयांच्या इतकेच गुदमरून टाकणारे आहे हे ध्यानात येऊन रमाबाईंचा धर्माधर्मासंबंधीचा वैचारिक कलह या काळात पराकोटीला गेला. परत हिंदुस्थानात जावे व स्त्रीशिक्षणाचे कार्य चालू करावे या विचारात त्या असतानाच फिलाडेल्फियाच्या डॉ. रिचर्ड बॉडले या अमेरिकन विदुषी बाईने डॉ. आनंदीबाई जोश्यांच्या पदवीदान समारंभाच्या निमित्ताने रमाबाईंना अमेरिकेत येण्याचे निमंत्रण दिले. भोवतालच्या इंग्रज लोकांची आत्यंतिक नाराजी पत्करूनच, काही महिन्यांसाठी म्हणून त्या अमेरिकेत गेल्या. मात्र तिथे गेल्यावर त्या नव्या जगातल्या, संपूर्णपणे नव्या असलेल्या प्रगतिशील लोकांमध्ये व मोकळ्या धार्मिक वातावरणामध्ये त्या पूर्ण अडीच वर्षे राहिल्या; धार्मिक असूनही धार्मिकतेच्या जोखडात न अडकलेले हे जग स्वतःच्या जीवितकार्याच्या दृष्टीने त्यांना उत्साहवर्धक वाटले.

हिंदुस्थानातील आपल्या कार्यासाठी लागणारा पैसा अमेरिकेत उभा करावा अशी एक विलक्षण साहसी कल्पना रमाबाईंना सुचून ती प्रत्यक्षात आणण्यासाठी अमेरिकेचा तीस हजार मैलांचा प्रवास त्यांनी या अडीच वर्षांत केला. या प्रवासात अमेरिकेतील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील नवनवीन कल्पनांच्या पहिल्याबहिल्या प्रवर्तकांचा प्रत्यक्ष सहवास त्यांना लाभला. तिथे रमाबाईंनी 'भारतातील उच्चवर्णीय हिंदू स्त्री' या विषयावर ठिकठिकाणी दिलेल्या व्याख्यानांचे एक पुस्तक प्रसिद्ध केले; आणि ह्या पुस्तकाच्या उत्पन्नातूनच स्वतःच्या परतीच्या प्रवासखर्चाची सोयही केली. या भाषणांतून व रमाबाईंच्या व्यक्तित्वाच्या प्रभावाने हिंदुस्थानच्या उन्नतीसाठी तेथील स्त्रियांचे स्वावलंबन नितांत आवश्यक आहे हे उदार अमेरिकनांच्या मनावर बिंबले व वेगवेगळ्या संस्थानांत त्या कार्यासाठी रमाबाईंना आर्थिक साहाय्य देणारी लहान मंडळे स्थापन झाली; त्यातून एक 'रमाबाई असोसिएशन' निर्माण झाली. या संस्थेने रमा-बाईंच्या हिंदुस्थानातील भावी संस्थेच्या सर्व खर्चाची जबाबदारी दहा वर्षांसाठी स्वतःकडे घेतली. पैसा देताना व घेताना रमाबाईंचे काम धर्मातीत भूमिकेतून होईल असे उभयपक्षी

पंडिता रमाबाई सरस्वती मेधावी (डोंगरे) (१८५८–१९२२)

स्पष्ट ठरले. ह्या काळात रमाबाईंच्या उपजत उत्साहाला अमेरिकनांच्या आर्थिक व नैतिक पाठिंब्यामुळे इतके उधाण आले होते की, येतानाच त्यांनी आपल्या शाळेची काही क्रमिक पुस्तके, देवनागरी टाइपाच्या अभावी अर्धीमुर्धी छापूनही आणली होती !

परतीच्या प्रवासात जपानमध्ये काही दिवस राहून १ फेब्रुवारी १८८९ रोजी त्या कलकत्त्यात आल्या व लगेचच ११ मार्च १८८९ ला मुंबईला त्यांनी 'शारदासदन' ही बालविधवांसाठी वसतिगृह असलेली शाळाही सुरू केली. पहिल्या दिवशी दोन मुली शाळेत दाखल झाल्या आणि कामाला प्रारंभ झाला. शारदासदनच्या सल्लागार मंडळात रावबहादूर नूलकर, डॉ. भांडारकर, न्या. तेलंग, न्या. रानडे इत्यादी मंडळी नेमली गेली आणि उद्घाटनसमारंभ लेखिका श्री. काशीताई कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

ह्याच वर्षी (१८८९) मुंबईला भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाला प्रथमतःच स्त्री-प्रतिनिधींना घेऊन रमाबाई उपस्थित राहिल्या व सामाजिक सुधारणेबाबत त्यांचे अत्यंत प्रभावी भाषण झाले. अखिल हिंदुस्थानातून काँग्रेसला आलेल्या सदस्यांनी त्यांच्या शारदासदनाला आवर्जून भेट दिली. पुढच्याच वर्षी म्हणजे १८९० मध्ये 'युनायटेड स्टेटस्‌ची लोकस्थिती' हे अमेरिकेतील अनुभवांवर आधारलेले रमाबाईंचे पुस्तकही प्रसिद्ध झाले. या पुस्तकात त्यांनी प्रयत्नपूर्वक किती दर्जेदार कौटुंबिक आणि सामाजिक जीवन उभे करता येते हे वाचकाच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केलेला आहे. संस्थेचे काम वाढत असतानाच १८९० च्या अखेरीस काही व्यावहारिक सोयींसाठी रमाबाईंनी शारदासदन पुण्याला आणले. प्रथम भाड्याने घेतलेल्या व नंतर स्वतःच्या मालकीच्या मोठ्या बंगल्यात ते सुरू केले. पण संस्थेच्या स्थापनेपासून काही महिन्यांच्या आतच इथे ख्रिस्ती धर्माचा प्रचार होतो आहे या एतद्देशीयांच्या संशयाला, आक्षेपाला प्रारंभ झाला. त्यासंबंधी वृत्तपत्रांतून सतत वादविवाद चालू राहिले. शेवटी १८९४ च्या ऑगस्टमध्ये सर्व एतद्देशीय सल्लागारांनीही लोकभावनेला मान देऊन या संस्थेचा राजीनामा देऊन टाकला. प्रथमपासून या वादविवादात स्वतःची धर्मातीत दृष्टी प्रस्थापित करण्याचा आटोकाट प्रयत्न रमाबाई करीत होत्या; पण सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाताना कार्यनाशच होतो आहे असे वाटल्यामुळे सल्लागार मंडळींच्या राजीनाम्याने नंतर त्यांनाही सुटल्यासारखेच वाटले ! कालांतराने रमाबाईंनी वृत्तपत्रांतून जाहीर करून टाकले की 'शारदासदन' मध्ये धार्मिक स्वातंत्र्य राहील, परंतु ख्रिस्ती धर्माचीही शिकवणूक दिली जाईल. हे जाहीर होताच अनेक हिंदू मुली भराभर संस्थेतून काढून घेतल्या गेल्या. पुढे रमाबाईंनी १८९८ मध्ये अमेरिकेची दुसरी फेरी करून तेथील मंडळींना स्वतःच्या कार्याचा अहवाल व त्यातील अडचणी सांगितल्या; इतकेच नव्हे तर उघडउघड ख्रिस्ती धर्माची शिकवणूक संस्थेत देता यावी अशीही परवानगी अमेरिकनांकडून मिळवली. रमाबाईंच्या

व्यक्तित्वावर नितांत विश्वास असलेल्या अमेरिकनांनी शारदासदनची सर्व स्थावरजंगम इस्टेट (केडगावच्या दोन अडीचशे एकर जागेसह) व्यक्तिशः रमाबाईंना बक्षीस देऊन टाकली; पण रमाबाईंनी ती 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' या नव्या संस्थेच्या नावे केली. अमेरिकेहून परतल्यानंतर लगेचच रमाबाईंनी आपल्या कार्याचे ठिकाण पुण्यातील प्लेगाच्या व देशातील दुष्काळाच्या परिस्थितीत जवळच असलेल्या केडगावला हालविले. स्वतःचे कार्य केवळ उच्चवर्णीय स्त्रियांसाठी न ठेवता सर्व जाति-जमातींना खुले करून टाकले. तिथे धर्मांतराची सक्ती केली नाही पण ख्रिस्ती धर्माची शिकवणूक सतत दिली. मध्यप्रदेश, गुजरातच्या भीषण दुष्काळात हजारो स्त्रियामुलांना केडगावला आणून मदतकार्य केले. शारदा–सदन, मुक्ति–सदन, कृपा–सदन, प्रीति–सदन अशा वेगवेगळ्या शाखांच्या वेगवेगळ्या इमारती याच काळात इथे उभ्या राहिल्या. या कामात रमाबाईंची कन्या मनोरमा व इंग्लंड-अमेरिकेहून आलेल्या अनेक सेवाभावी स्त्रिया यांनी त्यांना सर्वस्वाने साहाय्य केले. त्या सदनांतून अविवाहित मातांना आधार मिळाला, पोरकी पोरे वाढविली गेली, मागास बुद्धीच्या मुलांची सोय झाली व अंध–अपंगांपासून धडधाकटांपर्यंत, सर्वांसाठी वेगवेगळे शिक्षणक्रम, उद्योगधंदे सुरू करण्यात आले.

रमाबाईंच्या या कामाची कीर्ती सर्व ख्रिस्ती जगात पसरून परदेशातही त्याचे अनुकरण झाले; पण शिक्षित मध्यमवर्गीय हिंदू समाजाशी त्यांचा संबंध जो एकदा कमीकमी होत गेला, तो कधीच जुळला नाही. केडगावचा तो शांत परिसर, बीस वर्षांत, रमाबाईंना हवा होता तसा विविध जीवनोपयोगी व्यापांनी गजबजून गेला. पण इतके साधले तरी रमाबाईंची आध्यात्मिक अस्वस्थता मात्र संपली नाही. मनात धर्माचा शोध वेगळ्या प्रकारे चालूच राहिला. मूळ हिब्रूमधील बायबलचे मराठीत भाषांतर करण्याचे काम त्यांनी सुरू केले (१९०४). त्यासाठी त्या हिब्रू शिकल्या, त्या भाषेचे व्याकरण लिहिले. एका व्यक्तीने समग्र बायबलचे भाषांतर केल्याचे जगातील हे एकमेव उदाहरण आहे.

पण रमाबाईंच्या आध्यात्मिकतेची कसोटी पाहणारा आणखी एक प्रसंग त्यांच्या-वर अद्याप कोसळायचाच होता. १९२१ च्या जुलैमध्ये रमाबाईंची एकुलती एक कन्या मनोरमा वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी हृदयविकाराने वारली आणि रमाबाईंचा अखेरचा व्यक्तिगत पाशही त्यांच्या डोळ्यादेखतच संपून गेला. तिच्या मृत्यूनंतर नऊ महिन्यांनी, एका संध्याकाळच्या वेळी केडगावच्या छापखान्यातच छपाई चालू असलेल्या बायबलची शेवटची प्रुफे रमाबाईंनी तपासून दिली. स्नान करून नेहमीचे शुभ्र वस्त्र परिधान केले व त्या शांतपणे निद्राधीन झाल्या. दुसऱ्या दिवशी रमाबाई जाग्या झाल्या नाहीत. ती तारीख होती ५ एप्रिल १९२२.

उपेक्षित माणसांवर सतत प्रेम करणारे, त्यांच्यासह स्वतःच्या उन्नतीसाठी आपल्या

अंतर्विश्वात सतत झगडत राहिलेले हे एक झपाटलेले आयुष्य त्या क्षणी प्रथमच निवांत झाले...

बाईची शुभ्र वस्त्राच्छादित शवपेटी त्यांच्या सदनातील मुलींनीच आपल्या खांद्यावर वाहून नेली--देवाच्या हाकेसरशी त्या पुन्हा जाग्या होणार आहेत हा विश्वास मनात सांभाळीत...

रमाबाईंची ही जीवनकथा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत घडलेली (१८५८–१९२२). प्रत्यक्ष कालदृष्ट्या ती केवळ चौसष्ट वर्षांचीच; पण आयुष्यात ज्या ज्या स्थित्यंतरांतून रमाबाई गेल्या ती स्थित्यंतरे त्यांच्या जीवनाचे नाते इतके दूरवर पोहोचवणारी आहेत की असे वाटते, हा जीवनपट शेकडो वर्षे विस्तारलेलाच आहे; ज्ञात इतिहासापासून अगदी आधुनिक काळापर्यंत, त्याच्या शाखा-पारंब्या पोहोचलेल्या आहेत; जन्मतः रमाबाईंचे नाते वेदकाळाशी आहे; बाढत्या वयात मध्ययुगाचा अंधार त्यांच्या भोवती आहे; आणि पूर्वपश्चिमेच्या समन्वयातून निर्माण झालेल्या अर्वाचीन युगाच्या जन्मकाळी तर त्या अवघ्या पंचवीस वर्षांच्या तरुणी आहेत. रमाबाईंच्या प्रौढावस्थेचे नाते नेमके कुठे जुळते हे अद्याप मला आकळलेले नाही; पण मनात येऊन जाते की धर्मातीत मानवतेची स्वप्ने पाहणाऱ्या अद्याप अज्ञातच असलेल्या विश्वाशी ते येऊन भिडते आहे. चाळीशी-पंचेचाळीशीनंतरच्या रमाबाई या भारतीय ख्रिस्ती मंडळींमधील एक संततुल्य व्यक्तीच आहेत.

वास्तवात घडून गेलेल्या एकाच आयुष्याला ही एवढी प्रदीर्घता असावी ही गोष्ट माझ्या मनाला स्तिमित करून टाकते. इथे एका स्वयंनिष्ठ मनाने चौसष्ट वर्षांच्या काळात, एवढ्या उलथापालथी अनुभवल्या आहेत की, सनातनापासून अद्यतनापर्यंतचे सगळे भारतीय स्त्रीजीवन एकदमच ढवळून निघाले आहे असे वाटते आणि रमाबाईंच्या ' द हायकास्ट हिंदू वुमन ' या ग्रंथाला प्रस्तावना लिहिणाऱ्या डॉ. रिचर्ड बॉडले या बाईंचे प्रस्तावनेतील पहिलेच वाक्य एकदम विलक्षण वजनदारपणे मनात घोळत राहते. डॉ. बॉडले लिहितात : "हजारो वर्षांची स्तब्धता आता भंगली आहे..." " The silence of thousand years has been broken and the reader of this unpretending little volume catches the first utterances of the unfamiliar. "

शेकडो वर्षे गच्च भरून राहिलेली ती हिंदुस्थानातील स्त्रीजीवनातील स्तब्ध बधीरता ज्या स्त्रीच्या वाणीने, लेखणीने व कृतीने मुळापासून ढवळून गेली तिल

तत्कालीन महाराष्ट्राने कसकसा प्रतिसाद दिला व तिचा कसकसा प्रतिकार केला हे पाहू जावे तर एकोणिसाव्या शतकातील समाजपटावरचे एक अनेकरंगी जीवन-नाट्यच आपल्यापुढे उभे राहते. ह्या नाट्यात स्त्री-शूद्रांच्यावतीने, आजवरच्या उपेक्षितांच्या वतीने, बोलणारे जे लोक आहेत त्यांची नावे आहेत महादेव गोविंद रानडे, गोपाळ हरी देशमुख, जोतिबा फुले, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाबा पदमनजी, फादर नीलकंठशास्त्री ऊर्फ नहेम्या गोरे, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर अशी काही. ज्या वृत्तपत्रांतून व संस्थांतून हे आवाज सर्व साक्षर समाजात खेळते राहिले त्यांची नावे आहेत सुबोधपत्रिका, इंदुप्रकाश, केसरी, सुधारक, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश आणि प्रार्थनासमाज, आर्यमहिलासमाज, सत्यशोधक समाज यांसारखी. या वृत्तपत्रांच्या व समाजांच्या मदतीसच अनेक 'सभा' आहेत, 'मंडळ्या'ही आहेत; आणि तत्कालीन शिक्षित माणसांचे वर्गीकरणच करावयाचे झाले तर त्यात राजाहूनही राजनिष्ठ असलेले जसे काही लोक आहेत तसे गेलेल्या स्वराज्यामुळे जागे झालेले सर्वांगीण बदल करण्याची गरज जाणवलेले, असे पुष्कळ प्रागतिकही आहेत. त्यांपैकी एखाद्याचा आवाज आसुडाच्या कडकडाटासारखाही तीव्र आहे. राज्यकर्त्यांच्या सुप्त आधाराने जगून, सेवेतून व ज्ञानप्रसारातून धर्म-प्रसार साधणारा कडवा मिशनरीवर्ग जसा एकीकडे आहे तसा दुसरीकडे सर्व आघातांच्या भयातून स्वतःचे सर्वच बरेवाईट सावधपणे उराशी कवटाळू पाहणारा धर्मनिष्ठ, आत्मगौरवात रमलेला असा बहुसंख्य परंपरानिष्ठ वर्गही आहे. एकीकडे ख्रिस्तीधर्म स्वीकारूनही स्वतःच्या भारतीयत्वावर पहिल्याइतकाच हक्क सांगणारे सहृदय हिंदू आहेत, दुसरीकडे धर्मांतराने देशांतरही झालेले आहे असे मानणारे अ-भारतीय ख्रिस्ती आहेत—अशा या गुंतडलेल्या वातावरणात हिंदू-ख्रिस्ती पंडिता रमाबाईंच्या आगमनासारखी हादरवून टाकणारी घटना घडली तेव्हा हे सर्व समाज-घटक आपापल्या पद्धतीने वेगाने क्रियाशील झाले. त्यांच्या स्थितिप्रियतेला वा बदल घडवून आणण्यासंबंधीच्या त्यांच्या विविध वैचारिक भूमिकांना हादरे बसू लागले.

आज पन्नास वर्षांच्या अंतरावरून त्या सर्वांच्याकडे पाहताना एक वजनदार आशयविश्व या हालचालींतून आपल्यासमोर उलगडू लागते; पुन्हा रमाबाईंचे आगमन हे या रंगपटावरचे एका स्त्रीचे आगमन आहे व तेव्हा आणि आज-सुद्धा, केवळ भारतातच नव्हे तर सर्व जगातच अशा नाट्यातला हा एक केवढा तरी महत्त्वाचा घटक आहे!

वास्तवात ही स्त्री महाराष्ट्रात जन्मली नाही. वाढलीही नाही. जन्मतःच मोठे रूप धारण करून महाराष्ट्राच्या भूमीवर अवतार घ्यावा तशी ती आली. ती कन्या, भगिनी, पत्नी, माता या सर्व भूमिकांतून निसर्गप्राप्त स्त्री-जीवनाचे सर्व पैलू अनुभवून आली आहे. ती लावण्यवती तर आहेच पण पुरुषांच्या जगातही अपवादात्मक

ठराव्यात अशा अडचणींतून पार पडून केवळ स्वतःच्या ध्येयनिष्ठेच्या जोरावर ती आयुष्यात उभी राहिलेली आहे.

तत्कालीन बहुसंख्य थोर नेत्यांनी व धुरीणांनी पाहिला नाही एवढा जुना-नवा भू-गोल तिने स्वतःच्या डोळ्यांनी ऐन तारुण्यात पाहिलेला आहे व तो पाहताना योग्यायोग्यतेचे, हिताहिताचे, वास्तवतेचे, आदर्शत्वाचे भान असण्याइतकी ती परिपक्व बुद्धीची व सावध आहे. तिचे देशप्रेम हे मुलीच्या आईवरच्या मायेइतकेच सहज आहे. त्याला कोणत्याही व्यावहारिक तडजोडीची मर्यादा तिला जाणीवपूर्वक नकोशी आहे. त्या मायेचा, प्रेमाचा, आधार घेऊन तिला फक्त परकीय राजसत्तेशी किंवा भिन्न मतांच्या स्वकीयांशी लढा उभा करायचा नाही. तिचा लढा आहे जगात कुठेही चालणाऱ्या–असणाऱ्या अमानुषतेशी. असे असले तरी मनुष्यत्वाचाच एक भाग म्हणून ज्या भारतीय समाजात ती जन्माला आली आहे, तिची मुलगी जन्माला आली आहे, त्या समाजाच्या सुखदुःखांशी तिचे रक्ताचे नाते आहे. तिने धर्मांतर केले खरे, पण ते स्वतःला मनुष्याचे संपूर्ण जिणे जगायचे आहे या ध्यासातून केलेले असून, ते फसून वा स्वार्थासाठी केलेले नाही. प्रत्येक मनुष्यमात्राला (मग तो अज्ञानी असो, पापी असो–कसाही असो) जन्मतः समानता देणारा, लौकिक आणि पारलौकिक उन्नतीची सारखीच आशा आहे असे म्हणणारा आणि उदात्त विचारांची उदात्त कृतींशी सांगड साधणारा ख्रिस्ती धर्म तिने उन्नत मनुष्यत्वासाठी स्वीकारला आहे. त्यामुळे तो ' आपला ' नाही, ' परका ' आहे हे तिला इतर अनेकांप्रमाणे प्राणभूत महत्त्वाचे म्हणून विचारातच घ्यावेसे वाटलेले नाही. हा धर्म जगातल्या कोणाचाही असू शकतो व भारतात तर इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून तो आहे; तेव्हा तो रूढ अर्थानेही भारतीय आहे, असे तिचे म्हणणे आहे. केवळ राज्यकर्त्या ब्रिटिशांचा धर्म ख्रिस्ती आहे म्हणून ख्रिस्ताला परकीय मानणे तर अयोग्य आहेच, पण तो धर्म स्वीकारल्यावर अन्यायी ब्रिटिशांचे समर्थन करायला हवे हे त्याहून अयोग्य आहे असे निःसंदिग्धपणे मानणारी ही स्त्री, केवळ तडजोड म्हणून स्वतःचा मानसिक आधार असलेला धर्मविचार बाजूला टाकायलाही तयार नाही. त्यामुळेच भोवतालचे सनातनी सुधारक, मिशनरी व राज्यकर्ते या सर्वांहून तिचा पंथही वेगळा आहे. हा वेगळेपणा तिच्या समर्थकांनासुद्धा व्यवहारात कळवून न घेता यावा असाच आहे. तिची झेप ज्या अज्ञ लोकांसाठी ती स्वतःचे जीवनदान करायला निघाली आहे त्यांच्याही हिताची नाही असे त्या सर्वांचे स्पष्ट मत आहे. पण स्वभावतः ती बदलू शकत नाही. स्वतःपुरत्या आखून घेतलेल्या, स्त्रीवर्गासंबंधीच्या एका कार्यक्षेत्रात जे जे करता येईल ते ते सर्व तिला वेगाने केलेच पाहिजे. घरात, दारात, जीवनाच्या कोणत्याही लहानमोठ्या क्षेत्रात, भारतीय स्त्री एक मनुष्य म्हणून आत्मसन्मानाने वावरताना दिसायला हवी हे तिचे ध्येय आहे. तिचे सगळे कृतिशील आयुष्य हा तिच्या याबाबतच्या

तत्कालीन महाराष्ट्राने कसकसा प्रतिसाद दिला व तिचा कसकसा प्रतिकार केला हे पाहू जावे तर एकोणिसाव्या शतकातील समाजपटावरचे एक अनेकरंगी जीवन-नाट्यच आपल्यापुढे उभे राहते. ह्या नाट्यात स्त्री-शूद्रांच्यावतीने, आजवरच्या उपेक्षितांच्या वतीने, बोलणारे जे लोक आहेत त्यांची नावे आहेत महादेव गोविंद रानडे, गोपाळ हरी देशमुख, जोतिबा फुले, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाबा पदमनजी, फादर नीलकंठशास्त्री ऊर्फ नहेम्या गोरे, बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर अशी काही. ज्या वृत्तपत्रांतून व संस्थांतून हे आवाज सर्व साक्षर समाजात खेळते राहिले त्यांची नावे आहेत सुबोधपत्रिका, इंदुप्रकाश, केसरी, सुधारक, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश आणि प्रार्थनासमाज, आर्यमहिलासमाज, सत्यशोधक समाज यांसारखी. या वृत्तपत्रांच्या व समाजांच्या मदतीसच अनेक 'सभा' आहेत, 'मंडळया'ही आहेत; आणि तत्कालीन शिक्षित माणसांचे वर्गीकरणच करावयाचे झाले तर त्यात राजाहूनही राजनिष्ठ असलेले जसे काही लोक आहेत तसे गेलेल्या स्वराज्यामुळे जागे झालेले सर्वांगीण बदल करण्याची गरज जाणवलेले, असे पुष्कळ प्रागतिकही आहेत. त्यांपैकी एखाद्याचा आवाज आसुडाच्या कडकडाटासारखाही तीव्र आहे. राज्यकर्त्यांच्या सुप्त आधाराने जगून, सेवेतून व ज्ञानप्रसारातून धर्म-प्रसार साधणारा कडवा मिशनरीवर्ग जसा एकीकडे आहे तसा दुसरीकडे सर्व आघातांच्या भयातून स्वतःचे सर्वच बरेवाईट सावधपणे उराशी कवटाळू पाहणारा धर्मनिष्ठ, आत्मगौरवात रमलेला असा बहुसंख्य परंपरानिष्ठ वर्गही आहे. एकीकडे ख्रिस्तीधर्म स्वीकारूनही स्वतःच्या भारतीयत्वावर पहिल्याइतकाच हक्क सांगणारे सहृदय हिंदू आहेत, दुसरीकडे धर्मांतराने देशांतरही झालेले आहे असे मानणारे अ-भारतीय ख्रिस्ती आहेत—अशा या गुंतडलेल्या वातावरणात हिंदू-ख्रिस्ती पंडिता रमाबाईंच्या आगमनासारखी हादरवून टाकणारी घटना घडली तेव्हा हे सर्व समाज-घटक आपापल्या पद्धतीने वेगाने क्रियाशील झाले. त्यांच्या स्थितिप्रियतेला वा बदल घडवून आणण्यासंबंधीच्या त्यांच्या विविध वैचारिक भूमिकांना हादरे बसू लागले.

आज पन्नास वर्षांच्या अंतरावरून त्या सर्वांच्याकडे पाहताना एक वजनदार आशयविश्व या हालचालींतून आपल्यासमोर उलगडू लागते; पुन्हा रमाबाईंचे आगमन हे या रंगपटावरचे एका स्त्रीचे आगमन आहे व तेव्हा आणि आज-सुद्धा, केवळ भारतातच नव्हे तर सर्व जगातच अशा नाट्यातला हा एक केवढा तरी महत्त्वाचा घटक आहे!

वास्तवात ही स्त्री महाराष्ट्रात जन्मली नाही. वाढलीही नाही. जन्मतःच मोठे रूप धारण करून महाराष्ट्राच्या भूमीवर अवतार घ्यावा तशी ती आली. ती कन्या, भगिनी, पत्नी, माता या सर्व भूमिकांतून निसर्गप्राप्त स्त्री-जीवनाचे सर्व पैलू अनुभवून आली आहे. ती लावण्यवती तर आहेच पण पुरुषांच्या जगातही अपवादात्मक

ठराव्यात अशा अडचणींतून पार पडून केवळ स्वतःच्या ध्येयनिष्ठेच्या जोरावर ती आयुष्यात उभी राहिलेली आहे.

तत्कालीन बहुसंख्य थोर नेत्यांनी व धुरीणांनी पाहिला नाही एवढा जुना-नवा भूगोल तिने स्वतःच्या डोळ्यांनी ऐन तारुण्यात पाहिलेला आहे व तो पाहताना योग्यायोग्यतेचे, हिताहिताचे, वास्तवतेचे, आदर्शत्वाचे भान असण्याइतकी ती परिपक्व बुद्धीची व सावध आहे. तिचे देशप्रेम हे मुलीच्या आईवरच्या मायेइतकेच सहज आहे. त्याला कोणत्याही व्यावहारिक तडजोडीची मर्यादा तिला जाणीवपूर्वक नकोशी आहे. त्या मायेचा, प्रेमाचा, आधार घेऊन तिला फक्त परकीय राजसत्तेशी किंवा भिन्न मतांच्या स्वकीयांशी लढा उभा करायचा नाही. तिचा लढा आहे जगात कुठेही चालणाऱ्या–असणाऱ्या अमानुषतेशी. असे असले तरी मनुष्यत्वाचाच एक भाग म्हणून ज्या भारतीय समाजात ती जन्माला आली आहे, तिची मुलगी जन्माला आली आहे, त्या समाजाच्या सुखदुःखांशी तिचे रक्ताचे नाते आहे. तिने धर्मांतर केले खरे, पण ते स्वतःला मनुष्याचे संपूर्ण जिणे जगायचे आहे या ध्यासातून केलेले असून, ते फसून वा स्वार्थासाठी केलेले नाही. प्रत्येक मनुष्यमात्राला (मग तो अज्ञानी असो, पापी असो–कसाही असो) जन्मतः समानता देणारा, लौकिक आणि पारलौकिक उन्नतीची सारखीच आशा आहे असे म्हणणारा आणि उदात्त विचारांची उदात्त कृतींशी सांगड साधणारा ख्रिस्ती धर्म तिने उन्नत मनुष्यत्वासाठी स्वीकारला आहे. त्यामुळे तो 'आपला' नाही, 'परका' आहे हे तिला इतर अनेकांप्रमाणे प्राणभूत महत्त्वाचे म्हणून विचारातच घ्यावेसे वाटलेले नाही. हा धर्म जगातल्या कोणाचाही असू शकतो व भारतात तर इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून तो आहे; तेव्हा तो रूढ अर्थानेही भारतीय आहे, असे तिचे म्हणणे आहे. केवळ राज्यकर्त्या ब्रिटिशांचा धर्म ख्रिस्ती आहे म्हणून ख्रिस्ताला परकीय मानणे तर अयोग्य आहेच, पण तो धर्म स्वीकारल्यावर अन्यायी ब्रिटिशांचे समर्थन करायला हवे हे त्याहून अयोग्य आहे असे निःसंदिग्धपणे मानणारी ही स्त्री, केवळ तडजोड म्हणून स्वतःचा मानसिक आधार असलेला धर्मविचार बाजूला टाकायलाही तयार नाही. त्यामुळेच भोवतालचे सनातनी सुधारक, मिशनरी व राज्यकर्ते या सर्वांहून तिचा पंथही वेगळा आहे. हा वेगळेपणा तिच्या समर्थकांनासुद्धा व्यवहारात कळवून न घेता यावा असाच आहे. तिची झेप ज्या अज्ञ लोकांसाठी ती स्वतःचे जीवनदान करायला निघाली आहे त्यांच्याही हिताची नाही असे त्या सर्वांचे स्पष्ट मत आहे. पण स्वभावतः ती बदलू शकत नाही. स्वतःपुरत्या आखून घेतलेल्या, स्त्रीवर्गासंबंधीच्या एका कार्यक्षेत्रात जे जे करता येईल ते ते सर्व तिला वेगाने केलेच पाहिजे. घरात, दारात, जीवनाच्या कोणत्याही लहानमोठ्या क्षेत्रात, भारतीय स्त्री एक मनुष्य म्हणून आत्मसन्मानाने वावरताना दिसायला हवी हे तिचे ध्येय आहे. तिचे सगळे कृतिशील आयुष्य हा तिच्या याबाबतच्या

व्यापक संवेदनाशीलतेचाच आविष्कार आहे; अज्ञान, बालविवाह, वैधव्य, संपूर्ण परावलंबन यांमुळे विध्वंस, ऱ्हास, विनाश, यांच्या दिशेने शतकांमागून शतके चाललेली भारतीय स्त्रीजीवनाची लाट तिला थोपवायची आहे. हे करीत असताना पदोपदी अटळ असलेला सामाजिक संघर्ष ती जाणते; पण संघर्षातून शेवटी प्रचंड स्वरूपात करावयाच्या विधायक कृतीपर्यंत तिला लवकरात लवकर पोहोचायचेही असते. अशा विधायक कृतीशिवाय तिला जगताच येऊ नये इतके तिचे सामाजिक व व्यक्तिजीवन तिने गुंतवून घेतलेले आहे. अनेक प्रश्न 'आ' वासलेल्या अवस्थेत समोर ठेवून वादविवाद करीत मंदगतीने जायला किंवा पदोपदी स्पष्टीकरणे देत बसायला तिला सवड नाही. तिच्या दृष्टीने आधीच शेकडो वर्षे उशीर झालेला आहे. समाजजीवनाचे गाळातच रुतलेले एक चाक जोपर्यंत वर निघत नाही तोपर्यंत हा समाजशकट पुढे सरकणारच नाही.

—असे हे इतके सर्वस्वी दुसऱ्यांसाठी असलेले आणि तरीही सातत्याने स्वयंनिष्ठ असणारे व्यक्तिमत्त्व या शंभर वर्षांपूर्वीच्या सामाजिक नाट्यातला केंद्रबिंदू आहे!

रमाबाईंच्या आयुष्यातले अखेरचे पर्यवसानही त्यांच्या ह्या दोन उत्कट गुण-विशेषांच्या ताणातूनच निर्माण झालेले आहे; त्यामुळे जी घडली ती या आयुष्याची शोकांतिका की सुखांतिका हे ठरविणेही अवघड आहे—रमाबाईंच्या सर्व श्रेष्ठ समकालिनांनी मात्र ती शोकांतिकाच मानली आहे!

...आपल्या अखेरच्या दिवसांत मुक्ति-मिशनच्या आवारात, संध्याकाळच्या वेळी, एखाद्या झाडाखाली खुर्ची टाकून दोन हजाराहून अधिक जिवांचा भार पेलणाऱ्या रमाबाई शांतपणे बसलेल्या असत. त्यांच्या भोवती त्यांना भेटायला आलेली परदेशी पाहुणे मंडळी किंवा त्यांचे सहकारी असत आणि समोरच्या मोकळ्या आवारात कुठून कुठून एकत्र आलेल्या हिंदुस्थानातल्या अनाथ पोरांचा खेळ रंगात आलेला असे. शेकडो स्त्रिया आपापले उद्योग करीत दुःसह परिस्थितीतून वाट काढायची धडपड करीत असत...सभोवताली नसायचे ते फक्त एतद्देशीय, हिंदुधर्मीय जाणते समानधर्मे!

रमाबाई महाराष्ट्रात आल्या येथपासून त्यांच्या व महाराष्ट्राच्या जीवनातल्या या सामाजिक नाट्याला प्रारंभ झाला. त्यापूर्वीचे त्यांचे तेवीस वर्षांचे अद्भुतरम्य आयुष्य हा त्यातील केवळ प्रास्ताविकाचाच एक भाग आहे. प्रार्थनासमाजाच्या सभासदांच्या निमंत्रणावरून त्या ३१ मे १८८२ रोजी पुण्यात उतरल्या; आणि अकरा महिने राहून २० एप्रिल १८८३ रोजी इंग्लंडला निघाल्या हा त्यातला पहिला टप्पा मानला तर रमाबाई इंग्लंड-अमेरिकेचा दौरा करून मुंबईला परतल्या व सुधारकांच्या

सहकार्याने त्यांनी शारदासदन चालू ठेवण्याचा प्रयत्न केला हा दुसरा टप्पा मानता येईल (१८८९–१८९४); आणि बरोबरीच्या सर्वांपेक्षा वेगळाच असा आपला मार्ग ठरवून त्या आयुष्याच्या अखेरपर्यंत जात राहिल्या हा तिसरा, अखेरचा भाग म्हणता येईल (१८९४–१९२२).

पुण्यास रमाबाई येणार आहेत या वार्तेने सुधारकांमध्ये व त्यांच्या स्त्रियांमध्ये जे कुतूहल तयार झाले होते त्याचे वर्णन रमाबाई रानड्यांनी 'आठवणी'त लिहिले आहे : "सगळ्या बायकांच्या बोलण्यात पंडिताबाईंचाच विषय होता. ती कशी असेल, कोठे उतरेल, आपल्याला भेटेल की नाही...ती लांब उतरली तर मग काय ? वगैरे पुष्कळ गोष्टींची चर्चा आमच्यात बराच वेळ झाल्यावर मी नक्की बातमी काढण्यासाठी भिडे-मोडक बसले होते तिथे जाऊन पंडिताबाईंबद्दल सर्व विचारून घेतले. ते म्हणाले, 'पंडिताबाई ही कोणी परकी आहे की काय ? ती एक आपली कोकणस्थच बाई आहे. आम्ही मंडळींनी तिला बोलावले आहे...ती दुःखीकष्टी बाई, तिचा तुम्ही येऊन समाचार घेतला पाहिजे...' 'स्वतः' च्या सांगण्यावरून मी पंडिताबाईंकडे एक दिवसाआड बसावयास जाऊ लागले...दोन-तीन दिवसांनी त्या आमच्या घरी इंग्रजी शिकावयास येऊ लागल्या...पंडिताबाईंचे पहिले पुराण आमच्याच घरी झाले.. जेथे पुराण असेल तेथे आम्ही दोघे जाऊ लागलो... आधीच पंडिताबाईंची वाणी अस्खलित व गोड असून विषयप्रतिपादन करण्याची शैली उत्तम. बोलत असताना श्रोत्यांचे मन आपल्या भाषणाकडे आकर्षित करून घेण्याची त्यांची विलक्षण हातोटी होती. हे चारही गुण त्यांच्यामध्ये असल्यामुळे शहरातील सर्व जुन्या व नव्या शिक्षणेच्छू विद्वानांना पंडिताबाईंचे कौतुक व अभिमान वाटू लागला व दर सभेला आपल्या घरच्या बायकांना, मुलांना ही मंडळी नेमाने पाठवू लागली."

अनेकदा पंडिताबाईंच्या व्याख्यानांची निमंत्रणे देण्यासाठी स्वतः रमाबाई रानडे घरोघर जात असत आणि काही सनातनी बायकांची वाकडी बोलणी ऐकून हिरमुसल्या होऊन घरी येत असत. काशीबाई कानिटकरांनी या काळातल्या आपल्या आठवणी सांगताना रमाबाई रानड्यांच्या 'उमाकांत' लिखित चरित्रातील प्रस्तावनेत म्हटले आहे, "बायको माणूस, बोलते तरी कशी हे पाहण्याची उत्कंठा प्रत्येक पुरुषाला लागली होती. त्यांना वाटले होते, पंडिताबाईंची व्याख्याने आपणा पुरुषवर्गाला एकटयाला ऐकावयास मिळतील; कारण युरोपियन विद्वान स्त्रियांची भाषणे जशी आपणास ऐकायला मिळतात तसेच हेही घडेल. पण पंडिताबाई कसल्या वस्ताद ? त्यांना हा पुरुषांचा कावा पूर्ण माहीत ! पंडिताबाईंची व्याख्याने, पुराणे वगैरे जे काय होईल त्याच्या निमंत्रणपत्रिकेत एक अट घातलेली असे ती ही की, जे कोणी पुरुष व्याख्यानाला येतील त्यांनी आपली पत्नी, मुलगी, सून, बहीण, भावजय अशांपैकी खुद्द घरची स्त्री बरोबर आणल्याशिवाय त्यांना रांगेत बसता येणार नाही. या त्यांच्या

अटींमुळे मला माझ्या श्वशुरांबरोबर पंडिता रमाबाईंना पाहण्याचा योग आला.'' या अटीमुळे केरूनाना छत्रे यांच्यासारख्या त्या काळातील माननीय व्यक्तीलाही पंडिताबाईंचे व्याख्यान हॉलमागच्या खोलीत बसून एकट्याने ऐकावे लागले होते! स्त्री-सुधारणेची ओढ असणारे, तशी स्वप्ने पाहणारे कादंबरीकार हरिभाऊ आपटे मोठ्या उत्साहाने आपल्या पत्नीला-मथूताईंना-बरोबर घेऊन (घरातल्या मंडळींना न कळवता) या व्याख्यानांना जाऊ लागले; इतकेच नव्हे तर रमाबाईंना त्यांनी 'आनंदाश्रमा'त एक पार्टीही दिली! सुबोधपत्रिकेने तर रमाबाईंची चरित्रकथा व व्याख्यानांचे वृत्तान्त प्रसिद्ध करण्याचा सपाटाच लावला. साऱ्या महाराष्ट्रात रमाबाई हिंडत होत्या; ठिकठिकाणी महिला-समाजाची स्थापना होत होती व ठिकठिकाणची सुधारकमंडळी त्यांना साडीचोळीबरोबर प्रवासखर्चासाठी रोख रकमेचा आहेरही करीत होती. रमाबाईंनी कोणत्या व्याख्यानात काय विचार मांडले याची घरी-दारी सर्वत्र चर्चा चालत होती. उपनिषत्कालातल्या गार्गी-मैत्रेयींशी त्यांचे नाते जोडले जात होते तर 'हा काळ कठीण आला' म्हणून सनातनी आत्मे अस्वस्थपणे जागच्याजागी तडफडही करू लागले होते.

भारतीय स्त्रीसंबंधात तत्कालीन समाजाला रमाबाईंनी काय सांगितले असले पाहिजे ह्याची कल्पना ह्या काळात त्यांनी लिहिलेल्या 'स्त्रीधर्मनीती' या पुस्तकावरून एकत्रितपणे येते. त्यांनी लिहिले आहे, 'सांप्रतकाळी आमच्या या हतभाग्य-देशातील स्त्रीजातीची दशा किती शोचनीय आहे ती सांगता पुरवत नाही...या स्त्रिया अगदी असाहाय्य आणि ज्ञानशून्य आहेत. त्यांस आपले हित कसे करून घ्यावे हेही समजत नाही, तेव्हा ज्ञानी लोकांनी त्यांचे हित काय केल्याने होईल हे त्यास सांगून त्याजकडून त्याप्रमाणे आचरण करविले पाहिजे. नीतिज्ञान व तदनुसार आचरण ही मनुष्याच्या उन्नतीची द्वारे आहेत...भारतवर्षातील शास्त्रे अपरिचित अशा संस्कृत भाषेत लिहिलेली असून अक्षरशून्य स्त्रियांस त्याचे ज्ञान होणे आकाशपुष्पासारखे असंभाव्य आहे...मनुष्यास परमेश्वराने ज्या ज्या प्रवृत्ती दिल्या आहेत त्या सर्वांत आत्मोन्नतीची इच्छा ही फार मोठी वृत्ती आहे. त्यासाठी एकाग्रचित्त होऊन आळस न करता पयत्न केला पाहिजे...आत्मावलंबन म्हणजे आपणावर अवलंबून असणे हा उन्नत होण्याचा अद्वितीय उपाय होय...परिश्रम, उत्साह, सत्यप्रतिज्ञता हे गुण त्यापाठीमागून आपोआप येतात. मेघास सोडून जशी विद्युल्लता दूर नसते तशी या गुणांस सोडून उन्नतीही नसते. अन्नाला काळ आणि भुईला भार होऊन राहण्यापेक्षा जन्म न घ्यावा ते बरे-नाहीतर जन्मतःच मरावे तेही बरे...सर्व स्त्रिया या कामाला लागल्या असता थोड्याच दिवसांत, समाजात सत्पुरुषांचे जसे आधिपत्य आहे तसेच किंबहुना त्यापेक्षाही अधिक स्त्रियांचे होईल यात तिळमात्र संशय नको...पाहा, युरोपखंडातील लोक जे आमच्या देशावर राजसत्ता चालवीत आहेत, ह्या आमच्या

देशातील २६ कोटी प्रजेचे धन, प्राण, मान ज्यांच्या मुठीत, जे ह्या भारतवर्षातील राजापासून रंकापर्यंत सर्व लोकांस लाकडाच्या बाहुल्यांप्रमाणे आपल्या मनास वाटेल तसे, बोटाच्या अग्रभागावर नाचवीत आहेत, ते ह्या देशातील लोकसंख्येच्या एक-चतुर्थांशइतकेही नसून त्यांच्या जातीची ही असंभवनीय उन्नती कशाने बरी झाली? ..युरोपियन लोक एका मोठ्या मंत्रसाधनाच्या जोरावर सर्व दुर्घट कामे थोडक्यात, अल्पपरिश्रमाने सिद्धीस नेऊन आपल्या जातीची उन्नती करीत आहेत; ते मंत्रसाधन त्यांच्या जातीतील प्रत्येक मनुष्याचा सतत उद्योग हेच होय...(ह्या उलट आपल्या लोकांत) साहस नाही, तेज नाही, उत्साह नाही, स्वाधीनता नाही. आणखी किती काय नाही म्हणू? खरोखर म्हटले असता चांगले असावे तसे काहीच नाही. 'आहे' या शब्दात जागा द्यावयाची असल्यास कोठे? तर संगीत नाटके आहेत, पोटभर भाकरी न खाता, कष्टाने जमवून नीच तमाशात वर्गणी भरण्यास पैसा आहे, आपल्या समाजातील एखादे मनुष्य चांगले देशहिताचे काम करू लागले तर त्यास कोणत्या तरी उपायाने निंदा करून व त्याच्या विरुद्ध लोकांस उत्तेजित करून त्याचा उद्योग कोणत्याही रीतीने सिद्धीस न जाऊ देण्याची बुद्धी आहे, बुद्धीची अस्थिरता आहे इत्यादी अशा प्रकारच्या 'आहे'स जागा हजारो मिळतील. ही आमच्या दुर्भाग्याची भरती जी चढत चालली आहे ती आहेच. हीस ओहोटी कधी लागणार ते एक ईश्वर जाणे!...ईश्वराने स्त्रियांस नुसता स्वयंपाक करण्यास अथवा अपत्यो-त्पादनासच पाठविले नाही–तुम्ही येथे विचार करून पाहाल तर अगणित कामे आहेत. ह्या विशाल संसाररूपी विराट पुरुषाच्या शरीराचे डावा आणि उजवा असे दोन भाग आहेत. त्यातून डावा भाग स्त्रिया आणि उजवा पुरुष हे होत. आपल्या शरीराचे दोन्ही भाग सारखे चालत असले म्हणजे आपण जसे सुखाने स्वस्थ असतो, तसेच संसारातील पुरुष आणि स्त्री दोघेही नीट आपापली कामे करीत असली म्हणजे संसार फार सुंदर व सुखप्रद होतो...एकटा पुरुष कोणतेही काम संसारात चांगल्या रीतीने करू शकणार नाही...तुम्ही म्हणाल, सुख तर आम्हास होते...मग आणखी सुख ते कोणते? माझ्या प्रिय बहिणींनो, सुख म्हणजे खाण्यापिण्याचेच नव्हे—सुख म्हणजे स्वाधीनता...ते तुमचे सजीवत्व लोकांस समजू द्या—तुमच्या शरीरात जे रक्त आहे ते मनाच्या उत्साहामुळे उष्ण होऊन प्रत्येक धमनीवाटे वेगाने वाहू द्या... '

रमाबाईची अशा प्रकारची भाषणे मुंबईतही झाली तेव्हा सुबोधपत्रिकेत तीस-पस्तीस लोकांच्या सह्यांनिशी एक पत्र प्रसिद्ध झाले. त्यात आजवर मुंबईकर मंडळी जिचे नाव ऐकून होती तिला पाहून, ऐकून त्यांना जो आनंद झाला तो व्यक्त केलेला आहे व शेवटी 'श्रेष्ठ दर्जाच्या बुद्धिमत्तेमुळे आजच्या भारतातल्या अनेक सुप्रसिद्ध स्त्रियांमध्येही त्या अग्रेसर आहेत, इतकेच नव्हे तर आपल्या अभागी

भगिनींसाठी सर्व आयुष्य वाहण्याचा त्यांचा जो निश्चय आहे त्यामुळे तर त्या अधिकच स्तुतीस पात्र आहेत, ' असे भारावून जाऊन म्हटले आहे.

या अशा उत्तेजक कार्यशील वातावरणात वावरत असतानाच रमाबाईंचा इंग्लंडला जाण्याचा विचार चालू होता; परंतु त्या विचाराला त्यांच्या चाहत्यांपैकीही फारसे कोणी अनुकूल नव्हते. इंग्लंडला गेल्यानंतर एका प्रार्थनासमाजिस्ट सहकाऱ्याला लिहिलेल्या पत्रात लोकांचे आक्षेप व आपली उत्तरे रमाबाईंनी सविस्तर लिहिलेली आहेत. हेच पत्र पुढे ' इंग्लंडचा प्रवास ' ह्या पुस्तकाच्या रूपाने प्रसिद्धही झाले आहे. पत्रात रमाबाई जे म्हणतात ते सारांशरूपाने असे आहे, " माझे या वेळेस इकडे येणे हे मोठे साहस किंवा (तुमच्या मते) मोठ्या चुकीचे आहे. तुम्ही त्याची कारणे दाखविलीत आणि एकपक्षी ती म्हणजे खोटी आहेत असे नाही. तरी कित्येक लोकांनी गैरसमजुतीमुळे किंवा आपल्या प्रकृतीप्रमाणे माझ्या इकडे येण्याचे उद्देश नाना तऱ्हेने कल्पून घेतले ही गोष्ट खरोखरच दुःखास्पद होय...पुण्यात असता काही प्रसंगांनी माझा आणि सेंट मेरीज होममधील सिस्टर सुपीरियर हिचा परिचय झाला होता. त्याचप्रमाणे आणखीही कित्येक युरोपियन स्त्रियांशी माझा बराच स्नेह जमला होता...त्यांपैकी कितीएकाने अगदी निराशा केली, कितीएक म्हणाल्या, तुम्ही खिश्चन असता तर काही सोय झाली असती. कोणी म्हणाल्या, आमच्या येथे अगोदर उमेदवारी करा पुढे पाहता येईल. एका बाईने लंडनहून मला लिहून कळविले की तुम्ही एकट्याच (मुलीला हिंदुस्थानात ठेवून) सहा महिन्यांकरता इकडे या, पुढे तुमची काही येथे राहण्याची तजवीज झाली तर बरेच आहे. नाहीतर परत जाल. परंतु तसे करणे अशक्य होते. त्यात मुख्य दोन अडचणी होत्या. पहिली, दोन वर्षांच्या बाळाला सोडून इतक्या दूर येणे आणि दुसरी केवळ सहा महिन्यांकरता इकडे येऊन ' ना धड गाढव ना धड ब्रह्मचारी ' या म्हणीप्रमाणे होणे. काही दिवसांनी सिस्टर सुपीरियरकडून मला निरोप कळला की येथे आले असता त्यांच्या ज्या पुष्कळ सिस्टर्स हिंदुस्थानात जाणार आहेत त्यांस मराठी शिकण्याची जरुरी असून ते काम जर मी पत्करले तर त्या माझा खर्च (खाण्यापिण्याचा) चालवतील. आणि मला इंग्रजी शिक्षणही देतील...मी त्यास सांगून पाठविले की त्यांनी जो माझा खर्च चालविण्याचा पत्कर घेतला तो निःस्वार्थ असावा (म्हणजे पुढे मला आभारी करून खिश्चन करण्याच्या आशेने किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या मतलबाने असू नये). तरच मी त्यांच्या मंडळापाशी राहण्यास जाईन. हे माझे म्हणणे त्यांनी कबूल केल्यावर मी इकडे येण्याची तयारी केली. असो. आता या देशात आताच आले पाहिजे असे मला वाटण्याची कारणे आणि माझ्या हितेच्छू मित्रमंडळीस मी आताच न यावे असे वाटण्याची कारणे यांचा विचार करू. माझ्या मताच्या विरुद्ध जी काही कारणे माझ्या मित्रांनी दाखविली त्यांपैकी मुख्य अशी

(१) प्रकृतीची अशक्तता आणि मुलगी लहान आहे. (२) इंग्रजी बोलता येत नाही. (३) मी इकडे निघून आल्यावर आर्य-महिला-समाज वगैरे निद्रा घेऊ लागतील. (४) खिश्चन लोकांच्या सहवासात राहणे बरोबर नाही. (५) इंग्लंड-सारख्या चैनबाजीच्या मुलखात या तरुण वयात येणे बरोबर नाही. (६) या देशाची मला माहिती नसून इकडे पुष्कळ लबाड लोकांपासून मला अपाय होण्याची भीती आहे. (७) इंग्लंडमध्ये गेल्यावर तिकडच्या वैभवाने डोळे दिपून जातील आणि मग स्वदेशप्रीती अगदी राहणार नाही. (८) ...मिसेस फॉसेट, मिस मॅनिंग यां-सारख्या विद्वान बायांसमोर जाऊन तुम्ही काय बोलणार ? तुम्हाला इंग्रजी पुरते समजत सुद्धा नाही. (९) जी जी ठिकाणे पाहाल त्यांचा इतिहास तुम्हाला माहीत नसला तर त्या पाहण्यापासून काय फळ होणार ? म्हणून तुम्ही आधी सगळे इतिहास पाठ करा....वयोवृद्ध झाले म्हणजे मनुष्यास पुष्कळ वजन येते. तुम्ही आणखी दहा-बारा वर्षांनी तिकडे जा. (१०) तुमचा वैद्यकी शिकण्याचा इरादा आहे... चार वर्षे चांगला अभ्यास करून मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास झाला म्हणजे मग जा. कोणाच्या मनाचा तर असा समज झाला, की माझ्या स्वदेशीय मित्रांवर माझा अगदी विश्वास नसून माझा काय तो भरंवसा सर्व मिशनरी लोकांवरच आहे. यावरून माझे इकडे येणे माझ्यावाचून बहुधा कोणासही सयुक्तिक किंवा बरे वाटले नाही हे स्पष्टच आहे.

तर मग मला का इकडे यावेसे वाटावे ? सदरहू कारणे दाखविणाऱ्या मोठ्या विद्वानांपेक्षा माझी बुद्धी अधिक होती असे नाही. परंतु प्रत्येक मनुष्याचा असा स्वभाव असतो, की त्याला त्याने काय करावे आणि काय न करावे याचे चांगले ज्ञान आहे असे वाटते आणि ते असतेही...मीही मनुष्यजातीच्या बाहेर नाही, तेव्हा मलाही तसे वाटणे स्वाभाविकच आहे. लोकांच्या मतांविरुद्ध माझी जी मते पडली त्याची कारणे अशी—(१) माझी अशक्तता काही रोगमूलक नव्हे...आज आठ वर्षांपासून सतत प्रवासात माझे आयुष्य गेले असून शेकडो ठिकाणचे हवापाणी माझ्या प्रकृतीला मानवले आहे. सतत मितभोजन आणि मिताचार असल्याने सहसा रोग होण्याचे भय नाही.. आता मुलगी लहान आहे आणि तिच्या प्रकृतीला समुद्रातील आणि येथील हवा मानवेल किंवा नाही हा प्रश्न राहिला. मुलीची आई सहा महिन्यांची (तान्हे लेकरू) होती तेव्हाच तिची आईबापे तिला एका वेताच्या पेटाऱ्यात घालून ती गड्याच्या डोकीवर देऊन प्रवासास निघाली, तेव्हापासून आजपर्यंत तिच्य कपाळाचा प्रवास चुकला नाही. तेव्हा तिच्या मुलीची प्रकृती नाजूक कोठून होणार ? बरे, मुलीला तिच्या आईने 'भुईवर ठेवली तर मुंगी चावेल आणि अधांतरी ठेवली तर कावळा नेईल' अशी आशंका करून अगदी नाजूकपणाने वाढविली आहे असेही नाही...(२) मी हिंदुस्थानात पुष्कळ देशांत फिरले. त्या देशांतील भाषा मला कशा

त्या स्वप्नीसुद्धा माहीत नव्हत्या...त्या शिकंण्याचा प्रयत्न करताच मला बोलता, लिहिता, वाचता येऊ लागल्या. तशीच इंग्रजी भाषा मला येणार नाही म्हणून कशावरून? ...मूल जन्माला येते तेव्हा त्याला सर्वच भाषा मुलखानिराळ्या असतात...मी जाणून-बुजून शिकण्याकरताच या देशात येणार होते तेव्हा मला ही भाषा येत नाही म्हणून माझी कोणती मोठी अब्रू जाणार होती? (३)...जेथे आर्य-महिला-समाज चालविण्यासारखे लोक असतील तेथे तो मी हिंदुस्थानात नसले तरी चालेल. आणि जेथे तसे लोक नाहीत तेथे एक सोडून हजार रमाबाई असल्या तरी तो चालावयाचा नाही. (४) ख्रिश्चन लोकांच्या सहवासात राहणे का बरोबर नाही हे मला कळत नाही... पाण्यात राहायचे तर तेथे कोरडी जमीन कोठून मिळणार?...एक मात्र भय ते हे की ख्रिश्चन धर्म स्वीकारणे. ते करण्यास मला हिंदुस्थानात पुष्कळ लोकांनी उपदेश केलेला आहे. मनुष्याचे मनाचा काही निश्चय नाही असे जर आहे तर त्याला हिंदुस्थान काय आणि इंग्लंड काय?...(५) इंग्लंडच काय पण त्याच्यापेक्षा सहस्रपट चैन-बाजीच्या मुलखात गेले तरी ज्याला ते करावयाचे नाही ते त्याच्याने कधीच करवणार नाही. चैनीला तरुण आणि वृद्ध असा विचार नसतो...एखादा पदार्थ आपल्याला मिळत नाही म्हणून त्यावर आपली इच्छा नाही असे दाखविणे किंवा तो नाही म्हणून आपल्याला आवडत नाही असे म्हणणे हे शुद्ध ढोंग होय. मला या चैन-बाजीच्या मुलखातच माझ्या मनाची परीक्षा करावयाची आहे. जरी या देशाची मला माहिती नसली आणि एथे पुष्कळ लबाड लोक असले तरी मला त्याची काय भीती? एथे सर्वच म्हणजे लबाड आहेत असे नाही. मी ज्या स्त्रियांच्या समाजात राहते त्या धर्मार्थ सर्व सोडून संन्यासिनी झालेल्या अशा आहेत...मला या बायांची सभ्य रीती आणि पवित्र आचरण फार आवडते. (७) इंग्लंडातील वैभवाने डोळे दिपून आपल्या जन्मभूमीचा विसर पडणे हे मनुष्यस्वभावाच्या विरुद्ध आहे. आपली आई गरीब असून म्हातारी आहे म्हणून तिला टाकून, दुसऱ्या श्रीमंत, तरुण आणि सुस्वरूप बाईला आईप्रमाणे सन्मान देणारे मनुष्य, मनुष्यरूपी राक्षस असे म्हटले पाहिजेत अथवा भर्तृहरीने म्हटल्याप्रमाणे 'ते के न जानीमहे...'(८) मिसेस फॉसेट वगैरे बायांच्या समोर व्याख्याने देण्याकरता माझे या देशात येणे आहे असा ज्यांचा समज झाला त्यास माझे एवढेच उत्तर आहे की, तो दिवस येण्यास अद्याप सातआठ वर्षे विलंब आहे...माझा त्याहीपेक्षा मोठा उद्देश एकही अक्षर न बोलता सिद्धीस जाईल आणि तो जावो अशी माझी ईश्वरापाशी प्रार्थना आहे. (९)...घरात बसून इतिहास पाठ केल्याने जेवढे ज्ञान होणार त्यापेक्षा प्रत्यक्ष पाहिल्याचे ज्ञान जास्त आहे असे माझ्या अल्पबुद्धीला वाटते...वजन वाढण्याला ज्ञान जितके कारणीभूत आहे तितके वयोवार्धक्य आहे असे म्हणणे सर्वांशी खरे ठरत नाही. (१०)...लंडन युनिव्हार्सिटीची मॅट्रिक्युलेशन परीक्षा हिंदुस्थानातील मॅट्रिक्युलेशन परीक्षेपेक्षा सुलभ

आहे. येथे राहून ती परीक्षा एक किंवा दोन वर्षांनी मी देऊ शकेन...हा मुलूख थंड असल्याने सतत बारा तास मेहनत केली तरी फारसा थकवा येत नाही...प्रिय बांधव, मी आपल्या देशबांधवांवर विश्वास टेवीत नाही असे म्हणण्यास तुम्हास काहीएक कारण नाही. इंग्लंडात जर तुम्ही अथवा तुमच्यासारखे कोणी असते तर माझी प्रीती कोणावर जास्त आहे हे त्यास समजले असते...ज्या मनुष्याचा हितकर्ता सर्वसमर्थ ईश्वर आहे त्याचे हित करण्याची कोणाला बुद्धी होणार नाही?"

—असा भोवतालच्या हितचिंतकांहून वेगळा, विधायक आणि धाडसी विचार करीत रमाबाई बोटीवर चढल्या. अनेक मित्रमंडळी त्यांना अश्रुपूर्ण डोळ्यांनी अगदी बोटीवर पोहोचवायला आली. एक मित्र तर पडावातून बोटीपर्यंत आला. त्याने शिडीवर पाय ठेवला पण तेवढ्यातच बोट सुटली. रमाबाई लिहितात, 'माझी दृष्टी पोहोचली तोपर्यंत मी त्या परत जाणाऱ्या माझ्या मित्रमंडळींस डोळे भरून पाहून घेतले...त्या वेळेस माझ्या मनात किती प्रकारच्या कल्पना येत होत्या म्हणून सांगू? असा मनातील हजारो भावनांचा एकच घोटाळा कधीच झालेला मला आठवत नाही. त्या वेळेस मी जशा अनंतकल्लोळमाला भीषण समुद्रात आगबोटीवर होते तसाच एक समुद्र माझ्या हृदयात खवळला होता. त्यात किती तरंग वर येत होते आणि परस्परांशी झुंजून पुनः त्या अनंत सागरगर्भात कोठल्या कोठे लीन होऊन जात होते ते मला सांगता येत नाही...जेव्हा भारतभूमी दिसेनाशी झाली तेव्हा तिला शेवटचा नमस्कार करून मी आपल्या आगबोटीच्या तळघरात गेले.'

रमाबाईंच्या धर्मांतराची उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त झाली ती 'अहाहा! ही विदुषी खरी' अशा शीर्षकातून! केसरीने लिहिले, 'पंडिता रमाबाईंचे संबंधाने आलेले वृत्त ऐकून आम्हास फारसे नवल वाटले नाही. कारण हा प्रकार असा केव्हा ना केव्हातरी होणारच होता. प्रार्थनासमाजाच्या व्यासपीठावर बसून बाबू प्रतापचंद्र मुजुमदारांप्रमाणे मोठे पांडित्य करण्याचाही डौल हिने कितीएक प्रसंगी घेतला आहे. हिने आपल्या अंगच्या अल्पविद्येने आमच्या ह्या प्रांतातल्या पुष्कळ समंजस लोकांस देखील थक्क करून सोडले आणि शेवटी फसविले'...इतरांनी म्हटले, 'बाई चंचल आहे. ती हिंदू होती व ती ब्रह्मो झाली आणि मग खिस्ती झाली. ह्यावरून मुसलमानी धर्म हाच सर्वांत उत्तम तारणमार्ग आहे, असा चित्तवेधक बोध करणारा जर कोणी काजी तीस मिळाला तर ती कदाचित मुसलमानही होईल...ह्या बाईस शिक्षण कमी असल्यामुळे तिच्या हातून हा पर्याय घडला आहे. हीच जर ती ह्यापेक्षा चांगली शिकलेली असती, तर असे चांचल्य तिच्या हातून कधीही घडले नसते.' ... "She has accepted the faith of those who started by providing her just with what she

most desired–the means to go to England and reside in England. ''
'तिच्या अल्प शिक्षणात तिला स्वतंत्रता वाजवीपेक्षा फाजील मिळून तिजवर कशाचाही आळा राहिला नाही,' या सर्व विरोधी उद्‌गारांच्या जोडीला सतत पाठीराखेपण करणाऱ्या सुबोधपत्रिकेनेही लिहून टाकले, 'रमाबाईंचे धर्मांतर त्यांच्या अज्ञानातून घडलेले आहे.'

बाईंच्या संबंधात प्रारंभापासून अखेरपर्यंत 'केसरी'ची भूमिका ही प्रामुख्याने विरोधाचीच आहे. न. चिं. केळकरांनी आपल्या टिळक-चरित्रात एकत्रितपणे ही भूमिका मांडताना म्हटले आहे, 'त्यांचे तेज, त्यांचे तारुण्य, त्यांची विद्वत्ता, त्यांचे वैधव्य या सर्व गोष्टींचा परिणाम दोन निरनिराळ्या रीतींनी लोकांच्या मनावर झाला. सुधारकांची दृष्टी, रमाबाईंचे कर्तृत्व व समाजसेवा याजकडे होती व जुन्या लोकांची दृष्टी, बाई दिसते चांगली पण निघेल कशी कोणास ठाऊक याकडे होती... टिळकांच्या स्वभावावरून पाहता पंडिताबाईंच्या प्रथमदर्शनाचे वेळीच त्यांनी नाक मुरडलेले असेल व कपाळास आठी घालून पाहिले असेल असेही वाटते. बाईंच्या भोवती सुधारकांचा वेढा पडलेला पाहून बाईंच्या हातून खरे समाजोपयुक्त असे काम कोणतेही होणार नाही असेच त्यांच्या मनाने घेतले असेल यात शंका नाही. टिळकांची ही उपजत बुद्धीच अखेर खरी ठरली व त्यांनी सर्व जन्मभर बाईंना समाजशत्रू म्हणूनच लेखिले! तात्पर्य, ही दोन माणसे आपापल्या परीने कर्तृत्ववान व तेजस्वी पण त्यांच्या ग्रहांचा असा हा शत्रुयोग होता!' केळकरांनी सांगितलेले हे 'तात्पर्य' भारतीय स्त्रीजीवनाबद्दलची कठोर वास्तवता विचारात घेत नाही. त्याचप्रमाणे रमाबाईंच्या त्यांना मान्य असलेल्या कर्तृत्वाचाही तपशील देत नाही.

बाईंच्या धर्मांतराने हिंदुस्थानातील ख्रिस्ती मंडळींना आनंद होणे साहजिकच होते. पण त्यांच्याइतकाच आनंद ख्रिस्ती नसलेल्या व धर्मांतराचा पुरस्कार न करणाऱ्या दुसऱ्या एका मोठ्या माणसाला, वेगळ्या कारणाने झाला. तो माणूस म्हणजे जोतिबा फुले. त्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' व 'सत्सार' या आपल्या पुस्तकांतून लिहिले, 'ज्या वेळी पुण्यात पंडिता रमाबाईने येऊन हिंदुधर्मप्रतिपादक अनेक व्याख्याने दिली त्या वेळी मला त्यांच्या व्याख्यानांची फारशी थोरवी वाटली नाही; कारण हिंदुधर्माचे उत्पादकांनी स्त्री व शूद्रादी अतिशूद्र जातीवर कोणकोणत्या प्रकारची आग पाखडून त्याजवर अनेक प्रकारचे जुलमी लेख केले, हे त्या बिचाऱ्या बाईबापड्या पंडिता रमाबाईस माहीत कोठून! परंतु त्यांनी विलायतेस जाऊन हिंदू व ख्रिस्ती धर्माची तुलना केल्यामुळे त्यास हिंदुधर्माचा हेकड व पक्षपातीपणा दिसून आल्याबरोबर त्यांनी हिंदुधर्माचा धिक्कार करून ख्रिस्ती धर्माचा अंगीकार केला... अशा शोधक साध्वीनीस पाहण्याची कित्येकांस फार इच्छा झाली आहे,'...'या (स्त्रीशिक्षणाबाबतच्या) सर्व हालचालींचे श्रेय पंडिता रमाबाईस दिले तरी चालेल

आणि असल्या विद्वान, विचारशील, परोपकारी, शोधक, पंडिता रमाबाई मनाचा दृढ निश्चय करून इंग्लिश अभ्यास करण्याकरता इंग्लंडास गेल्या आणि तेथे पक्षपाती हिंदुधर्माचा धिक्कार करून ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केल्याबरोबर महाराष्ट्रातील कित्येक असमंजस पत्रकर्त्यांनी ह्या अबलेस नानाप्रकारची निरर्थक 'इसापनीतीतील कोल्ह्या'-सारखी दूषणे दिली... अरे, ह्या स्त्रियांबरोबर हुंबर घालणाऱ्याने पंडिता रमाबाईंचे नावसुद्धा घ्यावयाचे नव्हते. कारण याची समजूत ती किती? जर पंडिता रमाबाईंबरोबर यास तोलून पाहिले तर याचे वजन खंडीस नवाटक्यासारखे भरणार आहे.' जोतिबांचा हा आनंद प्राधान्याने त्यांच्या चालू असलेल्या सामाजिक लढ्यातील भूमिकेच्या विजयाचा उच्चार आहे!

ह्याच काळात अमेरिकेत शिक्षण घेत असलेल्या डॉ. आनंदीबाई जोशी यांना, त्यांच्याकडेही धर्मांतर करतील की काय या संशयाने पाहात पाहातच धर्मांतराची ही वार्ता कळविली गेली. त्यांनी ठामपणाने गोपाळरावांना लिहिले, 'जर रमाबाईंच्या धर्मांतरात लोकक्रांती अथवा आपणास काही मदत व्हावी अशा, प्रकारची आशा याव्यतिरिक्त अन्य हेतू असला तर माझी जिव्हा व लेखणी त्यांच्याविरुद्ध कधीही वाहणार नाहीत. कारण जे आपल्या समजुतीप्रमाणे व शब्दास अनुसरून वागतात त्यांच्याबद्दल मला कळवळा येतो. म्हणून तिने जे धीटपणाने काम केले त्याचा मला अभिमान वाटून, तिच्या धैर्याविषयी आश्चर्य वाटले असते, परंतु खरोखर तसे आहे की नाही याचीच शंका आहे...जो जो शिक्षण अधिक तो तो धैर्य अधिक आणि जसजशी गती अधिक होत जाते तसतशी योग्यता, इच्छा, विकास ह्याही गोष्टी अधिक होत जातात.' पुढील काळात डॉ. आनंदीबाईंच्या मनातील शंकेचे निवारण झाले असावे असा अंदाज त्यांच्या पत्रांवरून करता येतो.

रमाबाईंनी खरोखरीच धर्मांतर का केले या गोष्टीची चिकित्सा या धर्मांतराच्या प्रसंगी जेवढी झाली तेवढीच पुढील पाच-सहा वर्षे शारदासदनासंबंधी सुरू झालेल्या वादविवादांमुळे चालूच राहिली. त्यांचे धर्मासंबंधीचे अज्ञान, स्वतःचा अगदी व्यक्तिगत स्वार्थ येथपासून सर्व हेतू या वादात उल्लेखिले गेलेले आहेत. काही व्यवहारी मंडळींना रमाबाईंनी धर्मांतर हे आपल्या सामाजिक ध्येयाचे साधन म्हणून वापरलेले आहे असे वाटले; तर काहींना तत्कालीन अनेक सुशिक्षित सुहृदांच्या सारखीच धर्मांतराची मानसिक गरज रमाबाईंना वाटली असावी असेही वाटले. स्वतः रमाबाईंनी वेळोवेळी हा प्रश्न दुसऱ्यांसाठी व स्वतःसाठीही स्वतःला विचारला आहे आणि त्याची मिळालेली उत्तरेही निर्भयपणे नोंदवून ठेवलेली आहेत.

रमाबाईंनी सुबोधपत्रिकेत लिहिले आहे, 'एकदा मदर सुपीरियरने मला लंडनमधील सिस्टर्स होमच्या शाखा पाहण्यासाठी पाठविले. त्यांनी पतित स्त्रियांच्या उद्धारार्थ चालविलेले कार्य मला दाखविले. तेथल्याच रेस्क्यू होममध्ये राहून गेलेल्या

काही स्त्रियांची व माझी तेथे गाठ पडली, तेव्हा त्यांच्यामध्ये अगदी पूर्ण पालट झालेला पाहून, त्यांनी दुसऱ्यांची दुःखे हलकी करण्याच्या कामी स्वतःला वाहून घेतलेले पाहून अगदी प्रथमच पतित स्त्रियांच्या उद्धाराकरता काही करणे शक्य आहे हे मला पटले...माझ्या स्वतःच्या देशातील हिंदूंनी अशा प्रकारचे केलेले काम मी कधी पाहिले नव्हते, ऐकले नव्हते. अशा स्त्रियांच्या बाबतीत हिंदू शास्त्रे कठोर आहेत. पतित स्त्रियांना वेशीबाहेर घालवून, कोल्ह्याकुत्र्यांकडून खावविावे अशी स्मृतिकारांची राजाला स्पष्ट आज्ञा आहे...इथे चाललेली दयेची कामे पाहून असे वाटू लागले की हिंदू धर्म व ख्रिस्ती धर्म यांत खरेखरे अंतर आहे...आपण दैवी तारक आहो असा जो येशूचा दावा आहे तो खरा आहे. हिंदुस्थानच्या किंवा जगातल्या पायदळी तुडविल्या जाणाऱ्या स्त्रियांना तोच तारणार आहे. अशा रीतीने माझे मन ख्रिस्ताच्या धर्माकडे आकर्षिले गेले व बौद्धिक दृष्टीनेही माझी खात्री पटली म्हणून मी बाप्तिस्मा घेतला."

'बौद्धिक दृष्टीने माझी खात्री पटली.' असे जे रमाबाईंनी म्हटले आहे ते त्यांच्या व फादर नीलकंठशास्त्री गोऱ्हे यांच्या पत्रव्यवहाराच्या संदर्भात असावे. फादर गोऱ्हे व रमाबाई यांच्यामध्ये या काळात हिंदुधर्म व ख्रिस्तीधर्म यांच्या संबंधात तौलनिक विचार करणारा बराच पत्रव्यवहार झालेला होता. नीलकंठशास्त्री (जन्म १८२५) हे रमाबाईंच्याप्रमाणेच एका व्युत्पन्न कोकणस्थ ब्राह्मणाच्या घरात जन्माला येऊन ख्रिस्ती धर्माकडे वळलेले होते. हे मूळचे महाराष्ट्रातील; पण त्यांच्या वडलांचे वास्तव्य झाशीकडे होते. त्यामुळे श्रीरामपूरच्या मिशनमधील मिशनरी मंडळींशी त्यांचा धार्मिक वादविवादाच्या निमित्ताने प्रथम संबंध आला. हिंदू तत्त्वज्ञानापुढे ख्रिस्ती धर्मातील तात्त्विक चर्चा ही केवळ पोरकट वाटते अशी त्यांची ठाम विचारसरणी होती; परंतु बायबलच्या अभ्यासानंतर १४ मार्च १८४८ रोजी नीलकंठशास्त्री यांनी स्वखुषीने बाप्तिस्मा घेतला आणि ते 'नहेम्या गोऱ्हे' झाले. यापुढील आयुष्याची अखेरपर्यंतची सत्तेचाळीस वर्षे (मृत्यू १८९५) दोन्ही धर्मांच्या तौलनिक अभ्यासात, त्यावर पुस्तके लिहिण्यात व देशी भाषांतून ख्रिस्ती धर्माचा प्रचार करण्यात त्यांनी खर्च केली. रमाबाईंची व गोऱ्हे यांची पहिली भेट पुण्यातल्या वास्तव्यात १८८२ साली झाली होती व त्यांनी ख्रिस्तीधर्माचे 'ईश्वरदत्त' स्वरूप रमाबाईंना पटवून देण्याचा प्रयत्न केला होता. 'प्रार्थनासमाजाकडून धर्मासंबंधीची तुमची आंतरिक गरज तृप्त होणार नाही' असे सांगण्यावर गोऱ्हे यांचा विशेष भर होता परंतु आरंभी रमाबाईंना हे काहीच पटू शकले नाही. ख्रिस्ती झाल्यानंतर गोऱ्हे यांची राहणी, पोशाख, वागणे बोलणे अत्यंत साधेपणाचे व शंभर टक्के भारतीय, एखाद्या संन्याशाप्रमाणे, राहिलेले होते. रमाबाई इंग्लंडला पोचल्यावरही पत्रांतून जन्मतः हिंदू असणाऱ्या मनुष्याला असलेली नव्या उन्नत धर्माची आवश्यकता गोऱ्हे त्यांन



कळवीतच होते.

बाप्तिस्मा घेतल्यानंतर आपल्या जिव्हाळ्याच्या मित्रमंडळींसाठी कर्तव्य म्हणून सुबोध-पत्रिकेलाही बाईंनी स्पष्टपणे लिहिले; त्या म्हणतात, 'आपल्या पूर्वजांच्या धर्मग्रंथांतून चांगली नीतिपर, परमेश्वरस्वरूप प्रतिपादक वाक्ये पुष्कळ आहेत हे मला कबूल आहे. त्यांपैकी काही मला ग्राह्य आहेत. पण परमेश्वर जसा इहलौकिक जीवनास आवश्यक पाहिजेत ते पदार्थ समयी पाठवून देतो, त्यास म्हणजे आपल्या पारलौकिक जीवनाची काळजी नसेल असे नाही. ज्या ज्या ठिकाणी आणि काळी जे सत्य व आत्मिक गोष्टीचे ज्ञान आम्हास मिळाले पाहिजे ते परमेश्वर कोणत्या तरी द्वारे आपल्याला देतो. आता निरनिराळी सत्ये निरनिराळ्या समयी आपल्या लोकांस प्रगट होतात, ह्याचे कारण एवढेच की सगळीच सत्ये एकाएकी समजून घेण्याची पुरती शक्ती मनुष्यजातीला एकदम प्राप्त होत नाही... हिंदुधर्मग्रंथांतून विखरून पडलेली सत्ये जेव्हा आपल्याला प्राप्त झाली तेव्हा त्याहून अधिक उच्च व गहन सत्यांचे आकलन करण्याची शक्ती आपल्यात नव्हती, पण माणसाने सर्वदाच असे अशक्त राहावे अशी परमेश्वराची मर्जी नाही. त्याने योग्य काळी सर्वांहून श्रेष्ठ, गहन आणि या जगातील सत्याचे भांडार असे मत ख्रिस्ताकडून जगास दिले तेव्हा ख्रिस्त जे म्हणाला आहे की I come not to destroy but to fulfil the law हे सर्वस्वी खरे आहे.

'... आज आपल्यास बायबल म्हणून जो ग्रंथसमूह उपलब्ध आहे, त्यातील प्रत्येक पद, अक्षर अगदी ईश्वरी सत्यासारखे शुद्ध व निर्दोष आहे असा माझा समज नाही... परंतु त्यातील मुख्य भागात म्हणजे ख्रिस्ताचा उपदेश म्हणून जो भाग आहे त्यात खरोखरच अनादी सत्य पूर्णत्वास पावले आहे असे निःपक्षपाती धर्मविचारकास वाटल्याखेरीज राहणार नाही. परमेश्वरी सृष्टीतील सर्व गोष्टी काहीतरी नियमित मार्गाने घडत असतात, ते नियम जसे शास्त्रीय विषयास (रसायन, गणित इत्यादी)... लागू आहेत तसे ते धर्मतत्त्वासही लागू आहेत... चुंबक जसा लोहाला आपल्याकडे ओढून घेतो, वाळूला घेत नाही तसेच आपले हृदयात परमेश्वराने जे सनातन सत्य घालून ठेवले आहे ते बाहेरील आप्तवाक्यात उपलब्ध असलेल्या सत्यास आपल्याकडे आकर्षून घेते. असत्यास घेत नाही... सर्व आवश्यकीय सत्याचा समावेश असून जो पूर्णत्वास पावला आहे त्या ख्रिस्ताचे उपदेशाचा मी अंगीकार केला. असे करणे हे आपल्याजवळचे होते नव्हते ते विकून लहानसहान किड्डूकमिड्डूक न घेता, मोठ्या मोलाचे एकच, पण आपल्या तेजाने इतर सर्व रत्नांस मागे टाकणारे असे रत्न घेतल्याप्रमाणे आहे." रमाबाईंचे हे तात्त्विक स्पष्टीकरण सुशिक्षित व सनातनी या दोघांनाही स्वधर्माभिमान बाजूला ठेवून विचारात घेता येणे कठीणच होते.

ह्या धर्मांतरामुळे मुळातच अवघड असलेले रमाबाईंचे आयुष्य व्यावहारिक पातळीवर अधिकच अवघड होऊन बसले. त्यांचा पहिला संघर्ष सुरू झाला तो

त्यांच्या भोवतालच्या मिशनऱ्यांशीच. प्रथम इंग्लंडमधल्या आणि नंतर हिंदुस्थानातल्या. आपण फक्त ख्रिस्त आणि बायबल मानतो, त्यांचे भाष्यकार मानीत नाही असे म्हणणाऱ्या रमाबाई, वेगवेगळे पंथोपभेद संघटित रीतीने वर्षानुवर्षे सांभाळत जगणाऱ्या इंग्रजांना, त्या नेमक्या कोणत्याच पंथात बसत नाहीत म्हणून, विश्वासार्ह वाटेनात. एके ठिकाणी गमतीच्या सुरात रमाबाईनी लिहिले आहे, 'हिंदुस्थानात जसा एका हिंदुधर्मात शैव, शाक्त, वैष्णव, तांत्रिकादी मतभेद असतो तसा एका ख्रिश्चन धर्मातही रोमन कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट, ग्रीक चर्च, चर्च ऑफ इंग्लंड, चर्च ऑफ जर्मनी, मेथडिस्ट, युनिटेरियन वगैरे पुष्कळ मतभेद आहेत व या मतांमधील लोक एकमेकांचा बराच मत्सर करतात. शैवाला पाहिला म्हणजे वैष्णवाने सचैल स्नान करण्याची जशी हिंदुस्थानात चाल आहे तशीच सदरहू मतानुयायांची असती; पण हा मुलूख पडला थंड. इथे घटकोघटका सचैल स्नान केले की सर्दी होऊन आयुष्य असतानाच येशू ख्रिस्ताबरोबर जाऊन जजमेंट डे येईतोपर्यंत तिष्ठत बसावे लागेल. म्हणून या शहाण्या लोकांनी ती चाल पाडली नसावी.' असल्या मोकळ्या व धीट नजरेने सर्व धार्मिक विधींकडे पाहणाऱ्या रमाबाई मठातील नियमात बसू शकेनात. गळ्यात क्रॉस घालणे, कन्फेशन देणे या ख्रिश्चनांच्या सहज रीतीने अंगवळणी पडलेल्या गोष्टींबद्दलही रमाबाईना स्वतःची स्वतंत्र मते होती आणि ती त्या धैर्याने—अगदी अटीतटीने—बोलून दाखवीत होत्या. त्यांनी लंडनमध्ये कुठे, केव्हा, काय बोलावे, कोणाकडे जावे, काय वाचावे, त्यावर कोणती मते व्यक्त करावीत हे सर्व दुसरेच कोणीतरी त्यांच्यासाठी आखते आहे, ठरवीत आहे असे जेव्हा त्यांना वाटू लागले तेव्हा उघड्या जगात वाढलेली ही वाघिणीच्या वृत्तीची बाई त्याविरुद्धही बंड करून उठली. हिंदुस्थानसारख्या मागासलेल्या देशातही संमिश्र समाजापुढे स्त्रीपुरुष भेद विसरून त्या व्याख्याने देत होत्या आणि इंग्लंडसारख्या प्रगत राष्ट्रात एखाद्या पुरुष विद्यार्थ्याला मिशनमधील वास्तव्यामुळे संस्कृत मात्र शिकवू शकत नव्हत्या! कधी हिंदुस्थानासंबंधी इंग्रज मिशनरी मंडळी त्यांना ज्ञान देऊ लागत. त्या वेळी 'माझ्या देशाबद्दल, माझ्या माणसांबद्दल तुम्ही मला शिकवू नका. मी त्यांना तुमच्यापेक्षा अधिक चांगली जाणते' हे स्पष्ट केल्याखेरीज त्यांना राहवत नव्हते. 'माझे आई-वडील ख्रिस्ती नव्हते म्हणून त्यांना मुक्ती मिळाली नसेल असा जर तुमचा समज असेल तर तो साफ चुकीचा आहे.' हेही त्या ख्रिस्तीजनांना ठणकावून सांगावयास कमी करीत नव्हत्या. आपल्या लहान मुलीला तिचे वय ध्यानात घेऊन ख्रिस्ती धर्मासंबंधी काय सांगितले जावे याही बाबतीत त्यांची ठाम मते होती व ती इंग्लंडमधल्या मठातल्या लोकांशी जुळत नव्हती. या अशा परिस्थितीत रमाबाईंचे लंडनमधील वास्तव्य अनेक बाबतींत संघर्षमय झाले. रमाबाईंच्या या विकट जीवनाच्या काळातील एक निकटच्या साक्षीदार आहेत सिस्टर जिराल्डिन. ह्या त्यांच्या 'गॉडमदर' आणि पुढील

बेचाळीस वर्षांतील 'प्रिय आजी'. रमाबाईंचा आणि सिस्टर जिराल्डिन यांचा या काळातील विपुल पत्रव्यवहार आता महाराष्ट्र सरकारच्या साहित्य संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केलेला आहे. या पत्रव्यवहाराच्या अखेरीस रमाबाईंच्या जीवनातील काही वादग्रस्त प्रसंगांचे स्पष्टीकरण आजीबाई आपल्या स्वतःच्या भूमिकेतून देताना आढळतात. त्यांच्या लिहिण्याचा सारांश असा आहे—"ख्रिस्ती वातावरणात राहण्याचा रमाबाईंच्या आयुष्यातील तो पहिलाच प्रसंग होता. संस्थेतील व्यक्तींचा नमुनेदार दिनक्रम त्यांचे डोळे टिपत असत. ह्याच सुमारास एक तरुण, गुणी, सिस्टर क्षयाने पछाडलेली होती. आम्ही तिला चाकाच्या खुर्चीतून दररोज सकाळी वसंत-ऋतूतील कोवळे उन्ह अंगावर पडावे म्हणून बागेत आणून बसवत होतो. या सिस्टरसह चौघीजणींचा एक दीक्षाप्रसंगही रमाबाईंनी पाहिला. आपले सर्व आयुष्य ईश्वराच्या सेवेला वाहण्याची त्या सर्वांनी शपथ घेतली तेव्हा रमाबाई थरारून गेल्या. ती क्षय झालेली सिस्टर तर यानंतर दहा दिवसांतच दिवंगत झाली. मग तिची उत्तरक्रिया अतिशय शांत, गंभीर, आशादायक मंत्रोच्चारात पार पडलेलीही त्यांना दिसली. धार्मिक संस्थेतील शिस्तीचे, व्यवस्थेचे, स्वच्छतेचे वातावरण त्यांना भारावून टाकत गेले...' हे अशा प्रकारचे जीवन तीन महिने सतत पाहिल्यानंतर आणि त्यांच्याबरोबरच बॉंटेजमध्ये आलेल्या आनंदीबाई भगत अचानकपणे दिवंगत झाल्यानंतर रमाबाई स्वतःच्या आणि देशभगिनींच्याही जीवनसंदर्भात अतिशय हळव्या होऊन गेल्या. ह्याच काळात त्यांच्या नव्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीला प्रारंभ झाला. त्या बाप्तिस्म्यासाठी तन्मयतेने तयारी करू लागल्या. बालकाच्या निरागस वृत्तीने त्या मनातील शंकाही विचारीत.

ह्यानंतर रमाबाईंच्या बाप्तिस्म्याचा विधी घडवून आणण्यात आपण उतावीळपणा केला काय असा प्रश्न स्वतःला विचारून जिराल्डिन आजीने लिहिले आहे—'त्यांचा बाप्तिस्मा करण्याची ईश्वरदत्त संधी आम्ही साधली ते योग्यच होते. त्या अशा काही विलक्षण परिस्थितीत होत्या की, सर्वसामान्य दृष्टिकोण किंवा कसोटी त्यांना लावता येत नव्हती. आमच्याकडे त्या प्रथम आल्या त्या वेळी त्यांनी आम्हाला विनंती केली होती की, पाच वर्षे आम्ही त्यांना साहाय्य करावे; या अवधीत त्या आपल्या जीवितकार्याची पूर्वतयारी म्हणून निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करतील. त्याच वेळी आम्हीही अटकळ बांधली होती की या अवधीत ख्रिस्ती धर्मशिक्षण त्यांना देता येईल. तरीदेखील इंग्लंडचे वातावरण आणि अंग्लिकन महामंडळाचे वातावरण त्यांच्या उत्कट स्वतंत्र वृत्तीला पोषक वाटले नाही. त्यांच्या अन्तःकरणात प्रत्येक दिवशी विकसत असणाऱ्या मुक्त, स्वतंत्र वृत्तीचा, भावनेचा, या बंदिस्त परंपरावादी देशात अभाव असल्याचे त्यांना दिसत होते. हा देश आणि त्यातील महामंडळ अतिशय संकुचित विचारसरणीचे असून आपल्याला आपल्या कामासाठी हवे असलेले साहाय्य

येथे मिळण्यासारखे नाही असेही त्यांना निश्चितपणे वाटत होते. शिवाय त्यांना स्वतःच्या नियोजित कार्याला सुरुवात करण्याची घाई झालेलीच होती. क्षणोक्षणी अडथळे आणणाऱ्या आमच्या लोकांकडून आपल्याला पाहिजे ते सहकार्य मिळण्यासारखे नाही असे दिसताच त्या आमच्या विरोधाला न जुमानता, जन्मजात स्वतंत्र वृत्तीच्या अमेरिकन लोकांकडे गेल्या.

तेथे हैरिएट टबमन् या तीनशे निग्रो गुलामांना मुक्त करणाऱ्या स्त्रीचे चरित्र त्यांच्या वाचनात आले; आणि आपल्या हिंदू भगिनींची मोझेस् आपण व्हायचे, त्यांना अंधकारातून, गुलामगिरीतून बाहेर काढून भव्य दिव्य, ख्रिस्तीधर्माचा प्रकाश दाखवायचा असा निर्धार त्यांनी केला स्वतंत्रतेची कल्पना त्यांच्या अंतःकरणात किती खोलवर रुजलेली होती याचे एक प्रतीक म्हणजे पुढे त्यांनी त्यांच्या 'मुक्ती' या मुक्तिमिशनच्या नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर, अमेरिकेच्या स्वातंत्र्यघंटेचे—तडा गेलेल्या स्वातंत्र्यघंटेचे—चित्र सदैव छापले आणि त्या चित्रावर बायबलमधील पुढील वचन छापले—'दीन-दुबळ्यांना सुवार्ता सांगण्यासाठी देवाने मला अभिषिक्त केले आहे. भग्न हृदयांना सांधण्यासाठी मला पाठविले आहे. युद्धबंद्यांच्या मुक्तीची घोषणा करण्यासाठी आणि बंदिवानांचे तुरुंग उघडण्यासाठी मला पाठविले आहे.'

ह्याच स्वतंत्रतेच्या ध्यासातून 'बॉंटेज'मध्ये कॅथॉलिक ख्रिस्ती विचारप्रणालीचा स्वीकार त्यांच्याकडून झाला नाही पण स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण रीतीने त्यांनी पुढील काळात ईश्वरी सेवेचा अंगीकार केला. भारतातील जातीयवादाच्या अन्यायकारक जुलमी बंधनांविरुद्ध, क्रूर नियमांच्या आणि चालीरीतींच्या विरुद्ध, एखाद्या पक्ष्याने पिंजऱ्यातून सुटण्याची पराकाष्ठेची धडपड करावी त्याप्रमाणे रमाबाईंचे मन बंड करून उठले होते. पवित्र शास्त्रातील इतर कोणत्याही शब्दांपेक्षा त्यातील मुक्ती आणि स्वातंत्र्य या दोन शब्दांनी रमाबाईंच्या हृदयाची पकड घेतली होती. पाकोळ्यांसमवेत उडण्याची, चंडोलांसमवेत आकाशात उंच भरारी मारण्याची त्यांची मनीषा होती. साळुंक्यांसारखे किंवा डोमकावळ्यांसारखे म्होरक्याच्या तंत्राने चालणारे सामुदायिक जीवन त्यांना मानवण्यासारखे नव्हते. ख्रिस्ती मुक्ततेची आणि अनेक शाखा-उपशाखांनी युक्त शिस्तबद्ध रीतीने चालणाऱ्या ख्रिस्ती धर्मसत्तेची सांगड त्यांना मनाशी घालता येत नव्हती. शिवाय चर्च ऑफ इंग्लंड (इंग्लंडचे महामंडळ) या नावाचा सुळातच त्यांना तिटकारा वाटत होता. देशाचे जेते इंग्रज लोक त्यांच्या अंतर्यामात कटुतेचाच विषय होते. रखमाबाईसारख्या स्त्रीचा खटला ज्या पद्धतीने हिंदुस्थानात चालला होता, त्यात तेथील ब्रिटिश सरकार भारतीय पुरुषांशी केलेला धार्मिक, खाजगी बाबतीतील अलिप्ततेचा करार पाळते याबद्दलही रमाबाईंना संताप वाटत होता. दहा कोटींहून अधिक स्त्रियांचा बळी देऊन ब्रिटिश सरकार स्वतःच्या स्थैर्याला सांभाळते आणि स्वतःला ख्रिश्चन म्हणविते हेही त्यांच्या दृष्टीने

निषेधार्हच होते."

आपले आत्मिक जीवन मनन-चिंतनाच्याद्वारे बळकट करण्याऐवजी रमाबाई प्रत्यक्ष कार्याला लागण्यासाठी म्हणून अमेरिकेतील प्रचारकार्यात हिरीरीने पडल्या. हे काम करताना शारीरिक–मानसिक शीण येई तेव्हा येशूच्या प्रार्थनेतून त्यांना सामर्थ्य मिळे. अमेरिकेच्या वास्तव्यातील रमाबाई अशा 'वेगळ्या' खिस्ती होत्या.

अमेरिकेत जाण्यापूर्वी (१८८६) रमाबाईंना अमेरिकेची जवळजवळ मुळीच माहिती नव्हती. त्यात पुन्हा त्यांच्या जाण्याला विरोध करणाऱ्या इंग्रजांनी अमेरिकेतील स्वैराचाराच्या अतिशयोक्त कथा त्यांना ऐकविलेल्या होत्या. पण भय नाहीसे करण्याचा उपाय भयप्रद परिस्थितीत घुसणे हाच असतो हा मूलमंत्र जपत रमाबाई डॉ. आनंदीबाई जोश्यांच्या समोर येऊन उभ्या राहिल्या. सततच्या भयानक तुफानांमुळे त्यांचा बोटीचा प्रवास फार हालअपेष्टांचा झालेला होता. समुद्राच्या तांडवात त्यांची नौका 'पाण्यावर तरंगत असलेल्या एखाद्या उडत्या माशासारखी' त्यांना दिसत होती. पण आनंदीबाईंना पाहताच त्यांचा सर्व श्रमपरिहार झाला. भविष्यातल्या सुशिक्षित, स्वावलंबी भारतीय स्त्रीचे संपूर्ण चित्रच आनंदीबाईंच्या रूपाने त्यांना दिसले व अमेरिकेत हिंडताना तर इथे किती पाहू, किती शिकू, असेच त्यांना होऊन गेले. तेथील लोकसत्ताक राजकीय पद्धती, प्रत्येक व्यक्तीला समान लेखणारी राज्यघटना व धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रांत सुरू झालेले नवे वारे–सारेच रमाबाईंना आकर्षित करून घेत होते; व स्वदेशाच्या संदर्भात प्रत्येक क्षणी ते उद्‌बोधक वाटत होते. स्वबुद्धीच्या व स्वकष्टाच्या जोरावर मिळणारे शिक्षण स्त्रियांना स्वावलंबी करते हे तेथे दिसत होते. तेव्हा स्वतःचा आणि स्वदेशाचा अभिमान न सोडता स्त्रियांच्या दुःस्थितीचे चित्र अनेक प्रमाणे देऊन त्यांनी अमेरिकन समाजापुढे ठेवले. १८८१ च्या खानेसुमारीनुसार देशामध्ये एकोणीस वर्षांच्या आतल्या सहा लाख एकोणसत्तर हजाराहून अधिक बालविधवा होत्या. त्यांचे दुर्दैवी दैनंदिन जीवन सांगून वेगळे भवितव्य घडविण्याची गरज त्यांनी अमेरिकनांपुढे ठेवली. रमाबाई सांगत होत्या, 'आमची आजची मुख्य गरज आमच्याच समाजातून शिक्षिका तयार करण्याची आहे. आमचे धर्मशास्त्र व रूढी स्त्रियांच्या संबंधात अन्यायाच्या व अमानुषतेच्या आहेत; पण हिंदुस्थानच्या रहिवाश्यांमध्ये असाही एक उच्चवर्णीय लोकांचा वर्ग आहे की ज्यांची बुद्धिमत्ता व ग्रहणशक्ती त्यांना मिळालेल्या संधीमुळे इतरांपेक्षा अधिक तल्लख आहे. गेली दोन हजार वर्षे सभ्य आणि सुसंस्कृत म्हणून हा उच्चवर्णीय वर्ग प्रख्यातही आहे. परंतु या वर्गातील स्त्रिया मात्र अजून अज्ञानातच राहिलेल्या आहेत. त्याही आपल्या घरातील पुरुषांसारख्याच बुद्धिमान

आहेत. त्यांच्याकडे थोडे अधिक लक्ष दिले, आवश्यक ते शिक्षण त्यांना दिले, तर त्यांच्यामधून आम्हांला हवा असलेला उत्तम शिक्षिकावर्ग आणि कार्यकर्ता वर्गही मिळण्याची शक्यता आहे...या संबंधात आत्ताच त्या वर्गातील पुरुषांशी काही वादविवाद करणे व त्यांच्याकडून हे काम करवून घेणे शक्य नाही. त्यांच्यापैकी फार थोडेच सहकार्य देतील; पण त्यांना सुद्धा स्त्री-शिक्षणाचे फायदे आधी दिसावयास हवे आहेत. अशी परिस्थिती असल्यामुळे तुम्ही एका देशातल्या सुधारलेल्या भगिनींनी दुसऱ्या देशातील स्त्रियांचे पशुवत असलेले जीवन सुधारण्यासाठी सहकार्य करावे ही माझी विनंती आहे.....'

[रमाबाईंची ही भाषणे १८८७–८८ मध्ये चालू होती. स्वामी विवेकानंद अमेरिकेत १८९३ साली पोहोचले. हिंदू तत्त्वज्ञान आणि धर्म यांची थोरवी त्यांनी प्रभावीपणे अमेरिकनांपुढे मांडली. अमेरिकेतील काही समाजहितैषी मंडळी त्यांच्याही मागे उभी राहिली. आयुष्याच्या अखेरच्या काळात रमाबाईंना काही पाश्चात्त्य विचारवंत हिंदुधर्म आणि तत्त्वज्ञान याबद्दल फार गौरवाने लिहितात म्हणून रागही येत असे. ते इथल्या अमानुष सामाजिक जीवनाकडे डोळेझाक करतात असे त्यांना प्रखरतेने वाटे.]

शाळेच्या दहा वर्षांच्या खर्चाची, शिक्षणक्रमाची सर्व योजना पक्की करून रमाबाई मुंबईला आल्या. दीड महिन्याच्या आतच शारदासदनचे उद्घाटन झाले व त्याच्या जन्माबरोबरच त्यांच्या जीवनातल्या संघर्षनाट्याला जोरदारपणे प्रारंभ झाला.

रमाबाई परत आल्या तेव्हा धर्मांतराच्या घटनेला पाच वर्षे उलटून गेली होती. पुन्हा एकदा महाराष्ट्रातले सुधारक त्यांच्या स्वागताच्या भूमिकेत उभे होते. न्यायमूर्ती रानड्यांच्या 'इंदुप्रकाश'ने रमाबाईंच्या आगमनाची व त्यांनी डॉ. आत्माराम पांडुरंग यांच्या अध्यक्षतेखाली घेतलेल्या पहिल्याच सभेची सविस्तर हकिगत प्रसिद्ध केली व अखेरीस म्हटले–' We have no word to praise the sincerity and zeal of Pandita Ramabai and we have no doubt, she is the only unique and incomparable, intelligent, learned woman of this age, unparallel in history!'

लवकरच झालेल्या ' सदना 'च्या उद्घाटनप्रसंगी रमाबाई म्हणाल्या, ' देशातील स्त्रियांची स्थिती हृदयाच्या ठिकऱ्या उडवून टाकण्याइतकी शोचनीय आहे. केवळ आपणच या गोष्टीचे आकलन करू शकू...परकीयांना तर ते कधीच समजणार नाही. ब्रिटिश पार्लमेंटात आपला एकही प्रतिनिधी नाही ही एकच गोष्ट घ्या. त्यामुळे गरीब हिंदुस्थानच्या खऱ्या परिस्थितीचे आकलन त्यांना करता येत नाही. हिंदी स्त्रियांची स्थितीही अगदी तशीच आहे. सद्गृहस्थहो, तुमच्या पार्लमेंटमध्ये आमच्यापैकी एकाही स्त्रीला तुम्ही कधी आपली शोचनीय स्थिती मांडण्याची संधी

दिलेली नाही, पण पार्लमेंटपेक्षा तुम्हाला तुमच्या स्त्रियांची स्थिती अधिक चांगली ठाऊक आहे अशी माझी खात्री आहे.'

समारंभाने खूप उत्साहाचे वातावरण तयार झाले. एखादा सहृदय हिंदू एखाद्या बालविधवेला सदनाची वाट दाखवू लागला. सदनातल्या विद्यार्थिनींची संख्या फार हळूहळू पण वाढती राहिली. आलेल्या बालविधवा उपेक्षेच्या व अमानुष छळाच्या खाईतून आलेल्या असत. रमाबाई त्यांच्या खाण्यापिण्यापासून शिक्षणापर्यंत सर्व गोष्टींकडे जातीने लक्ष देत. त्यांना दूध, तूप भरपूर खाऊ घालत; मोकळेपणाने आबारात खेळायला सांगत. प्रत्येक घरातील विधवेला बहुधा स्वयंपाकघर, माजघर यातच वावरावे लागलेले असे. बाई त्यांना मुद्दाम त्यांच्यासाठी असलेल्या सगळ्या हवेशीर खोल्यांतून हिंडायला लावत. इतकेच नव्हे, तर पुण्याला सदन आणल्यानंतर याच मुलींच्या साहाय्याने बाईंनी एक उत्तम बाग तयार केली. जाईजुई, मोगऱ्याचे गजरे सायंकाळी त्यांना घालायला लावले. फुले, झाडे, पक्षी, नक्षत्रे यांची शास्त्रीय माहिती करून दिली. गाणी म्हणायला लावली. दिसायला या अगदी साध्या वाटणाऱ्या गोष्टी! पण त्या स्त्रीदुःखाबद्दल बधिर झालेल्या हिंदू समाजाला आव्हानच वाटावे अशा प्रखर होत्या.

हे इतके चांगले वातावरण टिकणे कठीणच होते. त्यांच्या वसतिगृहातील पहिली विधवा विद्यार्थिनी गोदूबाई (ही पुढे आण्णासाहेब कर्व्यांची पत्नी झाली) रमाबाईंच्या प्रार्थनेच्या वेळी त्यांच्या खोलीत हजर राहू लागली म्हणून सल्लागार मंडळातील सुधारक एकदम सावध झाले. रमाबाईंनी ख्रिश्चन धर्म स्वीकारलेला असूनही त्यांचे धर्मप्रसाराला साहाय्य होत नाही म्हणून मिशनरीही त्यांना पाण्यात पाहू लागले, गोदूबाई ख्रिश्चन होईल ना? हा त्यांचा प्रश्न! सनातनी हिंदू व केसरीकार तर प्रथमपासूनच हिंदू मुलींना ख्रिश्चन बाईच्या हाताखाली शिकायला ठेवणे धोक्याचे आहे हे गर्जून सांगत होतेच. याखेरीज ब्रिटिश सरकारशीही बाईंचे असलेले नाते पूर्णपणे वैराचे नसले तरी सख्याचेही नव्हते. स्वतःला सुसंस्कृत म्हणविणारे ब्रिटिश सरकार हिंदुस्थानातील स्त्री-शूद्रांसंबंधीचे अन्याय्य कायदे राज्याच्या स्थैर्याला धोका नको म्हणून बदलण्यास तयार नाही हे बाईंनी ओळखलेले होते व जाहीर रीतीने तसे म्हटलेही होते. सर्वच बाजूंनी निर्माण झालेल्या साशंकतेच्या व अविश्वासाच्या या वातावरणात आपल्या विवेकबुद्धीचा हवाला घेत व देत, बाई स्त्रीशिक्षणाचे काम वाढविण्याचा प्रयत्न करीत होत्या. सदनात येणाऱ्या मुलींवर आईप्रमाणे प्रेम करीत होत्या. पण ते प्रेमही ख्रिस्ती धर्माबद्दल अनुकूल मनोवृत्ती निर्माण होण्यास कारणीभूत होत होते म्हणून टीकेचाच विषय झाले होते! बाई आपल्या मुलींना दुधातुपात लोळवतात हा केसरी-सुधारक यांच्यामधील वादाचा विषय झाला होता. रमाबाईंनी स्त्री-पुरुष समानतेबद्दल बोलताच बाई पुरुषद्वेष्टी आहे हा समज करून घेणारे

पुष्कळच होते; पण रवींद्रनाथ टागोरांसारखा माणूससुद्धा काव्यात्मक पद्धतीने 'आपण स्त्रीला समान मानत नाही—मोठी मानतो' असे सांगून बाईंच्या सभेत 'भारतीय' लोकमानस जिंकून जात होता!

सदनाच्या स्थापनेनंतर लगेचच एतद्देशीय सल्लागार मंडळींनी रमाबाईंवर वेगवेगळी बंधने घालावयास प्रारंभ केला. सदनात सोवळ्याओवळ्याचे नियम काटेकोरपणे पाळले जावयास हवेत (म्हणजे स्वतः रमाबाईंनीही स्वयंपाकघरात जावयाचे नाही), पालकांची संमती असली तरी मुलींना ख्रिस्ती धर्माचे ज्ञान देता कामा नये, सज्ञान मुलींनीही स्वतःचे धर्ममत ठरविता कामा नये, रमाबाईंनी स्वतःच्या प्रार्थनेच्या वेळी खोलीचे दार बंद करून घेतले पाहिजे आणि याउलट हिंदुधर्माचे सर्व जुने व ठरीव आचार मात्र विद्यार्थिनींना पाळता आले पाहिजेत इत्यादी इत्यादी...

या सर्व अटींना आयुष्यात कधी नव्हे ती काही दिवस रमाबाईंनी मान तुकवली. त्यांना पाठबळ दिलेल्या अमेरिकनांनाही तेच हवे होते. आपल्या खोलीचे दार बंद करून त्यांनी प्रार्थना केली. परंतु सनातनी समाजाचा विश्वास संपादन करण्यापायी सुधारक या सदनाला 'सनातनी वसतिगृह' बनवीत आहेत, हेही त्यांच्या मनात आल्याखेरीज राहिले नाही. परिणामतः असले नियम पाळणे म्हणजे पुढे जे अनेक बदल घडवून आणावयाचे होते त्याबाबतचे स्वातंत्र्य गुंडाळून ठेवण्यासारखेच होते. त्यामुळे धर्मातीतता हे सदनाचे असलेले एक वैशिष्ट्य त्या काळच्या रूढिग्रस्त धर्मजीवनाच्या संदर्भात उभय पक्षांनाही काटेकोरपणे अमलात आणणे अशक्यच झाले. साहजिकपणेच अगदी लहानशा निमित्ताने सुद्धा शारदासदनाची वृत्तपत्रांतून चर्चा सुरू होई. या चर्चेत प्रखर हल्ला करण्याची एकही संधी केसरीकार सोडत नव्हते. एखाद्या वेळी सदनातील मुलींच्या साक्षी घेतल्या जात व खरोखरच ख्रिश्चन धर्माची शिकवणूक देतात की नाही हे तपासून पाहिले जाई. अशा साक्षीतील एखाद्या शब्दाचाही भरपूर विपर्यास करता येत होता. 'सदनात लावलेली तुळशीची रोपे रमाबाईंनी लाथेने उडवून दिली' असल्या वार्ता 'पुणेवैभवा'त छापून येत आणि अशा लोकांना महत्त्व देण्याचे स्वभावात नसताना सुद्धा रमाबाई नम्रपणाने त्याचे खुलासे करीत! कारण उच्चवर्णीय हिंदू स्त्रियांमधून त्यांना ज्या शिक्षिका निर्माण करावयाच्या होत्या त्या ख्रिस्तीकरणाच्या भयाने दूर जाण्याची शक्यता फार मोठी होती व ती शक्य तेवढी टाळावयास हवी होती. या गढूळ वातावरणातच शारदासदनाचे पाच वाढदिवस साजरे झाले. त्यांपैकी एका वाढदिवसाला स्वतःच्या घरातील स्त्रियांना घेऊन उपस्थित राहिल्याबद्दल रमाबाईंनी उपस्थितांचे विशेष आभार मानले. त्यावर डॉ. भांडारकर बोलावयास उभे राहिले व म्हणाले, 'पंडिता रमाबाईंनी आपल्या भाषणात आभारांची जी एक लांबलचक माळ ओवली आहे ती ऐकून मला फार वाईट वाटले... सर्वस्वी निराधार अशा एका बाईने आपल्या उदार अंतःकरणाच्या प्रेरणेने केलेले हे

महत्कृत्य मनात आणले म्हणजे आमच्यासारख्यांच्या सहाय्यास काडीइतकीही किंमत नाही हे प्रत्येकाला कबूल करावे लागेल. आज अनेक वर्षे आमच्या डोळ्यांदेखत हजारो विधवा दुःसह क्लेश सोशीत आहेत; परंतु त्यांच्यासाठी काही प्रयत्न करण्याचे कधी आमच्या गावीही आले नाही...आपण स्त्रियांस या समारंभास येऊ दिल्याबद्दल आपले आभार मानण्यात त्यांनी जो टोमणा दिला आहे तो आपण निमूटपणे सोसला पाहिजे, कारण स्त्रियांसंबंधाने आपले वर्तन तसेच आहे.' सदनाच्या पाचव्या वाढ-दिवसाला डॉ. कर्वे व गोदूबाई यांचा पुनर्विवाह एका आटोपशीर समारंभाने आनंदाने साजरा झाला. रमाबाईंनी आपल्या जावयाला व लेकीला मनापासून आहेर केला. लग्नप्रसंगी अण्णासाहेबांनी उखाणा घेतला, 'सदनाचे उपकार मजवर झाले फार। आनंदीने फेडायला असावे तयार।'

ह्याच काळात संमतिवयाच्या विलासाठी रमाबाईंनी स्त्रियांच्या सभाही घेतल्या. काँग्रेसच्या सामाजिक परिषदेत केशवपनावरील ठरावावर बोलताना त्या म्हणाल्या, 'विधवांचे केशवपन करावयाचे नाही असे तुम्ही ठरविलेत की कदाचित तुमच्या घरातील बायका—जसे जुन्या स्पार्टन स्त्रियांनी लढाईस निघालेल्या पुरुषांना, धनुष्य-बाणासाठी आपल्या केसांचे पेड कापून दिले तसे—आपण होऊन स्वतःचे केस तुम्हाला अर्पण करतील!' रमाबाईंच्या या उद्‌गारात दडलेली स्त्री-पुरुष भावविश्वातील जीवनसौंदर्याची जाणीव त्या काळच्या फारच थोड्यांना उमजली असावी.

असे संघर्षमय सामाजिक आयुष्य जगत असतानाच गुजरातकडून आलेल्या गोमतीबाई नावाच्या एका सज्ञान बाईने सदनात चार वर्षे वास्तव्य केल्यानंतर ठाण्याच्या मिशनमध्ये जाऊन, स्वतःच्या आईच्या मनाविरुद्ध (आई बाईट चालीची आहे असे मुलीचे म्हणणे होते.) बाप्तिस्मा घेतला. मग मात्र हळूहळू पेटत आलेले सदनाच्या विरोधाचे वातावरण कळसास पोहोचले. वारेमाप कंड्या पिकू लागल्या आणि रानडे-भांडारकरादी मंडळींनी 'सदनाचा उपयोग जर उघडउघड मुली बाटविण्यासाठी करायचा असेल तर आम्हांला या संस्थेशी संबंध ठेवता येणे शक्य नाही.' असे म्हणून राजीनामा पाठवून दिला. इतके झाल्यावर, रमाबाईंनीही आगरकरांच्या सुधारक पत्रास कळवून टाकले की, 'सदनात पाठविलेली मुलगी हिंदूच राहील ही हमी मला घेता येणार नाही!'—यानंतर पालकांनी भराभर आपल्या मुली सदनातून काढून घेतल्या. बासष्टपैकी बावीस मुली गेल्या आणि उरलेल्या सदनाबाहेर पडायला घाबरत इतक्या भयग्रस्त झाल्या. रमाबाईंनाही खुनाच्या धमक्या मिळाल्या. या निवेदनामुळे वातावरण इतके तापले की वेळोवेळी रमाबाईंच्या बाजूने सहानुभूतीने लिहिणाऱ्या आगरकरांनाही आता त्यांची बाजू घेता येणे शक्य राहिले

नाही. त्यांनी सुधारकात लिहिले ' (प्रार्थनेस येणाऱ्या मुलींची) संख्या वाढविण्याच्य कामी पंडिताबाईंकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने प्रयत्न झाला नाही हे आम्हांस माहीत आहे. परंतु कोणत्याही कारणामुळे म्हणा...या मुलींपैकी कोणी खिस्ती धर्मा-विषयी अधिक ज्ञान मिळविण्याची इच्छा धरल्यास ती जागच्या जागी दडपून टाकण्यास पंडिताबाई तयार नाहीत...तेही त्यांच्या समजुतीप्रमाणे वावगे नसल्यामुळे त्याची चेष्टा करण्याचे आम्हांस प्रयोजन दिसत नाही; परंतु असे करण्यात अल्पहित साधण्याकरिता मोठे हित गमवावे लागते हे रमाबाईस दिसू नये, किंबहुना दिसत असूनही त्यांनी जाणूनबुजून तिकडे दुर्लक्ष करावे हे आमच्या स्त्रीवर्गाचे दुर्दैव होय... हिंदुधर्माप्रमाणे आचरण करू इच्छिणाऱ्या मुलींस तसे करण्याला रमाबाईंकडून यत्किंचितही प्रतिबंध होत नाही हे आम्हाला पक्के ठाऊक होते. परंतु असल्या संस्थेत एवढा नियम पाळल्याने धर्मांतराची भीती नाहीशी होत नाही...कोणत्याही मुलीस स्वधर्मातून परावृत्त न होऊ देण्याचा अशा संस्थेच्या मुख्य चालिकेचा दृढ संकल्प असला पाहिजे. ही इच्छा किंवा शक्ती रमाबाईंस आता राहिलेली नाही असे वाटते. तेव्हा अर्थातच पूर्वी एकदा ज्या ईर्षेने या शाळेचा पक्ष आम्ही घेतला होता त्या ईर्षेने तो आज घेण्याला आम्ही असमर्थ आहो. धर्मासंबंधाने आमची मते कशीही असली तरी हिंदू स्त्रियांनी किंवा पुरुषांनी कोणत्याही ऐहिक किंवा पारमार्थिक लाभा-साठी खिस्ती व्हावे ही गोष्ट आम्हास बिलकूल संमत नाही. मुमुक्षू मर्त्यांनी धर्मा-वाचून मरू नये हे खरोखरीच इष्ट असल्यास 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' या गीतावचनातील रहस्य आम्हास पूर्णपणे मान्य आहे. '

सुधारकाप्रमाणेच प्रार्थनासमाजाच्या सुबोधपत्रिकेनेही आपला पाठिंबा काढून घेतला व केसरीने ' जितं मया 'च्या आविर्भावात रमाबाईंच्या बरोबर रानडे, भांडारकर, आगरकर साऱ्यांना भरपूर भरडून काढले. या घटनेवर एकत्रितपणे भाष्य करताना न. चिं. केळकरांनी टिळक-चरित्रात म्हटले आहे, ' अशा रीतीने रानडेप्रभृति सुधारकांना बाईंच्या सहवासामुळे कमीपणा आला; पण त्यात एकच फायदा झाला की काही झाले तरी आम्ही हिंदू ते हिंदूच राहणार, खिस्ती धर्म हा परका आहे-तो आम्हांस नको, आमच्या धर्मसहिष्णुतेची किंवा स्त्रीशिक्षणाविषयीच्या इच्छेची मजल खिस्ती होण्यापर्यंत जात नाही असे दर्शविण्याइतके तापट वर्तन त्यांच्या हातून जाहीरपणे घडले. धर्माच्या भांडणात असा निकाल केव्हातरी एकदा लागावा लागतो आणि विश्वबंधुत्वाच्या कल्पनेच्या राज्यातही तुटक, आखीव, खास प्रांत ज्याचे त्याचे म्हणून असतात, असावे लागतात व ठेवणे योग्य होते हे रानड्यां-सारख्या निर्विकार शांतिब्रह्मस्वरूप मनुष्याच्या कृतीने हडसून खडसून सिद्ध झाले; हा या वादातील एकच लाभ म्हटला पाहिजे. ' केळकरांनी वादातील लाभ शोधला; आगरकरांनी कार्यनाश झाल्याची खंत व्यक्त केली; फरक पडला तो असा !

इतके घडल्यानंतर १८९७ साली रमाबाईंनी मुंबई–पुणे, तेथील सुधारक मंडळी, आणि उच्चवर्णीय हिंदू स्त्रिया या सर्वांकडेच पाठ फिरवली व आपले काम सर्व जातिजमातींसाठी स्वतंत्रपणे केडगावला सुरू केले. मग नागर मध्यमवर्गाकडून त्यांची बुद्धिमत्ता, हितैषी बुद्धी, कळकळ, समर्पित वृत्ती–सर्व विसरले गेले. पुढे रमाबाईंचे जे काम चालू राहिले त्याकडे व त्यांच्याकडेही हिंदू समाजाने एक ख्रिस्ती धर्मप्रसार करणारी बाई एवढ्याच नजरेने पाहिले. किंबहुना त्यांच्या ख्रिस्ती धर्मप्रसाराकडेही जेवढ्या गंभीरपणे पाहायला हवे होते तेवढे पाहिले नाही. रमाबाईंना मध्यम, उच्च वर्गीयांपासून दूर करून त्यांची ताकद आपण काढून घेतली आहे या समाधानात हिंदू पुन्हा एकदा त्यांच्या मूळ स्वभावानुसार स्वस्थ राहिले. काही दिवसांपुरतीच जाग आलेला अजगर पुन्हा निद्राधीन झाला. पंडिता रमाबाईंचे प्रारंभापासूनचे एक मुख्य सहकारी दादा गद्रे १८९८ पर्यंत हिंदू होते. केडगावला आल्यानंतर एकदा सप्टेंबर महिन्यात शेवटच्या तारखेला रमाबाई अलाहाबादला दुष्काळग्रस्तांसाठी धावत गेल्या तेव्हा त्यांना गद्रेंनी नेहमीप्रमाणे स्टेशनवर निरोप दिला आणि मिशनमध्ये परतताना पोस्टात जाऊन अनावरपणे रमाबाईंनाच तार केली—

' Prejudices and September end together. I become a Christian...'!

रमाबाईंच्या गंभीर कार्यनिष्ठेचा हा प्रभाव होता.

रमाबाईंनी दुष्काळग्रस्तांसाठी अनेकविध कामे काढली तेव्हा आसपासच्या शेकडो अन्नान्न माणसांचा वेढा त्यांना पडत राहिला; सर्वांना कामे देताही येत नव्हती. पण त्यांच्यासाठी काही करता येईल असा विश्वास सततच होता. रमाबाईंनी एका पत्रात म्हटले आहे—' I own nothing on Earth except a few clothes and my Bible... I am poor and needy, yet the Lord thinketh upon me ! '

न. चिं. केळकरांनी इतरांबाबत काढलेला निष्कर्ष त्यांच्या टिळकपंथीय विचारसरणीशी सुसंगत असला तरी रानडे-आगरकरांच्या पंथाला तो पटण्याजोगा नव्हता. प्रथमपासून रमाबाईंनी सर्वांची योजनापूर्वक फसवणूक केली आणि शिकलेल्या स्त्रीबाबत नेहमीच अति-उत्साही असलेले सुधारक फसत गेले हा आरोप त्या सर्वांना मनातून अमान्य होता. रमाबाईंच्या व्यक्तिगत धर्माकडे न पाहता संस्थेची उपयुक्तता समोर ठेवून निराश्रित हिंदू विधवांना त्यांचा जेवढा देता येईल तेवढा फायदा द्यावा असे रानड्यांचे धोरण होते. शिवाय जो प्रश्न रमाबाईंनी अनेकदा जाहीर रीतीने विचारलेला होता त्यालाही त्यांच्यापाशी काही उत्तर नव्हते. प्रत्येक वेळी ' संस्था हिंदूंनी आपल्या ताब्यात घ्यावी व चालवावी. मी त्यांना मदतच करीन' असे निवेदन

रमाबाई करीत होत्या. दहा वर्षांत एतद्देशीय सुधारक तिची जबाबदारी स्वतःकडे घेतील असे अमेरिकनांनाही त्यांनी सांगितलेले होते; इतकेच नव्हे तर 'अशा प्रकारच्या तुम्ही इतर अनेक संस्था काढाव्यात, इतकी त्यांची आवश्यकता आहे' असेही रमाबाई म्हणत होत्या. पण ते प्रत्यक्ष कृतीने सिद्ध करून दाखविणे मवाळ, जहाल कोणत्याच सुधारकांना जमत नव्हते. लोकमान्यांनी रमाबाईंच्यावर कडाडून हल्ला केला, परंतु त्या करीत होत्या ते काम कसे केले पाहिजे यासंबंधी मात्र (क्वचित व्यक्त झालेल्या शाब्दिक आस्थेपलीकडे जाऊन) काहीच केले नाही. अशा विरोधकांना उद्देशून रमाबाई म्हणत की स्त्रीशिक्षणाचे प्रत्यक्ष काम करीत असताना येणाऱ्या सामाजिक अडचणींची व आपल्या वादविवादाने, त्यात घातल्या जाणाऱ्या भरीची जाणीव या मंडळींना नसली पाहिजे; किंवा ती असूनही ह्या कामाबद्दल पुरेशी आस्था नसल्यामुळे कामाचे नुकसान झाले तरी त्याची त्यांना खंत नसली पाहिजे. रानडे-आगरकरादींना रमाबाईंच्या या बोलण्यातील सत्य बोचल्याखेरीज राहात नव्हते.

या आरोपाला कृतीने उत्तर देण्यासाठी पुण्यात 'फिमेल हायस्कूल' (हुजूरपागा) निघाले. पण टिळकांनी तिथे दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा मुद्दा उपस्थित करून त्या हायस्कूलवरही सुरुवातीला हल्ले केले. शिवाय मुख्यतः सदन काढताना रमाबाईंनी स्त्रीजीवनाचा स्वावलंबनाच्या दृष्टीने जेवढा सर्वांगीण विचार केला होता तेवढा एखादी पुस्तकी शिक्षण देणारी शाळा काढण्यातून व्यक्त होत नव्हताच. त्यामुळेच सदनाचा निरोप घेताना आगरकरांनी म्हटले, 'मी खिस्ती नसते तर शारदासदन अस्तित्वात आले नसते' हे रमाबाईंचे उद्‌गार वास्तविक सर्व हिंदूंस झोंबण्यासारखे आहेत. अमेरिकन लोकांनी कोणत्याही उद्देशाने असो, हिंदू विधवांसाठी प्रतिवर्षी हजारो रुपये खर्च करण्यास तयार व्हावे आणि आमच्या हातून त्यांच्याकरिता आजपर्यंत काहीच होऊ नये, हे सर्व हिंदू लोकांस अत्यंत लांछनास्पद आहे. सुधारकांनी स्त्रीसुधारणेच्या बाबतीत बोलण्यापलीकडे काही केले नाही हा कित्येकांचा आक्षेप जरी आम्हांस मान्य नाही तरी त्यांच्या हातून या कामी जितका स्वार्थत्याग व्हावयास पाहिजे त्याच्या एकशतांशही अद्याप झालेला नाही असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. जुन्या लोकांच्या हातून जर काही झाले असेल तर सुधारणेस अडथळा आणण्याचे काम मात्र झालेले आहे...परंतु आम्ही अशी आशा करतो की आजपर्यंतच्या झालेल्या वाटाघाटीवरून अशा सदनाची आवश्यकता व त्यापासून होणारे हित ही त्यास पूर्णपणे दिसून आली आहेत... पुण्यास हिंदू शारदासदनाची स्थापना होणे अशक्य आहे असे आम्हास वाटत नाही.'

आगरकरांची ही कल्पना १८९८ साली अनाथबालिकाश्रम स्थापन करून आण्णासाहेब कर्व्यांनी व १९०८ साली रमाबाई रानडे यांनी सेवासदन ही संस्था उभी करून प्रत्यक्षात आणली. आण्णासाहेब कर्वे पंडिताबाईंपेक्षा वयाने पाच

दिवसांनी मोठेच होते. ते आपल्या आत्मवृत्तात लिहितात– 'पंडिता रमाबाईंवर व ख्रिस्ती मिशनऱ्यांवर वर्तमानपत्रांतून व खाजगी संभाषणांतून शिव्याशापांचे भडिमार सुरू झाले. पण आतड्याला पीळ पडून स्वोन्नतीच्या मार्गाचा प्रयत्न मात्र व्हावा तितक्या नेटाने झाला नाही...त्यांच्याशी कित्येक गोष्टीत जरी मतभेद झाला तरी त्या फार वरच्या कोटीतल्या म्हणजे 'परोपकाराय सतां विभूतयः' या कोटीतल्या होत, असे निदान माझे तरी मत आहे...अशा पराक्रमी स्त्रिया हिंदुस्थानात काय पण या भूतलावर, हाताच्या बोटांनी मोजण्याइतक्या सुद्धा मिळायच्या नाहीत... माझ्या पत्नीला सदनातील चार वर्षांच्या निवासात जे असंख्य फायदे झाले त्या सर्वांचा उल्लेख करणेही अशक्य आहे. ह्या शाळेतून ती आपल्याबरोबर तीव्र ज्ञान-लालसा घेऊन बाहेर पडली. तिथेच तिचे मन सुसंस्कृत व अंतःकरण विशाल बनले... जीवितहेतू व जगातील कार्य यासंबंधीचा तिचा दृष्टिकोण वस्तुतः बदलला...आयुष्य हा एक शाप नसून एक शुभाशीर्वाद आहे—असे तिला वाटू लागले... In fact I might not have started my institution if the शारदासदन had not changed its complexion.'

अखेर ज्याच्यासाठी रमाबाईंचा एवढा अट्टाहास होता ते बीज असे लहान प्रमाणात का होईना पण हिंदुविश्वात रुजले. रमाबाईंच्या कार्यामुळे विधवाविवाहाला अनुकूल भूमिका तयार होत गेली. केडगावच्या आसपासच्या गावातील पुरुष आपल्या घरातील स्त्रियांशी थोडे समजुतीने वागू लागले–त्यांनी रमाबाईंच्या आश्रयाला जाऊ नये म्हणून! आणि इंडियन ख्रिश्चन चर्चच्या कार्याला चालनाही मिळाली.

न्यायमूर्तींच्या पत्नी रमाबाई रानडे ह्या सर्व बऱ्याबाईट परिस्थितीत पंडिता-बाईंच्या पाठीशी मैत्रिणीच्या नात्याने, मोठ्या आदराने उभ्या होत्या. शारदासदना-विरुद्ध अत्यंत विरोधाची बावटळ उठलेली असतानासुद्धा तिथे राहणाऱ्या बाल-विधवांसाठी दिवाळीच्या फराळाचे करून घेऊन त्या गेल्या होत्या व दिवाळीसारख्या सुखद, शुभप्रसंगी आपल्या अनाथ दुर्दैवी विधवांची आठवण त्यांनी ठेवली, म्हणून पंडिताबाईंना गहिवरून आले होते. पण ह्या मैत्रिणीलाही सदनातील धर्मांतराच्या वादळात स्वतःला उघडपणे गुंतवून घेणे त्या काळी अशक्यच होते. मात्र रमाबाई रानडे यांनी सेवासदनचे जे काही हेतू ठरविलेले आहेत त्यांत पुढील गोष्टींचा जो समावेश आहे ती पंडिताबाईंची देणगी म्हणता येईल : 'जीविताबर आपली मालकी नसून हा परमेश्वरा-कडून मिळालेला ठेवा आहे असे समजून त्याचा योग्य उपयोग करावा व शेवटी तो प्रेमपूर्वक, भावनापूर्वक परमेश्वरास अर्पण करावा; सर्व मानवबंधूंशी प्रेमाने वागावे, दुष्काळ, अग्निप्रलय वगैरेंसारख्या सार्वजनिक आपत्तीत स्त्रियांनी लोकांच्या साह्यास जावे; शिक्षिका, परिचारिका इत्यादी सर्व व्यवसाय शिकून स्वतः स्वावलंबी व्हावे व सेवासदन संस्था धर्मातीत भूमिकेतून चालवावी...वाढवावी.' अशा प्रकारे कव्र्यांचा

अनाथबालिकाश्रम व रानड्यांचे सेवासदन ही हिंदू समाजाला उभी करावी लागलेली रमाबाईंची स्मारकेच आहेत. ज्या जगातून त्या बहिष्कृत झाल्या तिथेच परत कार्याचे महत्त्व पटल्यामुळे सन्मानाने स्थानापन्न झाल्या आहेत. हे स्वतःचे पुनरागमन मोठ्या समाधानी वृत्तीने केडगावच्या मुक्तिमिशनच्या एका भिंतीआडून रमाबाईंना पाहायला मिळाले. पंडिताबाईंच्या मृत्यूनंतर रमाबाई रानड्यांनी दुखवट्याच्या पत्रात म्हटले आहे की, माणसाचा धर्म कोणताही असो, त्याचे त्याने निष्ठेने पालन केलेले असले म्हणजे केवढी मानसिक ताकद निर्माण होत असते, हे रमाबाईंच्या आयुष्यात मला दिसत होते... 'धर्म कोणताही असो' हे उद्‌गार काढण्यासाठी १९२२ साल उजाडण्याची आवश्यकता होती!

कधी तरी मनात विचार येऊन जातो–रमाबाईंना धर्मांतर टाळता आले असते तर? असे झाले असते तर कदाचित सुधारकांशी कृतज्ञ असणाऱ्या हिंदू समाजाने त्यांना आपल्या देव्हाऱ्यातच ठेवायचे फक्त बाकी ठेवले असते. आजही वस्तुस्थिती पाहता महाराष्ट्रातल्याच नव्हे तर सबंध हिंदुस्थानातल्या स्त्रीशिक्षणाच्या त्या आद्य प्रवर्तिका ठरतातच. त्यांच्यापूर्वी आणि त्यांच्यानंतरही दीर्घकाळ स्त्रीशिक्षणाची सर्व चळवळ उदार बुद्धीच्या पुरुषांनीच चालविलेली आहे. ज्याप्रमाणे अस्पृश्यांच्या मूलभूत व सर्वांगीण उन्नतीसाठी त्या समाजातूनच नेतृत्व निर्माण होण्याची गरज होती व आहे, त्याचप्रमाणे स्त्रियांच्या बाबतीतही या कार्याला वाहून घेणारी स्त्रीच हवी होती. आपल्या सुदैवाने, आयुष्याच्या प्रत्यक्ष अनुभवातून घडलेली, स्त्रीसुधारणा हेच एकमेव जीवितकार्य मानणारी, कोणत्याही तथाकथित सनातनत्वाच्या किंवा आधुनिकत्वाच्या पुस्तकी कल्पनांशी स्वतःला बांधून न घेणारी व भारतीय स्त्रीचे मनुष्यत्वच अद्याप निर्माण व्हायचे आहे-हे ओळखून कामाला लागणारी स्त्री, १८८२ मध्येच स्वर्गातून भूतलावर अवतरावी तशी महाराष्ट्रात अवतीर्ण झाली होती. तिला महाराष्ट्राने घडवले नव्हते आणि तरीही प्रागतिक सुधारकांनी निर्माण केलेल्या वातावरणामुळे–महाराष्ट्र ही तिने आपली कर्मभूमी अचुकपणे निवडलेली होती. पण हा सारा जुळून आलेला दुर्मिळ योग रमाबाईंच्या केवळ धर्मांतरामुळे विस्कटत गेला आणि आयुष्यभर त्यांना जे जे करता आले ते ते जरी त्या करीत राहिल्या तरी हिंदू समाजाच्या नजरेत त्या एक अविश्वासाचा विषय म्हणूनच सतत खुपत राहिल्या. धर्मांतर घडले नसते तर आजसुद्धा त्यांच्याकडून होऊन गेलेल्या प्रत्यक्ष कार्याच्या बळावर आपण त्यांना फुले, आगरकर, कर्वे यांच्याइतकेच महत्त्वाचे व मानाचे स्थान देत राहिलो असतो.

पण आजही, रमाबाईंच्या मृत्यूला पन्नास वर्षे उलटत असताना, स्वातंत्र्यानंतरच्या धर्मातीत राजवटीला पस्तीस वर्षे होत असताना आणि बहुजनांच्या उन्नतीची

प्रतिज्ञा सतत उच्चारली जात असताना, रमाबाईंचे धर्मांतर लोकांच्या मनातून पूर्णपणे हटायला तयार नाही. कित्येकदा असेही होते की नव्या काळातील नव्या दृष्टिकोणाच्या संदर्भात पूर्वीचे अनेक उपेक्षित राहिलेले कार्यकर्ते, विचारवंत, समाजाच्या ध्यानात आणून दिले जातात; एकेकाळच्या उपेक्षित असलेल्या लोकहितवादी, फुले यांच्या-सारख्यांच्या कार्याची पुनर्मूल्यमापने होत राहतात. पण रमाबाईंच्या बाबतीत त्यांच्या धर्मांतराने ही मूल्यमापनाची गरजही फारशी कोणाला वाटलेली दिसत नाही. एखादी उच्चवर्णीय हिंदू मुलगी ख्रिस्ती होत आहे असे दिसताच आपल्या जीवनाच्या गाभ्यालाच कोणीतरी झोंबते आहे असे त्या काळातील नेत्यांसह सर्वांना वाटले आणि त्यांनी रमाबाईंना समाजशत्रू लेखले. पण नंतरच्या काळात सर्व उच्चवर्णीयांच्या व्यतिरिक्त शेकडो अज्ञानी-सज्ञानी माणसे केडगावच्या मुक्तिमिशनमध्ये ख्रिस्ती होत गेली; तरी त्याचे फारसे सोयरसुतक मात्र ह्याच हिंदू समाजाने मानले नाही. त्यांचे ख्रिस्ती होणे 'समाज' या दृष्टीने त्यांना इतके कमी महत्त्वाचे का वाटावे? सुधारणा आणि धर्मकल्पना–दोन्हीही फक्त उच्चवर्णीयांपुरत्याच होत्या म्हणून?

वास्तविक ह्याच इतिहासाची पुनरावृत्ती डॉ. आंबेडकर व त्यांचे अस्पृश्य अनुयायी यांच्या धर्मांतराच्या वेळी झालेली आहे. हिंदू समाजात अस्पृश्याला जन्मतः मनुष्यत्व असत नाही, पाठीला कणा नसल्याप्रमाणेच अस्पृश्य शूद्र म्हणून जन्माला येतो. निदान पुढल्या पिढ्यांतून तरी कणा असलेली 'माणसे' जन्माला यावीत ही धर्मांतरामागील आंबेडकरांची भूमिका आहे. डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक भूमिकेशी त्यांच्या राजकीय भूमिकेचा संबंध आहे; रमाबाईंच्या लेखी तो संबंध धार्मिक झाला. तरीही केडगावला स्थायिक झाल्यानंतर त्या काळात त्यांनासुद्धा हिंदू समाजातल्या ब्राह्मणेतर जातीतल्या स्त्रियांच्या उन्नतीसाठी धर्मांतर ही एक मूलभूत गरज आहे असे वाटलेले आहे. १८९५ नंतर धर्मांतराखेरीज भारतीय सामाजिक जीवन बदलणार नाही अशी रमाबाईंची पक्की धारणाच होत चालली. पण तेव्हा व अद्यापही जेवढ्या हिरीरीने या सामाजिक अन्यायाच्या प्रश्नांचा विचार हिंदू समाजाने करायला हवा होता तेवढा केलेला नाही. आजच्या उदार अल्पसंख्य सुशिक्षितांनी धर्म ही एक ज्याची त्याची व्यक्तिगत गोष्ट आहे, ही भूमिका स्वीकारली आहे आणि सर्व सामाजिक प्रश्न शैक्षणिक व आर्थिक उन्नतीशी निगडित आहेत असे मानले आहे; आजच्या बहुसंख्य हिंदूंनी धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर असे समीकरण मनात ठेवून आपली भूमिका संकुचित आणि पूर्वीइतकीच ठाम ठेवलेली आहे.

रमाबाईंच्या धर्मांतरातून निर्माण झालेल्या झगड्याचा हा जुना इतिहास आज पाहताना मनात येते की, आपण पुढे गेलो असे वाटणे हा आभास तर नाही? आपण पुढे काय किंवा मागे काय, जाण्यासाठी जेवढे खरेखुरे जागे व्हायला हवे आहोत, तेवढेही अद्याप झालो नाहीत, हीच वस्तुस्थिती तर नाही?

रमाबाईंनी धर्मांतर केले आणि तत्कालीन प्रागतिकांनी ते केले नाही; पण सर्वांचीच धर्मश्रद्धा रूढ मार्गाने जायला तयार नव्हती हे ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज इत्यादींच्या निर्मितीचे इतिहास स्पष्टपणे सांगत आहेत. फादर नहेम्या गोऱ्हे यांच्यासारख्यांनी तर हे बरोबर ओळखले होते व चाळीस वर्षे हीच सर्व मंडळी आपल्या लेखणीचे लक्ष्य म्हणून डोळ्यांपुढे ठेवली होती. परंतु रमाबाईंच्या योग्यतेची व्यक्ती त्यांच्या हातीसुद्धा फिरून लागली नाही. धर्मांतर हे आपल्या समाजाच्या व काळाच्या संदर्भात 'याचि देही याचि डोळा' जन्मांतरच ठरते हे १९ व्या शतकातील कृतिशील सुधारकांनी पुरते ओळखले व कार्याची हानी होऊ नये म्हणून व्यक्तिगत आयुष्यात अनेक प्रकारच्या विसंगती स्वीकारल्या. कोणी मूर्तिपूजा केली–केली नाही; कोणी अज्ञेयवादी झाले, पण तसे व्हावे असे उघड बोलले नाहीत; कोणी धर्माची व व्यक्तिगत आणि सामाजिक नीतीची सांगड घालून टाकली–पण त्यापेक्षा वेगळी अशी जी धर्मकल्पना आहे ती टाकून द्यावी असे आग्रहाने म्हटले नाही. रमाबाईंनी मात्र विसंगती पत्करण्याचे, स्वतःच्या मनाशी व बुद्धीशी तडजोड करण्याचे नाकारले; त्यापोटी येणारी कार्यहानी, कार्यहानी न मानता आपले कार्यक्षेत्रच उच्च वर्णीयांकडून तथाकथित नीच वर्णीयांकडे वळवले. 'जो माझ्या दारी येईल तो माझा आहे' असे मानले आणि भारतीय ख्रिस्ती समाज हा भारतीयच असणार आहे हे मिशनऱ्यांना, राष्ट्रवाद्यांना व इंग्रज सरकारलाही त्या पटवीत राहिल्या. स्वतःच्या मिशनमधील इमारती, रस्ते, खाणेपिणे, भाषा, प्रार्थनासंगीत, बाप्तिस्म्याची पद्धती, सर्व भारतीय जीवनाशी सुसंगत असायला हवीत, असा आग्रह त्यांनी ठेवला.

पण या आग्रहात सुद्धा कटाक्षाने एक गोष्ट टाळली. हिंदूंचे धार्मिक संस्कार, त्यांच्या रूढी व चातुर्वर्ण्यासारखे सामाजिक सिद्धान्त स्वतःकडून अजिबात कोटेही रुजता कामा नयेत–कारण यांना थारा देणे म्हणजे त्यांच्या दृष्टीने स्वतः पत्करलेले बंडखोर जीवनच व्यर्थ करण्यासारखे होते. आपल्या सर्वसामान्यांसाठी असलेल्या बायबलच्या भाषांतरात त्यांना संस्कृतप्रचुरता मुळीच नको होती; मिशनऱ्यांचे पाद्री मराठीही नको होते, इतकेच नव्हे तर बायबलशी सहजगत्या जुळू शकणारी–मराठी संतांची बोलीही त्यांना नको होती. 'परमेश्वरा' ऐवजी 'योहोवा' हा शब्द हिंदूंच्या ईश्वरकल्पनेपासून असलेले वेगळेपण सिद्ध करण्यासाठी त्यांना आवश्यक वाटत होता आणि 'पुत्र' शब्दामध्ये 'पुम्' नावाच्या नरकातून पित्याला सोडविणारा असा अर्थ अभिप्रेत आहे असा संशय येताच त्याऐवजी 'मुलगा' हा भारदस्तपणाचा अभाव असलेला शब्द घालावासा वाटत होता! रे. नारायण वामन टिळक हे बाईंच्याप्रमाणेच ख्रिश्चनांचे भारतीयत्व मानणारे व ते प्रस्थापित करण्याची धडपड करणारे होते; पण बायबलच्या भाषेच्या बाबतीत बाईंचे त्यांच्याशी पटू शकले नाही. टिळक ओवीबद्ध ख्रिस्तायनाकडे वळले आणि रमाबाईंनी बायबलचे जे गद्य भाषांतर

केले ते सरळ सुबोध न होता (पुन्हा एकदा वेगळ्या कारणाने पण) अवजडच होऊन बसले ! विशुद्ध खिस्ती विचारसरणीच्या पुरस्कारासाठी बाईंनी हे डोळसपणे पत्करले ! एखाद्या भूमीची नकोशी परंपरा नाकारताना तेथील हवामान बदलण्याचा प्रयोग करण्यासारखेच हे अस्वाभाविक कृत्य होते !

आपल्या स्नेहीसोबत्यांकडे संपूर्णपणे पाठ फिरविण्यापूर्वी जाता जाता स्वतःच्या स्वभावानुसार रमाबाईंनी आणखीही एक मोठेच साहसी काम केले. नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांचा व त्यांचा एकेकाळी स्नेह होता. १८९६ मध्ये प्लेगचा पुण्यात कहर उडाला असताना प्लेगमधील ब्रिटिश सोल्जरांच्या अनाचाराची वर्णने ज्या काही जबाबदार लोकांनी लंडनमध्ये असलेल्या गोखल्यांना पत्रांतून कळविलेली होती, त्यांत रमाबाईही एक होत्या. त्या पत्रांच्या आधारावर गोखल्यांनी इंग्लंडमध्ये रँड–आयर्स्टच्या खुनाने चिडलेल्या ब्रिटिश सरकारविरुद्ध आपली तोफ डागली म्हणून सरकारने एक चौकशी कमिशन नेमले. कमिशनने आरोप नाशाबीत ठरविले. गोखले लंडनहून परत निघाले आणि ते एडनला येत आहेत तोच त्यांच्या भारतीय मित्रांनी त्यांना कळवून टाकले की, पत्रांतील आरोप शाबीत करण्यासाठी आवश्यक असलेले पुरावे आपण आता देऊ शकत नाही; इतकेच नव्हे तर गोखल्यांनी मित्रांची नावेही हिंदुस्थानात जाहीर करू नयेत; ब्रिटिशांना तोंड देण्याचे धैर्य आपल्या ठिकाणी नाही. गोखले पुण्यात आले आणि रानडे आदी मंडळींच्या सल्ल्याने त्यांनी जाहीरपणे ब्रिटिश सरकारची माफी मागितली. या काळात लोकमान्य टिळकांनी घेतलेल्या जहाल भूमिकेशी गोखले-रानड्यांचे हे क्षमा मागणे मुळीच न जुळणारे असल्याने टिळकांनी आणखी एकदा संधी साधून त्या दोघांना लोकांपुढे हास्यास्पद ठरवले. ह्या प्रसंगी गोखल्यांना साथ देण्याचे धैर्य फक्त एकट्या रमाबाईंनीच दाखवले. गोखल्यांना इंग्रजांच्या अत्याचाराबद्दल त्यांनी जे कळविले होते तेच त्यांनी मुंबईच्या गार्डियन साप्ताहिकाला अत्यंत स्पष्टपणे कळवून टाकले. एका आजारी मुलीसाठी प्लेग हॉस्पिटलमध्ये, विलक्षण घाणीत राहण्याचा प्रसंग रमाबाईंच्यावर ओढवला होता. त्याची संपूर्ण हकीगत कळवून सर्व मातांना त्यांनी इशारा दिला की प्लेग हॉस्पिटलमध्ये तुमच्या मुली सुरक्षित नाहीत ह्यावर मुंबईच्या गव्हर्नरने ही माहिती निखालस खोटी आहे असा शेरा देताच पुन्हा रमाबाईंनी सत्य, न्याय यासाठी लोकमताला आवाहन करीत गव्हर्नरचे विधानच असत्य ठरविले. गोखल्यांच्या इतर मित्रांच्या तुलनेने रमाबाईंचे हे धैर्याचे, खऱ्या अभिमानाचे बाणेदार वागणे लोकमानसावर असे बिंबले की कित्येक दिवस पुण्यातील मंडळी 'नारि असुनी सत्यपणा तूचि राखिला' असे त्यांचे स्तवन गात होती. पण प्लेगची साथ ओसरली व

रमाबाईंच्या लोकप्रियतेची भरतीही ओसरली! पुन्हा रमाबाई खिश्चन म्हणून परक्या ठरल्या! पुण्यात त्यांच्या सभा उधळून लावण्याचे प्रयत्न होऊ लागले. बाईंनी मनात ओळखले की, या उच्चवर्णीयांच्या जगात आता आपल्याला स्थान नाही. त्यांना प्रथमपासूनच कृतिरूपाने जगायचे होते. त्याच्या आड येणारी कोणतीही गोष्ट त्यांच्या दृष्टीने सहजच त्याज्य होती. लोकमान्यतेच्या भरती-ओहोटीशी त्यांचे नाते नव्हतेच म्हणून ते तुटल्याची खंतही त्यांना नव्हती.

केडगावला आल्यानंतर रमाबाईंनी एक नवे जगच तिथे निर्माण केले. पुण्यात प्लेगची लाट आली, गुजरात-मध्यप्रदेशात भीषण दुष्काळ पडले, तिथेतिथे रमाबाई मदतीस धावल्या. एका वेळी शेकडो–हजारो भुकेने, रोगाने तडफडणारे मानवी सांगाडे घेऊन येऊ लागल्या व आपल्या मिशनरी सहकाऱ्यांच्या साह्याने त्यांनी त्यांना जगवले; पुढे स्वतःच्या पायावर उभे केले. १९०५ मध्ये दोनशेबीस कुमारिका माता त्यांच्या कृपासदनात होत्या! आजही आपण केडगावला गेलो तर ती तेव्हा तिथे आलेली दोनचार अगदी वृद्ध माणसे आपल्याला भेटतात व 'आईने' आपणास कसे सांभाळले ते डोळ्यांतले पाणी आवरीत सांगत राहतात. पण रमाबाईंच्या या लोकसेवेत धर्मांतराचा हेतू होता असे म्हणून तत्कालीन हिंदू समाजाने मात्र त्यांच्या ह्या कार्याची दखल घेतलेली नाही. धर्मांतरित होऊन ते जगले त्यापेक्षाही हिंदुधर्मात राहून मेले असते तरीही ह्या सर्वांना ते हुतात्मे झाले असे कदाचित वाटले असते. शारदासदन खिस्ती झाल्यामुळे, आपण होऊन त्याच्यात कोणी आपल्या मुली पाठवीनासे झाल्याने दुष्काळाची संधी साधून 'आयते आलेले पीक जमा करण्यासाठी' रमाबाई दुष्काळग्रस्त प्रांतात गेल्या व त्यांना तेथे कल्पनेच्या बाहेर लाभ झाला असे' बहुसंख्य हिंदूंचे याबाबत म्हणणे आहे; तर हजारो माणसे अन्नान्न दशेत असताना, घरी बसून दोन घास सुखाने खाणे त्यांना जमेना म्हणून त्या दुष्काळग्रस्त भागाकडे धावल्या असे खिश्चनांचे व आजही अगदीच अल्पसंख्य असलेल्या हिंदूंचे म्हणणे आहे. 'दुष्काळातून आणलेल्या मुलींच्या साहाय्याने बाईंनी आपले सदन 'गजबजविले', सदनाभोवती एखाद्या किल्ल्याप्रमाणे कोट बांधून बाई बसल्या व मग कोणासच सदनासंबंधी चर्चा करण्याचे कारण राहिले नाही.' या शब्दात बहुसंख्य हिंदू समाजाच्या वतीने न. चिं. केळकरांनी या घटनेचा समारोप केला आहे!

इकडे स्वतःच्या आश्रयाला आणलेल्या व आलेल्या शेकडो माणसांची अन्नवस्त्र-निवाऱ्याची व्यवस्था लावता लावता, त्यांचे शारीर स्वच्छतेपासूनचे सर्व प्रश्न सोडविता सोडविता, पहाटे चार वाजता सुरू झालेला दिवस कसा मावळत होता हे रमाबाईंना व त्यांच्या सहकाऱ्यांना कळत नव्हते. शाळेबरोबर लॉंड्री, बेकरी, शेती, गोशाळा,

छापखाना, हातमाग इत्यादी व्यवसाय स्वतःच्या गरजेसाठी सुरू करणे त्यांना आवश्यक झाले होते. त्यामुळे भोवतालच्या मिशनऱ्यांच्या व परदेशातील आपल्या क्रियाशील चाहत्यांच्या पलीकडे बाईंनी दुसरीकडे कुठे लक्षच दिले नाही. स्वतःला हव्या होत्या त्या पद्धतीच्या त्या आकाराच्या इमारती उभ्या करून, बीजपाण्यापासून सर्वच सोयी तिथे त्यांना करून घ्यायच्या होत्या. त्यातून आपल्या दैनंदिन गरजा कसकशा भागवायच्या हा त्यांचा पेच जवळ जवळ कधीच पूर्णपणे सुटत नव्हता. कधी धान्य नाही, कधी पाणी नाही, कधी पैसा नाही आणि आलेल्या माणसांवर कसलेच सुसंस्कार नाहीत; अशा परिस्थितीत शेकडो अनाथांचा भार माथ्यावर घेऊन दर दिवसाला वाट काढावी लागत होती.....

या कार्यमग्न वातावरणात बाईंच्या मनातील धर्मभावनेने एक वेगळेच वळण घेतले. कोणत्याही संकट प्रसंगी परमेश्वरावर भार टाकण्याचा बाईंचा मूळ स्वभाव होताच. आता तो अधिकच दृढ झाला. त्यांचे मन पुन्हा पुन्हा बायबलकडे, प्रार्थनेकडे धाव घेऊ लागले व अद्यापही आपली धर्मभावना अपूर्ण आहे असे वाटून ती परिपूर्ण करण्याच्या मागे त्या लागल्या. रमाबाईंनी या काळातील एका पत्रात लिहिले आहे—

'Some years ago I was brought to the conviction that mine was only an intellectual belief–a belief in which there was no life. It looked for salvation in the future after death and consequently my soul had not passed from death unto life. God showed me how dangerous my position was and how necessary it was for me to obtain salvation in the present and not in future time. I repented long and I become very restless and almost ill and passed many sleepless nights. The Holy Spirit so got hold of me that I could not rest until I found salvation then and there. या जाणिवेनंतर उपवास, प्रार्थना, ख्रिस्ताच्या दैवी सामर्थ्यावर पूर्ण भरवसा यांखेरीज रमाबाईंचे पाऊल पुढे पडेनासे झाले. बाईंची प्रयत्नशीलताही काही काल पूर्णपणाने सुटली. प्रयत्नांइतकीच परमेश्वराच्या कृपेचीही, किंबहुना त्यापेक्षाही अधिक, परमेश्वराच्या कृपेचीच त्यांना आवश्यकता वाटू लागली व ही कृपा आपल्याइतकीच आपल्या भोवतालच्या अनाथ माणसावरही व्हायला हवी हा ध्यास त्यांनी घेतला. सिस्टर जिराल्डिनलाही अमान्य असणाऱ्या अद्‌भुत चमत्कारांवर त्या विश्वास ठेवून राहिल्या. सर्वांचे ख्रिस्तीकरण झाले नाही तर त्यांची उन्नतीच होणार नाही हेही ठामपणे त्यांनी मानले...

धर्मस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य यांचा प्राणपणाने पुरस्कार करणाऱ्या पूर्वीच्या रमाबाई, आता जी माणसे स्वतःच्या आवतीभोवती घेऊन वावरत होत्या, त्यांचे प्रश्न फारच वेगळे होते. उच्चवर्णीय हिंदू माणसाला जन्मतः जे सहज रीतीने लाभते

ते साधे स्वत्वाचे देणे त्यांच्याकडे अभावानेही नव्हते; त्या दिशेने त्यांची विचारशक्ती अद्याप अंकुरलेलीही नव्हती. साहजिकच एखाद्या उपेक्षित, अजाण मुलाला वाढवावे, तसे रमाबाई भोवतालच्या लोकांना वाढवू लागल्या. त्यांचे निर्णय स्वतःच घेऊ लागल्या. अंधश्रद्धेकडे झुकत चाललेल्या आपल्या मनोवृत्तीचे वाटेकरी त्यांनी त्यांनाही करून घेतले आणि बाईंच्यामध्ये व इतर कट्टर मिशनऱ्यांमध्ये जाणवावे एवढे वेगळेपण राहिलेच नाही. बाईंचे राष्ट्रप्रेम व माणसांवरील खरेखुरे प्रेम कधी कमी झाले नाही; पण ख्रिस्तीधर्मप्रेम हे जीवनाचे आधारतत्त्व होऊन बसले. ख्रिस्ती धर्मतत्त्वांचा पुष्कळसा परंपरागत पद्धतीने चालणारा आचार हाच एक सर्वांच्या आत्मोद्धाराचा मार्ग आहे अशी त्यांची स्वतःची खात्री झाली. इतकी वर्षे आपण ख्रिस्ती असूनही खरा ख्रिस्तीधर्म आत्ताच आपल्याला कळतो आहे असेही 'पापाची जाणीव' होऊन त्यांना वाटू लागले. सततच्या व्यक्तिगत व सामूहिक प्रार्थनेमुळे अनेक मुलींच्यामध्ये पवित्र आत्म्याचा प्रवेश झाला आहे, प्रार्थनेमुळे आजार बरे होत आहेत, प्रार्थनेमुळे विहिरीला पाणी लागते आहे...एक ना दोन, रमाबाईंचे सगळे अंतर्बाह्य जीवनच केवळ प्रभूच्या प्रार्थनेचा प्रसार करू लागले.

मिशनमधील घंटा ठरावीक वेळेला वाजत होत्या. शाळा भरत होत्या, छापखान्यातील माणसे कामाला लागत होती. शेतीसाठी झालेली जुपी सुटत होती. सगळे व्यवहार शिस्तीने चालू होते. अनेक जुनी माणसे कामानिमित्त किंवा पुढील जीवनाच्या ओढीने बाहेर जात होती आणि अनेक नवीन, लहानमोठी, अडलेली-नडलेली आत येतच होती. रमाबाईंचे रत्नासारखे तेजस्वी असलेले करुणेने ओथंबलेले निळे डोळे एखाद्या फुलाच्या पाकळ्या मिटाव्यात तसे हळूहळू क्षीण होत होते. त्या डोळ्यांसमोर स्वतःच्या मंत्रसामर्थ्यात त्यांना गुरफटून ठेवणारे बायबल फक्त होते. बाईंचा प्रखर बुद्धिवाद थकलेल्या शरीरावरोबर व एवढ्या बिकट जीवनानुभवांनंतर पूर्ण श्रद्धेकडे झुकत झुकत गेला. तेव्हा 'बाईंचे सुद्धा मिशनरीपण कसे शेवटी बरोब्बर प्रगटले' असे त्यांच्या हिंदू चरित्रकारांना म्हणता आले, तर ख्रिस्ती चरित्रकारांना 'बाईंचा एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून पूर्ण विकास झाला' असे दाखविता आले!

खरे कसे आणि काय काय घडले? किंबहुना समकालीनांनी मानलेली रमाबाईंची शोकांतिका ही रमाबाईंच्यापेक्षाही अधिक आपली दुःखात्मिका होती व आहे हे तरी आपल्याला कितपत उमगले?

—मुक्तिमिशनमध्ये आल्यापासून मी सारख्या अनेक जणींच्या हकीगती ऐकत होते. एका सहा महिन्यांच्या गुटगुटीत मुलाची आई त्याच दिवशी सकाळी त्याला तिथे ठेवून निघून गेली होती, आणि माझ्या समोरच्या पाळण्यात ते अजाण पोर खळखळू

हसत होते ! अंधत्व आल्यामुळे घरातून हाकलून दिलेल्या एका विवाहित स्त्रीचा पाच-सहा वर्षांचा छोकरा, त्या मातृविहीन पोरांच्या घोळक्यात मोठ्या कौतुकाने, 'अहो, ही पाहा माझी आई–ही माझी आई–' असे तिच्या ओच्याला धरधरून, उंच सुरात मला अपूर्वाईने सांगत होता. चौऱ्याण्णव वर्षांच्या केशवपन झालेल्या सगुणाबाई शहाण्णव सालच्या प्लेगमध्ये घरात एकट्याच राहिलेल्या. आपण 'आईच्या' बरोबर पुण्यातून कशा निघालो हे कापऱ्या कापऱ्या आवाजात, मध्येच बोलण्याचे विसरूनही जात– मला सांगत होत्या...हे सारे पाहताना माझ्या पाठीशी उभ्या होत्या कॅनडातून, की ऑस्ट्रेलियातून, की आणखी कुठल्यातरी दूरच्या देशातून दहा वर्षांपूर्वी आलेल्या सेवाभावी मिस ग्रे...

लहानपणापासून पाहायचे होते ते केडगावचे बेट मी असे मोठेपणी पाह्यले !

३

त्रिशंकू

डॉ. आनंदीबाई जोशी यांचे पती गोपाळराव जोशी यांच्या संबंधात आज काही लिहिण्यास मी उद्युक्त झाले आहे; परंतु हे लिहिणे सहज जमून जाईल असा भ्रम माझ्या मनात नाही. गोपाळरावांविषयी माहिती सांगणारी पुष्कळ माणसे आणि पुष्कळ कागदपत्रे आढळतात; पण त्या आठवणींच्या, लिखाणांच्या, आड दडलेले गोपाळराव आपल्याला पुरेसे ओळखता आलेले आहेत असे मात्र कधी वाटत नाही. एखाद्या माहितीच्या किंवा कृतीच्या आधारावर त्यांच्याविषयीची एखादी समजूत आपण पक्की करतो न करतो, तोच गोपाळराव ती सफाईदारपणे उधळून लावतात! त्यांच्या चलाख, चपळ, कल्पक, उदार, आग्रही, शहाण्या आणि असमतोल व्यक्तित्वाचे अनेकरंगी, अनेकढंगी तुकडे जुळवून पाहता पाहता मनापुढे एकसंध असा कोणताच आकार उभा राहू शकत नाही. प्रश्न पुन्हा तसाच राहतो. गोपाळराव नेमके होते तरी कसे? एक माणूस म्हणून मला ते मुळीच आवडत नाहीत. परंतु त्यांच्या ठिकाणी जे सतत धक्के देण्याचे एक 'अद्‌भुत' सामर्थ्य आहे ते पुन्हा पुन्हा मला त्यांचा विचार करायला लावते; अनाकलनीयता त्यांच्याबद्दल कुतूहल वाढवीत राहते आणि त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न–तो अयशस्वी होणार हे ओळखूनही–परत परत करावासा वाटतो!

डॉ. आनंदीबाई जोशी अमेरिकेहून भारतात आल्यानंतर अडीच महिन्यांनी पुणे येथे दिवंगत झाल्या (२६ फेब्रुवारी १८८७). ज्या घरी त्या जन्माला आल्या होत्या त्याच बाळशास्त्री माट्यांच्या घरात, आपल्या आजोळी, वयाच्या बाविसाव्या वर्षी, त्यांनी शेवटचा श्वास घेतला. जिवंतपणी जे जे करायचे योजले होते, ते सर्वच जागच्या जागी विरून जाते आहे, हे या अखेरच्या काळात डॉ. आनंदीबाईंना स्वतःला

समजून चुकलेले होते. निरवानिरव करताना, मृत्यूनंतर आपल्या रक्षेचा थोडा भाग 'रोशेल' येथे पाठवावा असे त्यांनी गोपाळरावांना सांगून ठेवलेले होते. त्यानुसार आनंदीबाईंचे देहावसान झाल्यानंतर थोड्या वेळाने गोपाळरावांनी त्यांच्या निश्चेष्ट देहाचा एक फोटो काढून घेतला आणि पुढे त्या फोटोसह त्यांची रक्षा रोशेलच्या ज्या कार्पेंटर कुटुंबात आनंदीबाई राहात असत तेथे पाठवून दिली. फोटो पाठविताना, त्याच्याखाली, 'हिंदू' गोपाळरावांनी लिहिले होते, 'मॅटर बिफोर इट बॉज ट्रान्सफॉर्मड इनटू व्हेपर अँड अॅशेस!'

हे लिहिणारे वास्तवनिष्ठ गोपाळराव नेमके तसे होते का?

अमेरिकेतून परत निघाल्यापासूनच या कार्पेंटर कुटुंबाला आनंदीबाईच्या तब्येतीची हकीगत कळविण्याची जबाबदारी गोपाळरावांच्यावर येऊन पडलेली होती. बोटीवरून पाठविलेल्या पत्रांतून, तब्येतीच्या हकीगतींबरोबरच, पुरेशा पैशांच्या अभावी व आपण काळे हिंदू असल्यामुळे, परतीच्या प्रवासात आपल्याला कसकसा त्रास होत गेला, हेही गोपाळराव आवर्जून कळवीत होते. दोघांच्याही वरच्या वर्गाच्या तिकिटांपुरते पैसे मिळालेले असूनही गोपाळरावांनी या वेळी स्वतःचे तिकीट सर्व्हेट्स क्लासचे काढलेले होते! जवळ पैसा कमी असला म्हणजे जे खरे जग दिसते आणि अनुभवाला येते, ते सुस्थितीत असताना येत नाही हे गोपाळरावांचे एक जुनेच आवडते तत्त्व होते. ते कार्पेंटर्सना पत्रांतूनच सांगतच या इतक्या निकराच्या दिवसांतही गोपाळराव 'अनुभव' घेत होते! या पत्रातील 'अनुभवा'ची ही आधुनिक फॅशनची–स्वतःच्या जगण्यापासून स्वतःचे थोडे अलिप्तपण सुचविणारी–भाषा वाचताना गोपाळरावांचा पिंड एखाद्या तत्त्वचिंतक योग्याचा होता की कलावंताचा होता असा प्रश्न एक क्षणभर मनात येऊन जातो! पण या दोन्ही क्षेत्रांत गोपाळरावांनी काहीच कामगिरी केलेली नाही. ते उतरले आहेत सामाजिक सुधारणेच्या, वास्तवाशी बांधलेल्या क्षेत्रात; जिथे स्वतःबरोबरच लोकांचेही दैनंदिन प्रश्न विचारात घ्यायचे आणि योग्य मार्गदर्शन करीत सोडवायचे असतात अशा!

पण गोपाळरावांचा पिंड समाजसुधारक व्हायला अयोग्य होता असेही नाही! विचारांप्रमाणे कृती करण्याची हिंमत त्यांच्यात होतीच. कार्पेंटर मंडळींनी आनंदीबाईंच्या अगदी पहिल्या पत्रापासूनची सर्व पत्रे कौतुकाने जपून ठेवली होती. त्यांतच ती गोपाळरावांची नवी पत्रेही ठेवलेली होती. अवघ्या चार महिन्यांपूर्वी जिला आपण फार जड अंतःकरणाने निरोप दिला, तिची चाललेली ती शेवटची फरपट या वेळी–कार्पेंटर कुटुंबियांच्या बरोबरच डॉ. रेचल् बॉडले (पेन्सिल्व्हानिया महिला वैद्यकीय विद्यापीठाच्या प्रमुख), पंडिता रमाबाई आणि आनंदीबाईंच्या अनेक अमेरिकन मैत्रिणी मोठ्या व्याकुळ नजरेने पाहात होत्या. ब्राह्मणांनी दररोज शिंपडलेली तीर्थे, केलेले अंगारे-धुपारे, ग्रहशांतियज्ञ, गावातील देवदेवतांना चाललेले अभिषेक, यांचे

गोपाळरावांच्या पत्रांतून येणारे वर्णन वाचताना, हताशपणाने 'यामुळे तरी विचारीला बरे वाटो' अशी अगतिक प्रार्थना या परदेशस्थ मंडळींचीही चाललेली होती. त्यांनी स्वत: जवळून पाहिलेल्या विक्षिप्त गोपाळरावांना विसरून, केवळ आनंदीबाईंच्या जीवनाचा विचार करण्याचा प्रयत्न ती सर्वजण करत होती आणि ते त्यांना जमत नव्हते.

अमेरिकेच्या किनाऱ्यावर आनंदीबाई पोहोचल्या, त्या वेळी एका पौरस्त्य स्त्रीचे साहस हा तेथील सर्वांच्या कुतूहलाचा, चर्चेचा विषय होता; परंतु नंतर चाळीस महिन्यांनी त्यांनी अमेरिका सोडली त्या वेळी त्यांच्याविषयीच्या प्रेमाने, कौतुकाने आणि अभिमानाने फिलाडेल्फियाचा सगळा परिसर अगदी भारावून गेला होता. नुकत्याच झालेल्या पदवीदान समारंभाच्या वेळी आनंदीबाईंनी केलेल्या सुंदर भारतीय पोशाखापासून तो अनेक प्रसंगीच्या त्यांच्या गंभीर भाषणांपर्यंत प्रत्येक गोष्ट छापावयास या वेळी वृत्तपत्रे उत्सुक होती. आता त्यांच्या मनात केवळ साहसाचा गौरव नव्हता. पौरस्त्य बुद्धिमत्तेचा, चारित्र्याचा, लहान वयातील प्रगल्भतेचा आणि मुख्य म्हणजे आनंदीच्या स्नेहशील वृत्तीचा गौरव होता. साडेतीन वर्षांत या सर्वांच्या मध्ये वृद्धिंगत होत आली होती ती ध्येयाधिष्ठित सहानुभूतिपूर्ण स्नेहशीलता! शिवाय आनंदीबाईंशी असलेला स्नेह त्यांना गुदमरलेल्या समग्र भारतीय स्त्रीजीवनाचा विचार करायला प्रवृत्त करीत होता. अशी व्यापक भावना विकसित झालेली होती, म्हणून आनंदीबाईंच्या मृत्यूनंतर या सर्व स्नेहीमंडळींनी पंडिता रमाबाईंनाही आपले सहकार्य फार समजुतीने देऊ केले. डॉ. बॉडले यांनी यासाठीच पं. रमाबाईंचे फिलाडेल्फियातील आगमन हे एक 'दुर्दैवातील सुदैव' मानले. रमाबाई ज्या कुचंबलेल्या उच्चवर्णीय भारतीय स्त्रीबद्दल भाषणांतून सतत बोलत होत्या ती आनंदीच्या रूपाने त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेलीच होती.

साहजिकच डॉ. आनंदीबाई दिवंगत झाल्याचे कळल्यानंतर अमेरिकेतील या सर्व परिचितांनी वृत्तपत्रांतून, पुस्तकांतून त्यांच्याबद्दल सविस्तर लिहिले. याच सुमारास (१८८७) पं. रमाबाईंचे 'हाय कास्ट हिंदू वुमन' हे पुस्तक अमेरिकेत प्रसिद्ध झाले. त्याला लिहिलेल्या प्रस्तावनेत डॉ. बॉडलेबाईंनी आनंदीबाईंच्या आगमनापासून निर्गमनापर्यंतची सर्व हकीगत सविस्तर लिहिली असून त्यात केसरी, ज्ञानप्रकाश आदी मराठी वृत्तपत्रांतून आनंदीबाईंच्या अंत्ययात्रेचे जे वर्णन छापून आले होते तेही, पंडिताबाईंकडून इंग्रजीत भाषांतर करवून घेऊन दिलेले आहे. जिच्यावर एवढे प्रेम केले तिच्या जीवनाचे पुढील तपशील सर्व संबंधितांना कळावेत यासाठी!

अमेरिकेच्या साडेतीन वर्षांच्या वास्तव्यात आनंदीबाईंनी एक फार जिव्हाळ्याची मैत्रीण जोडली होती. तिचे नाव होते मिसेस कॅथरीन डाल्. तिने त्यानंतर एका वर्षाच्या आतच 'लाइफ ऑफ डॉ. आनंदीबाई जोशी' हे आनंदीबाईंच्या अनेक हृद्य आठवणी सांगणारे, सुमारे दोनशे पानांचे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकात

डॉ. आनंदीबाई जोशी त्यांच्या जपानी आणि सिरियन सहाध्यायीनी
पदवीदान समारंभाच्या निमित्ताने घेतलेला फोटो. १० आक्टोबर १८८५

कार्पेंटर कुटुंबातील अनेक पत्रांचा, वृत्तपत्रांतील कात्रणांचा जसा तिने उपयोग केलेला आहे, तसाच गोपाळराव-आनंदीबाई यांच्या सहवासातील आपल्या अनुभवांचा, आठवणींचाही केलेला आहे. मिसेस डाल् यांचे पुस्तक वाचताना लक्षात येते की आनंदीबाईंना घडविणाऱ्या आदरणीय गोपाळरावांबद्दल काय लिहावे, कसे लिहावे हा पेच तिलाही सुटलेला नाही! मिसेस डाल्ने जे म्हटले ते सारांशाने असे आहे, "गोपाळरावांच्याबद्दल मी जे लिहिते आहे. ते फार व्यथित मनाने लिहिते आहे. पण हे लिहिल्याखेरीज गत्यंतरच नाही. आनंदीबाईंचे खरेखुरे आयुष्य लिहायचे म्हणजे गोपाळरावांच्या अस्तित्वाने त्यांच्या दैनंदिन आयुष्यात जे पेच निर्माण होत होते तेही लिहायला हवेत...फिलाडेल्फियामध्ये असताना, त्यांच्या सहवासाचा, गप्पागोष्टींचा अनुभव घेताना, सारखा एकच विचार माझ्या डोक्यात चालू असायचा; मी म्हणत असायची...हा गृहस्थ हिचे यापुढील जगणे फार अवघड, फार अवघड, करून ठेवणार आहे. मला एक जुना प्रसंग आठवतो; तेव्हा आनंदीबाई नुकत्याच अमेरिकेत आलेल्या होत्या. एका ठिकाणी अतिशय गोड नम्रतेने समेत बोलताना त्या म्हणाल्या होत्या, 'मला माहीत आहे, अमेरिकेमध्ये आपल्या स्त्रियांशी चांगले वागणारे पुष्कळ नवरे आहेत. ते आपल्या बायकांना खूप सुखही देत असतात. तथापि, या सर्वांच्या तुलनेतही माझा पती मला अधिक चांगला, अधिक श्रेष्ठ आहे असे वाटते...'

ध्येयवादी, स्नेहशील आनंदीबाई पतीशी अशा कृतज्ञ होत्या म्हणून अमेरिकनांना विशेष प्रियही झाल्या होत्या...

पण आनंदीबाईंचे आपल्या यजमानांबद्दलचे हे सुखद उद्गार स्वतः गोपाळरावांनीच आपल्या अमेरिकेतील भाषणांनी, पदोपदीच्या वागण्याबोलण्यांनी सर्वांच्या मनांत इतके संशयास्पद करून टाकले की, डॉ. बॉडले यांच्या सुरात सूर मिसळून मिसेस डाल्नेही आपल्या पुस्तकात नाइलाजाने सुचविले, 'आनंदीबाईंच्या भगीरथ प्रयत्नांचा जो दुर्दैवी शेवट झाला, त्याला जी अनेक कारणे घडली, त्यांत पाश्चात्त्य शिक्षणाशी परिचय होऊनही मुळीच न बदललेले हिंदू पुरुष गोपाळराव हेही एक कारण आहे!'

—अमेरिकेतील सभा-संमेलनांत गोपाळराव अमेरिकन समाजाला त्यांचा पोशाख, शिष्टाचार, रीतीभाती इत्यादी वरवरच्या व परंपरेने चालत आलेल्या साध्यासुध्या गोष्टींबद्दल मोठ्या आवाजात, सतत वाईटसाईट नावे ठेवीत; ख्रिश्चन धर्माबद्दल, मिशनऱ्यांच्या भारतातील कार्याबद्दल, कुत्सितपणे, हलक्या वृत्तीने बोलत आणि आपल्याकडील बालविवाहासारख्या दुष्ट चालीचेही जोरदार समर्थन करीत! स्त्री-शिक्षण या विषयावर गोपाळरावांची भारतातील आणि अमेरिकेतील मते यांमध्ये दोन्ही देशांतील भौगोलिक अंतराइतकेच अंतर पडलेले हे ते! बायकांना लिहिण्या-वाचण्यापलीकडे अधिक काही शिकविल्यास ते कौटुंबिक जीवनास फार घातक आहे

असा, स्वतःच्या बायकोच्या पदवीदान समारंभासाठी आलेल्या या माणसाला नवा शोध लागलेला होता ! एका सभेत गोपाळराव हे सांगत असताना, सरळच एका अमेरिकन वार्ताहराने ' मग तुम्ही स्वतःच्या बायकोला शिकविण्याचा इतका अट्टाहास का केलात ? ' असे विचारले; यावर गोपाळरावांनी फक्त अमेरिकन पद्धतीने एकदम दोन्ही खांदे उडविले ! बस्स, उत्तर संपले ! पुढे एकदा एका सभेत गोपाळराव पाश्चात्त्यांच्या स्तुतिपरच खूप बोलले; तेव्हा या अनपेक्षित वर्षावाने अमेरिकन मंडळी अगदी बुचकळ्यात पडून गेली. मिसेस डालने त्यांना स्पष्टच ' तुमचे खरे मत काय आहे ' म्हणून विचारले; तेव्हा गोपाळराव टोकदारपणे म्हणाले, ' दॅट इज व्हॉट यू वॉंट टू हिअर फ्रॉम मी ! '

मिसेस डालने तिला अशा प्रकारे सतत गोंधळात टाकणाऱ्या गोपाळरावांचे वर्णन घडलेला एक प्रसंग सांगूनच केलेले आहे. एका सभेत मिशनऱ्यांना लाखोली वाहताना गोपाळराव म्हणाले, ' Christians have manufactured all the vices and exported them to countries where simplicity and innocence reigned. ' आणि हा आरोप शाबीत करण्यासाठी त्यांनी उदाहरण दिले आहे ते आनंदीबाईंच्या अमेरिकेतील प्रवासात कोणीतरी तिच्या जेवण्याच्या ताटात मांसाचा तुकडा ठेवून दुष्टपणाने तिने उपाशी राहावे अशी व्यवस्था केल्याचे ! हा प्रसंग सांगून मिसेस डाल् ज्यांच्यामुळेच अमेरिकेत येणे आनंदीबाईंना व गोपाळरावांना शक्य झाले त्या मिशनरी मंडळींची यादी देते आणि प्रश्न विचारते, ' If there had been a spark of nobleness in this Gopal's breast, would he not have known how to tell his truth without repulsing his best friends ? ' पुढे ह्याच व्याख्यानाच्या अखेरीस कोणीतरी हिंदुस्थानात राहिलेल्या मिस्टर डाल्, यांच्याबद्दल गोपाळरावांचा अभिप्राय हाच आहे का ? असा प्रश्न विचारला, तेव्हा एक क्षणभर गांगरलेले गोपाळराव म्हणाले, ' माझा आणि मि. डाल यांचा परिचय नाही. ' दुर्दैवाने पुढे एकाच महिन्याने मि. डाल्च्या निधनाची बातमी हिंदुस्थानातून आली; तेव्हा गोपाळरावांनी मिसेस डाल्ला ते हिंदुस्थानात किती प्रिय होते हे सांगणारे पत्र लिहिले ! कालांतराने त्यांचा व आनंदीबाईंचा ब्रिटिश बोटीवरील परतीचा प्रवास किती त्रासदायक झाला हे कळविताना अमेरिकेतील वास्तव्यात आनंदीबाईंच्या शाकाहारी खाण्यापिण्याची, भारतीय पद्धतीने राहण्याची, अमेरिकन मंडळींनी किती काळजी घेतलेली होती हेही लिहायला कमी केले नाही ! मिसेस डालला पेच पडला आहे.—या गोपाळरावाबद्दल आपण नेमके काय लिहावे ?

विशेष म्हणजे त्या निंदापर व्याख्यानांबद्दल अमेरिकनांकडून गोपाळरावांना मानधनही मिळत होते !

असे वाटू लागते की गोपाळराव यातली कोणतीही गोष्ट अनवधानाने करीत

नव्हते. स्वतःच्या वागणुकीची त्यांना चांगली जाणीव असली पाहिजे.

आनंदीबाई वारल्यानंतर सहा वर्षांनी (१८९२-९३) गोपाळराव परत एकदा इंग्लंडला गेले; आणि जाता जाता बोटीवरूनच 'केसरी'साठी त्यांनी आपल्या समुद्रप्रवासाची काही वर्णने लिहून पाठविली. या प्रवासवर्णनात गोपाळरावांनी वेळोवेळी स्वतःसंबंधी बरेच लिहिले आहे; तेच यापुढे गोपाळरावांची स्वभावरेखा कळवून घ्यावी म्हणून प्रामुख्याने मी आधाराला घेते आहे. त्यांपैकी एका लेखात जिव्हाळ्याची जोडलेली माणसे तोडत जाणाऱ्या आपल्या कृतघ्न स्वभावाबद्दल ते लिहितात— 'माझा स्वभावच असा बनून गेला आहे की जे मजवर उपकार करितात त्यांच्या बोटाचा चावा घेण्यास मी कधीही मागेपुढे पाहात नाही. माझे सर्वांशी वितुष्ट यायचेच. तथापि, हिंदुस्थान सोडले तेव्हा असा मनाचा निर्धार केला होता की, आता म्हणून पुढे कोणाची निंदा करायची नाही आणि कोणाशी भांडायचे नाही. आगबोटीवर मात्र हा नियम चालला...मग एकामागून एक अडचणी येत गेल्या, धर्मासंबंधी वादविवाद सुरू झाला. मग काय विचारता ? माझे हे निंदकाचे तोंड ! ते कधी दमत नाही, त्याला सबुराई नाही, एकदा चालले की चालले...हे तोंड नसते तर बरे झाले असते !'

आपल्या तोंडाचा हा पराक्रम माहीत असल्यामुळेच की काय, दुसऱ्याला अत्यंत अवघड वाटावे अशा रीतीने अमेरिकेत तास न् तास गोपाळराव गप्पही बसून राहात !

आनंदीबाई ज्या वेळी दिवंगत झाल्या, त्या वेळी गोपाळराव वयाच्या चाळिशीला आलेले होते; (जन्म अंदाजे १८४७-४८). पण गोरा रंग, सडपातळ व चपळ अंगकाठी आणि अगदी वेताचीच उंची यांमुळे त्यांचे वय त्या वेळच्या लोकांनाही फारसे जाणवत नव्हते. आजवर वायकोच्या शिक्षणासाठी एकाकीपणे जगलेल्या व स्वभावामुळेही तसेच एकाकी जगावे लागलेल्या गोपाळरावांच्याविषयी, त्या वेळी सर्व सुधारक मंडळींच्या मनात फार सहानुभूती होती. त्यांचे सांत्वन आपण कोणत्या शब्दांत करावे हे न कळून 'केसरीकार' आगरकरांनी त्यांना उद्देशून लिहिले, 'गोपाळराव, आनंदीबाई आमची बहीण, तुमची प्रत्यक्ष धर्मपत्नी ! तुमचे या प्रसंगी कसे समाधान करावे हे आम्हाला सुचत नाही. आम्ही आपल्या वाचकांच्या समाधानासाठी लिहवले तसे दोन शब्द लिहिले. पण त्यांनी तुमच्या शोकास उतार न पडता तो अधिकच वाढणार आहे. वेळाशिवाय तुम्हाला दुसरा सांत्वनकर्ता नाही.' मुंबईच्या वयोवृद्ध मामा परमानंदांनी गोपाळरावांना पत्रात लिहिले, 'ही तुमची केवळ व्यक्तिगत हानी नसून राष्ट्रीय हानी आहे !' त्यांच्या या पत्राला उत्तर देताना पहिल्या दहा दिवसांतच गोपाळरावांनी लिहिले आहे, 'जर राष्ट्र ही हानी विसरू शकेल तर कदाचित मीही विसरू शकेन. फिनिक्स पक्षी जसा राखेतून परत

परत जन्माला येतो तसे तिला पुन्हा जिवंत करता यावे असे मला वारंवार वाटते; असा विचार करणे व्यर्थ आहे हे कळून सुद्धा. हाऊ मॅड इज ह्यूमन लाईफ!'

थकलेल्या, हताश झालेल्या गोपाळरावांची ही अगतिक अवस्था, साहजिकच, फार काळ टिकली नाही. त्यांचा मूळचा कृतिशील पिंड आणि संघर्षाच्या प्रसंगात अधिक जिवंत होणारा स्वभाव, वरचेवर उफाळून येत गेला. आपण पुन्हा तिसरे लग्न (आनंदीबाई द्वितीय पत्नी होत्या.) करावे असे बहुधा गोपाळरावांना वाटलेले नसावे. तथापि यानंतर तीन-चार वर्षांनी 'पुणेवैभव'ने 'सुप्रसिद्ध गोपाळराव जोशी, पं. रमाबाईंशी पुनर्विवाह करणार आहेत' अशी एक बातमी छापली आणि त्याबद्दल संतापलेल्या पंडिताबाईंनी अब्रूनुकसानीची फिर्याद केल्यामुळे पुणेवैभवकारांना सपशेल माफीही मागावी लागली! बातमी पुरविणारी व्यक्ती कोण होती हे अर्थातच कळायला मार्ग नाही. असेही वाटते की केवळ लग्नाचीच नव्हे तर सगळ्या कौटुंबिक आयुष्याचीही मर्यादा यापुढे गोपाळरावांना नकोशी वाटलेली असावी. कारण प्रथमपासूनच ते तसे पूर्णपणे कुटुंबवत्सल म्हणावे असे गृहस्थ नव्हतेही. आनंदीबाईंच्या मृत्यूनंतर पुन्हा विवाह न करता व्यक्तिगत आयुष्याचा परीघ ओलांडून ते केवळ सामाजिक आयुष्यातच सरळ सरळ उतरले; आणि त्यांचे उद्योग कोणते व उपद्व्याप कोणते हे ओळखणे कठीण व्हावे अशी परिस्थिती त्यांनी होऊनच निर्माण केली! यानंतरच्या अशा प्रत्येक प्रसंगी गोपाळरावांच्या नावाच्या उल्लेखापुढे, कंसात, 'डॉ. आनंदीबाई जोशी यांचे पती' हे बिरुद गौरवाने सांगितले जाई! सुधारणेच्या बाबतीत एकदाच प्रत्यक्ष कृतीचे धैर्य दाखवून गोपाळरावांनी आपले खणखणीत नाणे असे वाजवून दाखविले होते की, सुधारकांना त्यांना सोडणे–त्यांना स्वतःला कितीही त्रास झाला तरी–अशक्यच झाले! त्यातच 'राखेतून पुन्हा पुन्हा जन्माला येणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे' जरी–आनंदीबाईंना 'जिवंत करणे गोपाळरावांना शक्य नव्हते तरी त्यांची स्त्रीशिक्षणाविषयीची जिद्द मात्र तशीच पुन्हा पुन्हा जन्माला येत होती. आपल्या घरातील बाल, तरुण, वृद्ध अशा सर्व वयातील सर्व स्त्रियांना इंग्रजी शिकवायचे या ईर्षेने गोपाळरावांना फार काळपर्यंत झपाटलेलेच होते. पुण्याच्या वेताळ पेठेतील पंचहौद मिशनमधील सिस्टर्सकडे काही वर्षे यासाठी गोपाळराव सक्त खेटे घालीत; आणि एक सुशिक्षित कोकणस्थ हिंदू आपल्याकडे येतो–जातो आहे, तो ख्रिस्ती होण्याची शक्यताही आहे हे–ध्यानात घेऊन पंचहौदमधील मंडळी त्यांचे यथोचित आगत–स्वागत करीत! या मिशनमध्ये एकदा, अगदी अंगाची जुडी झालेली घरातील एक वृद्ध स्त्री गोपाळरावांनी बग्गीत घालून, उचलून नेली–आणि तिला इंग्रजी शिकवा असा हट्ट धरला! हे शहाणपण की वेड म्हणावे, या अचंब्याने सिस्टर्स त्यांच्याकडे बघतच राहिल्या! विशेष म्हणजे गोपाळरावांचे असले वागणे आपल्या वार्षिक रिपोर्टात इंग्लंडला

कळवावे इतके त्या सिस्टर्सनाही महत्त्वाचे वाटत होते !

—स्त्रीशिक्षणासाठी गोपाळराव स्वतः वा इतरांकडून जी धडपड करीत गेले ती नंतरच्या काळात गोपाळरावांच्या एका बहिनीने आणि पुतणीने थोडीशी फलद्रूप करून दाखविली. गोपाळरावांच्या बालविधवा बहिनी हुजुरपागेत शिकून, पुढे नर्सिंगचे शिक्षण घेऊन, स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या. कधी फुकट तर कधी कमी पैशात मध्यम परिस्थितीतील स्त्रियांची बाळंतपणे करण्यास सेवासदनतर्फे त्या जात. त्यांच्या सई या मुलीने फर्ग्युसनमध्ये कॉलेजच्या प्रथम वर्षापर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर मगच विवाह केला. सई जोशी या पुतणीवर गोपाळरावांचे स्वतःच्या मुलीप्रमाणे प्रेम असावे. तिने अजिबात लग्न न करता अधिक शिकून अधिक उपयुक्त आयुष्य काढावे असे गोपाळराव तिला सांगत. परंतु तिची नर्स झालेली आई याविरुद्ध मताची असल्याने तिने सईचे लग्न रँगलर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांच्याशी, त्यांची मागणी येताच लावून दिले ! (१९०५) शिकायला उत्तेजन वाटावे म्हणून या सईला गोपाळराव काही वस्तू आणून देत. पैशाच्या अभावी त्या कित्येकदा इतरांकडे मागूनही आणलेल्या असत !

समान दर्जाचे स्त्री-पुरुष एकत्र आल्याखेरीज खरे कुटुंबसुख निर्माण होणार नाही असे तत्त्व बोलून दाखविणारे गोपाळराव, आपल्या पुढील आयुष्यात, समाजात स्त्रीशिक्षणाची होत चाललेली प्रगती पाहून खुशी व्यक्त करताना उंच स्वरात खूप हातवारे करीत म्हणत–'अहो, आता यापुढे मुलांचे शिक्षण बंद ! फक्त मुलींनाच शिकवायचे ! फक्त मुलींनाच !'

स्त्रियांना द्यावयाच्या इंग्रजी शिक्षणाबद्दलचा हा आग्रह जरी जवळजवळ शेवटपर्यंत टिकला, तरी कधी कधी गोपाळरावांना आपण स्वतः इंग्रजी शिकलो याचाही विलक्षण पश्चात्ताप होई ! भारतीयांचे इंग्लंडमधील शिक्षण व इंग्रजी पोषाख याबद्दल तक्रार करीत, 'समुद्रप्रवास' मध्ये शेवटी शेवटी त्यांनी लिहिले आहे—'आता माझे मला वाटते, की मी इंग्रजी शिकलो नसतो तर बरे झाले असते. या इंग्रजीने माझे जन्माचे मातेरे करून टाकले असे मला खास वाटते...मी जरी विलायतेत आलो तरी माझी सर्व ब्रह्मवृंदास अशी विनंती आहे, की त्यांनी आपल्या पोराबाळांस इंग्रजी शिकविण्याच्या नादास लागू नये, त्यापासून काही फायदा आहे असे मला तरी वाटत नाही. त्या विद्येने कोणी मोठा मनुष्य झाला आहे असे माझे पाहण्यात नाही...या विद्येचा परिणाम असा आहे, की आपलेच घर आपल्यावर उठते. आपली ही पुण्यातील विद्येची चांडाळचौकडी (!) आपले नाक कापून दुसऱ्यास अवलक्षण दाखवीत आहे. (या शेवटच्या वाक्यातील संदर्भ उलगडलेला नाही.)

इंग्रजीबाबत दोन विरुद्ध टोकांना जाऊन चिकटू पाहणारी गोपाळरावांची दृष्टी एकदा चित्रशाळेच्या वासूकाका जोश्यांच्या सांगण्यावरून, मुलांच्या शिक्षणाशी थोडा काळच, पण घुटमळलेली होती; परंतु वासूकाकांनी सांगितलेले मुलांचे वसतिगृह

चालविण्याचे काम गोपाळरावांना फारच अळणी वाटले. कसले तरी 'थ्रिल' असल्याशिवाय जगणे खरेखुरे नाही या गोपाळरावांच्या वाटण्याला पर्याय नव्हता! पण आयुष्यात प्रत्येक दिवसाला गोपाळरावांना हवे तसले नवे थ्रिल कुठून असणार? अशा अधल्या मधल्या 'रिकाम्या' क्षणी गोपाळराव फार अस्वस्थ होत. ते जिथे असतील तिथे आतबाहेर येरझारा घालीत समूहात, कुटुंबात कुठे जाऊन शांतपणाने बसणे त्यांना मानवत नव्हते. त्यांचा जीव 'गर्दीत' गुदमरू लागे. मग काहीतरी क्लृप्तीने ते एखाद्या वावटळीला निमंत्रण देत; सतत गावोगावच्या प्रवासातच राहात आणि कुठे काही थोडी गैरसोय झाली, थोडा अन्याय जाणवला, की तो प्रश्न धसाला लावण्यासाठी प्रखर जिद्दीने वृत्तपत्रातून लढायला उभे राहात! मग लोक म्हणत 'गोपाळराव म्हणजे खरे धीट, निःसंग, श्रेष्ठ भांडखोर! कोणीतरी समाजात ही भूमिका घ्यावीच लागते! त्याशिवाय का अन्यायाची दाद लागते?'

स्वतःबद्दलचा हा अभिप्राय गोपाळरावांना बहुधा सुखावत असावा. या पार्श्वभूमीवर साहजिकच गोपाळरावांकडे पाहण्याची समाजाची दृष्टीही काही काळ तरी निश्चित होई! आनंदीबाईंना इतके शिकविणारा माणूस हा खरा कृतिशील सुधारक म्हणायलाच हवा, इतके चोख जगणारा माणूस इतरांना जाब विचारायला सर्वथैव योग्यच म्हटला पाहिजे, त्याच्या विक्षिप्तपणातही काहीतरी शिस्त, काहीतरी नियम असलेच पाहिजेत, इत्यादी मते लोक स्वतःशी पक्की करीत. पण गोपाळरावांबद्दल विचारी माणसांनी घेतलेले असले तर्कशुद्ध निर्णय गोपाळरावांनाच उधळून द्यावेसे वाटत! कुठल्याही चौकटीत बसल्यानंतर (सुधारकी वा सनातनी) जे स्थिरत्व पत्करावे लागते व काहीसे साचेबंद व्हावे लागते, त्याच्याविरुद्ध बंड करणे त्यांना जन्मतः भागच होते! शिवाय आपल्या काळाच्या अगदी आरपार पाहणारी त्यांची भेदक दृष्टी क्वचित त्यांना जे भावी कालाचे चित्र दाखवून जात असे, ते शक्य करून दाखविण्याइतपत जिद्द तर त्यांच्या स्वभावात मुळापासूनच होतीच! माणसाचे आयुष्य सतत चाकोरीबाहेरचे व्हायला याहून अधिक काय लागते?

गोपाळरावांना स्वतःच्या घरात समानधर्मी असे कोणी नव्हते. परंतु नाशिकच्या प्रार्थनासमाजिस्ट गंगाधर नरसिंह ऊर्फ बापूराव केतकरांशी गोपाळरावांचा जो पहिल्या बायकोकडून नातेसंबंध होता तो फार जिव्हाळ्याचा होता. गोपाळरावांचा पहिल्या बायकोपासून झालेला मुलगा कृष्णराव हा केतकरांच्या घरीच लहानाचा मोठा होत होता. साहजिकच आनंदीबाईंच्या मृत्यूनंतर गोपाळराव काही दिवस नाशिकला केतकरांच्याकडे राहावयास गेले. बापूसाहेब केतकरांचे नाव नाशिकमध्ये त्यांच्या सामाजिक कार्याइतकेच उदार व सहनशील वृत्तीसाठीही प्रसिद्ध होते.

गोपाळरावांच्या स्वभावातील अनेक दुर्गुण ओळखूनही आनंदीबाईंना त्यांनी शिकविले हे त्यांचे महत्कार्य मानून बापूसाहेबांनी गोपाळरावांना स्वतःच्या घरी आणले. पण बापूसाहेबांचे वयोवृद्ध वडील परदेशपर्यटनाचे पाप केलेल्या गोपाळरावांना स्वतःच्या पंगतीला जेवायला घेईनात; तेव्हा 'वडील' की 'गोपाळराव' असा पेच त्यांच्यापुढे उभा राहिला. बापूसाहेबांनी आपल्या वडिलांची पुष्कळ समजूत घातली तरी काहीच उपयोग झाला नाही आणि वडील रागावून उपाशीपोटी जे घर सोडून पनवेलीला निघून गेले, ते फिरून लेकाच्या घरी कधीच आले नाहीत! ज्यांच्यासाठी हे तीव्र भांडण बापूसाहेबांना करावे लागले ते गोपाळराव मात्र त्यांच्याच घरात राहून आपल्याच मुलाशी–कृष्णरावाशी–भांडू लागले! गोपाळरावांचा हा मुलगा पुढे १९०८ पर्यंत हयात होता; पण या दोघांचे कधी पटू शकले नाही. प्रथम बापूसाहेब केतकरांनी आणि नंतर त्यांचे चिरंजीव विश्वनाथपंत केतकर यांनीच गोपाळरावांच्या मुलाचा कुटुंबपरिवार बराच काळ सांभाळला. मधले काही दिवस तर गोपाळराव आणि त्यांची विधवा सून व दोन नातवंडे नाशकातच पण दोन वेगवेगळ्या ठिकाणी राहात असत. केतकरांचा आधार संपल्यावर गोपाळरावांच्या सूनबाई काही दिवस आपल्या मूळ गावी संगमनेरला जाऊन राहिल्या. जमिनीच्या उत्पन्नावर त्यांनी कसाबसा चरितार्थ चालविला. गोपाळरावांनी त्यांना साहाय्यही केले नाही तशी स्वतःची झळही लागू दिली नाही.

केतकरांच्या घरी गोपाळराव राहायला गेले तेव्हा आनंदीबाईंचे चरित्र लिहिले गेले पाहिजे, असे वाटून स्वतः केतकरांनीच त्यासाठी पन्नास रुपयांचे बक्षीस जाहीर केले. हे चरित्र गोपाळरावांनी तपासून 'पास' करायचे असेही ठरले होते. १८८८ साली सौ. काशीताई कानिटकर यांनी ते लिहायला घेतले तेव्हा, त्यांना चरित्रसामग्री जमविण्यात मदत करण्यासाठी गोपाळराव त्यांच्या पुणे–नेवासा येथील घरी जात-येत राहिले. पण आपण परदेशपर्यटन करून आलेले असूनही 'मायपोट' असलेली कानिटकर मंडळी आपल्याला अस्पृश्य मानीत नाहीत हे बाहेरच्या सनातनी जगाला आवर्जून सांगून गोपाळरावांनी त्यांच्या घरावरच संकटे आणली! कानिटकरांपेक्षाही सुधारक असलेले नीलकंठराव सहस्रबुद्धे पुण्यात होते. यांच्या घरी गेल्यावर तर गोपाळराव सोवळे नेसल्याखेरीज जेवत नसत! तसे सर्वांत अधिक गोपाळरावांचे जाणे–येणे असे वासूकाका जोशी, विष्णू मोरेश्वर भिडे आणि न्यायमूर्ती रानडे यांच्या घरी. कुठल्याही मोठ्या माणसाच्या मोठेपणाला न बुजता, त्याच्या तक्क्यास तक्क्या लावून बेडरपणे बैठकीवर जाऊन बसायचे हा गोपाळरावांचा नेहमीचा खाक्या होता. जगात असेच वागायचे असते असेही 'तत्त्वज्ञान' म्हणून ते मांडीत.

या काळात पुण्यात (१८९०–१८९१) केवळ सनातनी आणि सुधारक यांचेच वृत्तपत्रीय वाग्युद्ध चालू नव्हते तर कर्ते आणि बोलके सुधारक यांचेही परस्परात

चालू होते. त्यातच अनेकांच्या घरात आश्रयासाठी जाऊन, त्यांच्या घरातील आणि बाहेरील आचरणांचे व्यवस्थित निरीक्षण करून, गोपाळरावांनी पुण्यात चहा-प्रकरणाचा एक जोरदार ॲटमबॉंब उडवून दिला! त्यांचे निरीक्षणसामर्थ्य काक-दृष्टीलाही मागे टाकणारे होते. या प्रकरणाने गोपाळरावांचे डॉ. आनंदीबाईंच्या संदर्भाशिवाय वेगळे असे असलेले स्वतंत्र अस्तित्व केवळ पुणेकरांच्याच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्राच्याही लक्षात राहिले आहे. आपण पेटवून दिलेल्या त्या आगीत सनातनी जिंकोत किंवा कर्ते वा बोलके सुधारक जिंकोत, गोपाळरावांचे स्वतःचे जसे काहीच खर्चणारे नव्हते. शिवाय स्वतः स्त्रीशिक्षणाखेरीज इतर कोणत्याही बाबतीत कसाला न उतरता, सर्व बाबतींत दुसऱ्यांची काटेकोर सत्त्वपरीक्षा पाहण्याचा जन्म-सिद्ध हक्क आपल्याला आहे असे ते पूर्वीपासून मानीत असतच. गोपाळरावांची ही वैशिष्ट्ये ध्यानात आलेल्या व ती स्पष्टपणाने लिहिणाऱ्या काशीताईंनी लिहून झालेले आनंदीबाईंचे चरित्र परस्परच प्रसिद्ध केले की गोपाळरावांच्याकडून तपासून घेतले? दोन्हीही शक्य आहे. कुणास ठाऊक, तटस्थ गोपाळरावांनी स्वतःला स्पष्ट व सूचक-पणाने नावे ठेवणाऱ्या त्यातील बोचक मजकुरालाही मान्यता दिली असेल!

१८९० च्या आक्टोबर महिन्यात गोपाळरावांनी पंचहौदमधील रे. रेव्हिंग्टन यांज-कडून पुण्यातील सेहेचाळीस प्रतिष्ठित व स्वतःला सुधारक म्हणविणाऱ्या व्यक्तींना, एका व्याख्यानासाठी म्हणून बोलाविले. या व्याख्यानाला वृत्तपत्रांतून परस्परांवर प्रखर हल्ले-प्रतिहल्ले करणारे न्यायमूर्ती रानडे आणि लोकमान्य टिळक दोघेही उपस्थित राहिले. व्याख्यानानंतर काहीशा आकस्मिक रीतीने टेबलावर चहा बिस्कुटे आणून ठेवण्यात आली. स्वतः गोपाळरावांनी आणि त्यांच्या एका भावाने या वेळी सर्वांना, म्हणजे आलेल्या बेचाळीसांना चहा दिला. चहा दिसताच आता या 'प्रसंगाला' कसे 'तोंड द्यावे' या विचाराने सर्व मंडळींचे जे आविर्भाव सुरू झाले ते एका खांबाशी उभे राहून गोपाळराव निरखीत बसले. आपण चहा न घेणे शिष्टाचाराला सोडून होईल, सुधारणेचे नैतिक धैर्य आपल्यामध्ये नाही असे स्पष्ट दाखविणारे ठरेल आणि तो घ्यावा तर बाटल्याचा आरोप येईल, तेव्हा या सर्व पेचातून, ऐनवेळी मार्ग कसा काढायचा हे न कळून, आलेले बेचाळीसजण वेगवेगळ्या प्रकारे वागले. काहींनी चहाच्या कपाला नुसता हात लावला, काहींनी इतरांची नजर चुकवून कप टेबला-खाली सारले; काहींनी आपण चहा घेतच नाही असे सांगून स्वतःची सुटका करून घेतली; तर काहीजण चक्क बिस्कुटांसह चहा प्याले! आलेल्या चारदोन बायकांनी मात्र चहा न घेऊन आपला 'धर्म' सांभाळला!

दुसऱ्या दिवशी 'पुणेवैभवा'त गोपाळरावांनी सविस्तर वर्णनासह, नकाशासह सर्व यादी प्रसिद्ध करून टाकली. यानंतर पुण्यात जे ग्रामण्य प्रकरण रंगले ते गोपाळरावांच्या अपेक्षेपेक्षाही अधिक 'बहारदार' झाले. या चहामुळे दोन अब्रू



गोपाळराव जोशी

श्री. व सौ. बी. एफ्. कार्पेंटर

नुकसानीच्या फिर्यादी 'पुणेवैभवा'वर न्यायालयात गुदरल्या गेल्या, शंकराचार्यांच्या धार्मिक निवाड्यासाठी दोन अभियोग झाले; बहिष्काराच्या व प्रायश्चित्ताच्या अनुभवातून रानडे–टिळकांसारख्या थोर मंडळींना तावून सुलाखून निघावे लागले; पाचपन्नास घरांतील विवाह, श्राद्धपक्षे आदी कौटुंबिक धार्मिक कामे आणि कार्ये घरोघरी अंतर्गत कलह निर्माण होऊन, क्लेशदायक रीतीने कशीबशी शेवटाला गेली आणि दर दिवशी या विषयी मजकूर छापता छापता वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरभरून गेले !

— इतके झाले तरी त्या दोन वर्षांत गोपाळरावांना साक्षीसाठी कुठल्याच कोर्टात कोणीही बोलाविले नाही. एकदा चहाचे कप हातात दिल्यानंतर आपण उडवून दिलेली ही छोटीशी वावटळ कशी जोरदार वादळात रूपांतरित झाली आहे हे पाहात, पुराणातील कळलाव्या फिल्मी नारदाप्रमाणे, गोपाळराव मजेत हसत बसले ! 'सुधारकांनी एकाच्या ठिकाणी जोरदार दहा चहा-पार्ट्या घडवून आणल्या असत्या म्हणजे सनातनी भिक्षुक बरोबर जेरीला आले असते' हे त्यांचे साधे म्हणणे मात्र कोणीच सुधारकांनी मनावर घेतले नाही. समाजाचे बळ असेच चिरडावे लागते तेव्हा तो वठणीवर येतो असा गोपाळरावांचा पूर्वीचा अनुभव होता. स्वतःची कैफियत मांडताना 'समुद्रप्रवासा'त गोपाळरावांनी म्हटले आहे, 'मी हाताश झालो नाही. दारोदार गेलो नाही. या चार-पाच वर्षांत माझा कधी कोणी अपमान केला नाही. मला कोणत्याही प्रकारे दुःख दिले नाही. ज्यास सुधारक ही संज्ञा पोहोचत आहे ते माझे पाठिंबे आहेत...उद्या जर मी मेलो तर तेच मला उचलायला येतील. माझ्या अंगावर सुवर्ण कांचन असल्यास ते मात्र ओरबाडून नेण्यास भटभिक्षुक जमतील...माझ्या पोरास (सुधारकांना) मी मारीन. दुसरे कोण मारणार ? खबरदार, तुम्ही माझ्या मुलाला हात लावाल तर ! ... परंतु मीच निमकहराम, यास त्यांनी काय करावे ? मी त्यांचे तोंडास काळोखी आणण्यासारखे कृत्य करीत आहे असे त्यांस वाटते. तथापि ते थोर आहेत. माझा अव्हेर कदापि करणार नाहीत. विद्येच्या वजनाखाली ते फार चेपून गेले आहेत. भिडस्तपणा फार वाढला आहे. ते म्हणतात, बोलल्याप्रमाणे करण्याचा काळ आला नाही, मी म्हणतो आला, इतकाच काय तो फरक ! मी त्यास बाहेर ओढू पाहात आहे आणि ते माझ्या हाताला हिसका मारून पळतात हा काय तो तंटा ! ...एकदा कोचीन येथे गेलो व प्रवासाची चर्चा चालली असता हाँगकाँगचे वर्णन निघाले. यात असा प्रसंग होता, की जेवायची कोठे सोय नव्हती. मी मांस–मच्छर खात नसे. मला भात-वरण द्या म्हणजे झाले, असे एका पार्श्वपाशी मागत असता ते देखील मिळेना. वरणात आम्ही कोंबडी शिजवतो असे तो म्हणाला. आता काय करावे ! 'तू कोंबडी काढून घे आणि मला खालचे वरण दे' असे म्हणावे लागले. हे बोलणे ऐकून कोचीनच्या ब्राह्मणास मोठे आश्चर्य वाटले. त्यांनी माझे त्यांच्याबरोबरचे जेवण बंद केले. खरे बोलण्यामुळे असे प्रसंग

येतात; त्यास उपाय नाही...म्हणत असाल तर हे सर्व खोटे आहे असे सांगून भुईमुगाच्या दाण्यांवर मी पृथ्वीपर्यटण केले, कोणाच्या हातचे खाल्ले नाही असे म्हणतो. यात तुमचा धर्म राहात असला तर राखून घ्या... हे प्रकरण असेच दवायचे, मेलो तर मी बरीक मरेन! करा बाबांनो फिर्याद! मला काय तुरुंगच दाखवणार कनी? जाईन बिचारा त्यात. कोठे तरी शेवटचे दिवस घालवायचे. मग तुरुंग काय आणि गंगातटाक काय? मजवर सध्या रागवा, मग परिणामी मी बरे केले असे तुम्हांस कबूल करावे लागेल... आप, तेज, वायू हे शुद्ध आहेत हे खरे नसेल तर मग विसरा सर्व गुणांस!'

बाप दाखव नाही तर श्राद्ध कर असे दुसऱ्यांकडून अपेक्षिणारा हा गोपाळरावी खाक्या जसा तत्कालीन सुधारकांना न पेलणारा होता तसा स्वतः गोपाळरावांनाही पेलणारा नव्हता. ते संध्या करीत, देवपूजा करीत, लहरीनुसार सोवळे-ओवळे पाळीत; जातिभेद नसावेत असे म्हणताना स्वतः ते मोडण्यासाठी काही करीतही नसत. ते जेव्हा जसे करावे, वा न करावे असे वाटे ते ते सर्व करीत. कोणत्याही बाबतीत आपला काही पक्का विचार झाला आहे आणि त्यानुसार वागणे आपल्याला बंधनकारक आहे अशी स्वतःची प्रतिमाच त्यांनी कधी तयार होऊ दिलेली नाही! प्रत्येक वेळी स्वतःच्या सनातनी वा सुधारकी वाटणाऱ्या कृतीमागे एखादे गंभीर किंवा बाष्कळ कारण उभे केले की त्यांची सुटकाही होऊन जाई!

'मी जे जे करतो ते चोरून करीत नाही, उघड उघड करतो' असे सांगण्यात गोपाळरावांचे धाडस किती आणि बेजबाबदारपणा किती हे ठरविणेही कठीण आहे!

ह्याच काळात पं. रमाबाईंनी आपल्या शारदासदनातील विद्यार्थिनींना आपापल्या धर्माप्रमाणे सगळे आचार व्यक्तिगत रीतीने करावयास परवानगी ठेवली होती; आणि स्वतःचा मुख्य भर ठेवला होता तो मुलींना द्यावयाच्या व्यावहारिक उपयुक्त शिक्षणावर. एक दिवस गोपाळरावांनी रमाबाई कुठेतरी गावाला गेल्याची वेळ साधून तिथे तुळशीची झाडे नेऊन लावली व ती नंतर रमाबाईंनी सदनातील विहिरीजवळ नेऊन ठेवताच 'त्यांनी ती उपटून बाहेर फेकून दिली' अशी बातमी त्यांच्या नेहमीच्या 'पुणेवैभवात' छापून आणली. आधीच रमाबाईंच्या ख्रिश्चनधर्मस्वीकारामुळे त्या हिंदू समाजाच्या नजरेत संशयाचा विषय होत्याच; त्यात गोपाळरावांच्या या साध्या दिसणाऱ्या युक्तीने आगीत तेल ओतावे अशी धगधगीत भर पडली. हिंदू एतद्देशीयांना आणि निधर्मी शिक्षणाची अट घालून पैसे देणाऱ्या अमेरिकनांना–दोघांनाही–स्पष्टीकरणे देता देता स्वतः रमाबाई तर टेकीस आल्याच पण त्यांचा नुकताच सुरू झालेला निधर्मी शिक्षणसंस्थेचा प्रयोगही पुरता नेस्तनाबूत होऊन गेला. रमाबाईंची शिक्षणसंस्था यानंतर काही काळाने उघड उघड ख्रिश्चन धर्मप्रसाराकडे वळल्याने गोपाळरावांची ही कृती रमाबाईंचे 'ढोंग' उघडकीला आणणारी, मोठ्या धोरणी वृत्तीची निदर्शक म्हणून फारच महत्त्वाची ठरली! या निमित्ताने टिळकपक्षीयांना

त्यांची उपयुक्तता व रमाबाईंना त्यांची तापदायक होण्याची शक्ती चांगलीच उमजून आली !

कोणत्याही बैचारिक कोलांट्या उड्या घेणे किंवा वाटेल तेवढे विध्वंसक वागल्यानंतर लीनतेने क्षमा मागून किंवा नाक घासून मोकळे होणे, गोपाळरावांना केव्हाही शक्य असायचे; पण वावटळीत सापडणाऱ्या, काही विधायक घडवू पाहणाऱ्या सुधारकांची गोष्ट वेगळी असायची. अज्ञानी, रूढिग्रस्त समाजाला सुधारणेच्या दिशेने आपल्याला तयार करायचे आहे ही जबाबदारी मानणारी ती माणसे समाजाच्या अनुनयाचा मार्ग सर्वस्वी सोडून चालणार नाही हे तर मानीतच, शिवाय कोणत्याही कृतीने सुधारकांच्या चारित्र्याविषयी, गंभीर भूमिकेविषयी संशय निर्माण होणेही त्यांना घातक वाटत राही. नवे सुधारक म्हणजे खाण्यापिण्याचा विधिनिषेध नसलेले लोक अशी उथळ प्रतिमा लोकांसमोर उभी राहिली, तर सुधारणेच्या कार्याचे नुकसानच होईल हेही त्यांनी गृहीत धरलेले होते; खिस्ती माणसाच्या हातचे चहापाणी घेतल्याने जसा हिंदू मनुष्य खिस्ती होत नाही, तसाच हिंदूंच्या अवनतीच्या खऱ्याखुऱ्या कारणांचा बरोबर चहा घेऊन निरासही होत नाही; म्हणून आपली सुधारणानिष्ठा केव्हा कशी दाखवायची हे त्यांना तारतम्यानेच ठरवावे लागे. गोपाळरावांना हे तारतम्य म्हणजे ढोंग व दुबळेपणा वाटे. या ढोंगाला उघड्यावर आणण्यात आपण पुरुषार्थ केला असाही अहंभाव वाटे. त्यामुळे पोशाखापासून परब्रह्मापर्यंतच्या प्रत्येक कल्पनेतील विसंगती शोधत, हेरत राहण्याचा एक छंदही त्यांना जडलेला होता. त्यांचे समकालीन त्यांच्या या विशेषाला जन्मजात कुत्सितपणा असे म्हणत !

शेवटी ह्या चहा प्रकरणातील 'बेचाळिसां'पैकी काहींनी गंभीरपणे तर काहींनी लोकभावनेला मान देण्यासाठी प्रायश्चित्ते घेतली; काहींनी प्रायश्चित्ते फर्माविणारे शंकराचार्यांचे न्यायालयच अमान्य केले; तर काहींनी ब्राह्मणांना दंड दिला, मिश्या छाटल्या, पण क्षौर मात्र होऊ दिले नाही !

इतका त्रास झाला तरी तेव्हा आणि नंतरही बराच काळ गोपाळरावांनी 'तथाकथित' सुधारकांचे दुहेरी जीवन चांगले उघड्यावर आणले असे सर्वसामान्य समाजाकडून मानले गेले. आणि त्यांच्या नजरेत या नाट्यातील ते ध्येयवादी नायकही ठरले. तथापि, यानंतर थोड्याच दिवसांत स्वतः गोपाळराव मात्र आपले गंध, आपले जानवे, आपली शेंडी हे आपल्या अस्मितेचे आविष्कार आहेत असे म्हणतच, त्याच पंचहौदच्या मनोऱ्याकडे, धर्मांतरासाठी आपण होऊन चालत गेले ! साहजिकच त्यांना नायक मानणारांची आणि गोपाळरावांच्या प्रत्येक कृतीत 'तत्त्व' पाहणाणाऱ्यांची काही काळ थोडीशी पंचाईतच झाली !

धड ना विनोदी, धड ना गंभीर असे हे चहा–ग्रामण्य प्रकरण ऐन रंगात आलेले असतानाच गोपाळरावांनी पुण्यातील मध्यवर्ती वस्तीत एका सहा महिन्यांच्या

गाढवाचे दोन महिन्यांच्या गाढवीशी साग्रसंगीत लग्न लावून वेगळीच मजा उडवून दिली (१८९०). या विवाहाच्या काढलेल्या निमंत्रण पत्रिकेत गोपाळरावांनी लिहिले होते, 'वासुदेव गणेश जोशी यांजकडील गाढव व गोपाळ विनायक जोशी यांजकडील गाढवी यांचा गोरज मुहूर्तावर शुक्रवार दि. १८ १२·१८९० रोजी विवाह होणार आहे. त्यास सहकुटुंब सहपरिवार येऊन कार्यसिद्धी करावी.' या लग्न-चिठ्ठीवर दोन्ही बाजूंस दोन गाढवांचे मुखवटे काढलेले होते. आपली मुलीकडची बाजू आहे हे ओळखून ताशे, बाशिंगे इत्यादींसाठी गोपाळरावांनी काही खर्चही केलेला होता! लग्नाला वऱ्हाडी हवेत, म्हणून कुंभाराकडील आणखी काही गाढवेही भाड्याने आणण्यात आली होती. फक्त वरातीचा परवाना न मिळाल्यामुळे ती तेवढी काढता आली नाही, त्यामुळे 'इतर' वऱ्हाडी मंडळींचा थोडासा विरस झाला!

हा कुचेष्टेचा प्रकार गोपाळरावांनी केला ह्याला कारण, एका सुधारक वरपित्याने द्रव्यलोभाने आपल्या मुलास अगदीच लहान मुलगी करून घेतलेली होती, असे काही होते असे म्हणतात. गाढव-गाढवीचे लग्न झाल्यावर जशी ताशेबाजंत्री कडाडली तशीच कितीतरी काळ गोपाळरावांच्या नावाचीही बाजंत्री कडाडत राहिली. काहींच्या म्हणण्यानुसार हे एका जरठबाला विवाहाचेही विडंबन होते. वास्तविक गोपाळरावांना त्या वरातीमागून आपल्या गोजिरवाण्या वधूवरांचीही वरात काढायची होती. एवढे खरे, की एका गंमतीदार पद्धतीने सुधारणेला आवाहन करणारे आणि कोणालाच फारशी दुखापत न करणारे हे तसे निरागस गोपाळरावी प्रकरण असल्याने सुधारक लोकांना त्यावद्दल थोडे बरेच वाटले. प्रत्यक्ष रमाबाईसाहेब रानडे यांनीच गोपाळरावांचे खाजगी रीतीने, त्यासाठी अभिनंदन केले होते! गोपाळरावांच्या व्यक्तित्वात दडून असणारा एक कसबी विदूषकच या वेळी प्रगटला असे म्हणायला हवे!

संमतिवयाच्या बिलासंबंधाचे जाहीर वादविवाद अटीतटीने लढले जात असताना गोपाळरावांच्या तडाख्यात त्यांचे 'स्वपक्षीय' खुद्द गोपाळ गणेश आगरकरच सापडले! आगरकरांवर नैतिक दृष्ट्या घाणेरडे आरोप करणारे एक पत्र गोपाळराव जोश्यांच्या सहीने ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध झाले. मग आगरकरांनीही स्वतःची भूमिका नेहमीच्या सरळमार्गीपणाने जाहीर रीतीने स्पष्ट केली. ते पत्र वाचताना गोपाळरावांचा भ्रम दूर झाला आणि त्यांनी माफीचे पत्र ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध केले (४ मे १८९१). आगरकरांनी पत्राची एक प्रत गोपाळरावांना घरीही पाठविली होती. त्याबाबत आपल्या माफीपत्रात गोपाळराव लिहितात—

'प्रोफेसर आगरकर यांस खाजगी दोषारोपाचे पत्र पाठविले-त्या दिवशी रात्री एकटाच बसलो असता माझे मन मला खाऊ लागले. दुसऱ्या दिवशी ऐन दोन प्रहरी उन्हाच्या तापाने ग्रस्त असा घरी आलो. खिडकीत एक पत्र पडलेले; त्यावर आगरकरांचे नाव असल्यामुळे आपल्या पत्रास उत्तर असणार म्हणून उघडून

वाचण्याची छाती होईना. हे शब्द वाचले तर जेवण जायचे नाही म्हणून भोजनोत्तर निवांतपणी पत्र वाचायला सुरुवात केली. काय सांगू, आदीपासून तो इतिपर्यंत एकही रागाचा किंवा मर्मभेदाचा शब्द वाचण्यात आला नाही. उलटे हे उत्तर इतके शांततेचे व समर्पक होते की, आगरकर जर असते तर मी त्यांच्या पायावर जाऊन डोकीच ठेवली असती. अशा पुरुषावर दोषारोप करणे म्हणजे पदरी पूर्वजन्माचे महत्पाप असले पाहिजे. त्यावाचून मनुष्याला अशी इच्छा होणे नाही.'

'चहा' आणि 'विवाह' या दोन प्रकरणांतून पुण्याच्या गंभीर सामाजिक वातावरणात गोपाळरावांनी जे 'चैतन्य' निर्माण केले ते त्यांचे त्यांनाच थोडेसे 'चढले' असावे. यानंतर लगेचच आपण होऊन गोपाळराव एका अनावर घोड्यावर आरूढ झाले आणि त्यांनी स्वतःची अगदीच विचित्र अवस्था करून घेतली. पहिल्या दोन्ही वेळी गोपाळरावांची जी क्रीडा होती तिने इतरांच्या जिवाशी खेळ केला. आता धर्मांतराचा जो खेळ ते खेळले तो काही काळ असा त्यांच्याच अंगाशी आला की, गोपाळरावांचे आयुष्य पार उलटेपालटे होऊन जायची वेळ आली. पूर्वी गोपाळराव दुसऱ्याला सावज करीत होते आता तेच त्यांचे स्वतःचे सावज झाले! अर्थात त्यांना हवे होते तसे भरपूर 'थ्रिल' निर्माण झाले!

पुण्यात गोपाळराव जसे पंचहौदमध्ये जात तसेच पंचहौदमधील मिशनरीही गावातील सुधारकांच्याकडे जात-येत. काही सार्वजनिक ठिकाणी त्यांची ख्रिस्ती धर्म-प्रसारासाठी व्याख्याने होत; त्याप्रमाणे कित्येक गरीब, गरजू मंडळी पोटासाठी व सुधारक-सुशिक्षित मंडळी ख्रिस्ताचे, ख्रिस्ती धर्मीयांच्या करुणेचे, सेवावृत्तीचे आकर्षण वाटून ख्रिस्ती होत. या धर्मांतराच्या प्रसंगी अंगावर पाणी शिंपडले जाई व बायबलच्या काही भागाचे वाचन होई. गोपाळरावांना प्रश्न पडे, की जन्माने लाभलेला विशिष्ट धर्म असल्या सामान्य विधीने कसा बदलतो? धर्मांतर केलेली व्यक्ती स्वसमाजाला, अगदी पार जन्मांतर व्हावे अशी पारखी कशी होऊन जाते? याबाबत बंडखोरी करावी म्हणून गोपाळरावांनी बाप्तिस्मा घेऊन पुन्हा स्वसमाजात येऊन राहायचे असे ठरविले. गोपाळरावांच्या मित्रांना विस्तवाशी चाललेला त्यांचा हा खेळ त्यांच्या अंगावर शेकेल अशी भीती वाटली, आणि त्यांनी त्यांना वाचविण्यासाठी पंचहौदमध्ये जाऊन सांगितले, की गोपाळरावांचा हिंदू धर्मावर पूर्ण विश्वास आहे, तुम्ही त्यांना बाप्तिस्मा देऊ नका, ते तुमच्यात राहणार नाहीत...यावर फादरने बाप्तिस्मा देणार नाही असे कबूल केले परंतु गोपाळरावांना ही मित्रवार्ता कळताच त्यांनी गावातील दुसऱ्या मिशनकडून बाप्तिस्मा घेण्याची व्यवस्था करून घेतली व ते दुसऱ्या दिवशी मुळा-मुठेच्या संगमावर हजरही झाले (१८९१). अर्थात पंचहौदचे

फादरही समारंभास हजर होते !

गोपाळरावांचे धर्मांतराचे कृत्य वाजवीपेक्षा अधिक गंभीरपणाने घ्यावे असे लोकांना वाटावे याला अनेक कारणे होती. मराठा, पुणेवैभव, ज्ञानोदय इत्यादी वृत्तपत्रांतून धर्मांतर या विषयावर इंग्रजी–मराठीतून गोपाळराव यापूर्वी आणि नंतरही खूप लिहीत गेले आहेत. एका पत्रात त्यांनी पुणेवैभवात लिहिले आहे (१८८९) 'माझे लोक दिवसेंदिवस अधर्मी होत चालले आहेत. मला माझे धर्माप्रमाणे वागता येत नाही व वागण्याची माझी इच्छा नाही व असली तरी माझी धर्मावर श्रद्धा नाही. कारण हिंदू धर्म म्हणजे काय हे मला समजत नाही व समजविणारा मला कोणी भेटत नाही. याकरिता मी खिस्ती होण्याचे पूर्वी जर कोणी हिंदू धर्माची तत्त्वे सांगेल तर बरे होईल. हिंदुधर्मात चार जाती आहेत. त्या मला मान्य नाहीत. मनुष्य सर्व एक. घरी पाहिजे तर उंचनीचपणा दाखवा; परंतु ईश्वराचे देवळात ब्राह्मणाने जावे आणि महारांनी जाऊ नये असा प्रतिबंध ज्या धर्मात असेल तो ईश्वरीधर्म मी समजत नाही. खिस्ती धर्मात पापक्षालनाची योजना फार सुंदर आहे. रागावू नये व उगाच काहीतरी हशा उत्पन्न करणारे उत्तर देऊ नये.'

या पत्रातील हिंदू धर्मावरील आक्षेप व खिस्ती धर्माचे सांगितलेले श्रेष्ठत्व त्या काळी पुन्हा पुन्हा उल्लेखिले गेलेले असल्याने लोकांनी गोपाळरावांचे म्हणणे मूलभूत व महत्त्वाचे मानले.

प्रत्यक्ष धर्मांतराच्या वेळी संगमाच्या काठावर उभे राहून गोपाळरावांनी एक छोटेसे भाषण केले. त्याचा सारांश असा होता 'मी खिस्ती होणार असा आज बरेच दिवस पुकारा आहे, परंतु इतके दिवस त्या गोष्टीस लागण्यास पाद्रीमंडळींत व माझ्यात काही गोष्टींविषयी मतभेद होता हे कारण होय. गंध लावणे हे मूर्तिपूजेचे लक्षण आहे असे पाद्री लोक मानतात व मी म्हणतो, की ते मूर्तिपूजेचे लक्षण नाही. परंतु हिंदुत्वाचे दर्शक आहे इतकेच काय ते. गंध लावण्यात मला काही दोष दिसत नाही.....तर मी या वेळी गंध पुसून टाकतो. जानवे हे मूर्तिपूजेचे लक्षण आहे असे पाद्री लोक मानतात, पण मी तसे मानीत नाही.....जानव्याचे जे तीन पदर असतात ते पिता, पुत्र व पवित्र आत्मा या खिस्ती धर्मातील त्रयीचे दर्शक होत; व तीन पदरांस मारलेली गाठ ही ईश्वराच्या ठिकाणी मानावी असे मला वाटते. जानवे घालण्यास काही हरकत नाही; परंतु पाद्री मंडळींची समजूत माझ्यासारखी होत नाही, म्हणून या वेळी मी आपले जानवे काढून एका मित्रापाशी दिले आहे.'

गोपाळरावांच्या या 'गंभीर' भाषणानंतर रेव्ह. टेलर यांनी धर्म-पुस्तक वाचले आणि एक पंचा नेसून नदीत स्नानाला उतरलेल्या गोपाळरावांच्या डोक्यावर हात ठेवला. गोपाळरावांनी शेंडी काढली नव्हती तरी रेव्ह. टेलरने त्यांच्या त्या 'तशा' मस्तकावर हात ठेवून काही धर्मवाक्ये उच्चारली ! मग टोपी वगैरे पोशाख करून

गोपाळराव इतर पाद्र्यांबरोबर बग्गीत बसून संगमावरून निघाले.

या समारंभाला नेटिव्ह ख्रिस्ती जसे हजर होते तसे गोपाळरावांचे अनेक हिंदू मित्रही हजर होते. धर्मांतर केल्यावर पाद्र्यांबरोबर न जाता गोपाळरावांनी त्यांच्याबरोबर स्वतःच्या घरीच यायचे असे ठरलेले होते; परंतु ऐनवेळी गोपाळराव थोडेसे गडबडले आणि ख्रिस्ती मंडळीबरोबरच बग्गीत बसून गेले. थोडे अंतर गेल्यावर आपली चूक गोपाळरावांच्या ध्यानात आली आणि म्युनिसिपालिटीच्या इमारतीजवळ येताच ते उतरून घरी गेले. तथापि, गोपाळरावांच्या या वागण्याने चिडलेल्या वासूकाका जोशी आदी मित्रमंडळींनी आणि अनेक अग्रगण्य सुधारकांनी विरोधी सामाजिक प्रतिक्रियेच्या भयाने, गोपाळरावांना त्या दिवशी व पुढेही काही काळ स्वतःच्या घरात प्रवेश दिला नाही. सुधारकांचा आधार तुटतो आहे हे लक्षात येताच, काय करावे या पेचात सापडलेल्या गोपाळरावांनी चक्क उपवासच आरंभला! फळफळावळ व दूध ह्यांवर ते उदरनिर्वाह करू लागले. गंध-जानवे तर लगेचच त्यांनी अंगावर चढविले होते. अगदी चाळीस दिवस कडक उपास केल्यावर गोपाळरावांनी ॐकारेश्वरावर जाऊन क्षौरविधी केला, ब्राह्मधर्माप्रमाणे संध्यावंदनादी प्रकार केले आणि आपल्या काही हिंदू-मित्रांना पंगतीला घेऊन चाळीस दिवसांच्या उपवासाचे पारणे फेडून ते परत एकदा हिंदू झाले! त्या वेळच्या वृत्तपत्रात या माहितीनंतर एक वाक्य आलेले आहे 'आता एकदोन दिवसांनंतर ते तीर्थाटणास निघणार आहेत!'

गोपाळराव लगेच तीर्थाटणाला गेले की नाही ते माहीत नाही. ते पूर्वीही तीर्थयात्रेला गेले तरी धार्मिक वृत्तीने जात नव्हते. 'केल्याने देशाटन मनुजा चातुर्य येतसे फार' या दृष्टीने आणि एके ठिकाणी चैन न पडण्याच्या अस्थिर स्वभावामुळेही जात. ते काही दिवसांनी मद्रासकडे गेले. मद्रासमध्ये त्यांनी एक चित्रे विकण्याचे दुकान वासूकाका जोश्यांच्या प्रेरणेने काढले होते असे म्हणतात जशी स्त्रीशिक्षणाची तशीच व्यापारात पडण्याचीही ऊर्मी फार पूर्वीपासून गोपाळरावांना अनेक वेळा आलेली होती. अगदी लहान वयापासून ते पोस्टात नोकरी करीत असल्याने पोस्टाचा उपयोग त्या काळच्या इतर अनेकांपेक्षा गोपाळराव अधिक सुबलक रीतीने करीत! दक्षिणेतील अनेक मान्यवर मंडळींशी उत्तम फड्र्या इंग्रजीत सामाजिक सुधारणा व धार्मिक प्रश्न यावर ते भरपूर पत्रव्यवहार करीत असत. यामुळे परप्रांतात गोपाळरावांची प्रतिमा विशेषच मोठी होती. तरीही त्यांचे चित्रांचे दुकान काही मद्रासमध्ये नीट चालले नाही!

गोपाळरावांचे हे धर्मांतर-नाट्य व्यक्तिगत संदर्भात त्यांना स्वतःला फार महागात पडले. सर्व आप्तेष्टांची घरे काही काळ बंद झाल्याने चरितार्थाचाच प्रश्न आला आणि ख्रिश्चनाचे परत हिंदू झाल्यामुळे पाद्रीमंडळीकडील गोपाळरावांचे वजनही पार संपुष्टात

आले. तथापि मी हिंदू आणि ख्रिश्चन दोन्हीही राहू शकतो हा गोपाळरावांचा दावा त्या वेळच्या आणि नंतरच्याही काही विचारवंतांनी थोडा गंभीरपणानेही घेतलेला आहे. त्या वेळच्या हिंदुसभेच्या अध्यक्षांनी (मद्रासकडील सभा) ' चातुर्वण्यव्यवस्थेबाहेरील पाचव्या वर्णाचे अनुयायी म्हणून तुम्ही हिंदू राहू शकता.' असे गोपाळरावांना कळविले तर नंतरच्या पिढीतील श्री. ग. वि. केतकर यांनी गोपाळरावांचे विचार आणि कृती भारतीय ख्रिस्ती मंडळींच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने फार गंभीरपणाने विचारात घेण्यासारख्या आहेत असे म्हटले. ख्रिस्त आणि ख्रिस्तीधर्म स्वीकारूनही हिंदू हा हिंदू राहू शकतो या मताचे गोपाळराव हे आद्यप्रवर्तक आहेत असेही केतकरांनी म्हटले आहे.

या ' प्रसंगा 'नंतरच गोपाळराव एका वर्षाच्या आतच मद्रासमधील व्यवहार आटोपून व्यापारी बनून विलायतेला जायला निघाले (१८९२). आता त्यांन चरितार्थासाठी पैसा मिळविणे जसे आवश्यक होते तसेच पूर्वीसारखे एक वेगळे साहसही करून दाखविणे भाग वाटत होते. तरुण भारतीयांना व्यापारात, शिक्षणात, व्यवसायात तयार करायचे हे ' मिशन ' या वेळी गोपाळरावांनी डोळ्यांपुढे ठेवले होते. पोशाखापासून अंतरंगापर्यंत पूर्णपणे हिंदू राहून उत्तम व्यापारी होण्याचा वस्तुपाठ इतरांना आपण घालून द्यायचा असा त्यांचा बेत होता. धर्मांतर प्रकरणाने, गोपाळरावांबाबत ते एक अत्यंत अविश्वासार्ह, अप्रामाणिक आणि सहानुभूती दाखविण्यास अपात्र गृहस्थ आहेत असा जो सर्वांचा समज झालेला होता तो असे काही केल्याखेरीज धुतलाही जाणार नव्हता. तेव्हा एका मोठ्या पेटाऱ्यात हिंदुस्थानातील कलाकुसरीच्या काही वस्तू घेऊन ते व्यापारासाठी निघाले. त्या वस्तूंचे पैसे त्या विकल्या गेल्यानंतर द्यावयाचे होते. गोपाळरावांजवळ तिकीट काढल्यानंतर उरले होते फक्त चाळीस रुपये !

गोपाळराव बोटीवर चढले तेव्हा आपले हे साहस सर्व बाजूंनी यशस्वी झाले पाहिजे या इराद्याने त्यांनी मनाशी काही नियम ठरविले होते. या नियमांपैकी पहिला नियम होता, कोणत्याही गोष्टीबद्दल तक्रार करायची नाही, भांडायचे नाही. इंग्रज माणसाचे गुण तेवढे घ्यायचे, दोषांकडे डोळेझाक करायची... हा नियम तक्रारखोर गोपाळरावांनी पहिले काही दिवस व्यवस्थित रीतीने पाळला तेव्हा त्यांचे त्यांनाच स्वतःबद्दल थोडे आश्चर्यही वाटले ! लंडनमध्ये उतरल्यानंतर ज्या मोठ्या लोकांच्या गाठीभेटी गोपाळराव घेणार होते त्यांत सर वुइल्यम वेडरबर्न, मार्टिन वुड, डॉ. भाभा आदी नामवंत माणसे होती. मुंबईच्या मामा परमानंदांनी स्नेहपूर्ण वृत्तीने त्यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध राखून जी पुण्याई जोडलेली होती तीही गोपाळरावांच्या मदतीला होती. परंतु ' स्वभावो दुरतिक्रमः ' हेच सत्य प्रत्ययाला आले ! सर वेडरबर्नने भारतीय कलाकुसरीच्या वस्तूंची अमेरिकेप्रमाणे इंग्लंडमध्ये

अधिक विक्री होणे कसे कठीण आहे हे समजावून सांगताच भारतीय व्यापाराला उत्तेजन न देणाऱ्या इंग्रजांचाच तो प्रतिनिधी आहे हे गोपाळरावांनी ठरवून टाकले. डॉ. भाभा हे मलबारीच्या इंडियन स्पेक्टेटरचे इंग्लंडमध्ये एजंट होते. त्यांनी काही वस्तू खपविल्या पण त्यांना किंमत कमी आली म्हणून गोपाळरावांचे त्यांच्याशी जोरदार भांडणच झाले. हे भांडण सोडविताना वेडरबर्नने गोपाळरावांच्या मागणी-प्रमाणे कमी पडलेले पैसे स्वतः द्यायची तयारी दाखविली, तेव्हा गोपाळरावांनी मला पैसे नकोत असे म्हणून विकलेल्या वस्तूच परत मिळाव्यात असा हट्ट धरला!

या वेळी इंग्लंडमध्ये वावरणारे-शिकणारे जे जे भारतीय होते त्यांची पाश्चात्त्य पद्धतीची राहणी हा गोपाळरावांच्या टीकेचा सर्वांत मोठा विषय होता. त्यातून दादाभाई नौरोजीही सुटले नाहीत. गोपाळराव स्वतः पूर्ण भारतीय पद्धतीने तिथे राहणे शक्य आहे हे दाखविण्यासाठी धोतर उपरणे, पगडी यांच्या जोडीला त्रिपुंड्रही लावीत! स्वतःच्या अशा 'ग्रेसफुल' दर्शनावर ते अगदी खूष होते! दररोजचा खर्च फक्त सहा आठ आणे करून आपण इंग्लंडमध्ये राहू शकतो, हे 'समुद्रप्रवासा'तील बातमीपत्रात त्यांनी अभिमानाने मायदेशी कळविले आहे. परंतु इंग्लंडमध्ये शिकणारे डॉक्टर, बॅरिस्टर हे भारताचे वैरी आहेत, त्यांची बंदरावरच कत्तल उडवायला हवी, कारण ते हीन अशी पाश्चात्त्य विद्या व संस्कृती मायदेशात घेऊन येत आहेत असे गोपाळरावांनी चिडून लिहायला सुरुवात केली तेव्हा आता ह्यांचा प्रयत्नपूर्वक सांभाळलेला तोल पुरा सुटलेला आहे हे 'समुद्रप्रवास' वाचणाऱ्यांच्या लक्षात येते. मग तिकीट काढून त्यांना परत हिंदुस्थानात पाठविणे हाच एक सामंजस्याचा, सभ्यतेचा मार्ग आहे हे ओळखून सुधारकांच्या पाश्चात्त्य मित्रांनी गोपाळरावांना परत हिंदुस्थानात पाठवून दिले. भल्याभल्यांना जगात कसे वागावे याचे धडे शिकवून परतलेले गोपाळराव अर्थातच फक्त अनुभवदृष्ट्या संपन्न झालेले होते! इंग्लंडमध्ये त्यांनी खरा आनंद लुटला होता तो गोऱ्या इंग्रज यजमान-यजमानिणींना त्यांची जी सेवा करावी लागत होती तिचा! त्याचप्रमाणे आपल्या तांबड्या जोड्यापासून तांबड्या पगडीपर्यंत (अधूनमधून इंग्रजी पोशाख केला तरी) 'खरा' हिंदू इंग्रज माणसांना दाखविल्याचा!

या समुद्रप्रवासातील काही अनुभव सांगताना गोपाळरावांनी आपला हिंदुत्वाचा अभिमान पदोपदी दाखविला आहे; स्वतःच्या पूर्वीच्या धर्मांतराच्या कृतीबद्दल तीव्र पश्चात्ताप व्यक्त केला आहे आणि हे करताना एखाद्या कालविसंगत विचार करणाऱ्या सनातनी माणसाने ज्या प्रकारची स्वप्ने पाहावीत, तशीच स्वप्ने आपली म्हणून सांगितली आहेत! बोटीवरील 'इंद्रभवनात' असलेले गोपाळराव लिहितात, 'माझा जोडा, ज्याला हिंदुस्थानात दरबारी मान नाही तो चोहोकडे या आगबोटीवर फिरतो; जेवताना, बसताना, उठताना तो मजबरोबर सर्वत्र असतो...त्याला कोणी धक्का नको

म्हणत नाही. असा माझा तांबडा जोडा देशाभिमान्यांच्या मर्जीतून उतरून त्याचे-ऐवजी खिस्ती काळीकभिन्न बुटेरी आली.. माझ्या जोड्या, मी तर तुझा अव्हेर केला नाही ना ? तू माझ्यावर रुष्ट होऊ नकोस. जे तुला त्यागून जातात त्यांचे तू कधी कल्याण करू नकोस. महाराज, मी या उघड्या पायाने, जोडा घालून, धोतर नेसून, या गोऱ्या लोकांबरोबर आपले सगळे हक्क राखून वागत आहे. ते ज्या ठिकाणी स्नान करतात, त्या ठिकाणी मी स्नान करतो. शौचविधी, मुखमार्जनही त्यांचे -माझे एकाच ठिकाणी होते....यावर मी हिंदुस्थान सोडले हे बरे केले नाही काय ? ...जसा मला माझे देशाचा कंटाळा आहे तसाच त्यांस (बोटीवरील यहुद्यास) येऊन त्याने आपल्या देशाचा त्याग केला आहे. मजसारखेच ते आपल्या देश-बांधवास शिव्या देत. त्यांचे बोलणे ऐकले म्हणजे मला माझे स्मरण होई. हा मीच बोलतो आहे असे वाटे. मीही असाच वेड्यासारखा बरळत असे. काय आपले लोक लबाड, ते पाजी, ते लुच्चे, ते हलकट, असे कसे होईल ? आता मी ४/५ हजार मैल मागे पाहतो, असा कोणी मनुष्य आहे काय ? म्हणून तपास करिता मला एकही दिसत नाही. तो सगळ्या पुण्यात नाही, देशात नाही, नाही, कोठे नाही. कोणी लबाड असला तर तो माझ्यामध्ये असेल. मीच मूर्ख म्हणून दुसऱ्यास नांव ठेवीत होतो....

...इतके दिवस मी सुखात प्रवास केला. हे सुख एकदम नाहीसे होऊन मी आलो नसतो तर बरे झाले असते असे मला वाटू लागले. मनाचे विकार फार कठीण व चमत्कारिक असतात. मी माझा कातड्याचा थैला उघडला. त्यात हात घातला. ती माझी धोतरे, माझा अंगरखा, माझा जोडा, माझ्या हातात लागला; आणि मग काय विचारता, 'दे माय धरणी ठाय' होऊन अश्रुपातास सुरुवात झाली त्याच थैल्यात हिंदुधर्माची व खिस्तीधर्माची पुस्तके एकत्र केलेली होती. ब्रह्मकर्माची पोथी, गीता, रेशमात बांधलेली इष्टीस पडताच असे काही भरते आले, त्याचे वर्णन या ठिकाणी करणे अगदी अशक्य आहे. वेळेचा गुण ! मला वाटले, की ही ख्रिस्ती धर्माची पुस्तके आत्ताच्या आत्ता समुद्रात बुडवून टाकावी. यांनी किती रे सत्यानाश केला ! किती लोकांची घरे बुडविली, गोरगरिबांस भिकेस लावले, मातापितरांची ताटातूट केली. अरे या निर्दया धर्मा, मी तुझ्या पाशात कसा रे सापडलो ? आणि माझ्या लोकांस सोडून कोणीकडे रे जात आहे ? त्या पुस्तकांशी घटकाभर तरफड करीत बसलो आणि ती समुद्रात नेऊन टाकणार, तो दुसरा विचार पुढे उभा राहिला. मला लोक काय म्हणतील ? मी आता पोर नाही. माझे खिस्तीबांधव मला नावे ठेवतील, माझे गुरू आपली बोटे चावून घेतील, वेदमूर्ती नीळकंठशास्त्री गोऱ्यांसारखी माणसे हा कसला खिस्ती, त्याला तो धर्म समजलेलाच नाही असे पुन्हा पुन्हा म्हणतील. काहीही होवो. झालेली हकीगत खरी आहे...मायबापाची ताटातूट करणारा प्राणी कसा असतो तर तो या खिस्ती लोकांसारखा. निर्दयाचे राजे किंवा पुतळेच

म्हटले तरी चालेल...तो थैला डोळ्यांआड केला आणि मग मला बरे वाटले. निर्जीव पदार्थात मनुष्याची अशी त्रेधा करून सोडण्याचा धर्म आहे म्हणूनच की काय कोण जाणे. आमचे पूर्वज सगळ्या पदार्थांची राखरांगोळी करून टाकीत असत...

...आगबोट हे लहानसे खेडेच आहे म्हटले तरी चालेल. जसे खेडेगावात शांत रात्रीच्या पहाटेस बायका उठून गाणी म्हणत दळीत बसतात, मुले उठून पाणी मागतात, खोकलेकऱ्यांचा दमा सुरू होतो, भाविक लोक भजन करीत बसतात तद्वत या आगबोटीवर व्यापार सुरू होतात. चहूकडे खरखर घासणे–पुसणे चालू आहे असे ऐकू येते. पेलेबश्यांचे खणखणीत आवाज कानी पडतात. मुसलमानांचे कुराणिक भजन ऐकू येते. आणि एकदोनदा तर काकडआरती चालली आहे असा मला भास झाला! राहून राहून वाटते, अशा मोठ्या आगबोटी आम्हा ब्राह्मणांच्या हातात येतील तर बरे! मग आम्ही सर्व ब्राह्मणमय करून टाकू. सगळे सोवळ्याचे पदार्थ! धाबळीच्या बंड्या घालून आमचे लोक स्वयंपाकघरात भोजनाची तयारी करीत आहेत. तो वरणभात, त्या पोळ्या, चटण्या–कोशिंबिरी, भाजीपाला! मग आम्ही स्वच्छ वस्त्रे परिधान करून गुळगुळीत डोक्याने, भस्म परिधान केलेले जेवायला बसलो आहोत. भुईवर नाही! खरोखरीच नाही ही मेजे–खुर्च्या पाहिजेत. वाढपे व स्वयंपाकी ब्राह्मणी पोषाख केलेले! व जेवणारी मंडळी सगळी ब्राह्मण! त्या लहान लहान शेंड्या, शुभ्र यज्ञोपवीते, असा दिवस येईल काय? आणि मग सगळे हिंदुस्थान ब्राह्मणमय! आला गेला की कर त्याला ब्राह्मण, मुंड त्याच्या दाढीमिश्या, दे त्याला पंचगव्य आणि कर एकदम ब्राह्मण! मुसलमान, ख्रिस्ती, हिंदू मिळून आम्ही सगळे ब्राह्मण झालो तर मग काय पाहिजे?...(इंग्लंडमध्ये) आमचे षष्ठीपूजन, नामकरण, मौंजीबंधन, लग्न वगैरे सोळा संस्कार करून दाखवील तो धन्य! आणि हे सगळे होणे शक्य आहे, मात्र देशाभिमान पाहिजे.'...

ब्राह्मण या शब्दाचा गोपाळरावांना अभिप्रेत असलेला अर्थ रूढ अर्थाहून वेगळा आहे एवढे या मजकुरातून उमजते; पण त्यांना नेमके काय सुचवायचे हे मात्र कळत नाही. मुसलमान, ख्रिस्ती यांनी 'ब्राह्मण' व्हायचे मग सोवळ्याच्या बंड्या कशासाठी? सर्व देश–परदेश ब्राह्मणमय करून टाकू इच्छिणाऱ्या 'उदार', 'सुधारक' गोपाळरावांचे हे 'हिंदुत्व' आपण गंभीरपणाने घ्यावे की ती त्यांची एक 'लहर' म्हणून घ्यावे हे 'समुद्रप्रवास' वाचताना कळेनासेच होते. सारांशाने एवढे जाणवते, की कोणत्याही विषयाचा किंवा अनुभवाचा फक्त बाह्याविष्कार हाच गोपाळरावांना प्रामुख्याने जाणवलेला असतो. त्याच्या अंतरंगापर्यंत पोहोचावे आणि माणसांचा, समाजाचा, किंवा स्त्रीशिक्षण, धर्म, देशाभिमान यांचाही परस्परसंबंध लक्षात घेऊन एकत्रितपणाने त्यांचा आपण विचार करावा हे कधी त्यांना साधलेले नाही. शिवाय आपल्याला जे आणि जेवढे कळलेले आहे ते पूर्ण स्वरूपात कळलेले आहे अशी त्यांची पक्की धारणा, त्या तेवढ्या क्षणा-

पुरती, होत असते. तो क्षण उलटला, की मग आपण अस्थिर आहोत, चंचल आहोत, लहरीच्या आहारी जाणारे आहोत हे गोपाळराव स्वतःही स्वतःबद्दल म्हणतच असतात. या त्यांच्या मनोधर्माच्या जोडीलाच जेव्हा त्यांचे अनेक गंड, अनेक आग्रह व वेळोवेळी आवर्जून स्वीकारावयाचे प्रतिक्रियात्मक पवित्रे येऊन मिसळतात, तेव्हा गोपाळरावांची व्यक्तिरेखा अधिकाधिक गुंतागुंतीची होऊ लागते. झाडाचे मूळ कोणते आणि कलम कोणते हेच नव्याने दरखेपेला तिथे तुम्हाला शोधून बघावे लागते! आपण मनात गृहीत धरलेले अंदाज सोडून दुसरेच काही त्यांच्या बाबतीत गृहीत धरायला हवे असे वाटू लागते. अशा प्रकारे गोपाळरावांचा अस्थिरपणा आपल्यालाही एकसारखा अस्थिर करीत राहतो.

बऱ्याचदा स्वतःला वा दुसऱ्याला इजा करीत सुटताना गोपाळरावांना तारतम्य राहात नाही. अनेकदा हे इजा करीत सुटणेच त्यांना काही प्रमाणात सुखही देत असते.

एखादी गोष्ट घडविताना किंवा तिला आकार देताना जे सात्त्विक सुख माणसाला वाटत असते त्याची गोडी असण्यापेक्षा कशावरच्या तरी आघातामध्ये, किंवा कोणाचे तरी खिंग शोधण्यामध्ये अधिक रस असणारे गोपाळरावांसारखे जे महाभाग असतात ते जन्मतः हा एक शापच घेऊन आलेले असतात की काय ते कळत नाही! आनंदीबाईंना शिकवितानाही तो बुरसटलेल्या शिक्षणविरोधी सनातनी समाजावरचा हल्ला आहे, या गोष्टीला ज्ञानसाधनेपेक्षाही गोपाळरावांकडून बाजबीपेक्षा जरा अधिकच महत्त्व मिळते. अमेरिकन समाजाचा आनंदीबाईंना लाभलेला स्नेह स्वाभिमानपूर्वक अधिकाधिक वृद्धिंगत करीत जाणे शक्य असूनही गोपाळरावांसारखी संघर्षप्रिय माणसे वाट पत्करतात, ती अमेरिकनांच्या अस्मितेवरच आघात करण्याची! त्याशिवाय आपली अस्मिता सिद्ध होणार नाही इतका साधा आणि असुंदर हिशेब त्यांनी केलेला असतो. ख्रिस्ती धर्माला नावे ठेवल्याखेरीज हिंदुधर्माचे मोठेपण सिद्ध होत नाही या भूमिकेतून त्यांच्या मनात जो एक प्रतिक्रियात्मक उथळ खेळ चालतो त्यालाच ते धर्मविचार मानीत असल्याने, त्यांना स्वतःला यांपैकी कोणताही धर्म निरोगी निष्ठा देऊ शकत नाही. गोपाळरावांसारखी माणसे सामान्य नसतात पण असामान्यही नसतात, सुधारक नसतात आणि सनातनीही नसतात. अनेक अर्थांनी ती केवळ त्रिशंकू असतात. दुसऱ्यांच्या शिकारी साधताना त्यांची स्वतःचीही शिकार होत जात असल्याने, अखेरीस आपल्या मनात ते एक करुणेचा विषयही होतात. स्वतःच्या ठिकाणच्या काही व्यक्तिवैशिष्ट्यांना जोडणारे निकोप विधायक वृत्तीचे अंतःसूत्र त्यांना लाभलेलेच नसते...

गोपाळरावांचा असा विचार करता करता कधी तरी पूर्वी पाठ केलेला एक चमत्कारिक श्लोक मला गंमतीने आठवत राहतो;

उभा चिरला शंखाकार । आडवा चिरला चक्राकार
ऐसा विष्णूचा अवतार । म्हणूनी कांदा भक्षावा ॥

कांदा आणि विष्णू दोन्हीचेही कवीने हे एकदमच केलेले वर्णन !

पन्नाशीला आलेले गोपाळराव जेव्हा दुसऱ्यांदा समुद्रप्रवासाला जायला निघाले तेव्हा त्यांची काळजी वाटणाऱ्या काही सुधारक मंडळींनी त्यांना 'जाऊ नका' असे म्हटले होते. आता ते परत जायला निघाले तेव्हा तीच मंडळी 'तिकडेच राहा' असे त्यांना सुचवू लागली ! गोपाळरावांना साहजिकच हे बोलणे जिव्हाळा नसल्याचे निदर्शक वाटू लागले. कोणत्याही माणसाच्या सहवासाची किंमत त्याच्या सहवासात असताना, तीव्रपणाने भांडताना, गोपाळराव विसरलेले असत. त्याच्यापासून लांब गेल्यावर ती त्यांना उमगे; तसेच याही वेळेला झालेले होते. ते निघाले तेव्हा पोहोचवायला आलेल्या एकदोघांबद्दल त्यांना काहीच वाटलेले नव्हते. परंतु निम्या प्रवासात बोटीवरील इंग्रज मंडळी परस्परांचा निरोप घेताना एकमेकांना आलिंगन देऊन, हस्तांदोलन करून, भावपूर्णतेने 'गुड बाय' 'गुडबाय' म्हणताना दिसू लागली तेव्हा गोपाळराव अस्वस्थ होऊ लागले. त्या वेळी म्हणजे जात्या प्रवासाच्या शेवटी त्यांनी लिहिले 'मी आपल्या इष्टमित्रांची रजा घेतली तेव्हा...एकदोघांनी आलिंगन दिल्यासारखे केले ते अजून शरीरात आहे. त्याचे स्मरण झाले म्हणजे शरीराला उबारा येतो...खर्च होतो म्हणून शेवटची भेट नको म्हणणारे व्यापारी नको आहेत. मनुष्य जर थंडीने कुडकुडत असेल तर घराचे वासे काढून आगटी करणे रास्त. घर मोडले तर मोडू द्या, परंतु प्राणांचे रक्षण करा. मनात जिव्हाळा नाही तर कर्माला कोठून उत्पन्न होणार ?' या जिव्हाळ्याची ओढ लागून गोपाळराव इंग्लंडहून परतले ! गोपाळराव स्वतःही कधी कधी भावनेच्या ऊर्मीने कृती करीत; थंडीत कुडकुडणाऱ्या माणसाला स्वतःच्या अंगावरची बंडीसुद्धा काढून देत.

वास्तविक सुधारक समाज सततच गोपाळरावांच्या बाबत ते डॉ. आनंदीबाईंचे पती आहेत हा गौरवात्मक संदर्भ लक्षात ठेवून वागे. परंतु आपला व्यक्तिगत सुखद अनुभव आणि सर्वसामान्य समाज म्हणून असणारी हिंदूंची बधिर प्रवृत्ती यांची गल्लत करून, सुधारकांबद्दल सरसकट कधी अतीव कृतज्ञतेने बोलायचे, तर कधी कार्यनाश होईल असे जाहीर आरोप त्यांच्यावर करीत बोलायचे असे गोपाळरावांचे चाललेले असे. या गल्लतीमुळे सुधारकही त्यांच्यावर कधी कधी फार चिडून जात. असे कधी चिडले नाहीत ते नामदार गोपाळ कृष्ण गोखले ! इंग्लंडहून गोपाळराव जोशी परतल्यावर त्यांनी त्यांना आपल्या भारत सेवक समाजाच्या ग्रंथालयात नोकरीसाठी ठेवून घेतले. गोपाळराव तिथे नोकरी करीत आणि पुण्यातील समाजात मिसळून

नामदार साहेबांची जोरदार टिंगल करीत ! ती गोखल्यांना कळे; पण ती आपल्याला ऐकूच आलेली नाही असे ते दाखवीत. गोपाळरावांचे 'पूर्वकृत्य' स्मरून ते त्यांचा मान राहिला पाहिजे यासाठीही दक्ष राहात !

काहीतरी 'चळवळ' करीत जगणे हेच वळण आजवर लागलेले असल्याने उतारवयात गोपाळराव तसेच जगले. विविध ठिकाणी भरणाऱ्या सामाजिक परिषदांना ते हजर राहात व खुल्या अधिवेशनातून धीटपणाने बोलत. पुण्याच्या वसंत व्याख्यान मालेत उपवक्त्यांची आज जी एक 'वैशिष्ट्यपूर्ण' परंपरा आहे तिचे तर ते एक सन्माननीय अध्वर्यूच मानायला हवेत ! तिथे गोपाळराव बोलले नाहीत असा राजकीय, सामाजिक, धार्मिक विषय नाही !

गोपाळरावांचे चळवळे शरीर आणि मन, पासष्टी-सत्तरीनंतर वयोमानानुसार थोडे थकले; मग ते पुण्याहून नाशिकला येऊन राहिले. तिथे ते लहान मुलांना इंग्रजी शिकवून चरितार्थापुरते पैसे मिळवीत. मात्र शिकविताना गोपाळराव खुर्चीऐवजी कमोडवर बसून शिकवीत ! 'विधी' नैसर्गिक पद्धतीनेच आटोपला पाहिजे यासाठी ! साहजिकच, या मास्तरांनी काय शिकविले यापेक्षा ते कसे शिकविले हेच या विद्यार्थ्यांच्या आज लक्षात आहे !

नाशकातील एका स्वयंपाकीणबाईंच्या आधाराने गोपाळरावांचे उर्वरित दिवस गेले. तिने दोन वेळा त्यांना अन्न शिजवून घातले. ते जेव्हा दिवंगत झाले (८ आक्टो. १९२२) तेव्हा आसपासच्या चार ब्राह्मणमंडळींनी एकत्र येऊन धर्मबुद्धीने त्यांना अग्नी दिला. कोणी म्हणतात मंत्राग्नी दिला, कोणी म्हणतात त्यांचे परदेशपर्यटण, त्यांचे धर्मांतर हे सर्व लक्षात घेऊन त्या श्रीक्षेत्रवासियांनी त्यांना भडाग्नीच दिला !

आनंदीबाईंच्या मृत्यूनंतर गोपाळरावांनी आपल्या लिखाणात, वक्तव्यात कुठेही त्यांचे नाव घेतलेले आपल्याला आढळत नाही.. तथापि, ज्या कार्पेंटरमावशीकडे आनंदीबाई फार सुखाने राहिलेल्या होत्या त्यांच्याशी त्यांनी अधूनमधून पत्रे पाठवून जिव्हाळ्याचा संबंध ठेवलेला होता. १९०५ साली गोपाळरावांच्या पुतणीचे रँग्लर परांजपे यांच्याशी जेव्हा लग्न झाले तेव्हा ही अभिमानास्पद वार्ता त्यांनी कार्पेंटर मंडळींना कळविली आहे. उत्तरादाखल लिहिलेल्या अभिनंदनपर पत्रात श्री. बी. एफ. कार्पेंटर लिहितात, 'अजूनही आनंदीबाईंचे कित्येक फोटो (आणि तुमचाही एक) आमच्या घराच्या भिंतीवर लागलेले आहेत. आमच्या ग्रंथालयात आनंदीबाईंचे चरित्र, त्यांनी दिलेल्या सुंदर भारतीय कलाकुसरीच्या वस्तू...सगळे आम्ही सांभाळून ठेवलेले आहे. त्यांनी 'हिंदू' म्हणून इथे राहायचे या हेतूने बरोबर आणलेली स्वयंपाकाची, घरगुती गरजेची, सर्व उपकरणे आजही आमच्या जेवण-घरातील भिंतींची शोभा वाढवीत आहेत....हे सर्व पाहताना ज्या वेळी तिचे–तुमचे स्वर या भिंतीच्या आत निनादत असत ते दिवस आम्हांला फार फार आठवतात.

...तुमच्या थोर, सद्‌गुणी पत्नीचे साहस आम्हांला कोलंबसाच्या साहसासारखे वाटते. भारतीय स्त्रियांसाठी तिने एका नव्या जगाचा मार्गच खुला केला असे म्हटले पाहिजे. आपल्या कार्यात ती अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी झाली. तिने फक्त वैद्यकीय पदवीच मिळविली नाही, तर मृत्यूला पुसून टाकता येऊ नये अशी शाश्वत कीर्तीही मिळविली... अशा जगाचा तिने शोध लावला की तिच्या जातीत जन्माला आलेल्या सर्वांना एक नवे जीवनच उपलब्ध होऊ शकले. तुमच्या देशातील अनेक प्रगतिशील चळवळींना यापुढेही तिचे जीवन सदैव मार्ग दाखवीत जाणारे ठरेल असे मला वाटते.'

—गोपाळराव अगदी निर्धन अवस्थेत वारले, त्यांचे सगळे सामान म्हणजे एक छोटीशी ट्रंक होती! त्या एका ट्रंकेत होती आनंदीबाईंची अभ्यासाची काही पुस्तके, काही फोटो, काही चरित्रे...ती दाखवून कधीमधी भेटायला भेणाऱ्या आठ दहा वर्षांच्या आपल्या छोट्या नातीला ते म्हणायचे, 'तू खूप शीक आणि बायकांनी पुष्कळ शिकलं पाहिजे हे लक्षात ठेव.' आज गोपाळरावांच्या वयोवृद्ध नातीची ती ट्रंकही कुठेतरी हरवलेली आहे...

४

त्रिदळ

एकोणिसाव्या शतकाची अखेरची बीस वर्षे आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभीची बीस-पंचवीस वर्षे ज्या मराठी साहित्यिकांनी काव्य व कादंबरी क्षेत्रांत विशेष कामगिरी केली, त्यांच्यामध्ये रावसाहेब गोविंदराव वासुदेव कानिटकर (१८५४-१९१८), त्यांच्या पत्नी सौ. काशीबाई कानिटकर (१८६१-१९४८) आणि ह्या उभयतांचे परमस्नेही असलेले, कादंबरीकार म्हणून विशेष ख्यातनाम असलेले हरिभाऊ आपटे (१८६४–१९१९) यांचा समावेश होतो.

काशीबाई व गोविंदराव यांचा विवाह १८७० मध्ये झाला. त्या वेळी गोविंदरावांचे वय सोळा वर्षांचे, तर काशीबाईंचे नऊ वर्षांचे होते. लग्नापूर्वी अक्षरओळखीपलीकडे अधिक शिक्षण न झालेल्या काशीबाईंनी कोणत्याही शाळेत न जाता गोविंदरावांच्या प्रेरणेने, आणि हरिभाऊंच्या प्रोत्साहनाने लक्षणीय अशा कथा-कादंबऱ्या लिहिण्या-इतपत मजल मारली आणि थोडेफार सामाजिक कार्यही केले. रावसाहेब गोविंदरावांनी आपली सबॅ-जज्जाची नोकरी सांभाळून स्फुटकाव्ये, दीर्घकाव्ये आणि मौलिक भाषांतरे मराठीला उपलब्ध करून दिली. १९०६ साली पुणे येथे झालेल्या ग्रंथकार संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

काशीबाई कानिटकरांनी लिहून ठेवलेल्या अप्रकाशित आत्मचरित्राला पूर्णता देऊन ते प्रकाशित करावे या हेतूने त्यांच्या उत्तर आयुष्यातील घडामोडींची माहिती मिळविण्याच्या कामाला मी सहा वर्षांपूर्वी लागले. कानिटकर मंडळींच्या अनेक नातेबाइकांनी दिलेल्या आणि जुन्या मराठी मासिका-पुस्तकांतून मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जीवनाचे जे उत्तरायण एकत्रितपणाने मला न्याहाळता आले, त्यापैकीच हा एक भाग— तिघांच्या व्यक्तिगत स्नेहजीवनाच्या संदर्भात

त्यांच्या वाङ्मयीन जीवनाचा दिसलेला हा लहानसा आलेख...

हरिभाऊंपेक्षा वयाने गोविंदराव नऊ वर्षांनी वडील होते. त्यांची परस्परांशी ओळख झाली तेव्हा शिक्षणाने आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीनेही गोविंदरावच मोठे होते; तरीही वाङ्मयप्रेमामुळे त्यांचे हरिभाऊंशी वागणे-बोलणे असायचे ते अगदी बरोबरीचे. इंग्रजी शिक्षण व सरकारी नोकरी यांच्या हळकुंडाने पिवळी झालेली तत्कालीन काही पदवीधर मंडळी ज्या गर्विष्ठपणाने इतरांशी वागायची, त्याचा स्पर्शही गोविंदरावांच्या मनाला नसायचा. आपल्या प्रारंभीच्या पत्रांतून हरिभाऊ स्तुती करीत, ती या त्यांच्या विरळा असणाऱ्या निरहंकारी स्वभावाची व काशीताईंना शिकविण्याचे जे श्रम वेळोवेळी त्यांनी घेतले होते त्यांची.

हरिभाऊंचे कादंबरीलेखन मराठी कादंबरीच्या संदर्भात फार महत्त्वाचे आहे, हे ते प्रसिद्ध व्हावयास प्रारंभ झाला त्याच वेळी अभिजात इंग्रजी साहित्यावर ज्यांची अभिरुची संपन्न झाली होती त्या गोविंदरावांनी जाणलेले होते. स्त्रियांच्या दुःस्थिती-संबंधीची तरुण हरिभाऊंची जाणीव मिल-स्पेन्सरच्या वाचनानंतर अधिक डोळस झाली, तेव्हा गोविंदरावांना सामाजिक दृष्टिकोणाबाबत ते आपले समानधर्मेच वाटले. परस्परांच्या ह्या परिचयापूर्वी नुकतेच डेक्कन कॉलेजात शिकावयास आलेले हरिभाऊ, आगरकरांच्या सुधारणावादास फारसे अनुकूल नव्हते; उत्तमोत्तम इंग्रजी-फ्रेंच वाङ्मयाच्या आस्वादात रमायचे आणि भोवतीच्या कौटुंबिक-सामाजिक परिस्थिती-बद्दल नाराज राहायचे एवढेच त्यांना मुख्यत्वे माहीत होते. परंतु १८८३ साली कानिटकरांच्या घरी त्यांचे येणेजाणे सुरू झाले व हरिभाऊंचे जीवन आणि साहित्य बदलण्यास प्रारंभ झाला. कानिटकरांच्या 'मनोरंजन आणि निबंधचंद्रिके'च्या संपादनामधून आयुष्यात व्यवसाय म्हणून आपण नेमके काय करायचे हेही त्यांना स्पष्ट झाले. 'गणपतराव,' 'पण लक्षात कोण घेतो?' या कादंबऱ्यांच्या निर्मितीचा काळ हा हरिभाऊंच्या जीवनातील कानिटकर दांपत्याच्या प्रभावाचा कालखंड आहे,' असे यासाठीच हरिभाऊंच्या चरित्रकारांनी आणि समीक्षकांनी पुन्हा पुन्हा म्हटलेले आहे. या स्नेहातून त्यांच्या लेखनाचा आशय व कथानकाची वळणे निश्चित झाली आहेत, व्यक्तिचित्रणावर परिणाम झालेला आहे आणि साहित्यनिर्मितीची प्रयोजने आदर्शाच्या ध्यासातून उद्‌बोधनाच्या दिशेने अधिक झुकलेली आहेत.

...परस्परमैत्रीच्या त्या सुंदर दिवसांत, उन्हाळ्याच्या सुट्टीच्या काळात, पुण्यातील नगर वाचनालयाच्या इमारतीपाशी सकाळीसकाळीच गोविंदरावांनी हरिभाऊंना भेटावे, पुस्तकांच्या दुकानात जाऊन नवनवीन पुस्तके खरेदी करावीत, पंचहौद मिशनमधील सभांना वक्ते म्हणून, श्रोते म्हणून जावे, टेनिस-बिलियर्डसचा खेळ

बघावा, घोडागाडी करून कँपातील चित्रप्रदर्शन पाहण्यासाठी सहकुटुंब निघावे, पंडिता रमाबाईंना निरोपाची पार्टी देण्याचा बेत आखावा, आगरकरांच्या 'विकार-विलसिता'ला, हॅम्लेटचे दुसरे स्वतंत्र भाषांतर करून प्रत्युत्तर देण्याची योजना आखावी–असे बरेच काही सहजतेने घडत होते. अशा भेटीगाठींत आपल्या सांसारिक अपेक्षांमधून निर्माण होणारे नाजुक कौटुंबिक कलह, विश्वासपूर्वक एकमेकांना सांगता सांगता ही मंडळी एकमेकांच्या घरातीलच झाल्यासारखी झाली. (आणि तरीही नाते कौटुंबिक अतिपरिचयापासून थोडेसे लांबचेही राहिले.) हरिभाऊंचे घर हे कानिटकरांच्या मुलांचे आजोळ झाले; आणि हरिभाऊंना काही सुचवायचे वा सुनवायचे असल्यास ते कानिटकरांकडून सुचवावे, असे आपटे मंडळींनाही वाटू लागले. लेखन-वाचनासंबंधी उत्सुक असणाऱ्या आपल्या बुद्धिमान, वडीलधाऱ्या बहिणीला—'काशाक्काला' उत्तेजन देताना, तिच्याशी संभाषणे करताना भावनाप्रधान हरिभाऊ कधी फार मनःपूर्वक तिच्यापेक्षा लहान झाले, तर कधी आपल्या पुरुषी जगातील अनुभवांमुळे नकळत वडीलधारेही झाले. दरवर्षी भाऊबीजेला नव्या नव्या पुस्तकांची ओवाळणी तिला मिळू लागली. तिच्या सहवासात राहून शाकुंतल–उत्तररामचरिता-सारख्या उत्तमोत्तम साहित्याचा आस्वाद घेताना त्यांचा वाचनाचा आनंद दुणावत गेला. परस्परांना आपली सुखदुःखे मोकळेपणाने सांगण्याची जी संधी त्यांना मिळाली आणि तशी जी सवय त्यांनी लावून घेतली, ती त्यांच्या तिघांच्या साहित्यनिर्मिती-मागील एक महत्त्वाची प्रेरणाच ठरली. एखाद्याने उत्साहाने काही लिहावे आणि ते दुसऱ्याला कसे वाटेल याचा सुखद विचार करावा, यामध्ये मैत्रीला जशी उत्कटता आली, तशाच जगण्यासंबंधात विशेष अर्थही प्राप्त झाला. या तीनही तरुण माणसांना एकमेकांच्या सहवासात आयुष्य एखाद्या ताज्या दळदार रसरशीत फळासारखे भरलेले आकर्षक आणि चविष्ट वाटत राहिले.

पण प्रारंभकाळातील या जवळिकेनंतर पुढील काळात प्रत्येकाचा प्रवास अगदी एकसारखा असा होणे शक्यच नव्हते. पाचसहा वर्षांतच हरिभाऊ एक कादंबरीकार म्हणून, वाङ्मयविषयक चळवळींचे अध्वर्यू म्हणून आणि एक जबाबदार सामाजिक कार्यकर्ते म्हणून भराभर नाव मिळवीत गेले. शाळा–कॉलेजपासून थोडीशी आत्मपर, थोडीशी सांकेतिक अशी कविता लिहिणाऱ्या, दक्षिणा प्राइझ कमिटीची बक्षिसे मिळविणाऱ्या गोविंदरावांची चांगली वाढ झाली ती एक गद्य भाषांतरकार म्हणून!. मिल्च्या 'सब्जेक्शन ऑफ वुईमेन'चे त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक केलेले भाषांतर रसिकांच्या जेवढे लक्षात राहण्यासारखे झाले, तेवढे त्यांचे प्रासंगिक स्वरूपाचे स्फुट-काव्य, स्कॉट टेनिसनच्या 'पद्धती'चे आख्यानक काव्य किंवा मोरोपंती 'पद्धती'चे 'संमोहलहरी' झाले नाही. तरीही असे दिसते की, त्या काळात कवी म्हणून गोविंदरावांना समकालीन कवींनी व संपादकांनीही बराच मान दिलेला आहे.

'नवयुग', 'मनोरंजन' यांनी मोठ्या थाटामाटात, नक्षीदार महिरपींसह रावसाहेब कानिटकरांच्या प्रासंगिक कविता वरचेवर छापलेल्या आहेत.

या दोघांच्या तुलनेने काशीताईंच्या लेखनाची गती नेहमीच संथ आणि सातत्याची राहिली. आजूबाजूच्या जगात कथाकादंबऱ्या लिहिणाऱ्या (वाचणाऱ्या सुद्धा) स्त्रिया जवळजवळ नव्हत्याच त्यामुळे त्यांच्या लिखाणाचे प्रारंभीच्या काळात कौतुकही बरेच झाले. त्यांना उत्तेजन देणे ही एक सामाजिक जबाबदारी आहे असे हरिभाऊंसारख्या त्यांच्या स्नेह्याला जसे वाटले, तसेच वा. ना. देव या तत्कालीन परखड टीकाकारांनाही वाटले आहे. पण काशीताई या स्तुतीने हरखून गेल्या नाहीत. आपल्या त्रुटींची आणि मर्यादांची कबुली प्रस्तावनांतून त्या शेवटपर्यंत देतच होत्या. त्यांचा पहिला लेख छापून आला होता तो जुन्या-नव्या स्त्रीजीवनाची तुलना करणारा. (सुबोधपत्रिका १८७८). त्यांच वेळी त्यांच्या मनाला आपले 'लिहिणे' आणि आपले 'बागणे' यांतील एका जिव्हाळ्याच्या नात्याचा शोधही लागल्याने कधी हौसेने, कधी कर्तव्य म्हणून, तर कधी विरंगुळा म्हणून त्या लिहीत राहिल्या. आपल्या घरीदारी पाहिलेली अनेक माणसे त्यांनी त्यांच्या 'रंगराव,' 'पालखीचा गोंडा,' 'चांदण्यातील गप्पा' या साहित्यामधून तपशीलवार रीतीने चितारली. त्यांच्या पूर्वीच्या लेखक-लेखिकांच्या तुलनेने आलंकारिक भाषेच्या, भडक घटनांच्या मागे न लागता काशीताईंनी साध्यासुध्या पद्धतीने लिहिले; थोड्या शिक्षणामुळे लाभलेल्या नव्या जीवनदृष्टीनुसार वास्तव परिस्थितीवर अनुकूल प्रतिकूल भाष्ये केली. या भाष्यांचाच एक भाग म्हणून कादंबरीतील कथानके प्रेमविवाहाच्या, ध्येयवादाच्या परिपूर्तीमध्ये स्वप्नरंजनात्मक पद्धतीने पूर्ण केली. जे कथा-कादंबऱ्यांमध्ये आवर्जून साधावे लागले, ते साहसयुक्त भावात्मक नाट्य डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या विलक्षण चरित्रात मुळातच उपलब्ध झाल्याने ते चरित्रही त्यांनी फार समरसतेने लिहिले. या सर्वांलाच थोडीफार यशाची आणि कौतुकाची पावती मिळाल्याने लिखाणातून होणारे स्वतःचे आणि स्वसमाजाचे शिक्षण काशीताईंनी अखेरपर्यंत चालू ठेवले—अगदी आत्मचरित्राच्या अपुऱ्या कृतीपर्यंत.

अनेक अडीअडचणींतून गोविंदरावांच्या इच्छेप्रमाणे काशीताई शिकल्यासवरल्यानंतर, स्वतंत्र संसारात जे जीवन त्या काळी ह्या दोघांनी अनुभवले, ते अगदी दृष्ट लागण्याइतके सुंदर होते (१८८०–१९०१). लग्नाच्या वेळी गोविंदरावांच्या तुलनेने दिसायला फारच सामान्य वाटलेल्या काशीताई, वयाच्या वाढीबरोबर आणि शिक्षणामुळे वाढलेल्या समजुतीच्या, आत्मविश्वासाच्या बळावर, पुष्कळच चांगल्या दिसू लागल्या होत्या. प्रमाणबद्ध बांधा, नीटनेटकी राहणी यांमुळे या दोघांमधील रंगाचे–गोऱ्या सावळ्या रंगाचे–अंतर सोडले, तर एकाला सुरूप आणि दुसऱ्याला कुरूप म्हणावे असे पुढे कधीही कोणाला वाटलेले नाही. त्या काळातील इतर संसारी

स्त्रियांच्या तुलनेने काशीबाईंचा संसार स्वप्नवत वाटावा असा सुंदर–सुखद होता. हरिभाऊंनी आपल्या 'गणपतराव' कादंबरीत, स्त्री-पुरुषांच्या नात्याबद्दलचे एक स्वप्न प्रत्यक्षात आलेले पाहायला मिळाल्याच्या आनंदातच, गोविंदराव व काशीताई यांचे या काळातील जीवन रेखाटले आहे. स्वतःच्या कल्पनेतील अनुरूप स्त्री-पुरुषांचे सविस्तर वर्णन केल्यानंतर 'गणपतरावां'च्या मुखाने हरिभाऊ म्हणतात, 'असे जोडपे माझ्या पाहण्यात एकच आहे, ते आपल्या विष्णुपंतांचे व लक्ष्मीबाईचे होय. ती दोघेही एकेठिकाणी वाढली, दोघेही सुशील, यामुळे त्यांच्यात जे प्रेम आहे असे मला वाटते तसे कोठेही नसेल. यमुनाबाई ऊर्फ लक्ष्मीबाईची विष्णुपंतास आलेली पत्रे मी पाहिली; ती किती मजेदार आहेत! ती एखाद्या कादंबरीत वाचलीशीच मला वाटतात. नाहीतर घरोघर विवाह आणि नवरा-बायको आहेतच.'

'गणपतराव'चे लेखन झाले त्या काळापासूनच हरिभाऊंच्या लिहायच्या खोलीत काशीताईंचे एक भारदस्त, तेजस्वी छायाचित्र लागले होते! हरिभाऊ त्या तसबिरीत नव्या मनूतील नव्या स्त्रीचे स्वप्न प्रत्यक्ष आकाराला आलेले पाहात. या सुखाच्या दिवसांची स्मृती म्हणून अगदी म्हातारपणापर्यंत, गोविंदरावांची या प्रारंभीच्या काळातील काही पत्रे काशीताईंनी जपून ठेवलेली होती. जीवनोत्साहाच्या वाटेवर आरूढ झालेल्या तरुण गोविंदरावांनी त्यात काशीताईंना 'प्यारी बेगम', 'बेगम-साहेबा' असे संबोधले होते आणि 'तुमचे नबाबजादे' अशी तृप्त, फर्डी सही ठोकलेली होती!

काशीताईंच्या शिक्षणाने, सहजपणेच, कानिटकरांच्या घराचे वातावरण काही बाबतींत इतर ब्राह्मण कुटुंबांपेक्षा थोडे वेगळेही होऊन गेले होते. इतक्या जुन्या काळात स्त्री-पुरुषांच्या 'सहभोजना'चे कार्यक्रम त्यांच्याकडे होत. 'पतीच्या बरोबरीने अनेक विषयांवर पत्नी चर्चा करीत आहे, पुरुष स्त्रियांच्या मतास मान देऊन त्या मतांचा आनंदाने स्वीकार करीत आहेत, पतीच्या मित्रांबरोबर संभाषणे करण्यासाठी बैठकीच्या खोलीत पत्नी येऊन बसलेली आहे'—हे हरिभाऊंना दिसलेले कानिटकरांच्या गृहसौख्याचे चित्र त्या काळी आणि पुढेही बराच काळ अगदी अपूर्व, सुंदर आणि असंभाव्य वाटावे असे होते. कालांतराने एकदा नाट्यछटाकार दिवाकरांची आणि गोविंदरावांची रस्त्यात गाठभेट झाली होती. गोविंदरावांनी त्यांना साहित्यचर्चा करीत करीत घरी नेले आणि दिवाणखान्यात काशीताईंना हाक मारून त्यांच्यासह नाट्यछटाकारांशी नव्याजुन्या पुस्तकांबद्दल गप्पा मारल्या. आपण पाहिलेल्या त्या अद्‌भुत सुंदर सहजीवनाची नोंद सुखावलेल्या, संवेदनाशील नाट्यछटाकारांनी आपल्या रोजनिशीत हळुवारपणाने घरी आल्यावर करून ठेवली!

मैत्रीच्या प्रारंभकाळात हरिभाऊंना दिसलेले हे जोडपे 'हरिभाऊंची पत्रे' या काशीताईंनी संपादित केलेल्या पत्रव्यवहारातही आपल्याला पाहावयास मिळते.

दा. क. ३१०९

'रंगराव'ची काही प्रकरणे लिहिल्यानंतर सांगरलेल्या, अडखळलेल्या काशीताईंची या पत्रांत हरिभाऊंनी भरपूर स्तुती केली आहे. ही स्तुती, अर्थातच, आज अतिशयोक्तीपूर्ण वाटावी अशी आहे. कादंबरी लिहिणारी, पाश्चात्त्य साहित्यातील आधुनिकतेचा थोडाफार परिचय झालेली मराठी स्त्री या वेळेपर्यंत तारुण्याच्या डोळ्यांना दिसूही शकलेली नव्हती, ही या वेळची वस्तुस्थिती ध्यानात घेतली, तरच हरिभाऊंच्या त्या उद्गारांचा नेमका अर्थ कळू शकेल. या पत्रव्यवहारात पहाटे चार वाजता उठून पत्र लिहिणारे व काशीताईंकडून वेळेवर उत्तर न आल्यास स्वतःचे स्वप्नचित्र काही आकस्मिक कारणाने विनसणार तर नाही ना, म्हणून शंकाकुशंकांनी व्याकुळ झालेले हरिभाऊ आपल्याला दिसतात; कधी या उभयतांच्या मैत्रीला आपण पात्र ठरत नाही की काय, या कल्पनेनेसुद्धा त्यांना बेचैनी येते. 'हॅव आय इन एनी वे ऑफेंडेड यू अँड युवर वर्दी वाइफ?...ओ! व्हाय शुड यू वी सो क्रुएल टु युवर हरिपंत?' अशा आर्जवपूर्ण पद्धतीने 'डोळ्यांत तेल घालून' पत्राची वाट पाहताना मूळचेच मिष्किल असलेले हरिभाऊ कधी अख्ख्या पुण्यातील तेल संपल्याची घोषणाही करतात!

ह्याच काळात काशीताईंनी इंग्रजी शिकावे, वाचावे यासाठी गोविंदरावांप्रमाणेच हरिभाऊंनीही खूप धडपड केली होती. जेन ऑस्टिनची 'प्राइड अँड प्रेज्युडीस' काशीबाईंसाठी पोस्टाने पाठविताना, काशीबाईंना ती स्वतःची स्वतः वाचता येणार आहे या कल्पनेने ते केवळ हवेत तरंगत होते!

कानिटकरांचा उल्लेख हरिभाऊ बऱ्याच वेळा 'हॅपी कपल' असाच करीत. तालुक्याच्या गावातील स्वतंत्र संसारात, लहान मुलाबाळांत आणि एकमेकांना सुखावणाऱ्या वाङ्मयास्वादात खरोखरच पहिली दहा वर्षे हे जोडपे अगदी नितांत रमलेले होते. 'मनोरंजन आणि निबंधचंद्रिका' यांमधून काशीबाईंची 'रंगराव' व गोविंदरावांची 'स्त्रियांची परवशता' ही प्रत्येक अंकामध्ये क्रमशः प्रसिद्ध होत होती. डॉ. आनंदीबाईंचे चरित्र लिहिण्याच्या निमित्ताने काशीबाईंनी आपला इंग्रजीचा अभ्यास बराच वाढविलेला होता. ज्या 'सब्जेक्शन ऑफ वुइमेन' बद्दल पुरुषमंडळी सतत बोलत आणि 'जे या जन्मी तुम्हाला वाचता येणार नाही' असे चिडून गोविंदराव म्हणत, ते स्वतः काशीबाईंनी या काळात, अगदी मिल्लसाहेबाच्या भाषेतून वाचलेले होते आणि मिल्च्या चरित्रातील मिल् पति-पत्नीच्या नात्याचा संदर्भ देऊन, या पुस्तकाच्या आपल्या भाषांतरात कानिटकरांनीही लिहिले होते, 'जेव्हा दोन माणसांचे विचार व कल्पनातरंग सर्वांशी एक होतात, जेव्हा बौद्धिक किंवा नैतिक अशा संबंधांचे विषय घेऊन त्यांचा दररोज होईल तितका खल ती करीत असतात, जेव्हा एकाच तत्त्वाचा आधार घेऊन त्याजवर विचार करून एकाच प्रकारचे सिद्धान्त ती ठरवतात, तेव्हा विशेष कल्पना प्रथम दोघांपैकी कोणाच्या डोक्यातून निघाली या प्रश्नाचा निकाल ती

कोणाच्या लेखणीतून खाली आली ह्याजवरून फारसा करिता येत नाही. अशा वेळी असा संभव असतो की, त्या कल्पनांना लेखनरूपी शृंखलेने बद्ध करण्यात त्या दोघांपैकी साहाय्य अगदी कमी असेल त्याचे कल्पना काढण्याच्या कामी अतिशय असेल!'

स्त्री-पुरुष सेव्य-सेवक संबंधावर आधारलेले आपल्याकडील वैवाहिक जीवन नाकारणारे व 'नवऱ्यापेक्षा स्त्री कमी बुद्धिवान असेल तर पुरुषावरही अपायकारक परिणाम होतो' हे सांगणारे गोविंदराव आणि पतीची इच्छा ओळखून ध्यासाने आणि धाकाने लेखन-वाचन करणाऱ्या काशीताई, दोघेही हरिभाऊंची सुखद स्वप्नपूर्तीच करीत होती.

पंधरा वर्षांपूर्वी जेव्हा कुरूप, खेडवळ आणि अडाणी अशी बायको आजोबांच्या धाकाने गोविंदरावांना पत्करावी लागली होती, तेव्हा घोरपडच गळ्यात पडल्याचे दुःख त्यांना झाले होते. पण सुरवंटाचे फुलपाखरू व्हावे तसे झाले. साहजिकच काही काळ नवऱ्याने टाकूनच दिलेला आपला संसार निभावूनच गेला म्हणून मध्यमवयीन काशीताईंनीही सुखाचा सुस्कारा सोडला.

आता गोविंदरावांची सेवानिवृत्ती तशी जवळच आली होती.—पण वाटले त्यापेक्षा थोडे वेगळेच घडत गेले...

गोविंदराव कानिटकर १९०६ साली अहमदनगरला हंगामी फर्स्ट क्लास सबजज्ज म्हणून नेमले गेले. नोकरीतील उरलेली पाचसात वर्षे याच सन्माननीय हुद्द्यावर काम करण्यात जातील असे त्यांना वाटले होते. पण अहमदनगरला गेल्यावर लोकमान्य टिळकांच्या 'ओरायन आणि आर्यांचे मूळ वसतिस्थान' या ग्रंथावर त्यांनी व्याख्याने दिली व ब्रिटिश नोकरशाहीचा रोष, इच्छा नसताना, स्वतःवर ओढवून घेतला. अगदी आकस्मिक रीतीने नगरच्या हंगामी नेमणुकीची मुदत संपताच गोविंदरावांच्या हाती, पुन्हा एकदा मूळ गावी, येवल्यालाच सेकंड क्लास जज्जाच्या जागेवर हजर होण्याचा हुकूम येऊन पडला! याबाबत दीर्घकाळ पत्रव्यवहार करून तो व्यर्थ ठरल्यावर मानहानी पत्करायची नाही असे ठरवून गोविंदरावांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेऊन टाकली (१९०९).

सेवानिवृत्त झाल्यानंतर स्थायिक कोठे व्हायचे हा प्रश्न गोविंदरावांच्या दृष्टीने फारच सोपा होता. शाळा-कॉलेजातील दिवसांपासून असलेली काव्यशास्त्रविनोदात आणि सर्व ललित कलांच्या आस्वादात रमण्याची त्यांची आवड पाहता, आता पुणे शहरासारखे राहायला सोयीचे दुसरे शहर नव्हते. दरवर्षी कोर्टाला उन्हाळ्याची सुट्टी असायची, तेव्हा कुटुंबातील माणसांच्या, ग्रंथालयांच्या, सभासंमेलनांच्या लोभाने त्यांची पावले आजवर पुण्याकडे वळत असतच, तथापि ह्या वेळचे येणे

मागच्या अनेक येण्यांहून वेगळे होते. कानिटकरांच्या कौटुंबिक स्थितीत बाह्यतः नसला तरी अंतरंगात ह्या काळात बराच बदल झालेला होता. पुण्यात आता पूर्वीचे रावबहादूर वासुदेव बापूजी कानिटकरांचे वैभवशाली एकत्र कुटुंब राहिले नव्हते. गोविंदराव आणि त्यांचे तिघे बंधू यांच्यामध्ये १९०४ साली, वासुदेव बापूजींच्या निधनानंतर, वाटण्या झालेल्या होत्या. १९०९ साली गोविंदराव काशीताई यांनी पुण्यात पाऊल ठेवले तेव्हा, त्यांच्या पुष्करिणी हौदाजवळील मोठ्या कानिटकर वाड्यात चार वेगवेगळ्या चुली पेटू लागलेल्या होत्या. या वाड्यातील ईशान्य दिशेचा भाग गोविंदरावांच्या वाटणीला आलेला होता. मुख्य दरवाज्याचा भाग सामाईक; माडीवर जाण्याचा जिना, दिवाणखान्यात-खोल्यांत जाण्याचे मार्ग, सर्वच भाऊबंदांच्या हद्दीतून गेलेले : शिवाय आंघोळीच्या, धुण्याभांड्याच्या जागाही सामाईकच.

आपल्या जुन्या एकत्र कुटुंबातील माणसांच्या बऱ्यावाईट स्वभावाची योग्य कल्पना असलेल्या काशीताईंनी वाटणीच्या वेळीच, गोविंदरावांना, स्वतः आणि मुलांकडूनही निक्षून सांगितले होते की, या मोठ्या वाड्यातला एक कुठलातरी हिस्सा घेण्यापेक्षा वाटणी म्हणून रोख रक्कम घ्या. आपण आपल्या सोयीचे घर बांधून दुसरीकडे राहू. पण हळव्या मनाच्या पितृभक्त गोविंदरावांनी आईच्या आग्रहाखातर वडिलार्जित वाड्यातच राह्यचे ठरवून टाकले. पुण्याला येताना आलेले नोकरीबाबतचे मनावरचे सावट त्यांनी प्रयत्नपूर्वक दूर केले. माडीवरच्या झुंबरांच्या दिवाणखान्यात उत्साहाने आपली बैठक सजविली; त्याच्याच जवळची एक खोली आपल्या स्वतःच्या ग्रंथालयासाठी निवडली आणि शिसवी लाकडाच्या कपाटातून रचलेल्या उत्तमोत्तम इंग्रजी, संस्कृत, मराठी पुस्तकांमध्ये दर आठवड्याला ते भरही घालीत गेले. काव्ये, नाटके, कादंबऱ्या, तत्त्वज्ञानासंबंधीची पुस्तके...वाङ्मयवेड्या, जिज्ञासू गोविंदरावांना वाचनात वर्ज्य असे काही नव्हतेच. मुख्य म्हणजे या सर्वांत गर्क असताना खालच्या मजल्यावरच्या स्वयंपाकघरातून भांड्याला लागणारी भांडीही त्यांना ऐकू येणार नव्हती !

सेवानिवृत्त गोविंदरावांचा दिवसाचा कार्यक्रम त्यांच्या लहरींनुसार, विविध आवडींनुसार, पण सतत उत्साहाने चालू असायचा. कधी सकाळीच ते लांब टेकडीकडे फिरायला जायचे. उंचावरून सूर्योदय पाहण्यासाठी ! ही त्यांची खास आवड. येताना पाना-फुलांबरोबरच सुरेख रंगांचे, वेगवेगळ्या आकारांचे दगडसुद्धा प्रेमाने घेऊन यायचे. फिरणे आटोपून घरी आल्यावर स्वच्छ आंघोळ झाली की मोठ्या रसिकतेने आपल्या गोऱ्यापान भव्य कपाळावर भुवयांच्या मध्ये, चमकदार केशरी गंध लावायचे आणि मग नव्या कपड्यांची घडी मोडावी इतक्या हौसेने नवीन आणलेली पुस्तके ते उलगडू लागायचे. कधी सकाळीच उठून तंबोरा घेऊन गायला बसायचे. शास्त्रीय संगीताची, भक्तिपर पदे म्हणण्याची विलक्षण ऊर्मी त्यांना यायची.

संगीत नाटकांतल्या पदांच्या, लावणी-पोवाड्यांच्या, लोकगीतांच्या अनेक चाली डोक्यात, जिभेवर घोळत असायच्याच. घरातील मुले अजून अंथरुणातून जागी होत आहेत तो गोविंदरावांचे म्हणणे –' तात्यां 'चे–' प्रिये पहा, रात्रीचा समय तो सरून होत उषःकाल हा ' हे सुरेल पद हार्मोनियम-तंबोऱ्याच्या साथीसह त्यांच्या कानावर यायचे. मग कधी कधी मुलेही झटकन उठून स्वतःचे आवरून तानपुरा, व्हायोलिन घेऊन अवतीभोवती बसायची. सुरांनी भरलेल्या या आसमंतात काशीताई त्यांची त्यांची स्वयंपाकघरातील सकाळची कामे उरकीत असायच्या.

एकतारीवर भजन म्हणून घरातल्या आजारी माणसाची करमणूक करायची हेही काम गोविंदरावांच्या अगदी आवडीचे. ताप उतरत असताना, झोपेच्या कुशीत शिरताना, मुलांना नातवंडांना ऐकू यायची ती तात्यांची झंकारलेली सतार ! ते नुसते गणपतीच्या दिवसांत गणपती आणायला गेले तरी तीनचार वेगवेगळे गणपती आणायचे ! कोणाच्या पीतांबराचा रंग आवडला, कोणाचा मुकुट आवडला, कोणाची सोंड आवडली तर कोणाचे ध्यान आवडले म्हणून !

वऱ्याच वेळेला गाण्याची, वाद्यांची किंवा वाचनाची अशी बैठक जमलेली असतानाच हरिभाऊ आपटे, लक्ष्मणशास्त्री लेले, माधवराव जोशी, बापूसाहेब आंबेकर, वि. वा. भिडे यायचे. हरिभाऊंची तर नेहमीच मजा व्हायची. सकाळी सकाळी आनंदाश्रमातून फिरायला–व्यायामासाठी–म्हणून ते अगदी वेगाने बाहेर पडायचे. असे वाटायचे, आता हे दोनचार मैल तरी झरझर फिरून येणार. पण जवळच असलेल्या कानिटकरांच्या किंवा अंजनगावकरांच्या घरी गरम गरम चहा पिऊन खुशीत, दहा वाजता डुलत डुलत घरी परतायचे ! इतर मित्रमंडळी मिष्किलपणे त्यांना विचारायची, ' काय हरिभाऊ, झाले का सकाळचे फिरणे ? ' हरिभाऊ गंभीरपणे उत्तर द्यायचे, ' हो, गेलो होतो ना पुष्करतीर्थावर ! ' कधी म्हणायचे, ' अहो, आज अंजनगड चढून आलो; आहात कुठं ? ' हरिभाऊंच्या उत्तरातील आवेश समविचारांच्या कलास्वादप्रेमी स्नेही मंडळींच्या झालेल्या सुखद गाठीभेटीतील आनंदातून आलेला असे. विचारा प्रश्न विचारणाराच मनात वरमून जाई. हरिभाऊंचे मित्रप्रेम हा त्याच्याही कौतुकाचा विषय असेच.

हरिभाऊंचे ' पुष्करतीर्थ ' म्हणजे समोर चहाचा सरंजाम ठेवून राजकीय, सामाजिक वादविवादात आणि काव्यशास्त्रविनोदात वेळेचे भान विसरलेली गोविंदराव व काशीताई कानिटकर यांच्या पुष्करणीच्या जवळच्या वाड्यातील स्वयंपाकघराजवळची खोली ! या खोलीत डॉ. आनंदीबाई जोशी यांचे यजमान–गोपाळराव–आले म्हणजे तर वादविवादाला अंतच नसायचा. एखादेच वाक्य बोलून सर्वांना

हसविण्याचे काम हरिभाऊंचे, तर सर्वांना सुनावल्यासारखे सतत उंच स्वरात बोलण्याचे काम गोपाळरावांचे ! दहा वाजल्यानंतर नाइलाजाने काही ना काही कामाची आठवण झाल्यामुळे पुरुषमंडळी आणि मुलांना वेळेवर शाळेत पाठविले पाहिजे म्हणून काशीताईंसह बायकामंडळी या वातावरणातून हळूहळू बाहेर पडायची. या पुण्यतीर्थावरच नाट्यवाचने व्हायची आणि नाटककाराने गोविंदरावांची सूचना स्वीकारली की काशीताईंची सूचना स्वीकारली, ह्याची चर्चा नंतर दोघांकडे स्पर्धा-युक्त नजरेने पाहणाऱ्या तरुणमंडळींत जोरजोरात चालायची !

काशीताईंच्या घरात स्वयंपाकासाठी बाई असायची, हाताखाली एखादी मोलकरीण असायची, आणि तरीही पहाटेपासून रात्रीपर्यंत कोणत्या ना कोणत्या उद्योगात त्या स्वतः सतत गर्क असायच्या. अगदी पहाटेची ध्यानधारणा झाली की जवळच असलेल्या पुष्करणीच्या हौदाचे पिण्यापुरते पाणी, मनातल्या मनात स्तोत्रे म्हणत म्हणत त्या घेऊन येत शिकण्याच्या निमित्ताने पुण्यात येऊन राहिलेले काही ब्राह्मण विद्यार्थी याच वेळी स्नानासाठी पुष्करणीच्या हौदावर येत; ते नजरेनेच, 'ह्या त्या शिकलेल्या, कादंबरी लिहिणाऱ्या, सभेत बोलणाऱ्या काशीताई कानिटकर' असे एकमेकांना खुणावून विस्मयाने, आदरपूर्वक सांगत !

पैशाचे व्यवहार गोविंदराव कधीच पाहात नसत. पूर्वीपासूनच पगार आला की, कारकुनाच्या हाती तो घरी पाठवून द्यायचा आणि कधी स्वतःसाठी लागले की घरातून पैसे मागून घ्यायचे असा त्यांचा शिरस्ता होता. सणसमारंभ, खरेदी, मुलांच्या शाळा-कॉलेजचे खर्च, नोकरमाणसांचे पगार—सर्व काही काशीताईच पाहात. आपले घरदार, भांडीकुंडी, कपडेलत्ते हे सगळे एखाद्या अशिक्षित सुगृहिणी इतकेच लखलखीत, नीटनेटके असले पाहिजे, नाहीतर स्त्रीशिक्षणाचा उद्धार होईल हे त्या जाणून होत्याच.

या उत्तरकाळात घरात कुणा सूनबाईच्या काळ्या-गोऱ्या रंगाचा विषय आला, खेडवळ-अडाणीपणाचा विषय आला की काशीताई ठामपणाने सांगायच्या, 'पण आता ती आपली –कानिटकरांची झाली आहे ना ? पुन्हा कुणी ही चर्चा करू नका !' मागच्या पिढीने याबाबत त्यांना दिलेले कटू अनुभव मनातून त्यांना आठवायचे. पण आता त्या स्वतःच्च मोठ्या वाड्यातल्या मोठ्या जाऊबाई, मोठ्या सासूबाईही होत्या. थोडा वरचा सूर काढण्याचा अधिकार त्यांना होताच. शाळेत जाऊन शिकणाऱ्या एखाद्या सख्ख्या-चुलत जावेला, पुतणीला त्या आवर्जून उत्तेजन देत राहात. शिवाय वासुदेव बापूजींच्या जुन्या काळातील आश्रित मंडळींच्या मुली माहेरपणाला यायच्या, त्याही आता त्यांच्याकडेच. कुणाची बाळंतपणे करायची, कुणाच्या मुलांच्या शिक्षणाच्या सोयी करायच्या, कुणाचे वार लावून द्यायचे, तर कुणाचे दुरावलेले संसार सांधून देण्याची धडपड करायची...

या पुष्करणीच्या हौदाजवळील वाड्यात दुपारच्या वेळी काशीबाई गोविंदरावांचे वाचन-लेखनाचे कामही मोठ्या स्वास्थ्याने आणि सवडीने चालायचे. गोविंदरावांचा प्रश्नच नव्हता; ते सतत लिखाण, वाचन, वादन, गायन, चर्चा यांच्या जगातच रमणारे, पण प्रपंच सांभाळून सामाजिक जबाबदारी म्हणून लेखनाकडे वळणाऱ्या काशीताईंना भल्या पहाटेखेरीज वा भरदुपारखेरीज कोणती वेळ मिळणार ? नवयुग, मासिक मनोरंजन यांच्यासाठी पाठवायचे लेखन, दरवर्षीची भारदस्त वसंत व्याख्यान-माला, सेवासदनाच्या निमित्ताने गावोगावी जाऊन, अधूनमधून स्वतःला द्यावी लागणारी व्याख्याने, दोघांना भरपूर गुंतवून ठेवायची. कधी काशीताईंचे व्याख्यान ऐकल्यावर जुन्या बायका त्यांची दृष्टसुद्धा काढायच्या ! आजवर त्यांच्या मनात साठलेले सर्व इतक्या चांगल्या रीतीने दुसऱ्या कोणी स्त्रीने मांडले होते ? शिवाय काशीताई बोलत ते समयोचित. घरगुती दाखले देत आणि अगदी परखडपणानेही.

कधी दुपारच्या वेळी हरिभाऊंच्या द्वितीय पत्नी–रमाबाई यायच्या, घरातील सगळे त्यांना 'वेणुमामी' म्हणत. त्या आणि काशीताई दोघी मिळून जवळच असलेल्या सेवासदनात जात. कधी कामासाठी घोडागाडी जोडून हिंगण्याला असणाऱ्या कर्व्यांच्या आश्रमात जावे लागायचे, तर कधी संगमावर राहणाऱ्या डॉ. भांडारकरांच्याकडे. पर्णकुटीत राहणाऱ्या लेडी ठाकरसी व विठ्ठलदास ठाकरसी यांच्याकडे जाताना श्रीमती रमाबाई रानडे या दोघींनाही बरोबर घेऊन जायच्या. या वेळी सेवासदनासाठी करायची कामे–शिक्षणासाठी बायकांची मने वळविण्यापासून, खर्चायला पैसा मिळविण्यापर्यंत–सर्वच काही असत. शिवाय संस्था बघायला येणाऱ्या बड्या देशी-परदेशी मंडळींना संस्था दाखवायचे काम रमाबाई, काशीबाई या दोघी अध्यक्ष-उपाध्यक्ष स्त्रियांचेच असायचे. रमाबाई इंग्रजी उत्तम लिहीत, बोलत; काशीबाईंना इंग्रजी बोलण्याचा सराव नसायचा. मग पाहुण्यांना द्यावयाच्या भारतीय पद्धतीच्या पदार्थांच्या स्वादिष्ट मेजवानीची जबाबदारी काशीताई स्वीकारीत. श्रीमती रमाबाई आणि सौ. काशीबाई यांच्या या सार्वजनिक कामाला उत्तेजन देणारे गोविंदराव आणि हरिभाऊ हेही सेवासदनात वरचेवर व्याख्याने देण्यासाठी जात. हरिभाऊ गीतेवर, तर गोविंदराव एलिझाबेथ ब्राउनिंगवर बोलत. आणि 'शारदा' कर्ते गोविंद बल्लाळ देवल आपल्या सुशिक्षित भगिनींच्या चाललेल्या धडपडीस साहाय्य म्हणून स्वतः दरवर्षी एका विधवेच्या शिक्षणाचा सर्व खर्च देत; प्रसंगोचित पदेही रचून देत.

कधीमधी सेनानिवृत्त गोविंदरावांना भिंतीवर मोठमोठी चित्रे काढायची लहर यायची. मोठा मुलगा–माधवराव–बी. ए. झाल्यावर जे. जे. स्कूलमधून डिप्लोमा घेऊन आलेला. तो तात्यांसह चित्रे काढायला त्यांच्याजवळ उभा असायचा मुंबईला.

काही दिवस त्याने चित्रकाराचा व्यवसाय केलेला. चित्रशाळेने प्रसिद्ध केलेल्या महाभारतात त्याची अत्यंत भावदर्शी अशी, रविवर्म्याची आठवण करून देणारी, सुंदर प्रसंगचित्रे आहेत. लहानपणी–अगदी चौथ्या इयत्तेत असतानाच–या हरहुन्नरी स्वारीने हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतील काही चित्रे रेखाटलेली! 'रूपनगरची राजकन्या' याच्याच कुंचल्यातून आकाराला आलेली.

असा हा देखणा, गुणी मुलगा–माधवराव–या काळात मनातून मात्र फार दुःखी होता. त्याची तरुण पत्नी–गोदावरी–वर्षापूर्वीच दिवंगत झाली होती (१९०८). स्टुडिओच्या निमित्ताने मुंबईत असतानाच थिऑसॉफी लॉजच्या चाललेल्या उभारणीत तो लक्ष घालू लागला होता, तेव्हापासून माणसाच्या जन्ममरणाचा, भावसंबंधाचा अर्थ शोधीत, थिऑसॉफीच्या तत्त्वविचाराचा मागोवा घेत, भावनाप्रधान माधवराव झपाट्याने खोल खोलवर निघाला. त्याला रोखून धरीत होती ती त्याच्या आणि गोदावरीच्या सांसारिक आयुष्याची स्मृती असलेली दोन चालतीबोलती, लहान, गोजिरवाणी चित्रे: सरला (दुर्गा) आणि मधुमालती. तसे त्यांना सांभाळण्याचे कामही, मुलींची आजी म्हणून, काशीताईच करीत.

एक दिवस बनारसहून न्या. काशीनाथ त्र्यंबक तेलंग यांचा मुलगा पंढरीनाथ तेलंग याचे माधवरावाला पत्र आले आणि तो एकटाच झपाटल्यासारखा बनारसला, तिथल्या कॉलेजिएट हायस्कूलमध्ये अध्यापकाची नोकरी करण्यासाठी निघून गेला. आपल्या या हुशार, तरुण मुलाने पुन्हा संसार थाटावा अशी गोविंदरावांची फार इच्छा होती. ते माधवरावाकडून स्वतःच्या घराण्याचा मोठा वारसा–वासुदेव बापूजींचा वारसा-तो चालवील अशी अपेक्षा करीत होते. पण तो मात्र 'चित्रकाराचा व्यवसाय करण्याचा आपला बेत नियतीला पसंत नाही' असा निष्कर्ष काढून थिऑसॉफीला स्वीकारून यापुढे धर्मकार्य, शिक्षणकार्य हेच आपले जीवितध्येय असे मनोमन ठरवून बनारसला गेला.

माधवराव बनारसला निघून गेला आणि गोविंदरावांच्या मनात थिऑसॉफीच्या तत्त्वज्ञानाचा पुनर्विचार सुरू झाला–असा पुनर्विचार करता करता, तीव्र आंतरिक उलघालीतून, गोविंदराव हळूहळू थिऑसॉफीच्या कट्टर विरोधकांपैकी एक होऊन बसले! घरीदारी, पत्रव्यवहारातून, थिऑसॉफीविरोधी बोलावे हा त्यांचा–चिडीतून आलेला-एक नेहमीचा विषय होऊन बसला. दरवर्षी वसंत व्याख्यानमालेत कोणीतरी परप्रांतीय वा मराठी माणसाने या विषयावर बोलण्यासाठी पुण्यास यावे आणि गोविंदरावांनी व्याख्यानानंतर उपवक्ता म्हणून विरोधी बोलावे हेही पुण्याच्या सार्वजनिक जीवनात ठरल्यासारखेच झाले. गोविंदरावांचे बोलणे केवळ तात्त्विक पातळीवरचे नाही, ते व्यक्तिगत निराशेतून आले आहे हे लोकांच्या लगेचच लक्षात येई...

खुद्द काशीताईंच्या पूर्वायुष्यावर जसा गोविंदरावांचा प्रभाव होता, तसा उत्तर

आयुष्यात माधवरावाच्या विचारांचा होता. थिऑसॉफीची ओढ त्यांना गोविंदरावांमुळे निर्माण झाली आणि माधवरावामुळे ती अधिक स्थिर झाली. जे. कृष्णमूर्तींचे पहिले अगदी लहानसे पुस्तक 'ऑट द फीट ऑफ द मास्टर' याचे 'साधनचतुष्टय' नावाचे जे भाषांतर काशीताईंनी केले आहे, ते माधवरावांच्या सांगण्यावरून. या घटनेपूर्वीही आयुष्यातील काही दुःखद अनुभवांनंतर, थिऑसॉफीचे वाचन करू लागलेल्या गोविंदरावांनी धुळे–मालेगाव येथे स्वतःच थिऑसॉफीवर अनुकूल भूमिकेतून व्याख्यानेही दिली होती काशीबाईंना त्यासंबंधीची इंग्रजी पुस्तके वाचावयास साह्य केले होते व त्यांच्या सभासदत्वाचा फॉर्मही आपण स्वतःच भरला होता! पण त्याच गोविंदरावांना माधवराव बनारसला गेल्यानंतर, काशीताईंनी आणि माधवरावानेही थिऑसॉफी स्वीकारू नये असे स्पष्टपणाने वाटू लागले. गोविंदराव त्या दोघांना सभासदत्व सोडण्याचा आग्रह करू लागले. संसारसुखाकडे पाठ फिरवून निघालेल्या मुलाची धर्मनिष्ठा काशीताईंनी समजून घेतली; पण गोविंदरावाना मात्र ती दुःख आणि चीड आणणारी ठरली. पतिपत्नींतील हा धार्मिक मतभेद, स्त्री-शिक्षणाचा सावधपणाने विचार करणाऱ्या पुण्यातील त्या वेळच्या लोकांच्या जाहीर चर्चेचा अतिविषय होऊन बसला. 'शिकलेल्या बायका नवऱ्याला अमान्य असलेली धर्ममते स्वीकारतील, तर आपले कुटुंबजीवन कसे चालणार' ही शंका मनात बाळगणारी, स्त्री-स्वातंत्र्यविरोधी माणसे तर कानिटकर दांपत्याच्या घरात या निमित्ताने डोकाडोकावून बघू लागली.

१९१५–१६ साली 'क्रीडाभवना'त चालू असलेल्या वसंत व्याख्यानमालेत, एक दिवस काशीताईंचे थिऑसॉफीसंबंधी व्याख्यान झाले. व्याख्यानाला पुष्कळ गर्दी जमलेली. स्वतः गोविंदरावही श्रोत्यांत उपस्थित होते. काशीताईंच्या व्याख्यानानंतर एक उपवक्ते म्हणून ते व्यासपीठावर चढले आणि 'थिऑसॉफीतील ऑकल्ट म्हणजे काय ते कोणी मला सांगू शकेल काय?' असा खोचक प्रश्न त्यांनी वक्त्याबाईंना आणि श्रोत्यांना विचारला. त्यांच्या या प्रश्नाने, अर्थातच, श्रोत्यांमध्ये हास्याची मोठी लाट उसळली. दुसऱ्या एका धर्मविषयक व्याख्यानप्रसंगी 'आपले यजमान हे खरे म्हणजे नास्तिकच आहेत' अशी तक्रार काशीताईंनीही व्यासपीठावरून जाहीरपणे केली! अध्यक्षपदी विराजमान असलेल्या सेवासदनाच्या गोपाळराव देवधरांनी समारोपात या भाषणाचे वर्णन 'ए फायटिंग स्पीच' असे केले.

मग पुण्यातील लोकांना बराच काळ चर्चेचा एक 'गहन' विषय मिळाला– इतका महत्त्वाचा की आठनऊ वर्षांनंतरही, गोविंदरावांवरील मृत्युलेखात त्याचा आवर्जून उल्लेख व्हावा! स्वतःच्या यजमानांना ते 'नास्तिक' आहेत असे पत्नीने म्हणणे म्हणजे त्या काळी मोठे साहस वाटणे स्वाभाविकही होते; कारण सर्वसामान्य लोकांच्या मनात नास्तिकता आणि अनेक मानवी दुर्गुण यांचे एक नाते निष्कारणच

दृढमूल होऊन बसलेले होते. वास्तवात सौंदर्यप्रेमी, कलाप्रेमी, धर्मजिज्ञासू गोविंदराव जसे पूर्णपणे बुद्धिवादी वा तार्किक वृत्तीचे नव्हते, तसेच गतानुगतिक वृत्तीने अंधश्रद्धा सांभाळून जगण्यासही तयार नव्हते. ते स्वतःला नास्तिक म्हणून घ्यायलाही तयार नव्हते; किंबहुना स्वतःच्या 'संमोहावस्थे'चा शेवट व्हायलाच हवा असेही त्यांना निकडीने वाटत नव्हते. नव्या इंग्रजी राजवटीच्या काळात उपलब्ध झालेली ऐहिक जीवनविकासाची संधी स्वतःसाठी आणि स्वसमाजासाठी भारतीय स्त्री-पुरुषांनी पुरेपूर राबवली पाहिजे एवढेच कौटुंबिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय आदी प्रश्नांचा विचार करताना त्यांना आग्रहाने ठामपणे म्हणायचे होते. मिल-स्पेन्सरच्या वाचनामुळे विशेष स्नेह जुळलेल्या गोपाळराव आगरकरांची धर्मदृष्टी जरी गोविंदरावांना जवळची होती तरी ती पेलण्यासाठी आवश्यक असलेले आगरकरांसारखे मानसिक बळही त्यांच्याजवळ नव्हते. पण माधवरावांनी नेमका ह्याच जीवनदृष्टीला हादरा दिला होता.

खरे तर, काशीताईंचीही जी थिऑसॉफीची कल्पना प्रत्यक्ष जीवनात दिसत होती, ती अगदीच सर्वसामान्य स्वरूपाची होती. आजच्या काळात ज्याला सर्वधर्मसमन्वयाचे, व्यापक, मानवतावादी तत्त्वज्ञान म्हणता येईल, त्याच्यावरच आचारांमध्ये त्यांचा अधिक भर होता. आपल्या धर्ममतांसाठी कर्तव्यकर्म, घरदार सोडून, आत्मशोधार्थ, त्या कुठेही अरण्यात निघाल्या नव्हत्या. परंतु जाहीर व्याख्यानांतून थिऑसॉफीने सांगितलेल्या पूर्वजन्म, पुनर्जन्म, बंध आणि मोक्ष यांसंबंधीच्या तत्त्वविचारांवर असलेला आपला विश्वासही काशीताई आग्रहाने बोलून दाखवीत असत. प्रत्यक्ष घरात वावरताना काशीताईंच्यावर थिऑसॉफीचा झालेला परिणाम एवढाच दिसायचा की त्यांचा जुना आचारधर्म त्या अधिक डोळसपणाने करीत राहायच्या. श्राद्धकर्म कशासाठी करायचे, गायत्रीमंत्र कशासाठी म्हणायचे, हे काशीताई थिऑसॉफीमान्य तत्त्वांच्या आधारे स्वतः समजून घेऊन इतरांना सांगत असत.

सगळ्या पुण्यामध्ये कानिटकर 'सुधारकां'त गणले जात असले, तरी वास्तविक त्यांच्या घरात सर्व जुने कुळधर्म-कुळाचार पूर्वीप्रमाणेच चालू असायचे. त्यामुळे टिळक-दाभोळकर ही त्यांची व्याही मंडळी 'यांना सुधारक तरी का म्हणायचे' अशा पेचातही कित्येकदा दिसत. घरात थोडे सोवळेओवळे असेच; देवाची पूजा, नवरात्र, नैवेद्य, वैश्वदेव, श्राद्ध आणि ग्रहशांती इत्यादी सर्व नित्यनेमाने वा कारणपरत्वे होत. प्रथम मुलांची जेवणे झाली की मग पुरुषांची आणि त्यानंतर बायकांची पंगत बसायची असा, इतर घरांसारखाच क्रम इथेही असायचा. पायांतील जोडेवहाणा ओसरीवर काढल्याखेरीज कोणी घरात यायचे नाही; लहान मुली शाळेतून घरी परत आल्यावर खणाचे परकर-पोलके अंगावर असेल तर ते बदलून टाकून मगच घरात यायच्या. मुलींनी दररोज स्नानानंतर तुळशीला पाणी घालायचे आणि मुलांसह त्यांनीही गीतेचा अकरावा अध्याय म्हणायचा हेही त्यात ठरलेले असे. स्वतः गोविंदराव

व काशीताई यांचा पोशाखसुद्धा जुन्याच पद्धतीचा असे. धोतर, शर्ट, कोट, लाल पगडी, लाल जोडा ही गोविंदरावांची, आणि रेशमी काठाचे घनवडी लुगडे, खणाची चोळी, मऊ गादीचे लाल जोडे ही काशीताईंची वेषभूषा असायची. हळदीकुंकवाला जाताना काशीबाई नथ-बुगडीपासून सगळे दागिने अंगावर घालून, वर शाल किंवा शेला पांघरून चारचौघींसारख्याच जायच्या. संध्याकाळी सगळी मुले देवाला, घरातल्या वडीलमाणसांना नमस्कार करून पाढे, परवचा, श्लोक म्हणायची.—अशी ही जुनीच असणारी कानिटकर पति-पत्नी, समाजापुढे उभी राहून सुधारणाविषयक व्याख्याने देणारी आणि पुस्तके लिहिणारी आहेत, हे कोणी न सांगितल्यास तिऱ्हाइतास कळायचेही नाही. त्यांच्या या ब्राह्मणी जीवनात 'थिऑसॉफी' दिसायची, सुधारकी वृत्ती दिसायची, ती स्वच्छ, नीटनेटक्या राहणीत; शुद्ध संस्कारित वाणीत, कला-स्वादात; आणि घरातील माणसांच्या काहीशा मोकळ्या, तत्कालीन इतर कुटुंबांपेक्षा व्यक्तिस्वातंत्र्याला थोडे अधिक मानणाऱ्या, उच्चमध्यमवर्गीय वातावरणात.

एवढे खरे की, असे सर्व इतर ब्राह्मणी कुटुंबांप्रमाणेच पुष्कळसे असूनही थिऑसॉफी हा काशीताई आणि गोविंदराव यांच्या पति-पत्नीसंबंधात दुरावा निर्माण करणारा एक मोठा विषय होऊन बसला आणि माधवरावाच्या बनारसच्या, वास्तव्याने गोविंदरावांच्या मनात तो अखेरपर्यंत सलतही ठेवला. बायकोमुळे मुलगा हातातून गेला आणि मुलामुळे बायको अधिक आग्रही झाली, असा या सर्वांचा त्यांच्या दृष्टीने साधा निष्कर्ष होता.

त्या वेळचे पुणे खूप शांत होते; तरीही पुण्यातील गजबज टाळून चार दिवस कुठेतरी निवांत ठिकाणी राहायला जावे असे गोविंदरावांना नेहमीच वाटायचे. सिंहगडला आपटे मंडळींचा बंगला होता; तिथे कधी सगळ्या कुटुंबाची सहल जायची, वास्तव्य व्हायचे. शिवाय प्लेगच्या दिवसांत वरचेवर गावाबाहेर जाऊन राहायची गरजच पडायची. ह्याच सुमारास गोविंदरावांच्या वाटणीला पुण्याजवळच्या यवत या गावी असलेला वासुदेव बापूजींचा एक छोटा बंगलाही आला होता. खास स्वतःच्या आवडीचे 'शारदाश्रम' असे नाव त्यांनी त्याला दिले होते. या घराच्या भोवती भरपूर झाडी होती. जेवण झाल्यावर अगदी हात धुवायलासुद्धा ओढ्यावर जाता यावे असा एक लहानसा खळखळणारा ओढा शारदाश्रमाजवळून वाहात असायचा. आजूबाजूला फिरायला जाण्यासारख्या दोनचार फार सुंदर, दाट झाडीच्या जागा होत्या. तिथे सकाळ–संध्याकाळ गोविंदराव निवांत जाऊन बसायचे.

शिवाय गोविंदराव इथे राहायला येत तेव्हा आपली सतार-तंबोरादी सर्व वाद्ये आणि चित्रकलेची सामग्री बरोबर घेऊनच येत. 'तोंडी लावायला' म्हणून दुर्गा,

पदी, लालू, माली, अशी निर्मळ निरागस मुले–नातवंडे असत. पहाटेपहाटे उठून ते त्यांना तंबोऱ्यावर गायला शिकवीत. 'राधाधरमधुमिलिंद जयजय'च्या सुराने सुरू झालेला दिवस सभोवतालच्या शेतांतील हुरडा, बोरे व काशीताईंनी केलेले गरमागरम गाकर खाण्यात आणि दुपारच्या वेळी चांगली चांगली पुस्तके–मासिके वाचण्यात झपाट्याने संपून जाई. सकाळी पोरांचे खाणे झाले, ती बाहेर खेळायला गेली आणि स्वयंपाकीण चुलीपाशी कामाला लागली की आपली लाकडी पेटी पुढे ओढून काशीताई त्यांची चालू असलेली कादंबरी, कथा लिहायला बसायच्या. या पेटीत त्यांची टाक-दौत, कागद, बाळू आदी सर्व लेखनसामग्री असायची. एका गृहस्थाश्रमी माणसाची पत्नी म्हणून सगळी कर्तव्ये पार पाडल्यानंतर उरलेल्या वेळात चालणारे हे लेखन! कुण्या मुलाने भेंड्या लावण्याची टूम काढली, सोंगट्यांचा पट खेळण्याचा बेत केला की, पुन्हा मुकाट्याने पेटीत जाऊन पडायचे! मग मधूनच हरिभाऊंचे पत्र यायचे : "काय झाले त्या 'कृष्णाकाठच्या दोन कुटुंबां'चे?" पुन्हा सगळी लेखन आयुधे पेटीबाहेर निघायची; पुन्हा निसटलेला सांधा जुळविण्याची धडपड...

गोविंदरावांनी यवताच्या ह्या घरातही पुष्कळ मोठा पुस्तकसंग्रह ठेवलेला होता. शिवाय करमणूक–नवयुग–मनोरंजन यांसारखी आवडणारी साप्ताहिके–मासिके घेऊन दर सोमवारी टपालवालाही यायचा. इथल्या वास्तव्याचा आनंद 'नवयुग'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या गोविंदरावांच्या प्रासंगिक स्वरूपाच्या कवितांतून वरचेवर पाझरत राहायचा. 'नवयुग आले', 'माझी झोपडी', 'शारदाश्रम', 'कंटककुंज' या त्यांच्या कविता यवतमधील वास्तव्याचे त्यांचे सुख सांगणाऱ्या आहेत.

'सुंदर झाडे, सुंदर पक्षी, सुंदर रानातील फुले।
गवतावरती सुमे चिमुकली हसती सुंदर जशी मुले॥'

हे सुरुवातीला सांगून—

'नको नको त्या उंच उंचशा माड्या रथही नकोत ते।
गोविंदा! ही तुझी झोपडी बरी शांति दे चित्ताते॥'

ह्याच एका शेवटाशी, वेगवेगळ्या युक्तिवादानंतर येऊन थांबणाऱ्या सगळ्या कविता!

यवताहून जवळच हिंदू नारायणमहाराजांचे केडगाव आणि खिस्ती पंडिता रमाबाईंचे केडगावही होते. काशीताई दोन्ही ठिकाणी जाऊन 'दर्शन' घेऊन यायच्या. सर्व मुलांनाही एकदा स्वतंत्रपणाने त्यांनी बैलगाडीने पाठविले होते. उशीर झाला तर 'पंडिताबाईंकडेच राहा' असेही आवर्जून बजावले होते. नेमके तसेच झाले. मग पंडिताबाईंनी आपल्या या हिंदू मैत्रिणीच्या मुलांना केळी, दूध असे 'फराळाचे' खावयास देऊन त्यांचा धर्म नीट संभाळून स्वतंत्रपणाने त्यांची झोपायची व्यवस्था केली!

—पण हे तसे सर्व अनेक दृष्टींनी सुखाचे असूनही ह्या दिवसांत काशीताई–

गोविंदरावांचे आयुष्य अंतरंगातून बदलतही गेलेले होते. ते स्वाभाविकपणाने वाढत्या जीवनपसाऱ्याबरोबर मुळातूनच अधिक गंभीर झालेले होते. आताचे हे दिवस अगदी पहिल्या उमेदीच्या दिवसांसारखे स्वप्नसदृश सुखाचे व तरल मनोवृत्तीने अनुभवावेत असे नव्हते. 'काही वर्षांपूर्वीच, त्यांची लग्न झालेली मोठी मुलगी–कृष्णाबाई–एका अपघातात तिच्या डोक्याला झालेली जखम भरून न आल्यामुळे, झिजून झिजून, मरणाच्या आधीन झालेली होती (१९०३). हळव्या व निर्मळ मनाच्या कृष्णाबाईला सतत दीड वर्ष इतक्या असह्य वेदना भोगाव्या लागलेल्या होत्या की, त्या बघणाऱ्यांना पुढे कित्येक वर्षे त्यांचे विस्मरण झाले नाही. देहप्रारब्ध, पूर्वकर्म, माणसाने जन्ममरणाच्या यातनेतून सुटण्याची गरज–या सर्वांचे खरे अर्थ, याच वेळी, काशीताईना प्रथमच आत्मानुभवातून कळले होते. रंगनाथी योगवासिष्ठ, दत्तप्रबोध या ग्रंथांची पाने उलटत, संसारातील मानसिक शांती कशी टिकवून धरायची ह्याचा पुन्हा पुन्हा शोध त्यांना घ्यावा लागत होता... माधवराव-वामनरावांच्या उच्च शिक्षणाच्या वेळी, लग्नाच्या वेळी, एकत्र-कुटुंबातील मंडळींच्या स्वभावभिन्नतेचा, दुःस्वासाचा, भिन्नदृष्टीचा अनुभव मनाला त्रासदायक होऊन गेलेला होता. त्यातच १९०८ मध्ये थोरली सून-गोदावरी–गेल्यानंतर तरुण माधवरावाने निश्चयाने संसाराकडे पाठ फिरविलेली. अधूनमधून काशीताईंच्या व गोविंदरावांच्या वाट्याला आलेल्या लौकिक कीर्तीच्या आनंददायक प्रसंगांमुळे, स्नेहीमंडळींबरोबर चालणाऱ्या वाङ्मयास्वादामुळे त्यांचा हा सुखदुःखाचा तराजू संसारात कसाबसा समतोल राहात होता, हातून थोडेबहुत लेखन होत होते, थोडी समाजसेवा होत होती. त्या निमित्तातून कुठली अध्यक्षपदे, कुठली सभासंमेलने आणि कुठले सत्कारसमारंभ घरात आनंद घेऊन येत होते.

या काळातील एक अपवादात्मक सुखद घटना होती ती मुलीच्या-विमलच्या लग्नाची. विमला सर्वांत धाकटी आणि वडिलांची लाडकी मुलगी. हुशार, हुजूरपागेत शिकणारी. दिसायला सुंदर आणि वडिलांच्या कलाप्रेमाचा वारसा जन्मतः घेऊन आलेली. ती नऊ वर्षांची होती नव्हती तेव्हाच तिच्या कविता-कथा 'आनंद' मासिकाने झोकात छापल्या होत्या. विमला पंधरा वर्षांची व लक्ष्मणराव जोशी पंचवीस वर्षांचे. ती शाळेत जाणारी, तर लक्ष्मणराव नुकतेच अलाहाबादला इतिहासाचे प्राध्यापक झालेले. एकमेकांना ही अगदी अनुरूप आहेत असे सर्वांनाच वाटले. प्रा. जोशी यांना इचलकरंजीचे संस्थानाधिपती, कलाविद्याप्रेमी, श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे दत्तक घेणार आहेत, अशी कुणकुण या वेळी होती. ...विमलने अविवाहित राहून 'करमणूक' चालवावी, असे स्वतःच्या लहानग्या मुलीच्या–लाडक्या ताईच्या

मृत्यूनंतर हरिभाऊ आपटे यांना वाटायचे; पण कानिटकरांची मुलगी एका विद्यागुण-संपन्न राजघराण्यात पडते आहे, इतिहासाचे एक हुशार प्राध्यापक तिचे पती होत आहेत, या आनंदात आपल्या जुन्या बेताची हरिभाऊंना मुद्धा आठवण राहिली नाही ! लग्न झाल्यावर विमला बनारस-अलाहाबादकडे शिक्षणासाठी गेली; आणि हरिभाऊ आनंदाश्रमात नेहमीच येणाऱ्या संन्यासी-ज्योतिषांना नवविवाहित दांपत्यांच्या पत्रिका दाखवून, दत्तकविधान नेमके कधी होईल ते विचारीत राहिले !

हे लग्न आटोपल्यावर, आपल्या कुटुंबाचा पुण्यातील राहण्याच्या जागेचा लोंब-कळलेला प्रश्न सोडवायला हवा, असे काशीताई, माधवराव-वामनराव या सर्वांनाच फार तीव्रतेने वाटायला लागले. माधवराव-वामनराव दोघेही पूर्वीच मिळवते झालेले होते. राहत्या घराच्या गैरसोयी सर्वांना बोचत होत्या.–पण हा घरबांधणीचा निर्णय कानिटकरांच्या घरातील दुसऱ्या एका वादळाचा लहानसा प्रारंभच ठरला !

कुटुंबातील वाटणीच्या वेळी गायआळीतील क्रीडाभवनासमोरची एक बखळ गोविंदरावांच्या वाट्याला आलेली होती. या बखळीचा अर्धा भाग त्यांचे चुलतभाऊ बाळूकाका कानिटकर यांच्या वाट्याला गेलेला होता. बखळीमधील सामाईक विहीर त्यांनी आपल्या भागात न घेता गोविंदरावांच्या राहिलेल्या भागात दिली. ह्या अर्ध्या बखळीत एक सुंदर दुमजली घर बांधावे असे माधवराव-वामनराव यांच्या मनात आले. घराच्या भोवती मोठे आवार हवे, मोठी बाग हवी, बागेत झोपाळा हवा आणि दोन मजल्यांवर, गच्चीवर, उंच टॉवर हवा शोभेसाठी ! तात्यांना उंचावरून सूर्योदय दिसावा यासाठी !

–पण इमारतीचे काम सुरू झाले आणि पहिल्या महायुद्धाला आरंभ झाला. कधी कल्पनेत नव्हत्या अशा अडचणी उभ्या राहिल्या आणि तीन वर्षांनंतर खर्च होऊन घर फक्त कसेबसे उभे राहिले !

या दिवसांत साधारणपणे प्रत्येक साहित्यसंमेलनाला गोविंदराव-काशीताई जात. बडोद्याला ती गेलीच होती. श्रीमंत चिमणाबाई गायकवाडांनी सर्व साहित्यिकांना राजवाड्यात खास मेजवानी दिली. सन्मानाने चिमणाबाईंच्या शेजारीच काशीताईंना बसविण्यात आले. १९१७ चे संमेलन इंदूरला भरणार होते. इंदूरला जवळची स्नेहीमंडळी होती. बनारसला स्थायिक झालेल्या माधवरावांकडे जावे, काशीयात्रा करावी, मथुरावृंदावन पाहावे आणि इंदूरच्या संमेलनाला उपस्थित राहावे असा गोविंदराव-काशीताई यांचा पूर्वीपासूनच बेत ठरलेला होता. त्यानुसार ती परत येईतो पुण्यातील घर बांधून पुरे होणार होते. इंदूरला गेल्यावर सरदार माधवराव किबे व कमलाबाईसाहेब किबे या लेखन-वाचनावर प्रेम करणाऱ्या श्रीमंत जोडप्याची व

कानिटकर दांपत्याची जवळून ओळख झाली. चार दिवस सहवासात मजेत गेले आणि दोघेही परत पुण्याला आली. बांधायला घेतलेले घर आता आणखी थोडे पुरे झाले होते; म्हणजे भिंती अजून रंगाशिवाय, गिलाव्याशिवाय होत्या....

सुरुवातीपासूनच गोविंदरावांचा नव्या घराच्या बांधकामाला थोडासा विरोध होता. कर्ज काढून ते बांधणे सुरू झाले तेव्हा त्यांच्या या विरोधाचे कडवट तिरस्कारात रूपांतर झाले. 'हे घर म्हणजे एक पांढरा हत्ती आहे', या शब्दांत ते त्याचे वर्णन करू लागले; चिडून त्याबद्दल घरात रोज वादविवाद करायला लागले. आपली मिळवती मुले घरासाठी झालेले कर्ज फेडतील याचा भरवसा त्यांच्या मनाला वाटेना. पण घर पुरे केल्याखेरीज मुलांनाही गत्यंतर नव्हते. साहजिकच १९१७ सालातील पावसाळ्याच्या सुरुवातीला, म्हणजे प्रवासाहून परतल्यानंतर, घर कसेबसे बांधून पुरे झालेले असल्याने, वास्तुशांती करून त्या नव्या घरात बिऱ्हाड हालवायचे असे ठरले. पण गोविंदरावांनी तिथे राहायला जाणेच पूर्णपणे नाकारले! 'जुन्या घरातील स्वतःची खोली मी मुळीच सोडणार नाही' असा आपला दृढनिश्चय त्यांनी सांगून टाकला. सरतेशेवटी खूप आर्जवे करकरून दमलेली घरातील इतर सर्व मंडळी, नाइलाजाने नव्या घरात राहावयास गेली. जुन्या घरात एकटे गोविंदराव राहिले! भावनाप्रधान गोविंदरावांना हे एकटेपण पचवणे शक्य नव्हते. बायको, मुले-मुली सर्व असूनही आपले कोणीच नाही! गोविंदरावांचे दुःख-संताप-सर्वच-अखेर काशीताईंच्या-वरील तीव्र रागामध्ये रूपांतरित झाले!

या घटनेचा विलक्षण मनस्ताप सर्वांना भोगावा लागला. दररोज दुपारच्या वेळी घरातल्या मोठ्या मंडळींना एक कार्यक्रमच होऊन बसला की, कोणातरी नातीला पाठवून गोविंदरावांना हाताला धरून, जेवण्यासाठी नव्या घरी आर्जवाने बोलावून आणायचे! आणि गोविंदरावांनीही जेवण होताच पुन्हा आपल्या जुन्या घरातल्या खोलीवर जाऊन राहायचे! गोविंदरावांचा घरासंबंधीचा हा असंतोष केवळ भावनात्मक स्वरूपाचा, केवळ रागापोटी आलेला नव्हता. ह्याच काळात त्यांची प्रकृतीही बिघडत गेलेली होती. रक्तातील ॲनिमियाचे प्रमाण बरेच वाढले होते. ते पांढरे फटफटीत दिसू लागले होते. पूर्वीपासूनच त्यांच्या स्वभावात एका जागेहून दुसरीकडे हलू नये अशी चमत्कारिक वृत्तीही होती. तेव्हा त्यांचा हा स्वभाव ओळखून नव्या घरी त्यांना राहायला आणण्याचे काशीताईंकडून, मुलांकडून पुष्कळ प्रयत्न झाले; पण गोविंदराव हट्टीपणाने हलले नाहीत ते नाहीतच! नव्या घरात बाळंतपणाला आलेल्या संस्थानिक लेकीचे लहान मूल पाहतानासुद्धा ते तीक्ष्णपणाने तिला म्हणाले, 'जुन्या घरात बाळंत झाली असतीस तर तुला मुलगा झाला असता!'

—ही अवस्था पेलणे काशीताईंना फार जड गेले. सामाजिक जीवनात आपली जी प्रतिमा निर्माण होऊ नये असे त्यांना वाटत असे, तीच प्रतिमा नेमकी या

घटनेतून निर्माण होत होती ! आजवर त्यांनी आपली राहणी–वाणी–करणी अत्यंत चोखपणाने नीटनेटकी ठेवल्यामुळे प्रत्येक स्त्रीसुधारणाविषयक चळवळीकडे डोळ्यांत तेल घालून बघणाऱ्या 'केसरी'नेसुद्धा काशीताईंचा गौरव वरचेवर केला होता. पंडिता असलेल्या रमाबाईंचे वागणे बेजबाबदारपणाचे आहे हे सांगताना 'केसरी'-मध्ये जबाबदारपणाचे उदाहरण म्हणून नाव येई ते काशीताईचे ! त्यामुळे गोविंद-रावांच्या अशा विभक्त राहण्याने जे आयुष्यभर सांभाळले, तेच काशीताईंच्या दृष्टीने पूर्णपणे गमावले गेले.

आजूबाजूच्या सगळ्या भाऊबंदांमध्ये या काळात, गोविंदराव आणि काशीताई वेगळी राहू लागल्याची बातमी सहजपणाने पसरली. लेकी-सुनांनी भरलेल्या घरात, वयाने लहान असलेल्या मंडळींपुढे, अवमानित झालेल्या काशीताई, गोविंदरावांशी आरडूनओरडून, रागाने कधी बोलत-भांडत नसत; त्या आतल्या आत संतापत, दुःखी होत. त्यांचे हे दबलेले दुःखही रोजरोजचा तो जेवणाचा 'प्रसंग' पाहून एक दिवस अगदी उफाळून आले. पूर्वी, नेवाशाला असताना, गोविंदराव त्यांना आपल्याच पंगतीला जेवायला बसायचा सारखा आग्रह करायचे हे काशीताईंना नको त्या वेळी आठवले. अगदी विद्ध होऊन, काकुळतीने, पण तितक्याच तापटपणाने गोविंद-रावांच्या पायापाशी, जमिनीवर धाडधाड डोके आपटून घेत त्या म्हणाल्या, 'आता पुरे झालं ना हे ! मला नाही हो हे सहन होत ! पुरे आता ! नाही सहन होत !' पण दुखावलेले गोविंदराव समजुतीचे काहीएक न बोलता, दररोजच्याप्रमाणे, हातावर पाणी पडताच नव्या घरातून जुन्या घरात काठी टेकत टेकत निघून गेले !

त्या दिवशी आणि दुसऱ्या दिवशी, मूकपणाने, घरातल्या सर्व सामानाची व्यवस्थित नीटनेटकी आवराआवर करून गोविंदरावांना न सांगताच काशीताई आपल्या मुलाकडे–माधवरावांकडे–बनारसला राहण्यासाठी निघून गेल्या (१९१७). नेहमी-प्रमाणे दुसऱ्या दिवशी नातवंडांनी जेवायला आणल्यानंतर गोविंदरावांना ही बातमी कळली आणि हातापायांतील त्राण पार गेल्यासारखे, क्षणभर अगदी दिङ्मूढ होऊन ते निश्चल उभे राहिले !

थोड्या वेळाने जुन्या घरात परतलेले, कावरेबावरे झालेले, चिडलेले गोविंदराव आपण होऊन आपल्या ह्या वाड्यातील भाऊबंदांना सांगत होते, 'कळलं का तुम्हांला ? 'ती' मला न सांगतासवरता निघून गेली ! कळलं ?'

एकेकाळी रूपाने आवडत नाही, अशिक्षित आहे म्हणून ज्या पोरवयातील बायकोचा त्यांनी त्याग केला होता, तीच आज त्यांना आपण होऊन सोडून गेली होती !

स्वतःच्या कुठल्याही लहानसहान मताबद्दल, विचाराबद्दल आग्रही असणे हे

एरवी रसिक वृत्तीच्या, स्वास्थ्यप्रिय आणि गोड स्वभावाच्या असणाऱ्या गोविंदरावांचे– तात्यांचे एक वैशिष्ट्य होते. साध्या गप्पांमध्येही ते आपला मुद्दा लवकर सोडीत नसत. त्यांच्या तुलनेने घरातल्या माणसांच्या दृष्टिकोणातून काशीताई–वहिनी –मूलतः थोड्याशा खमंग, किंचित तापट, अधिक कर्तव्यकठोर आणि अधिक जिद्दी व उद्योगी होत्या; त्यांचे वेगळे मत पटकन व्यक्त होई; पण अखेरीस नमतही त्याच ! थोडी गमतीची गोष्ट अशी होती की, एकीकडे आपल्या बायकोस स्व-मत तयार करण्याची शक्ती आपण दिली याचा गोविंदरावांना अभिमान वाटे आणि दुसरीकडे तिने आपल्याच सर्व मतांना 'हो' म्हणावे अशीही त्यांची आंतरिक अपेक्षा असे.

गोविंदरावांना आयुष्यात स्वतःचा असा वाटलेला मुख्य उद्योग म्हणजे 'डिव्हाइन मॅडनेस'च्या जगात रमण्याचा ! त्यांनी दीर्घकाळ न्यायखात्यात नोकरी केली व ती त्यांच्या अधिकाऱ्यांना रिपोर्ट लिहिताना 'समाधानकारक' वाटली असली, तरी खऱ्याखोट्याचे भांडण सोडवणारे ते सामान्य जग 'आपले' जग नाही हे गोविंदरावांनी मनात गृहीतच धरले होते. नोकरीच्या निमित्ताने तालुक्यांच्या गावी ते राहात; तेव्हा 'कचेरीत पाहावे तो बहुधा लंगोट्यांशी गाठ, घरीदारी शिपाई किंवा चाकर, फार झाले तर कचेरीतले फर्डे कारकून, गावातील पाटील-कुलकर्णी, एखादा-दुसरा मारवाडी किंवा गुजराती वाणी-सावकार...प्राचीन काळच्या तात्यापंतोजीपेक्षा ज्याची गती फार पुढे गेली नाही असा शाळामास्तर–अशांसारख्या माणसांशी जो नित्यसंबंध...' यावयाचा, तो त्यांना अत्यंत शोचनीय वाटायचा. पण त्यांच्या प्रयत्नांना दैवाची साथ मिळून, अनेक सांसारिक सामाजिक जबाबदाऱ्या उचलून, वाङ्मयास्वादात बरोबरीने रमणाऱ्या ज्या काशीताई गोविंदरावांना हव्या होत्या, त्या लाभल्यामुळे त्यांचे तालुक्याचे दिवस निभावून गेले. पण तेवढ्याच मर्यादेत थांबण्याचा बायकोचा स्वभाव नव्हता. किंवा एकदा शब्दांची दुनिया खुली झाल्यानंतर कुठे थांबावयाचे हे ठरविणे तिच्या हातीही नव्हते. वाङ्मयास्वादाबरोबर आपल्या ज्ञानाला उपयुक्त कृतीची जोड हवी, असे आजूबाजूच्या उपेक्षित स्त्रियांच्या जीवनाकडे पाहून, काशीताईंना वाटणे हेही स्वाभाविक होते. गोविंदरावांचा स्वभाव नेहमीच विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याचाही नव्हता. ते न्यायमूर्ती रानडे यांचे जवळचे मित्र होते. पण प्रत्यक्षात कुठल्याही सामाजिक चळवळीशी त्यांचा घनिष्ठ संबंध नव्हता. पूर्ववयात प्रार्थनासमाजाशी संबंध येऊनही गोविंदराव कधी प्रार्थना-समाजिस्ट झाले नव्हते. प्रौढ वयात थिऑसॉफीचा अभ्यास केल्यानंतर जेव्हा ती त्यांना मान्य झाली होती, त्या वेळीही ते थिऑसॉफिस्ट झाले नाहीत. ते नेहमीच नवनवीन वाहत्या विचारप्रवाहांच्या काठाकाठावरून चालत राहिले. मिलच्या विचारप्रस्फोटक अशा ग्रंथाचे भाषान्तर त्यांनी केले, तरी ते विचार समाजात रुजविण्यासाठी काही

वेगळी धडपड–बायकोला शिकविण्याव्यतिरिक्त–त्यांनी केलेली नव्हती; ती स्वतःची जबाबदारी आहे असेही, स्वतःची केवळ 'सारस्वत भक्ता'ची भूमिका असल्याने, मानलेले नव्हते. वडिलांच्या समाधानासाठी व चुलते नारायण बापूजी यांच्या मताप्रमाणे, त्यांनी फारशी खळखळ न करता ग्रामण्याच्या वेळी प्रायश्चित्त घेऊन टाकले होते. त्यासाठी स्वतःच्या दोन मुलींची लग्नेही लहान वयातच केली. या परिस्थितीमुळे 'घरातल्या' माणसांच्या सहकार्याच्या अभावी आपल्याला विचारांप्रमाणे कृती करता आली नाही याची खंत नेहमीच काशीताईंना फार तीव्रतेने वाटायची...

जे इतर सर्व जीवनक्षेत्रांबाबत तेच वाङ्मयाबाबतही खरे होते. केशवसुतांना समकालीन असलेल्या गोविंदराव कानिटकरांनी केशवसुतांप्रमाणेच रोमँटिक कविता आवडीने भरपूर वाचली; पण स्वतः लिहिली ती मात्र जुन्या मराठी पंडिती कवितेच्या व इंग्रजी वीणाकाव्याच्या अनुकरणाचा क्षीण वारसा सांगणाऱ्या अव्वल इंग्रजीच्या काळातील काही मराठी कवींसारखीच–म्हणजे वर्णनात्मक, निवेदनाचा सूर पकडून प्रगटणारी, बहिर्मुख आणि बोधवादी! कानिटकरांची कविता पाश्चात्त्य कवींशी जे साम्य दाखविते, ते सर वॉल्टर स्कॉटच्या 'घर्तीवर' लिहिलेले 'नारायणराव पेशवे यांचा वध' हे काव्य आहे हे सांगण्याइतपतच! शेली-ब्राउनिंगची स्त्रीप्रेमाची मानसिक भूक त्यांना फार 'मौलिक' वाटली, पण ती त्यांच्या कवितेतून स्त्रीजीवनोद्धाराची कळकळ या स्वरूपात व्यक्त झाली. निसर्गसान्निध्य त्यांच्या वृत्तीला सुखावणारे असूनही ते काव्यात आले ते मात्र सांकेतिक तपशिलवार वर्णनांच्या पद्धतीने; भाववृत्तीचा किंवा अनुभवाचा एक घटक म्हणून नाही. इंग्रजी भावकवितेत प्रत्येक कविमनाचे पृथगात्म वैशिष्ट्य प्रगटते हे कळूनही स्वतःची पृथगात्मता त्यांना शोधता आली नाही. स्वतःच्या निर्मितीत इंग्रजी-मराठीचा सांधा जुळवताना मुक्तेश्वर-मोरोपंतांना ते पुरते जसे सोडू शकले नाहीत, तसेच बायरन-ब्राउनिंगला स्वीकारू शकले नाहीत. अनेक इंग्रजी कवि-कवयित्रींच्या कवितांची गेय रूपांतरे त्यांनी केली. 'इमतनधनकी', 'पाहु चला हरि कोणिकडे' या त्यांच्या आवडत्या चाली. कानिटकरांकडून आवडलेल्या या चाली घेऊन केशवसुतांनी आपल्या 'फारा दिवसांनी भेट' आणि 'हरपले श्रेय' अशा स्वतंत्र कवितांची निर्मिती केली!

गोविंदरावांनी साहित्यनिर्मितीसंबंधात कलात्मकतेचा विचार नेहमीच केला, पण स्वतःच्या प्रापंचिक कर्तव्यकर्मांत आणि परिस्थितीच्या चढउतारात गुरफटलेल्या काशीताईंनी कारागिरीहून थोडाफार वेगळा असा कलात्मतेचा विचार जवळजवळ मुळीच केला नाही. स्वतःच्या विचार-आचार-सुसंगत जगण्याने, 'आजकालच्या गोष्टी' सांगण्याने आणि सेवासदनासारख्या संस्थेत सहभागी असण्याने त्यांना जे साधायचे होते, ते सगळे एकच एक होते. गोविंदरावांसारखी विचारांची तात्त्विक पातळीवरील ओढ त्यांना नव्हती आणि संगीत, चित्र, शिल्प आदी साहित्येतर ललित कलांचीही ओढ

नव्हती. अनुभव व्यक्त करण्याचे आणि त्याद्वारे जीवन बदलून टाकण्याचे साहित्याचे सामर्थ्य हेच त्यांना महत्त्वाचे वाटलेले होते. साहित्य हे त्यांचे साधन होते, साध्य नव्हते.

गोविंदरावांच्या मनात स्वतःच्या लेखनाबद्दल साध्याची भावना होती. लेखनाचे यशापयश हे त्यांच्या जगण्याचे यशापयश असावे इतके त्यांच्या लेखी महत्त्वाचे होते. दैनंदिन जगण्यामध्येही मानवी संसारातील फक्त निखळ काव्यात्मता त्यांना हवी होती; आणि ती प्रत्यक्षापेक्षा कल्पनेच्या जगातच अधिक शक्य असल्याने ते कल्पनेतील स्त्री-पुरुषप्रेमाच्या, रमणीय निसर्गाच्या आणि सामाजिक-धार्मिक ध्येयीभूत आदर्शाच्या जगाकडे पुन्हापुन्हा वळून पाहात, नाइलाजाने प्रत्यक्षातील वाटचाल करीत चालले होते. पण या वाटचालीत त्यांच्या डोळ्यांसमोर आजन्म एकच स्वप्न होते, ते उत्तम 'सारस्वतभक्त' असण्याचे! गोविंदरावांनी स्वतःसाठी वापरलेला 'सारस्वतभक्त' हा शब्दप्रयोग त्यांच्या कवी व रसिक या दोन्ही भूमिकांना सामावून घेणारा होता.

—हे स्वप्न प्रत्यक्षात आल्यासारखे ज्या स्वतःच्या कलाकृतीने गोविंदरावांना वाटायला लावले, ती होती रवींद्रांची गीतांजली! तिचा त्यांनी केलेला आणि १९१३ मध्ये 'नवयुगा'त प्रसिद्ध झालेला गद्य अनुवाद त्यांना अपूर्व समाधान देऊन गेलेला होता. ती त्यांची स्वतःची स्वतंत्र निर्मिती नव्हती; पण हे त्यांच्या लेखी फारसे महत्त्वाचे नव्हते; जे त्यांना साधावेसे वाटत होते ते रवींद्रांना साधलेले होते. तिचे भाषांतर करताना मिळालेल्या कलानंदात रसिक गोविंदराव सुखावलेले होते.

आणि नेमकी ह्याच लिखाणसंदर्भात एक विचित्र घटना घडली. सुप्रसिद्ध मॅकमिलन कंपनीने कुणाकडून तरी गीतांजलीचे भाषांतर करून घेतले व ते तपासावयास हरिभाऊ आपटे यांच्याकडे पाठविले. हरिभाऊंना ते भाषांतर अगदीच नापसंत झाल्याने त्यांनी मॅकमिलन कंपनीला तसे कळवून टाकले. ह्यावर कंपनीने हरिभाऊंनाच भाषांतर करण्याची विनंती केली. ती मान्य करून हरिभाऊंनी भाषांतर पाठविले व ते मॅकमिलन कंपनीने लगोलग प्रसिद्धही केले (१९१७).

यापूर्वीच चार वर्षे गोविंदरावांचे भाषांतर 'नवयुग'मध्ये प्रसिद्ध झालेले असूनही मॅकमिलन कंपनीकडे त्यांच्या नावाची शिफारस हरिभाऊंनी केली नाही! आपल्या मराठी 'गीतांजली'च्या प्रस्तावनेत हरिभाऊंनी गोविंदरावांच्या भाषांतराचा कुठे उल्लेखही केला नाही!

या घटनेनंतर गोविंदरावांचे आनंदाश्रमातील जाणे-येणे फार कमी झाले. उभयतांच्या स्नेहातील कविवर्य रहाळकरांनी हरिभाऊंना याबद्दल स्पष्टीकरण विचारले; तेव्हा हरिभाऊंनी 'तसे केले असते तर गोविंदरावांच्या भाषांतरातील दोष मला दाखवावे लागले असते, परवानगी न घेता भाषांतर केल्याचा, कॉपीराइटचा भंग केल्याचा, आरोप गोविंदरावांवर आला असता' असे काहीसे उत्तर दिले; परंतु या उत्तराने

कुणाचेच समाधान झाले नाही.

आज कालांतराने व त्रयस्थाच्या दृष्टीने पाहताना आपल्या लक्षात येते की, हरिभाऊंच्या गीतांजलीच्या भाषांतरापेक्षा गोविंदरावांचे भाषांतरच कितीतरी उजवे आहे!

स्वतः काशीताईंनी हरिभाऊंवरील मृत्युलेखात 'गोविंदरावांची गीतांजली मासिकातच पडून राहिली आहे' यावद्दल एका ओझरत्या वाक्यात खंत व्यक्त केली आहे. मात्र त्याबाबत अधिक सविस्तर लिहिले नाही. एकमेकांच्या भावजीवनात आयुष्यभर जिव्हाळ्याने सहभागी झालेल्या या तीनही सुसंस्कृत माणसांना या प्रकरणाला याहून अधिक महत्त्व देणे अनुचितही वाटले असावे. पण या तिघांच्या साहित्यिक सहजीवनातील काही आतले तडे त्यातून व्यक्त झाले, आणि तेही गोविंदरावांच्या अगदी अखेरच्या काळात!

गोविंदरावांच्या व्यक्तिमत्त्वातील व लेखनातील या गुणवैगुण्यांमुळे पुढे साहजिकच असे झाले की, त्यांनी काशीताईंना शिकविले आणि स्वतःच्या कुवतीप्रमाणे जगण्याची संधी देऊन एक मोठे उदाहरण घालून दिले हेच त्यांचे लोकमानसावर सर्वांत अधिक प्रभावी असा ठसा उमटवणारे कार्य ठरले. या उदाहरणापासून महाराष्ट्रातील अनेक उदारमतवादी सुधारकांनी प्रेरणा घेतली.

दुःखी, अवमानित काशीताई बनारसला फार काळ राहू शकल्या नाहीत. गोविंदरावांचे ॲनिमियाचे दुखणे वाढते आहे असे कळल्यावर काही महिन्यांतच त्या परत पुण्याला आल्या. त्यांनी आणि मुलांनी, गोविंदरावांना सक्तीनेच नव्या घरात राहायला आणले. मग माधवराव, वामनराव, अच्युतराव या मुलांनी त्यांच्या सहवासात उन्हाळ्याच्या सुट्टीचे काही दिवस आनंदात काढण्याचा प्रयत्न केला. तात्यांच्या कलासक्त व्यक्तिमत्त्वावर खूष असलेल्या नातवंडांनी ताणलेल्या वातावरणाचा ताण कमी करण्याची धडपड केली. तथापि, गोविंदरावांची अशक्त झालेली प्रकृती डॉक्टरांच्या औषधोपचारांना चांगला प्रतिसाद देत नव्हती. थकवा वाढतच चालला होता...

उन्हाळ्यातील संध्याकाळी वसंत व्याख्यानमालेला जायचे आणि हिरीरीने उपवक्ता म्हणून अनेक विषयांवर बोलायचे, ही गोविंदरावांची नेहमीची पद्धत. तीन वर्षे तर मालेच्या समारोपाचे ते सन्माननीय अध्यक्षच होते. या वर्षीही ते तिथे मधूनमधून ऐकण्यासाठी जाऊन बसले. पण मालेच्या शेवटच्या आठवड्यात त्यांची तब्येत एकदमच खालावली. खोलीतून बाहेर पडणेही त्यांना जमेना. उंचीवरून सूर्योदय–सूर्यास्त पाहण्याची आवड असलेले गोविंदराव नव्या घराच्या गच्चीवर मात्र कधीच

गेले नाहीत !

चार जूनच्या पहाटे गोविंदराव दिवंगत झाले (१९१८). आदल्या रात्री रात्रभर त्यांना घरघर लागलेली होती, तरीही या अखेरच्या प्रवासाला निघताना त्यांना पक्ष्यांचे कूजन ऐकू येत होते. त्यांच्या बिछान्याजवळ बसलेल्या लाडक्या माधवरावाला ते सांगत होते, ' पक्षी काय सुंदर गाताहेत ! ऐकलंस ? '

गोविंदराव कानिटकरांचा मृत्युलेख लिहिताना हरिभाऊ आपटे यांनी लिहिले : ' रावसाहेब विद्यार्थिदशेपासून फार विद्याव्यासंगी होते...त्यांचा रसिकपणा फार मोठा. ते कवी होते, साहित्य संगीतमर्मज्ञ होते, चित्रकलाभिज्ञ होते, मार्मिक लेखक होते आणि पाश्चात्त्य व पौर्वात्य वेदान्ताचे परिशीलन त्यांनी चांगल्या प्रकारे केले होते. वाङ्मयाची उपासना हेच त्यांचे ब्रीद. रावसाहेबांकडे केव्हाही जा, ते एखाद्या नव्या पुस्तकाच्या वाचनात गढलेले, एखादे वीणाकाव्य रचीत असलेले, एखादे चित्र काढण्यात रंगलेले, किंवा कधी फिडल, कधी सतार किंवा हार्मोनियम या वाद्यांवर एखादे गीत गाण्यात गर्क झालेले आढळायचे !

...रावसाहेब हे स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते होते याचे प्रमाण–अत्यंत उज्ज्वल प्रमाण–त्यांच्या विदुषी पत्नी श्री. काशीताई कानिटकर होत. एवढे सांगितले म्हणजे त्यांच्याबद्दल आणखी काही लिहिण्याची आवश्यकता नाही. '

गोविंदरावांच्या मृत्यूनंतर, आजूबाजूच्या सर्व मंडळींमध्ये शांतपणाने डोळे मिटून बसून राहिलेल्या काशीताई, स्वतःला सावरण्यासाठी, पुढे काही काळ कागदावर फक्त रामनाम लिहीत बसायच्या !

आपल्या लिखाणात कल्पित पात्रांच्या सुखदुःखांचा वेध घेत प्रदीर्घपणाने काही सांगत राहण्याची ' पालखीच्या गोंड्या ' तील त्यांची हौस पुढील काळात पुन्हा दिसली नाही. त्यानंतर स्वतंत्र असे जे काही त्यांनी लिहिले ते ' शिळोप्याच्या गोष्टी '-सारखे–अनेक परिचित व्यक्तींच्या अनुभवांना ' स्फुट गोष्टी ' चे रूप देऊन, उपदेश आणि करमणूक करणारे.

ज्याचा असा एवढा दुःखद अनुभव पदरात आला, त्या नव्या घराचा रेंगाळत राहिलेल्या टॉवरचा गिलावासुद्धा पुढे पाच वर्षांनी, १९२३ मध्ये पूर्ण झाला. मग घराला नाव काय ठेवावे असा प्रश्न समोर आला. त्यासंबंधी आपल्या मुलांना पत्रातून विचारताना काशीताईंनी लिहिले : ' कै० ती० दादांचे (वासुदेव बापूजी) नाव ठेवावे असा ' तिकडचा ' नाद होता. येणाऱ्या जगद्गुरूंचे ठेवायचे तर कृष्णधाम,

मंदिर, कुटीर, सदन इत्यादी...जे पसंत असेल ते उलट टपालाने कळवावे.'
१९३१ साली मुलांनी घराचे नाव ठेवले 'गोविंदकुंज'.

वयाच्या साठीकडे झुकू लागलेल्या काशीताईंच्या दृष्टीने गोविंदरावांचा वियोग ही स्वाभाविकपणानेच विलक्षण दुःखाची गोष्ट होती; शिवाय ज्या परिस्थितीत, ज्या भावस्थितीत तो झाला, तिनेही त्यांना अधिक व्याकुळ केले होते. झपाट्याने त्यांचे काळे केस पांढरे झालेले जेव्हा घरातल्या मुलामुलींनी पाहिले, तेव्हा तीही मनातून हादरून गेली. त्या दिवसांत समाचाराला येणाऱ्या मंडळींना कानिटकरांच्या घरात अधूनमधून रडण्याचे कढ ऐकू आले तरी विलक्षण, विचित्र शांतताच अधिक जाणवत होती. एका आतल्या खोलीत काशीताई केवळ निःशब्द बसून होत्या. घरात सांत्वनाची पत्रे येत होती; वृत्तपत्रांत गोविंदरावांची 'दुःखद वार्ता' छापून आली होती. लोक लिहीत होते : 'रावसाहेब कानिटकर व श्री. काशीताई कानिटकर म्हणजे महाराष्ट्रातील एक स्पृहणीय जोडी होती';...'दांपत्य अन्योन्यगुणानुरूप। दावोनिया धन्य विधी अमूप॥'...'आपल्यासारखी पत्नी त्यांना लाभल्याने गोविंदराव कानिटकरांचे जोडपे हा एक महाराष्ट्रातील अभिमानाचा विषय होता...'
...काशीताई हे सर्व ऐकत होत्या, आणि ऐकत नव्हत्याही!

गोविंदरावांच्या मृत्यूनंतरच्या लगेचच्या काळात, अनेक सार्वजनिक व्यापांत गुंतलेल्या हरिभाऊंची आणि काशीताईंची गाठभेट क्वचितच झाली. शिवाय ह्याच काळात पुण्यातील अनेक घरांप्रमाणे कानिटकरांच्या घरातही इन्फ्लूएंझाच्या साथीने नुसते थैमान घातलेले होते. या साथीत माणसे तासा-तासाच्या अंतराने आणि वारंवार तापाने पछाडली जात होती. इन्फ्लूएंझातून माधवरावांचे दुखणे डबल न्यूमोनियावर गेले, तर मुलगी-बनूताई-क्षयबाधेची लक्षणे दाखवू लागली! दिवसरात्र केवळ शुश्रूषा आणि औषधपाणी करण्यातच काशीताई बुडून गेल्या. घराला इस्पितळाचेच रूप आलेले. मग सर्वांचे दुखणे काढून थकलेल्या काशीताई फेब्रुवारीच्या अखेरीस स्वतःच फार आजारी झाल्या. त्यातच दत्तकविधानाची गडबड! घरात भावी काळात राणी होणारी धाकटी मुलगी बाळंतपणाला आलेली त्याची गडबड! त्यामुळे दि. ३ मार्च १९१९ रोजी अत्यवस्थ अवस्थेत हरिभाऊंना मुंबईहून पुण्यात आणलेले आहे, हेही काशीताईंना कळलेले नव्हते; कोणी सांगितलेही नव्हते. 'काशाक्कांना' हे सांगायचे कसे या पेचात असलेली घरातील माणसे त्यांचा ताप उतरण्याची वाट पाहात होती...
दुसऱ्या दिवशी रात्रीच्या वेळी बाळंतिणीच्या खोलीत मुलीच्या चौकशीसाठी

आलेल्या काशीताईंच्या कानावर रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांच्या बोलण्यातील काही शब्द पडले. बाजेवर झोपलेल्या मुलीला काशीताईंनी विचारले, 'लोक रस्त्यावर हरिभाऊंचे नाव घेऊन काय बोलताहेत?'

मुलीने भीतभीतच त्यांना हरिभाऊंच्या मृत्यूची वार्ता सांगितली. लगोलग रात्रीच्या अंधारात टांगा जोडून काशीताई वेणूमामींना भेटण्यासाठी आनंदाश्रमाकडे गेल्या. गोविंदरावांच्या मृत्यूनंतर प्रथमच त्या दिवशी त्या घराबाहेर पडत होत्या! हरिभाऊंची आणि आपली शेवटची भेट झाली नाही याचे दुःख जसे त्यांना वाटत होते, तसेच काशाक्का आजारी असल्याने भेटायला येऊ शकलेल्या नाहीत हे कोणीतरी हरिभाऊंना सांगायला हवे होते याचेही वाटत होते. 'एवढं कुणीतरी त्यांना कळवायला हवं होतं'–पुन्हा पुन्हा त्या हळहळत होत्या...

हरिभाऊंना अगदी लहान वयापासून बहिणीचे, भावजयीचे, इतकेच काय, आईचेही प्रेम लाभलेले नव्हते. आपट्यांच्या घरातील इतरांनी वेगवेगळ्या काळात ही उणीव थोडीफार भरून काढली असली, तरी प्रेमाला दीर्घकाळ जी समजुतीची जोड लाभली होती ती फक्त काशीताईंच्या बाबतीत. त्या सर्व न लाभलेल्या नात्यांना सामावणारे हे स्नेहबंध दोघांनीही अशा खोलपणाने सांभाळले होते, की आता वेणूमामींनाही आपल्या नातेवाइकांमध्ये काशीताईंच्या इतके जवळचे दुसरे कोणी नव्हते! 'नणंद-भावजयी'चे ते नाते हरिभाऊंच्या निधनानंतर वेणूमामी आणि काशीताई या दोघींनीही सांभाळले. दोघींनी मिळून रामेश्वरची यात्रा केली. कधीतरी गप्पागोष्टी करीत असताना हरिभाऊंना वचन दिले होते त्याप्रमाणे त्यांचे एक लहानसे चरित्रही काशीताईंनी लिहून 'विविधज्ञानविस्तारा'त प्रसिद्ध केले. दोघांपैकी जो कोणी आधी जाईल त्याने दुसऱ्याबद्दल लिहायचे असे त्यांचे दोघांचे ठरलेले होते. काशीताई वयाने वडील होत्या. त्यांना वाटले होते या जगाचा निरोप प्रथम आपणच घेणार! पण 'वळचणीचे पाणी आढ्या जावे' तसे उलटेपालटे झाले व हरिभाऊंच्या सहवासस्मृतींवर आपली 'तुळशीची माळ' वाहून काशीताई त्यांच्या अखेरच्या ऋणातून मुक्त झाल्या.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एका टप्प्याचे जिवंत प्रतीक असे हे जोडपे आणि त्यांच्याशी मनापासून स्नेहबंध जुळवलेले हळवे हरिभाऊ, यांच्या कधी प्रसन्न तर कधी खिन्न करणाऱ्या सहजीवनाचे हे उत्तरायण अशा रीतीने समाप्त झाले.

५

पंचआजोबा

'हिंदुपंच' या साप्ताहिकाचे नाव मी प्रथम केव्हा कुठे ऐकले ते आज मला आठवत नाही; परंतु आजही ते जेव्हा माझ्या कानांवर पडते तेव्हा त्याच्या शीर्षकात एकत्र आलेले 'हिंदु' आणि 'पंच' हे दोन्ही शब्द एकत्र समजून घेताना माझी थोडीशी तारांबळच उडते. शंभराहून अधिक वर्षांपूर्वी (१८७०) महाराष्ट्रातल्या एखाद्या व्यक्तीला, विनोदाला प्राधान्य असलेले साप्ताहिक आपण काढावे असे वाटावे आणि त्याला 'हिंदुपंच' असे टेम्सजमनी नाव द्यावे अशी कल्पना सुचावी याचेही आज माझ्या मनाला आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाही. तशी हिंदुपंच काढणारी काशीनाथ विष्णू फडके ही व्यक्ती एक मोठी अवलियाच असली पाहिजे. ज्या वेळेला सगळे इंग्रजी-मराठीतून लिहिणारे तरुण विद्वान गंभीरपणाने बालविवाह, बालवैधव्य, केशवपन, स्त्रीशिक्षण, इंग्रजी राजवटीचे व इंग्रजी शिक्षणाचे फायदे-तोटे इत्यादींचे समाजाच्या सुखदुःखांच्या संदर्भात आडवे-उभे हिशेब मांडीत होते त्या वेळी त्यांच्या इतक्याच तरुण वयाचे असलेले काशीनाथराव फडके 'पंचआजोबा' बनून याच विषयांवर उपहास, उपरोध, कारुण्य, विसंगती, अतिशयोक्ती इत्यादींनी युक्त लिखाण करीत होते आणि ते दर आठवड्याला तेवढ्याच निष्ठेने, समूर्त स्वरूपात, ललित पद्धतीने, महाराष्ट्रातल्या अनेक घरांतून पोहोचवत होते! गंभीर विषयांवर लिहिण्याचा फडक्यांनी शोधलेला हा वेगळा मार्ग त्या काळात तर फारच नवीन होता. 'प्रभाकरा'सारख्या एखाद्या प्रतिष्ठित वृत्तपत्रात येणारे एखादे प्रासंगिक विनोदपूर्ण पत्र एवढीच असली तर त्याला पूर्वपीठिका होती.

गंभीरपणे लिहिणाऱ्या, राजकीय-सामाजिक चळवळी करणाऱ्या एकोणिसाव्या शतकातील अनेक माणसांशी फडके यांचे चांगले मित्रत्वाचे संबंध होते; पण त्यांचा

जन्मजात स्वभाव मिस्किल, टारगट, खवचट, इरसाल, खोडसाळ आणि काहीसा वाह्यातही होता. त्यांनी स्वतःवर तरुणपणीच आजोबांचा मुखवटा चढवून घेतला आणि आपल्या खऱ्या नावापेक्षा 'पंचआजोबा' या टोपणनावाने लाल पगडी, जरीकाठी उपरणे, पिवळसर झालेले पांढरे धोतर, भरघोस मिश्या आणि पुणेरी जोडा अशा तत्कालीन प्रातिनिधिक पोशाखाने आपल्या देशातील गल्लीबोळापासून अनेक देशांच्या राजधान्यांपर्यंत सर्वत्र वावरणे स्वीकारले.

खरे म्हणजे इंग्रजांच्या संस्कृतीमुळे आत्मपरीक्षण करायला लागलेल्या शिक्षित मराठी समाजाला थोडेसे स्वतःचे हसू यावे हेही अगदी स्वाभाविकच नव्हते का? पण असे स्वाभाविक हसणे त्या काळातही फक्त काहींनाच रुचले. बाकीच्यांनी त्याकडे अशिष्टपणा, औचित्यभंग, घरंदाजपणाला विशोभित अशी अप्रतिष्ठा, या भावनेतून पाहिले. अर्थात चोरून किंवा उघडपणे, आजोबांच्या लिखाणाचा त्यांनी जरी आस्वाद घेतला तरी त्या काळातील भारदस्त निबंधकारांना असलेली मान्यता मात्र त्यांनी आजोबांना दिली नाही!

एकूण मराठी समाजाची मूळ प्रकृती गंभीर; त्यात काळही 'कडूकाळाचे दिवस' म्हणतात तसा वाईट आलेला. परकीयांनी देश ताब्यात घेऊन देशाची लुटालूट चालवलेली; सरकारी नोकरी मिळणे हा सर्वांत श्रेष्ठ 'उद्योगधंदा' होऊन बसलेला आणि धर्म, रूढी यांच्या खुळचट, स्वार्थसाधू स्वरूपाने समाजजीवन नीतिदृष्ट्या भ्रष्ट करून टाकलेले; त्यात भर नव्याने इंग्रजी शिकलेल्यांचे अनाचार आणि आचार यांची! मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनाला ते सतत ढवळीत चाललेले. अशा परिस्थितीत पंच-आजोबांना विनोदासाठी जो स्वतःच्या घरातच मालमसाला मिळत गेला तो 'अति झाले आणि हसू आले' याचाच नमुना आहे. भोवतालच्या हादरलेल्या परिस्थितीचे गांभीर्य ओळखणारी जांभेकर, लोकहितवादी, रानडे, चिपळूणकर, टिळक, आगरकर, गोखले आदी मंडळी 'हिंदुपंच' पूर्वी पंचवीस वर्षे आणि पुढे पन्नास वर्षे स्वतःची वा स्वतः स्थापन केलेल्या संस्थांची मुखपत्रे काढीत होती आणि राजकीय-सामाजिक प्रबोधन घडवून आणण्यासाठी लेखणी-वाणी आदी साधने शस्त्रांसारखी परजत चाललेली होती. पंचआजोबांनीही आपले भाषेचे शस्त्रच पण वेगळ्या, अनोख्या पद्धतीने वापरले आणि ते थोडेथोडके नाही, पुरे चाळीस वर्षे वापरले (१८७०-१९०९). ते विनोदी लिहिणारे असले तरीही चाळीस वर्षे ती त्यांची केवळ हौस-मौज कशी असेल? आपल्या पत्राला सत्ताविसावे वर्षे लागले तेव्हा (१३ जानेवारी १८९८) संपादकांनी स्वतःबद्दल लिहिले आहे:

'हिंदुपंच या विनोदी पत्रास गेल्या आठवड्यापासून २७ वे वर्ष लागले. गतवर्षी ५२ आठवडे पूर्ण सेवा करून पुनः नव्या दमाने व नव्या आवेशाने या २७ व्या वर्षीच्या ५२ आठवड्यांचे सेवेला हा म्हातारा आपले कलम सरसावून पुढे होत आहे.

आजपर्यंत खुद्दांनी जी लोकसेवा केली ती परमप्रिय व उदार आश्रयदात्यांनी मान्य करून घेऊन त्यांचा आश्रय कायम ठेवला. येणेकरून त्यांचेकडून सर्वांचे आभार मानण्यात येत आहेत. महाराष्ट्र भाषेत अशा प्रकारचे पत्र एवढेच असून या २६ वर्षांचे मुदतीतही ते अद्वितीय राहिले आहे... थेरडा पंच हा अर्थाडॉक्स आहे का रीफॉर्मर आहे ? याचा निकाल कोणालाही नक्की करता येईलच असे सांगता येणे नाही, नीतिदृष्टीने खुद्दांचे पुराणपुरुषत्व ' वेलनोन ' असलेच पाहिजे. म्हणजेच सर्वदा नीतीच्या बाजूचेच प्रतिपादन करावयाचे...तथापि, नवीन गोष्टीविषयी म्हाताऱ्याला अप्रीती नाही. अर्थाडॉक्स म्हणजे नवे विद्वेषी. त्यांची नवीन गोष्टीवर अप्रीती असते. ह्या वर्गात पंचसरकार आपणास सुतराम घालू इच्छित नाही. रीफॉर्मर म्हणजे सुधारणा मताचे. मानवी सुखाला नीतिज्ञानदृष्ट्या, कालदेशमन्वंतराप्रमाणे वाढवीत जाण्याविषयी ज्यांची प्रवृत्ती ते सुधारक होत. नवविद्वेष्यांनी सुधारक हा निंदाव्यंजक शब्द मानला आहे. पण तो अत्यंत गौरवाचा व यथार्थस्वरूपदर्शक आहे. नीतिदृष्टीला अनुसरून (असलेल्या) सर्व प्रकारच्या नवीन सुधारणा खुद्दांना आवडल्या आहेत, व त्यांचे यथोचित प्रसंगी अभिनंदन करण्यास म्हाताऱ्याचे कलम कचरत नाही. दंभाचा स्फोट, गोपनाचा प्रकाश, पापाचरणाचा निषेध, सत्कृत्याचा गौरव, सुधारणेचे अभिनंदन, नीतिवानांचे स्तवन, प्रिय भगिनी व्हिक्टोरिया ऽ क्का-संबंधाने ओतप्रोत राजनिष्ठा आणि खिन्न, उदास, चिंतामग्न व आपद्ग्रस्त अशांना क्षणैक तरी विश्रांती देणे ही खुद्दांच्या नित्य कर्तव्यातील मुख्य कार्ये होत. ती कसकशी पार पडत आली आहेत ते वाचकवृंद जाणतोच आहे. '

प्रत्येक अंकाच्या शिरोभागी फडके यांनी आपल्या साप्ताहिकाचा हेतू दर्शविणारा जो श्लोक दिलेला आहे तोही त्यांच्या वर उल्लेखिलेल्या निवेदनाशी जुळतामिळताच आहे. मम्मटाच्या सुप्रसिद्ध काव्यप्रयोजनांपैकी ' कान्तासम्मितोपदेश ' या प्रयोजनाशी साम्य असणारा हा श्लोक फडके ' दंभस्फोट ' या उपशीर्षकाखाली छापीत असत.

' विलोल नयना सती प्रियपतीप्रती हर्षवी ।
न ती सुमति मानसा स्वकृतिने कदा रोषवी ।
तशी ही नवपत्रिका बुधजनप्रीति पात्र हो ।
सदैव गुरुवासरी प्रगटुनी हरू त्रास हो ॥ '

दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, चाळीस वर्षांतील हिंदुपंचची भरीव कामगिरी मराठी वाङ्मयाच्या इतिहास-पुस्तकात एखादा परिच्छेद वाटणीला येण्यापलीकडे पंचआजोबांना काही देऊन गेली नाही. त्या परिच्छेदातही आजोबांच्या कपाळी स्तुती जवळजवळ लिहिलेली नाही. इतिहासकारांनी फडक्यांबद्दल लिहिले आहे :

' हिंदुपंच १९०९ साली गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या फिर्यादीनंतर बुडाला...फडके यांचा वृत्तपत्रीय विनोद पुष्कळसा ग्राम्य व झोंबणारा असे. विरुद्ध पक्षातील मोठमोठ्या

पुढाऱ्यांची चित्ररूपाने हेटाळणी करताना फडके यांना सुमार राहात नाही. ग्राम्यपणा व बीभत्सपणा यांच्या सरहद्दीवर जाऊन पोहोचण्यास त्यांना मुळीच वेळ लागत नसे. पण त्या काळात सर्वसामान्य लोकांत 'हिंदुपंच' चांगलाच लोकप्रिय होता.'

खरी गोष्ट इतकीच असली पाहिजे की समग्र हिंदुपंच १९०९ साली त्याच्यावर जसी आल्यानंतर फारसा कोणाला बघायलाच मिळालेला नसणार! आज मलाही तो समग्र स्वरूपात पाहायला मिळालेला नाही; परंतु काही महिन्यांपूर्वी अगदी योगायोगानेच 'हिंदुपंच'चे चौदा वर्षांचे (१८८० ते १८९८–मधली काही वर्षे वगळून) अंक माझ्या हाती आले आणि ते वाचल्यानंतर, आधुनिक काळात मराठी विनोदाचा प्रारंभ श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'सुदाम्याच्या पोह्यां'पासून झाला असे म्हणताना पंचआजोबांनी उगारलेला हातातला सोटा मला दिसू लागला! हिंदुपंचचा विविधांगी विचार मराठी वाङ्मयेतिहासात माहितीची नवीन मौलिक भर घालील याबद्दल मला शंका नाही.

हिंदुपंचचे स्वतःचे एक स्वतंत्र साम्राज्य आहे. त्या साम्राज्याचे प्रमुख जे आजोबा, ते स्वतःला सरकार, खुद्द, आम्ही, असे म्हणवितात. त्या वेळच्या इंग्रज सरकारचे जसे पोलिटिकल डिपार्टमेंट आहे, फॉरिन आणि फॅमिन डिपार्टमेंट आहे, हेर आणि हेल्थ डिपार्टमेंट आहे आणि 'स्वतंत्र' असे न्यायखातेही आहे तसेच सर्व या आजोबांच्या राज्यातही आहे. या खात्यातून ते अनेकांच्या नेमणुका वेळोवेळी करतात आणि म्हणूनच बदल्याही करतात; अनेकांबद्दल वरिष्ठांकडे रिपोर्टस् करीत राहतात; तसेच काही नोटिसा पाठवून शिक्षाही ठोठावतात. 'पंच' गॅझेटातून त्यांची फर्माने जाहीर होतात. त्यांचे सर्व कामकाज इंग्रजी शासनपद्धती व शिष्टाचार यांनुसार सतत कायद्यांची कलमे सांगून चालते. त्यांचे प्रजाजन त्यांच्याकडे सदैव वेगवेगळी गाऱ्हाणी गातात, नेहमी पत्रे लिहितात, पुष्कळ जाहिराती देतात; पंचसरकारच्या कोर्टात खटले लढवितात. देशी व परदेशी राजनैतिक शिष्टाचारानुसार आजोबा आपल्या राज्यातील माननीय पाहुण्यांना, डौलदार भाषेत, आदब सांभाळून, मानपत्रे देतात; परकीयांना अभिनंदनाची, सांत्वनाची पत्रेही पाठवतात. तथापि, पंचआजोबा जसे एक सरकार चालवतात तसे अनेक लहानमोठ्या कुटुंबियांच्या घरातील एक वडिलधारे, जिव्हाळ्याचे माणूसही असतात. ते त्यांच्या घरी सत्काराला किंवा समाचाराला जातात. चैत्रातल्या हळदीकुंकवाची डाळ, धुंधुर्मासाची खिचडी, संक्रांतीची गुळपोळी खायलाही जातात; डोहाळेजेवणाचे उखाणे, नागपंचमीची गाणी, बायकांची दररोजची देवळातील संभाषणे ऐकायला ते जसे उपस्थित असतात तसेच नवरात्रातील घागरी फुंकण्याच्या वेळचे दृश्य पाहायलाही ते हजर असतात. पंचआजोबांचे विशेष सख्य असते ते प्रत्येक घरातील लेकी, सुना, नातवंडे यांच्याशी. पंचसरकारच्या डाकेत यांची पत्रे नेहमी अधिक असतात. 'एक पहिल्या काळची म्हातारी', 'सोनटका', 'गतभर्तृका

कन्या', 'मारुतीच्या देवळात बसलेली सचिंत म्हातारी' अशा आजोबांना येणाऱ्या पत्राखालच्या सह्या असतात. शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी परगावी राहिलेले नवरे जेव्हा बरेच दिवस या स्त्रियांना भेटत नाहीत तेव्हा 'कसला मेला हा अभ्यास', 'काय जाळायचंय त्या पैशाला' ही त्यांची व्यथा मोकळेपणाने त्या आजोबांच्याजवळ सांगतात. मग आपल्या मुलांना, जावयांना तंबी देण्याचे काम आजोबांच्याकडे ओघानेच येते. हा त्यांचा एक फार आवडता 'गृहोद्योग'च असतो!

या कुटुंबात संस्थानिकांचा आणि इंग्रजांचाही अधूनमधून समावेश होतो. प्राईम मिनिस्टर 'आनंदी दगड' (ग्लॅडस्टन) हा पंचांचा प्रियमित्र असतो; डफरिन् हा 'डफरिनदादा' तर लेडी डफरिन् ही डफरिन्वहिनी असते. सयाजीराव, तुकोजीराव हे संस्थानिक त्यांचे प्रिय भाचे असतात. अशा या विश्वकुटुंबी आजोबांची भ्रमंती महाराणी व्हिक्टोरियाच्या दरबारापासून तो कोणाही व्यक्तीच्या वैध-अवैध अन्तःपुरापर्यंत, केव्हाही दृश्य-अदृश्य रूपात आजोबांच्या लहरीप्रमाणे होऊ शकते....

एखाद्या प्रदेशात जसे शासनकर्ते असतात, सर्वसामान्य सरळमार्गी प्रजाजन असतात, तसेच सर्व प्रकारची गावगुंडी करीत जगणारे काही महाभागही असतात. त्यांच्याबाबत पंचआजोबा स्वतः तेवढेच पक्के गावगुंडही बनतात!. अर्थात ते चाकू सुरा असली शस्त्रे न वापरता आपण प्रतिष्ठित वृत्तपत्रकार आहोत हे ओळखून तीक्ष्ण शब्दांचे छुपे शस्त्र वापरतात. 'लिहून आलेला मजकूर' अशी शिरोभागी सूचना देऊन किंवा आपल्या हेरखात्याला लागलेली 'एक बातमी' म्हणून अशा गावगुंड माणसाचे फक्त नाव तेवढे द्यायचे बाकी ठेवून, बाकी सर्व साग्रसंगीत व 'छापण्यासारखी' माहिती छापून ते मोकळे होतात आणि त्या व्यक्तीला पुरेपूर बदनाम करतात. हा मजकूर लिहिताना व्यभिचार, चोरी, लाचलुचपत आदी घाणेरड्या गुन्ह्यांमध्ये रमलेली मंडळी सावध व्हावीत अशी म्हाताऱ्याची प्रथम इच्छा असते. पुढे ती सावध होत नाहीत तेव्हा त्याच्या धमक्या सुरू होतात. अखेरीस आजोबांकडून पंचसरकारच्या न्यायालयातर्फे नरकलोकातील हालअपेष्टांना साजेशा शिक्षा त्यांना फर्माविल्या जातात. कधी मनुष्य सुधारला तर मग आपल्या बयाला साजेलसे आपण जबाबदारीने वागलो अशी कृतकृत्यताही आजोबांना वाटते. आजोबांचे पहिले रूप अर्थातच बरेचसे 'बीभत्स' आहे. आज आणि त्या काळीही-यासाठी हिंदुपंचवर टीका होत गेली. परंतु या एका दोषासाठी फडके यांनी हिंदुपंचमधून जे गंभीर आणि विनोदी-ललितगद्य प्रकाशित केले आहे त्याची उपेक्षा करून चालणार नाही. या लिखाणात जशी अनौपचारिक जीवनदर्शने आहेत तशीच फार प्रत्ययकारी अशी अनौपचारिक मराठी बोली भाषाही आलेली आहे. 'वुईट अँड ह्यूमर' यांसारख्या सदरातील विनोद इंग्रजीतून भाषांतरित-रूपांतरित करून घेतलेले असले तरी त्याव्यतिरिक्त असलेले विपुल विनोदी लिखाण मराठी जीवनानुभवांशी

निगडित, केवळ स्वतंत्र म्हणता येईल असे आहे. उपहास-उपरोधपूर्ण अशा त्यांच्या लेखनशैलीवर जरी उघडपणाने इंग्रजीचा परिणाम असला तरी लेखात त्यांनी व्यक्त केलेला सगळा आशय खास 'मराठी' आहे. शाब्दिक कोटीपासून विनोदपूर्ण व्यक्तिचित्रांपर्यंतचे सर्व विनोद-प्रकार कमी जास्त प्रमाणात या चौदा वर्षांतील सुमारे सातशे साप्ताहिक अंकांत त्यांनी हाताळलेले दिसत आहेत. संस्कृत सुभाषिते, श्लोक आणि अद्‌भुतरम्य साहित्य यांची शृंगार व विनोद सुचविणारी पूर्वपरंपराही आजोबांनी मदतीला घेतलेली आहे. शिवाय संस्कृत व इंग्रजी यांची शोभनीय व अशोभनीय मिश्रणे करून जसा हलकाफुलका आशय प्रसन्नपणे व्यक्त केलेला आहे तसाच संस्कृत-प्राकृत परंपरेनुसार त्यांनी अनुकरण करीत पुरेसा अश्लीलपणाही केलेला आहे.

शिवाय ही कामगिरी इंग्लंडमधील पंचच्या जन्मानंतर (१८४१) फक्त तीस वर्षांच्या अंतराने जन्माला येऊन एकूण पुरी चाळीस वर्षे चाललेली! आता पुढचीच उदाहरणे पाहा. इंग्रजी राज्यातील मध्यमवर्गीय लोकजीवनाचे तपशील आणि वातावरण त्यातून मिष्किल सूचकतेने कसे प्रत्येक वाक्यातून प्रगटलेले आहे.

आजोबांच्या साम्राज्यातील एका लहान सोळा महिन्यांच्या मुलाने आपल्या वडिलांना सॉलिसिटरमार्फत दिलेली नोटीस पुढीलप्रमाणे आहे :—

तीर्थरूप रा. नानासाहेब वडिलांचे सेवेशी—

/ खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते की, मी आपला मुलगा असून माझे वय नुकतेच सुमारे १३ महिन्यांचे झाले आहे. तो इतक्यात माझे आईस पाचवा सरून सहावा महिना लागला! माझे भक्ष्य जे माझ्या मातुःस्तनातील दूध ते आता दिवसेंदिवस कमी कमी होत जाऊन त्याची खारट रुची होत चालली असल्यामुळे मला बरेसे मानवत नसून माझी आतापासूनच उपासमार होऊ लागली आहे! मी या वयात म्हटले म्हणजे माझ्या आईच्या अंगाखांद्यावर खेळावयाचा, परंतु आईच्या शीघ्र गरोदरपणामुळे मी त्या सर्व सुखांस मुकलो असून पुढे माझी कशी काय स्थिती होईल हे सांगवत नाही. तेव्हा या सर्व दुःखाचा दोष आपल्यावर येत असून आपल्या अधीरपणामुळे मजवर हा अनर्थ प्रसंग प्राप्त झाला आहे. मला जन्मून तीन महिनेही झाले नाहीत तोच आपण माझ्या आईसह एकशय्येस अनुसरला व त्यामुळे हा दुष्ट प्रसंग मज बालकावर आला आहे, तर ही सर्व नुकसानी आपण साडेअडीच दिवसांत नोटिशीचे खर्चासह भरून द्यावी. तसे न होईल तर नाइलाजाने मेहेरबान राजाधिराज पंच सरकारच्या कोर्टात सन २२५० च्या २२॥व्या ऑक्टान्वये नुकसान भरून घेण्यासाठी दिवाणीत फिर्याद करणे भाग पडेल. कळावे ता. अंगी, माहे अंगडे, सन टोपडे.

२० जानेवारी १८८१

गंगाराम नारायण करिता
एम्. व्ही. पार्कर. अटणे व सॉलिसिटर.

एक जुने विनोदं-प्रधान साप्ताहिक (१८७०-१९०९)

या नोटीस देणाऱ्या बालकासारखेच दुसऱ्या एका अनाथ बालकाने म्हटलेले पद पंचमध्ये आलेले आहे. प्रसंग असा की पंढरपूरच्या अनाथबालकाश्रमाला 'व्हिजिट देण्यासाठी' अनेक थोर मंडळी गेली. त्यांच्या स्वागतप्रसंगी तिथल्या मुलांनी 'आई थोर तुझे उपकार' हे रूढ पद म्हणून दाखविल्यावर एका लहान मुलाने पुढे दिलेले पद गायले :

'ज्याचे मेले आई-बाप । त्याचे गेले सर्वही पाप ।
ज्यास असती आई-बाप । त्याचे घरी राहे पाप ।
आई-बापाचा महिमा । जाणे वाल्मिकी शंकर उमा ।
करिता नाही खेद करू । आनंदाने उड्या मारू ॥'

(२० जानेवारी १८८१)

गच्च बसलेल्या पारंपरिक धार्मिक वातावरणाला मोकळे करण्यासाठी आजोबा निरनिराळ्या युक्त्या योजतात. त्यांच्या राज्यात चैत्रात दरवर्षी राम जन्म होतो तेव्हा थोडा फार फरक करून अशी बातमी छापून येते :

'मंगळवारी कौसल्येचे पूर्ण नवमास होऊन तिला प्रसववेदना होऊ लागल्या. सकाळी आठ वाजल्यापासून तिचे पोट दुखू लागले. इंग्रजी राज्यात सुधारलेल्या वैद्यकीचा व उत्तम सुईणींचा ठिकठिकाणी बराच पुरवठा झाला असल्यामुळे कौसल्येच्या तरतुदीस प्रसवशास्त्रज्ञ सुइणी कौसल्येच्या सूतिकागृहात बसवल्या होत्या. डॉ. बगुपतरायही प्रसंग पडल्यास व उदरात गर्भ अडल्यास रामाच्या मातेची व बालकाची सुटका करण्यास आपल्या शस्त्रास्त्रांची पेटी घेऊन दाराबाहेर वाट बघत उभा होता. परंतु पंचांच्या हेतूप्रमाणे वैद्यशास्त्रपारंगत डॉ. अश्विनीकुमार, एम. डी. व इतर सुइणी सूतिकागृहाजवळ बसविल्या होत्या. तो नियमित वेळेला श्री. सौ. कौसल्या माता सौलभ्ये करून प्रसूत होऊन रामजन्म झाले. मूल मोठे अचपळ असून कीर्तीप्रमाणेच कार्य घडण्यात असत्यता यावयाची नाही! रामाचे जन्म झाले व हे दशरथपुत्ररत्न चिरायू होवो असे पुराणपुरुष खुद्द इच्छितात. नाहीतर पंचवटी रामासारखी अग्निस्पर्शादी अपघाताने बिचाऱ्यास काही इजा होईल की काय अशीही भीती बाळगिली पाहिजे व एवढ्याकरिता विलायतेतल्या एखाद्या प्रसिद्ध लाइफ इन्शुअरन्स कंपनीकडून या नूतन अर्भकाचे आयुष्याचा विमा उतरवण्याचेही साटे ठरविण्याचा (विचार) पंचसरकारांचे विचारी आहे. बघावे पुढे काय काय बेत होतात ते. रामाचा बाप दशरथ व माता कौसल्या यांच्या आयुष्याचे वगैरे परिमाणावरून हा पुत्रही दीर्घायुषी व निरोगी वगैरे निपजेल अशी खात्री बाळगण्यास मार्ग आहे व सहसा विमा उतरणाऱ्या मंडळीस भुर्दंड येणार नाही अशी पोटभरून

आकंठ खात्री आहे.'
(५ मे १८८१)

दरवर्षी वैशाखात लग्नाचा मोसम येतो तेव्हा आजोबांना पुन्हा नवा उत्साह चढतोच. ते तरुण माणसाहून (जरा जादाच) अधिक तरुण होतात. इंग्रजी राजवटीला साजेशा पद्धतीने सर्व लग्नव्यवहार शिस्तीत पार पाडला पाहिजे या हेतूने वेगवेगळ्या सूचना करीत राहतात. यापुढील काळात सर्व व्यवहार कागदोपत्री लिहिले गेले पाहिजेत म्हणून असा एक विवाहविषयक करारनाम्याचा मसुदा ते वाचकांना पुरवतात :

स्टांप

!! श्रीगजानन !!

करारनामा ता–माहे–सन–मिती, माहे–शके–रोज–वार या दिवशी रा. रा. यांस लिहून देणार–लिहून देतो ऐसाजे,

तुमचा कनिष्ठ चिरंजीव–वय वर्षे १८ यास माझी दुसरी मुलगी, नाव–वय वर्षे ११ हिचा विवाह करून देण्याचा संकेत चार शिष्ट लोकांचे समक्ष ठरला आहे... या लग्नाप्रीत्यर्थ हुंडा किंवा वरदक्षिणा १३०० रु. १५॥ आणे ठरला आहे. तो आम्ही सीमांतपूजनाचे अगोदर आपल्या स्वाधीन करू. तेव्हा आपण आपल्या चिरंजीवास सीमांतपूजनाला वसण्याची परवानगी द्यावी...पाच जेवणावळी आमचेकडे होतील. प्रत्येक जेवणास दोन दोन पक्वान्ने करण्यात येतील. तूप वाशेळे आणणार नाही. वाशेळे तूप ज्या जेवणावळीत लागेल ती जेवणावळ रद्द समजावी. गार पाणी, मठ्ठा वगैरेची व्यवस्था नीट रीतीने राखली जाईल...वाजंत्र्यात तास व बँडबाजा यांची योजना केली जाईल. रास नहाण्याला शंभर वायका बोलवू. जास्त असल्यास त्यावद्दलचे बिल आमचेकडून आपलेकडे पाठविण्यात येईल. या सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे लग्नमंडप उभारण्यात येईल. त्यात तीन झुंबरे, सहा मून, आणि बीस हंड्या लावण्यात येतील. चार दिवसपर्यंत चुन्नाजी बंदे अल्ली यांना १५० रुपये रोजप्रमाणे देऊन नृत्यगायन, वादन यासाठी बोलावले जाईल. लग्न झाल्यावर वर्षभराचे एकंदर सण वगैरेंना ६९९–१॥ आणापर्यंत खर्च करीन...दोघांतून कोणाकडे सुतक–सोयरे येऊन काही सण अंतरले तरी राहिलेल्या सणांची भरती वर लिहिलेल्या रकमेपर्यंत करावी...

येणेप्रमाणे हा करारनामा मी राजीखुषीने, अक्कलहुशारीने, अम्मलपाणी न करिता लिहून दिला.

सही—

साक्षी—

इतके सर्व पक्के ठरूनही लग्न झाल्यानंतर त्या काळची एखादी 'शिकलेली' रखमाबाई नवऱ्याकडे–दादाजीकडे–नांदायला, त्याची तब्येत, म्राहाणी इत्यादी मुद्द्यांवर नाखुषी दाखवीत जायचे नाकारतेच. त्या संबंधात आजोबांनी जाहिरात देऊन वरील करारनाम्यात करायला हव्यात अशा आणखी काही दुरुस्त्या सुचविलेल्या असतात :

जाहिरात

आमची एक उपवरा कन्या विवाहार्ह झाली आहे. उमेदवारांनी डॉक्टरच्या सर्टिफिकेटांसह अर्ज पाठवावे. डॉक्टरच्या सर्टिफिकेटात हेल्थ चांगली आहे, अस्थमा, कफ वगैरे रोगांचे विकार नाहीत, तसेच आपण ह्या तरुण वधूस तिच्या योग्यतेप्रमाणे घरदार, वस्त्रपात्र, आणि खाणेपिणे पुरवू, अशाबद्दल योग्य व सधन लोकांचे दाखले डॉ. च्या सर्टिफिकेटाप्रमाणेच अर्जासोबत आले पाहिजेत. ही सर्व पुढील संकटाचे निवारण होण्याचे तयारीची तजवीज अवश्य कर्तव्य आहे. नाहीतर डॉ. सखाराम अर्जुनची सावत्र पोरगी रुक्मिणीबाईच्या प्रमाणेच आमच्याही पश्चात आमची सुशिक्षित मुलगी काही वादविवाद करण्यास कदाचित प्रवृत्त होईल. ही भीती अगोदर समजून ही सावधगिरी ठेवण्यात येत आहे, याबद्दल कोणी हा आपला अपमान झाला असे मानण्याचे कारण नाही. मुलाचे लग्न यंदा या लग्नसराईतच उरकून घेण्याचा नक्की विचार ठरला आहे. अर्जदाराने अर्जासोबत फीसाठी ५ रुपयांची नोट पाठवावी. फी आल्याशिवाय अर्ज घेतले जाणार नाहीत. ज्याचा अर्ज पसंत होईल त्याची फी परत करण्यात येईल. कळावे, ता. माहे सन थापेवाजी मुक्काम कोठेतरी.

२८ एप्रिल १८८७ आम्ही

आपल्या जीवनातील काही सण-समारंभ आजोबांचे विशेष आवडते आहेत; वैभवशाली पेशवाईतल्या त्यासंबंधीच्या अनेक स्मृती त्यांच्या मनात आहेत आणि सभोवताली इंग्रजी राजवटीतले बदलून गेलेले नवे वातावरणही आहे. अशा वेळी आजोबांच्या लेकीसुनांनी सणासमारंभात घेतलेले उखाणे, गायलेल्या ओव्या सर्व काही त्या दोहोंची छाया घेऊन आलेले आहे.

एका हळदीकुंकवाच्या प्रसंगी जमलेल्या लेकीसुना उखाणे घेतात ते असे :

हत्तीवर हौदा । उंटावर भेरी ।
निघते भाऊसाहेबांची स्वारी । तेव्हा पाहती बडोद्याच्या नारी ॥
रुप्याच्या चौफुला । आत लवंगावेलदोड्यांचा साठा ।
वासुदेवरावांच्या विड्यात । सत्यभामेचा वाटा ॥

चालणं कसं चटकदार । बोलणं कसं कटकदार ।
पागोट्याची अक्कड । नि गणपतराव फक्कड ॥
गंगेची वाळू । चाळणीने चाळू ।
घरी गेल्यावर श्रीधरराव म्हणतील । सारीपाट खेळू ॥
सोन्याची सोंगटी । रत्नाचे फासे ।
जज्जाच्या कचेरीत । चिंतामणराव खासे ॥
आली हुंडी । गेली हुंडी । रुपये घ्या पारखून ।
कलेक्टराच्या कचेरीत । रामराव कारकून ॥
हस्तिदंताची पेटी । तिला सोन्याची चूक ।
रघुनाथरावांच्या हाती । इंग्रजी बुक ॥
खणखण कुदळी । मणमण मोती ।
चितारले खांब । सारवल्या भिंती ।
सासूबाईंच्या पोटचे । बन्संच्या पाठचे ।
नि डोक्याला लफ्फ्याचे पागोटे घालून फिरतात । ते विष्णुपंत आमचे ॥

या उखाणे घेणाऱ्या बायकांच्यामध्ये भटजींच्या घरातल्या दोन खट्याळ पोरीही आहेत. त्या म्हणतात,

' वाटल्या डाळीचं केलं पिठलं । त्यात खोबरं घातलं किसून ।
त्रिविक्रमशास्त्री गेले रुसून । तेव्हा राधेनं खाल्लं चाटूनपुसून ॥
मखमली गादी । तिथे किनखापाची उशी । राधा गेली पलंगापाशी ।
तर अनंतभट म्हणतात । आज एकादशी ॥ '

हिंदुपंचाच्या चौकटीत येणारा चुटकादेखील खास मराठी वातावरणातून येतो.

विट एन्ड ह्यूमर (थट्टा आणि विनोद

' एका वीरवैष्णवाची देशस्थ सून पोतेऱ्याने सारवीत असता तिचा सासरा आला. त्याने सूनबाई आडव्या हाताने पोतेरे घालीत आहे असे बघून तिचा निषेध केला व आपण काही शैव नव्होत, वीरवैष्णव आहोत, तेव्हा असे आडव्या हाताने कोणतेही काम करू नये; उभ्या हाताने वाटेल ते काम करावे; त्याबद्दल काही हरकत नाही असे म्हणाला. सूनबाई मोठी चाणाक्ष व हुशार होती. दुसरे दिवशी सकाळी बघते तो मामजी दात घासताना त्यांचे बोट उभे न फिरता आडवे फिरते आहे हे बघून तिने त्यांना निर्भीडपणे आपला धर्म संरक्षण करण्याकरिता सांगितले की, आपण वैष्णव आहोत, तेव्हा आडव्या बोटाने दात घासू नका; उभ्या बोटाने दात घासावयाचे याचे विस्मरण झाले वाटते ? (मुलगी स्त्रीशिक्षणातली असावी.)
(१९ फेब्रुवारी १८९५)

नव्या राजवटीत स्त्रियांच्या उखाण्याप्रमाणेच त्यांच्या जात्यावरच्या ओव्या व फुगड्यांची गाणीही बदललेली आहेत. हिंदुस्थानातील द्रव्याचा ओघ पश्चिमेकडे चालला आहे हे ओळखणारी एक बाई पुढील ओवी म्हणते :

'इंग्रजी लोकांनी । कळा फिरविल्या पहिल्या ॥
जाती पैशाच्या थैल्या । बंदराकडे ॥ '

पुणे शहरातील आग लागलेल्या बुधवारवाड्याच्या संदर्भात दुसरी म्हणते :

'जळाला बुधवारवाडा । आगीचा दिसे लोट ॥
नवे काढले घासलेट । इंग्रजांनी ॥ '

पुण्यात झालेल्या घिसाड्याच्या खटल्याच्या संदर्भात मुलीचे फुगडीचे गाणे असे असते :

'परात बाई परात, रानमाळी परात ॥
ब्राह्मणाची बायको, घिसाड्याचे घरात ॥ '

एका श्रावणात आजोबांनी एक 'नवी' संकट सोमवारची ही कहाणी जुन्या शैलीत वाचकांना सांगितलेली आहे :

'ऐका संकट सोमवारा, तुमची कहाणी. आटपाट नगर होतं. तिथं एक ढेरपोट्या होता. होता मेला कसाबसा तरी. पण बाई, मोठा लघळ नी चघळ होता. त्याचा नी त्याच्या गावच्या लोकांचा जणू काय उभा दावा होता. पण तो बाई साह्यबांकडे जाऊन जाऊन त्यांची भारी बाई हांजी हांजी करीत असे. साह्यबांना फळांच्या डाल्या पाठवायच्या; त्यांच्या मुलांलेकरांना आपल्या लठ्ठ पोटावर खेळवायचं. त्यांच्या मडमांची थुंकी झेलायची, साह्यबांनी गद्धा म्हटलं तरी हसण्यावारी व थट्टेवारी नेऊन आपला मऊमेणपणा दाखवायचा. त्यांणी आपले काळे कुळकुळीत नी कुर्रकुर्र वाजणारे नवे बूट जरी त्याच्या उंच कपाळावर मारले तरी ते निमूटपणे सोसायचे. त्याबद्दलचा विधिनिषेध मानायचा नाही. बिचारा सांबाचा अवतार. कुणाचं हूं का चूं म्हणून ऐकायचं नाही. येऊन जाऊन साहेब लोक काय ते पूज्य. कसे बरे पूज्य असणार नाहीत ? त्यांची भक्ती नी त्यांच्याबद्दलचं प्रेम यांनीच तर तो ढेरपोट्या इतक्या योग्यतेला आला. एका संकट सोमवारी त्याला बाई सरकारातून रावबहादुरीची पदवी देण्यात आली आहे. म्हटला म्हणजे, आडवा फोडला तर चक्र अन् उभा फोडला तर शंख. पण अशाला बाई सरकारनं रावबहादुरी दिली. अशा चांगल्या निर्गुणनिराकार माणसाला लोकं मेली नावं ठेवतात. लोकांना काही बाई समजत नाही. अशा पडल्या काळी जर आपलं आपल्याला ओळखून मनुष्य वागलं तर भगवान त्याचे हेतू सहज पूर्ण करील. असा संकट सोमवारचा महिमा आहे. हे संकट सोमवारचं व्रत कुणी केलं ? हे संकट सोमवारचं व्रत ढेरपोट्यांनी केलं. आणखी हे

संकट सोमवारचं व्रत कुणी केलं ? त्याच्याबरोबरच्या हांजी हांजी करणाऱ्यांनी केलं. आणखी हे संकट सोमवारचं व्रत कुणी केलं ? हडक्या दलालानं केलं. आणखी हे संकट सोमवारचं व्रत कुणी केलं ? त्या ढेरपोट्याबरोबर हिंडणाऱ्यांनी केलं. आणखी हे संकट सोमवारचं व्रत कुणी केलं ? त्याच्या मागे पुढे चालणाऱ्या सनकसनंदनांनी केलं. ते व्रत तशा रीतीने तुम्हा आम्हाला कधीही फल न देवो.'

श्रावण महिन्यात लोकांच्या मनात उफाळून येणाऱ्या धार्मिकतेचे योग्य भान ठेवून 'श्रावणी' च्या वेळी पंचमध्ये आलेली एक जाहिरात अशी आहे :—

'वरील सांवत्सरिक कर्म करण्याचा जनरल दिवस पुढील आठवड्यात आला असून अशा समयी लागणारा माल म्हणजे जानवी ऊर्फ यज्ञोपविते व पंचगव्ये वगैरे सर्व सामान उस्माएल फ्रामजी व शामोएल रामचंद्र या कंपन्यांच्या दुकानी मिळत असे. परंतु ते चांगले आणि कसोशीचे नसल्याविषयी पुष्कळ लोकांकडून तक्रारी व बोभाट झाल्याचे सर्वांस माहीत आहेच व खुद्द वरील दोन्ही कंपन्यांच्या एजंटांनी, नुकत्याच, विंचवाच्या औषधाच्या एका प्रसिद्ध डॉक्टराने, ज्याप्रमाणे आपले औषध खोटे म्हणून स्वतःच्या सहीने प्रसिद्ध केले होते हेही कोणी विसरले नसतीलच. कारण, पंचगव्यात गोमूत्र घातले तर ते फार थोडे घातले असून शिवाय त्यामध्ये कपटाने घोड्याचेही मूत्र मिसळले होते, असे तपासाअंती एका अनलायझराने त्या पंचगव्याचे पृथक्करण केले तेव्हा समजले व त्याप्रमाणे जानव्यांची बंडले जी पुडकेच्या पुडके विकली, ती जानवी आतमध्ये निघावी तशी मजबूत न निघता फुसकी व एकंदरीत खोटी निघाली असा वर्षाच्या अखेरीस जो हे ब्रह्मकर्म करणारांच्या हिशेबाचा आढावा निघाला आहे त्यावरून सिद्ध होते. म्हणजे, या जानव्यांमध्ये टिकाऊपणा म्हणून फार कमी होता. त्यांस दहा पाच किल्ल्या, पाच चार अंगठ्या व कधी कधी प्रसंगी किल्ल्यांस अडकलेली एक दोन कुलुपे इतकी सहन करून सहा महिनेही टिकाव धरत नाही असे बोभाटे प्रसिद्ध झाले आहेत. या सर्व गोष्टी लक्षात आणून आम्ही खाली सही करणारांनी मुद्दाम सर्व प्रकारच्या गुरांचे कातड्याच्या वादीची छत्तीस सुती करून मोठी मजबूत आणि सपोत जानवी केली आहेत; व ही नवीन शोधून काढलेल्या काही रासायनिक प्रयोगांनी साबूच्या पाण्याने धुऊन अगदी कापसाच्या जानव्याप्रमाणे सफेद केलेली आहेत. त्याचप्रमाणे सालाबादच्या लागणाऱ्या पंचगव्याच्या सुरेख कुप्याही सील केलेल्या चोख मालाने भरून ठेविल्या आहेत. हा वरील दोन्ही प्रकारचा उपयोगी माल न्यू फौन्ल्यांड बेटात नवीन स्थापलेल्या स्पिनिंग आणि विव्हिंग कंपनीच्या गिरणीत तेथील सर्व मजूर लोक सोवळ्यात वसवून व त्यांचे तोंडाने वेदमंत्र म्हणवीत शास्त्रोक्त रीतीने तयार करविला आहे. कातड्याच्या बारीक वाद्यांची जानवी करण्याचा शोध नवीनच असल्यामुळे ही इन्वेन्शन सर्वांस फायदेशीर होईल अशी आशा आहे. त्याचप्रमाणे पंचगव्यात लंडन येथील क्याटल मार्केटात जी जी पुष्ट म्हणून गुरे

येतात त्यांचे मूत्र गाळून घातले आहे. हे पंचगव्य प्राशन केल्याने सर्व प्रकारची शुद्धी तर होईलच; परंतु बुद्धीसही इंग्रजी तऱ्हेची तरतरी व हौशार्य येईल. कारण ज्या गुरांचे मूत्र या पंचगव्यात घातले आहे त्या गुरांचे मांसाहारावरच सर्व इंग्लंड देश पोसला जातो व इंग्लंड देशीयांची तरतरी, हौशार्य वगैरे लोकमान्य गुण तर जगप्रसिद्धच आहेत. सारांश, वरील मालाचा यंदा चांगला खप होऊन उत्तेजन येईल अशी आशा आहे.

पत्ता—कोठेतरी'

(१४ एप्रिल १८८१)

अब्राहम रिचर्ड फेलो,
दिनकर पेस्तनजी,
डेव्हिड महंमद नसरवानजी आणि
कंपनीचे सोल एजंट

आजोबांच्या घरी सततच विलायतची मेल येत असते. त्यातून एका आठवड्यात एक ढेकूण आला. तेव्हा आजोबांनी त्याच्याबद्दल लिहिले आहे :

'गेल्या आठवड्यात खुद्दांकडे जे विलायतच्या मेलमधून टपाल आले त्यातील एका वर्तमानपत्राच्या घडीत आतल्या बाजूला पुष्कळ दिवस खायला न मिळून पोटाची पत्रावळ झालेला असा एक चपटासा ढेकूण वसलेला आढळला. आता हा ढेकूण खुद्द लंडन शहरात जेथे हे पत्र छापले गेले त्या छापखान्यातला असो अथवा विलायतचे टपाल घेऊन येणाऱ्या पी. आणि ओ. स्टीमरमधील पोस्टाच्या खोलीत असलेल्या ढेकूण मंडळींपैकी असो. कसेही असले तरी हा खपाटपोट्या ढेकूण विलायतेहून उपवास करीत न्यूजपेपरबरोबर खुद्दाचे ऑफिसात दाखल झाला ही एक अपूर्व गोष्ट आहे यात संशय नाही. विलायत म्हणजे थंड मुलूख असल्यामुळे तिकडील प्राणिमात्र व पदार्थमात्र गोरे ऊर्फ पांढरे असावयाचे असा पुष्कळांचा समज आहे व तो पुसट पुसट खराही आहे असे पंच सरकारांचे या ढेकणावरून अनुमान होते. कारण हा आलेला ढेकूण इंडियन ढेकणापेक्षा बराच गोरा असून याचे अंगपिंडही इकडील ढेकणांपेक्षा सुदृढ आहेसे वाटते. विलायती वस्तू नवीन इकडे आलेली सर्व जिज्ञासूंस बघावीशी वाटते. तद्वत् वरील विलायती ढेकूणही सर्वांस बघण्याची इच्छा होणे साहजिक आहे. विलायती ढेकणास हिंदुस्थानातली उष्ण हवा सोसते किंवा नाही याचा (एक्स्पेरिमेंट) अनुभव आजपर्यंत कोणी बघितल्याचे खुद्दांनी ऐकिले नाही. तो अनुभव बघण्याचाही हा अनायासे योग घडून आला आहे. तरी हा ढेकूण फार दिवस इकडे वाचेल असे पंच सरकार समजत नाहीत व म्हणून लगबगीने सर्व विलायती ढेकूण बघणेच्छूस खुद्द असे कळवितात की, ज्या कोणास सदरील श्वेत-

द्वीपीय प्राणी पाहण्याचा समय साधणे असेल त्यांणी फार जलदीने कोटेतरी खुद्दांचे ऑफिस आहे तेथे बरोबर चार चार पैसे घेऊन यावे. कारण असे केले म्हणजे पाहणारांची दाटी होणार नाही व फीचे जे उत्पन्न होईल ते ढेकूण रक्षणार्थ जे पोलीस, चपराशी, शिपाई, व द्वारपाल ठेविले आहेत त्यांच्या मुशाहिऱ्याकडे लावण्यात येईल. खुद्दांस त्या फीतील एका कवडीची आशा नाही. खुद्दांचा हा परोपकारार्थ उद्योग आहे. सर्वांनी जलदी करावी. वेळेवर प्रसंग बघून प्रसिद्ध इचलकरंजीकर नाटककारां-प्रमाणे दाटी कमी होण्याकरिता फीचे दर वाढविले जातील. थोड्या खर्चात विलायती ढेकूण बघून घ्या व धन्य माना. धावा ! धावा !'

(४ ऑगस्ट १८८१) खुद्द

आजोबांचा हा विलायती ढेकूण पाहण्यास तमासगिरांची गर्दी होण्यापूर्वीच डॉ. बगुपतिराय या त्या काळच्या एका कुप्रसिद्ध डॉक्टरांनी ढेकणाच्या अंतस्थ रचनेचा अभ्यास करण्यासाठी त्याला भुलीचे औषध दिले. 'तो क्लोरोफॉर्म त्य चिमुकल्या प्राण्यास जास्त होऊन तो बिचारा प्राण गेल्याचे निमित्त होऊन ठार मेला. पंचांचे मित्र मि. कॅम्बेल यांनी ठाणा कलेक्टरांचे साहाय्याने वसईजवळील जैन स्तूपाचा शोध लावला व त्या स्तूपाचे अंतःशरीरपरीक्षण करण्याकरिता ढेकणाप्रमाणेच काही प्रयोग केला. परंतु तोही मरेपर्यंत जिवंत राहून जीव गेल्यावर मेला. अस्तु ईशेच्छा ! मृत्यू कोणत्या प्राण्यास नाही ?'

—अशा रीतीने आजोबांच्या लेखणीने विलायती ढेकणाचे निमित्त करून सूचकतेने एका डॉक्टरांच्या चारित्र्याला व कलेचा विध्वंस करणाऱ्या इंग्रजाला 'गती' दिली !

बालविवाह, बालवैधव्य हे गेल्या शंभर वर्षांतील आपल्या जीवनातील निर्विवाद करुणेचे सर्वांत मोठे विषय ! पण आजोबांच्या राज्यातील एक सटवाबाई स्वतःच्या केशवपनाच्या नंतर जे स्वतःचे अनुभव सांगतात तेही महत्त्वाचे आहेत. त्या लिहितात :

'काही म्हणा, 'बायका मूर्ख' म्हणतात ते काही खोटं नाही. मी नाही का बायको ? आता म्हटलं म्हणजे माझ्या वयाला साठी भरत आली. विटाळ गेले. सगळं काही झालं. आज चार सोवळ्या बायकांत माझं नाव निघतं. हे कशामुळे ! माझ्या पराक्रमाने ना ? माझा नाही का नवरा पंधराव्या वर्षी मेला ? मरेना मेला. मेला तर काय माझा जीव घेऊन गेला ? गेलं माझ्या कपाळाचं कुंकू नि डोकीचे केश. बरं झालं, मेला न्हाण्याचा नि धुण्याचा त्रास तरी चुकला. म्हणून माझं काही राहिलं का ? हे वडोदं आहे म्हटलं. माझं तारुण्य म्हणजे कसं रसरसलेलं होतं ? मजकडे कोणी पाहिलं तर दोन घटका तोंडात बोटच घालून उभं राहावं ! शेकडोजणांना झुलवून बोटावर खेळविलं. पण या कानाची गोष्ट त्या कानी गेली नाही. नवऱ्याच्या मागे अक्का तर गर्भपात केले नी चार मुलं जिवंत विश्वामित्रीच्या वाळवंटात रात्री बेरात्री

नेऊन गाडून आले. चला पाहिजे असेल तर त्या वाळवंटात त्या मुलांची प्रेते तुम्हाला उकरून दाखविते, पण गावात कोणी हूं की चूं म्हणेल तर काय मगदूर आहे? अशा छातीने दिवस काढले. म्हणून तर आज चार सोवळ्या बायकांत माझं नाव निघतं आहे? उगीच नाही म्हटलं. पुनः सगळ्यांना सटवाबाईची सल्ला हवी. ही कशाकरिता? चार पक्वान्नात हातखंडा, पुराण श्रवणात विठ्ठलमंदिरामध्ये माझ्या नावाची जागा नेमलेली. कोणीही पुराणिक आला तर त्यास सटवाबाई म्हणजे भाविक पवित्र बायको वाटावी. विठोबाला तुळशीचा हार कधी टाळला नाही. पुराण ऐकताना दोन दोन हजार बोटवाती तर सहज करून टाकी. पुनः मुलाबाळांस रोगराई नि पोटातली यांवर काळ्यामुळ्यांची औषधं नी मंत्र. नेहमी वाडीतल्या लांबलांबच्या आयाबाया येऊन घेऊन जातात. त्यास गुण पडतो, तरी कोणाच्या पैशास लिप्ताळी नाही. माझ्या हिमतीवर तारुण्यात चार पैसे करून ठेवले ते माझ्या जन्मवेरी पुरतीलच, नाही तर तुमच्यासारख्या चार अनाथ पोरीही जन्मापर्यंत पोशीन, असा माझा पराक्रम आहे. पण तुम्ही बायका कसल्या ह्या? अगे! आहे वैधव्य म्हणून जन्मपर्यंत मेल्या नवऱ्याच्या नावावर ब्रह्मचर्य का घेऊन कोणी अडाणी बायका राहिल्या आहेत? मनुष्य आहे चुकून म्हणा समजून म्हणा, गोष्ट होतच आहे. मेल्या देवानेच आम्हा बायकांत हा गर्भधारणेचा हा दोष ठेविला नसता तर आम्हास अशी तोंडे लपवून फिरण्याचा कशाला प्रसंग येता? पुरुषांसारखं असतं तर आपलं काम झाल्यावर नसत्या का आपण हातपाय धुऊन मोकळ्या झालो? पण तसं नाही. तरी म्हणून काय झालं? इतक्या थरावर मुळीच तुम्ही गोष्ट येऊ द्यायची नव्हे. दोन तीन पाळ्या उलटलेल्या पाहिल्या की लागलंच पुढच्या उपायास लागायचं. बरं, ते तरी माझ्यासारख्या आनुभविक, केल्या सवरलेल्या नी पोक्त बायकोकडे यायचं ते सोडून कोठे वैद्याकडे जा, कुठे डाक्तराकडे जा. अशाने कुठे बाई निभाव लागतो? ही गोष्ट किती विश्वासाचे झाले म्हणून पुरुषांजवळ बोलण्याचीच नव्हे. बरं तर बरं त्या प्रभाकर वैद्याने तुला मजकडे पाठवलीन. त्या मेल्या डाक्तरांकडे गेली असतीस तर तू दिसतेस चांगली गुटगुटीत; मेल्याने पुनः भलतंच काही तुला म्हटलं असतं तर ते तू, एकदा पोळल्यामुळे कबूल केलं असतं, म्हणजे त्याणे लगेच त्या थोरल्या डाक्तरांच्या कानावर घालून इस्पितळात नेऊन अटकेत ठेविलं असतं. मग तुझ्या जीवाचे नि अब्रूचे धिंडवडे विचारायलाच नको होते. असो. तू काळजी करू नकोस. तुला आता मी काळजीतून सोडवत्ये. या करिताच मी पुनर्विवाह चांगला म्हणते, उजळ माथ्याने तोच बरा बाई.'

(२० एप्रिल १८८२) सटवाबाई

पंच सरकारच्या राजधानीत अण्णा किर्लोस्करांच्या नाटकांचे जोरदार प्रयोग होऊ लागले. नाट्यसंगीताने घराघरांतील मंडळींना अगदी वेडे करून टाकले. ठिकठिकाणी संगीत चहा, संगीत दाढी, संगीत आंघोळ येथपासून संगीत मरणापर्यंत सर्व संगीत कार्यक्रम सुरू झाले. परंतु या नाट्यवेडात लोकांच्या पैशाचा फार मोठा ओघ अण्णांच्या खिशात जातो आहे हे कोकणस्थ आजोबांच्या नेमके ध्यानात आले. अण्णा वारले तेव्हा आजोबांना जरी बरेच वाईट वाटले तरी हेही त्यांच्या मनात येऊन गेले की आता बराच घरातला पैसा कंपनीच्या बिऱ्हाडी राहावयास जाणार नाही!

किर्लोस्करांची कंपनी ऐन बहरात होती तेव्हा पंच आजोबांनीही एक आगळा व्यापार सुरू केला. त्यांनी आपल्या गहाणाचे व्यवहार करणाऱ्या कंपनीची एक जाहिरात पुढे दिल्याप्रमाणे दिली आहे :

घमंडानंदन गहाण डुबव्ये आणि कंपनी लिमिटेड

'या लेखाने पुणे व पुण्याचे आसपास राहणाऱ्या एकंदर शोकी व रसिक लोकांस कळविण्यात येते की, हल्ली पुण्यास किर्लोस्कर नाटक मंडळी येऊन दाखल झाली असून तिचे अडीच खेळ हप्त्याहप्त्यांनी सुरू झाले आहेत. संगीत नाटके पाहण्याचा शोक अलीकडे आबालवृद्ध स्त्रीपुरुषांमध्ये उत्पन्न झाल्याचे समजण्यात आले आहे. तथापि वेळ आहे, वखत आहे, खेळाचे दिवशी शोकी मनुष्याजवळ पैसे असतील नसतील याचा नियम नाही. मुले, बायका, निरुद्योगी, उत्पन्नभक्षी, इत्यादी लोकांजवळ वेळेवर पैसे असण्याचा संभव कमी. अशा लोकांचे सोयीसाठी आम्ही खाली सह्या करणाऱ्यांनी एक भांडवलवाल्यांची कंपनी नुक्तीच रजिस्टर केली आहे. ह्या कंपनीकडून सर्व प्रकारच्या बारीकसारीक व किरकोळ जिनसा व पदार्थ, त्यांच्या मूळ किंमतीच्या अष्टमांशाइतके पैसे देऊन, दर सेकंद दर रुपयास एक पै व्याजाच्या दराने, वाटेल तितका पैसा गहाण मालाचे सरशीनिरशीवर विशेष लक्ष देवून, कर्जाऊ देण्यात येईल. मुलाकडून येणारी शालोपयोगी पुस्तके, स्त्रिया व मुलींकडून येणाऱ्या कुडुक वाळ्या, नथा व मंगळसूत्रे वगैरे सुद्धा किरकोळ सोन्यामोत्यांच्या व चांदीच्या वस्ता व दागिने, गरीब व निरुद्योगी आणि उत्पन्नभक्षी लोकांकडून मिळणारी पागोटी, घोतरे, जोडे, बूट, सोवळी, भांडी, अंगरखे, कांबळी, जोड पासोड्या, रकटी, हंतऱ्या, चटया, उखळे, मुसळे, वगैरे यच्चयावत् लहानमोठ्या व अल्पस्वल्प किंमतीच्या वस्तू आमचे दुकानी व पेढीवर लिहिलेल्या ठरावाप्रमाणे गहाणाचे पैसे घेऊन गहाण ठेवाव्या व दस्तऐवज लिहून द्यावे. सर्वांचे सोईकरता आम्ही ही पेढी मुद्दाम काढिली आहे. इचा उपयोग सर्व नाटकाचे शोकी व रसिक लोक करून घेतील अशी आम्हांस पूर्ण आशा आहे. अशा प्रकारची सोय आजपर्यंत कोणाकडूनही काढण्यात व योजण्यात आली नव्हती. ही आमची स्वतःची कल्पना असून इचा उपयोग फार

लोकांस व सर्व वर्गाचे स्त्रीपुरुषांस व्हावा अशी आमची इच्छा आहे. या इच्छेप्रमाणे किती लोक आमच्या या नवीन योजनेपासून फायदा करून घेतात इकडे आम्ही लक्ष देऊन आहोत. लोकांकडून आश्रय मिळेल त्याप्रमाणे या योजनेचा विस्तार सर्वत्र करण्याचा विचार आहे. त्याप्रमाणे या आमच्या नवीन कल्पनेबद्दल आम्ही सरकारातून पेटंट घेणार आहोत. संगीत मंडळीचे गमन बहुतकरून सर्वत्र आहे व सर्व ठिकाणी शोकी व रसिक लोकांना पैशांची जरूर लागायचीच आहे. तेव्हा, आमच्या या कंपनीपासून फार फार उपयोग होईल अशी आमची खात्री आहे. दिवसेंदिवस लोकांच्या गरजा फार वाढत चालल्या असून लोकांमधला विश्वास व भरवसा प्रतिक्षणी कमी कमी होत चालला आहे. ह्या सर्व गोष्टींवर लक्ष दिले असता आम्ही काढलेली कल्पना अत्युपयोगी आहे अशी सर्वांची खात्री होईल अशी आशा आहे. आमचे आफीस तांबड्या देवळाचे मनोऱ्यावर लष्करामध्ये आहे.'

घमंडानंदन गहाण डुबव्ये आणि कंपनी.

(१३ जानेवारी १८८१)

इंग्रजांच्या व्यापारी वृत्तीचे अनुकरण भारतीयांनी करायला हवे हे दाखविताना ही गहाणवटाची कंपनी आजोबांनी काढली. तसे इंग्रजी राज्यावर व इंग्रज माणसावर त्यांचे प्रथमपासून फार बारीक लक्ष आहे. व्हिक्टोरिया राणी ही त्यांची आवडती अंकाच आहे. तिच्या राज्यारोहणास पन्नास वर्षे झाली तेव्हा तिला उद्देशून हे तिचे आवडते आणि राजनिष्ठ पंचसरकार लिहितात :

हिंदुस्थानातून धि राइट् ऑनरेबल पंचबहादूर इत्यादी इत्यादी यांजकडून,

प्रिय भगिनी गंगाभागीरथी राजराजेश्वरी हिंदुस्थानची चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरियाताई, मुक्काम लंडननगर ईस—

महाराज्ञी ताई, हिंदुस्थानात जरी नाही तरी विलायतेतील तुझ्या राज्यारोहणास उणीपुरी पन्नास वर्षे झाली व म्हणून हिंदुस्थानातील तुझ्या प्रजेने महोत्सव करावा अशी तुझा प्रतिनिधी लॉर्ड डफ्रिनदादा याचेमार्फत तुझी आज्ञा व हुकूम सुटल्याप्रमाणे, गेल्या दोन दिवशी तुझ्या ज्युबिलीचा महोत्सव निर्विघ्नपणे आणि अभेद बुद्धीने सर्वत्र होत आहे हे बघून पंचसरकारास एक चहाचे चमचा भरून आनंद होत आहे.

...सर्व प्रजेच्या घरी लक्ष्मी व सरस्वती या उभयता कच्च्या घड्याने पाणी भरून फुगड्या, झिम्मा खेळत आहेत ! एवढ्या मोठ्या देशाचा काज-कारभार पाहण्यास तिकडून गेल्या मुदतीचा डलहौसी, ईडन, लिट्न, टेंपल, डफ, डफ्रिन वगैरे सारखी राज्यकुशल आणि राज्यकार्यधुरंधर मंडळी या देशावर आपल्या वतीने आली व त्याणी मोठ्या कळकळीने हिंदुस्थानचे खरे हित मनात बाळगून इकडील राज्यसूत्रे चालविली त्याबद्दल हिंदुस्थानची प्रजा तुझी फार फार आभारी आहे...

डलहौसीसारखे कामगार वारंवार इकडे यावे ही हिंदुस्थानातील हल्लीचे बाळराजे

व संस्थानिक यांची अन्तःकरणपूर्वक आणि मनापासून उत्कट इच्छा आहे म्हणजे त्यांना आपल्या राज्यकारभाराचे संबंधाने बरीच विश्रांती मिळून ते तुला रात्रंदिवस दुवा देतील.

हिंदुस्थानातील सर्व वर्तमानपत्रकर्ते अशी इच्छा व आशा बाळगून आहेत की नेक नामदार लॉर्ड लिट्न साहेबांनी पुन्हा एकवार हिंदुस्थानात येऊन इकडील राज्यसूत्रे धारण करावी व पूर्वीप्रमाणे पत्रकर्त्यांची मुस्कटे आवळून टाकून त्यांच्या तोंडात घट्ट बूच बसवावे किंवा त्या तोंडात घट्टसा बोळा कोंबावा. म्हणजे त्यांच्या पेनास खुरखुर खुरखुर करण्याचे श्रम पडणार नाहीत.

...सन १८७६–७७ साली, पुढे जो दोन वर्षे दुष्काळ पडला होता त्या वेळी, मुंबई इलाख्याचे अत्यंत दयाळू व लोकप्रिय गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांनी जे आपले औदार्य दाखविले त्याची इकडील प्रजेला प्रत्यही स्मृती झाल्याशिवाय राहात नाही. कारण त्या महोदार सद्गृहस्थांनी माणसी अच्छेर धान्य अगर रोज भरभक्कम दोन किंवा तीन पैसे देऊन त्याजकडून झटून काम घेण्याचे जे सुरेख यंत्र चालविले तेणेकरून दहा लाख मनुष्य मरेपर्यंत वाचले. त्या संबंधाने टेंपल बोवांनी त्या सर्व लोकांची पोटच्या लेकराप्रमाणे योग्य काळजी घेऊन सर्व प्रकारची दक्षता ठेवली. याबद्दल साखसुरत अधिकाऱ्याविषयी पंढरपूर येथील अनाथ बालरक्षक गृहातील व इतस्ततः भटकत फिरत असलेली पोरकी पोरे हितचिंतन करीत हात जोडून बसली आहेत...

प्रिय भगिनी, तुझे राज्यात तुझ्या कामदारांनी इन्कमटॅक्ससारखे व सॉल्टडयूटी-सारखे जुलमी कर बसवून गरीब लोकांना आपली भाकरी भाजण्यास लाकूडफाटी न मिळू देण्यासाठी रानावनांना टाळी मारली. तरी सर्व लोक आवडीने तुझे गुणानुवाद गातात. तुझ्या राज्यासारखे राज्य जन्मजन्मांतरी मिळावे म्हणून देवाजवळ कधीही मुक्ती न मागता जन्ममरणाच्या फेऱ्या जितक्या अधिक मिळतील तितक्यांची इच्छा करून रात्रंदिवस, त्या आकाशातील प्रभूला प्रार्थित आहेत...

...तुझे राज्यातून जे गोरे लोक इकडे व्यापार–टापार करण्यास वगैरे येतात तेही इकडील तुझ्या प्रजेशी व त्यांच्या नोकरांशी फारच ममत्वाने वागतात. ठोसे, लाथा, बुकांदे, बंदुकीतल्या व पिस्तुलातल्या गोळ्या वगैरेंनी अद्यापि, इकडील काळीबिंद्री व मर्कटतुल्य माणसे पटापट मरतात तरी, त्यांची दयालुता अद्वितीय आणि बिनतोड आहे. नेटिव्ह स्त्रियांवर बळजबरी करून त्यांचा उपभोग घेतला किंवा त्यांचे चैनीने गोडसे पापे घेतले तरी त्याबद्दल न्यायी सरकार बिलकुल लक्ष देत नाही ही अत्यंत इष्ट गोष्ट तुझ्या निष्कलंक राज्यात अत्यंत प्रशंसनीय होते...रिपन, नॉर्थब्रुक, वर्डस्वर्थ, ह्यूम वगैरे सारखे कामदार, अध्यापक, पत्रकार, व्यापारी वगैरे इकडे कधीही न येतील अशी जिकडून तुझ्याने तजवीज ठेवण्यात येईल तिकडून ठेवण्यात तू कधीही

कमी करणार नाहीस अशी इकडील प्रजेला फार फार उमेद आहे...

वाचकांनो, ही तार म्हणजे राणीसरकारच्या कारकीर्दीचा अर्क काढून मुद्दाम या आनंदोत्सवाचे भरात पाठविण्यात आली...आपल्या प्रिय भगिनीवरील प्रेम ज्या कोणत्या रीतीने व उपायांनी जास्त जास्त दिसेल तिकडून दाखविण्यास थेड्यानि कमी केले नाही...'

(३१ मे १८८८)

व्हिक्टोरिया राणीला लिहिलेल्या या पत्रासारखेच एकदा पंचआजोबांनी देवी महामारीदेवी हिलाही मानपत्र दिलेले आहे ! तिच्या कृपेने भूते, पिशाच्चे, वेताळ यांची सृष्टी कशी फुलून जाते आणि मानवी सृष्टी कशी सुकून जाते ते त्यांनी समाधानपूर्वक सांगितले आहे !

परंतु पंचसरकारला काही पत्रे-मानपत्रे देणे एवढाच उद्योग नाही. ते आपल्या राज्यातील वैज्ञानिक संशोधनाला उत्तेजन देत असतात; दररोजच्या बाजारभावावर लक्ष ठेवून असतात...कितीतरी कामे ! त्यांनी केलेल्या या नेमणुका आणि बदल्याच पाहा.

' ज्युडिशिअल आपॉइन्टमेन्टस् (पंच गव्हर्नमेंट गॅझिटवरून)

ता. तलखी, माहे उन्हाळा, सन हुशहुश, मेसर्स अंजिरे व द्राक्षे आपल्या कामावर मंडई ऑफिसात रुजू झाली होती. परंतु मध्यंतरी रा. ब. पावसोपंत ऊर्फ पर्जन्यराव यांची गारांसह अतिशय वृष्टी झाल्यामुळे हर्दू अफीसरांच्या प्रकृतीत जरा मांद्य आल्यावरून मंडई ऑफिसचे जुजबी काम सांभाळून त्यांस रजा दिली आहे.

अज्जम मातीचे घडे व कुज्जे यांची उन्हाळ्याकरिता सर्व लोकांस गार पाणी पुरविण्याकडे स्पेशिअल नेमणूक केली आहे...

मेसर्स खर्बुजे, टर्बुजे ऊर्फ कलिंगडे आणि सौ. काकड्या यांस आपल्या ऋतूचे काम सांभाळून चैत्रमासाच्या हळदीकुंकवाचे ॲडिशिनल काम दिलेले आहे. सौ. उन्हाळी छत्र्या याजकडून यंदाचा उन्हाळा फार जाणवतो असा तक्रारी अर्ज आल्यावरून कित्येकांस आच्छादनार्थ स्वच्छ कापडाचे अभ्रे करण्याच्या सँक्शनची मंजुरी देण्यात आली. खा. ब. वाळ्याचे पडदे यांस खुद्दांच्या ऑफिसरूमच्या दरवाज्यावर फुलपावरचा अधिकार दिला. रा. रा. हिरवे आंबे ऊर्फ कैऱ्या यांची गोड पन्हे व फोडणीचे लोणचे या कामावर सालाबादप्रमाणे परंतु फारच जुजबी नेमणूक करण्यात आली आहे.'

(१८ फेब्रुवारी १८८७)

हिंदुस्थानात उपयोगी पडतील अशी काही नवी मापक यंत्रे आजोबांनी बाजारात आणलेली आहे.

(१) उपकारमापक यंत्र—कोणी कोणावर थोडे किंवा फार उपकार केले असता आभारी मनुष्य असे उद्‌गार काढितो की तुम्ही आमच्यावर इतके उपकार केले आहेत की ते बोलूनसुद्धा दाखविता येणार नाहीत. यामुळे उपकार करणारास किती श्रम पडले याविषयी स्पष्ट निर्णय होत नाही. आभारी मनुष्यास पुढेमागे उपकार फेडणे झाल्यास तेणे त्या वेळेस—कोणच्या प्रमाणाने फेडावे हेही समजत नाही. वरील यंत्राने या दोन्ही अडचणी दूर होतात म्हणजे एकाने दुसऱ्यावर किती उपकार केले हे मापता येऊन दुसऱ्याने त्यापैकी काही फेडल्यास शिल्लक किती राहिले हेही सांगता येते.

(२) शिव्यामापक यंत्र—या यंत्राचे योगाने भामिनी, प्रियंवदा, शिन्नरकरीण वगैरे अप्सरांचे मुखातून निघणारी पाणीदार मोत्ये मोजून त्यातले चांगले चांगले दाणे निवडून त्या त्या अप्सरांच्या खाती जमा करता येतात. पहिल्याची किंमत ओंजळभर रुपये, दुसऱ्याची फुटका बदाम तर तिसऱ्या दममापक यंत्राची किंमत ३२ दात अशी आहे. ज्या सनात ही यंत्रे तयार करण्यात आली त्याचे नाव आहे झटपटसन.

(२८ एप्रिल १८८१)

काल संध्याकाळचे बाजारभाव

व्यभिचार—चार आण्यांनी पक्का तोळा, अपहार, चोरी आणि लबाडी यांचे दर जरी सारखेच आहेत तरी गिऱ्हाइकाच्या जास्त-कमीपणाप्रमाणे यांच्या भावात शेर–अच्छेरचा व पैशा–अधेल्याचा फरक पडतो.

कुंटणगिरी–पोटावरी किंवा दोन आण्यांनी शेर; हाय हाय आणि तळतळ आणि दुःख नाही. रुपये पल्ला. दारूबाजी, रंडीबाजी,...हे पदार्थ फार स्वस्त ऊर्फ सबंग झाले आहेत. त्यांना रोख पैसा द्यावा लागतो. तरी त्याचबरोबर एक अब्रू म्हणून जो मौल्यवान पदार्थ आपल्या संग्रही असतो तो एकेक, दोन–दोन थैंब द्यावा लागतो...भाजीवर कोथिंबीर देतात त्याप्रमाणे उपदेशाबरोबर (भगेन्द्र चट्टे) फुकट देण्यात येतात. चुगली, चहाडी, लावालावी यांचे पीक सरकारी ऑफिसाभोवतालच्या कंपौंडात बरेच आले असून त्याची मळणी वगैरे होऊन पोती भरून माल विक्रीकरिता तयार आहे. भाव बेताचा असून त्याच्या क्रयविक्रियात कधीकधी स्वार्थसाधन, तळीराम गार करणे किंवा कधी कधी छीः थूः हे पदार्थ आपापल्या श्रमाप्रमाणे व कर्तृत्वाप्रमाणे शेरअच्छेर फायद्याच्या रूपाने मिळतात. आळस, ऐदीपणा पैसापासरी झाला असून उद्योग, चपलता या मालाला बुरशी आल्यामुळे तो कूचकामाचा झालेला आहे...अहंपणा, आत्मश्रद्धा...एक्स्पोर्ट होऊ लागले असून असत्यता, कपट यांचे गठ्ठे नुकतेच मँचेस्टरहून पी. आणि ओ. स्टीमरमधून पोर्ट

ब्लरमध्ये दाखल झाले आहेत. कमिशन घेण्याचा तेथील एक्स्पोर्ट कंपनीचा ठराव झाल्याची यादी पंच ऑफिसात ॲडव्हरटायझिंग बोर्डवर लागलेली सर्वांच्या दृष्टीस पडेल.

(७ जुलै १८८१)

महाराष्ट्रातील ब्राह्मणेतरांच्या चळवळीबद्दल सुधारक असूनही आजोबांची प्रतिक्रिया सावधानता सुचविणारी आहे.

भटुरगे

'ही जात फार उन्मत्त, दुसऱ्यावर वर्चस्व ठेवणारी, कपटी, वेळ येईल तशी वागणारी, घरभरी म्हणण्यापेक्षा घरबुडवी, एवंच गुणादुर्गुणांची खाण अतएव प्रदर्शनात ठेविण्यासारखी, प्रत्यक्ष मूर्ती असून हिंदुधर्माचे जे काय पवित्र गाठोडे ते सर्व तिच्याच हाती असून आज निपटनिरंजन अल्लाचे भक्त व मेंढपाळांचे कळपचे कळप या देशात चमकले व चमकू लागले आहेत असे खडखडीत ठाकून ठोकून अनुभवास येत असता किंवा मिशनरी अथवा सालव्हेशन आर्मीच्या झुंडीच्या झुंडी हे भटुरगेनाम धर्म बोचके हिरावून घेण्याकरिता युक्तिप्रयुक्तीने, लालचीने सपाटून प्रयत्न करीत असता श्रमसाफल्य होत नाहीत व भटुरग्यांच्या मुहूर्ताविाचून किंवा पंचांग श्रवणाविाचून मनुष्यमात्र हिंदूचे अडलेलेच आहे. तस्मात् या भटुरग्यांची ऊर्फ उच्च म्हणविणाऱ्या बामणांची हंबेलंडी उडविण्यास किंवा त्यांचे ते गुहेत ठेवलेले धर्मतत्त्व हिरावून घेणे आवश्यक असून तसे झाल्याविाचून आकाशाच्या बापाच्या पाखरेखाली किंवा खिस्ताच्या तारणाखाली या लंडाचा इंडिया येण्याचा संभव नाही, असे निश्चित ठरवून हणगोजीराव लोखंडे वृद्ध आणि आनुभविक पंचास किंवा खुद्दांस अशी शिफारस करण्याकरिता विनंती करीत आहेत की, सर्व भटुरग्यांस मायंदळ झालेल्या अपकारी खात्यात नोकरी ऊर्फ चाकरी देण्याविषयी चार शब्दांनी सरकारास्नी खुलवून सांगा आणि तसे झाले म्हंजे भटुरग्यांच्या घ्राणेंद्रियात मद्यरूपी हवा संचार करता करता हृदयात वास करू लागली की आटपलेच धर्माचे बोचके नी काय? मग नको ती सालव्वेशन आर्मी, नको ते मिशनरी मंडळ, नको ते दीनबंधूचे रडगाणे नको तो एकेश्वरी, नको तो ब्राह्म आणि स्त्रीशिक्षणक्रम, आपोआप सर्वत्र मेंढपाळ पसरून शेवटचा जय गोपाळ पसरून देण्यास उशीर लागणार नाही.'

(१५ जानेवारी १८८५) ठेंठणपाळ.

कधी आजोबांना भोवतालच्या जगातील विलासी व्यक्तींना लोकांसमोर उभे करून धाक दाखवावासा वाटतो तेव्हा ते कडवटपणाने लिहितात :

प्राप्तीचा आकार

'निर्वाहाचे व चैनबाजीचे सर्व पदार्थ, न्यायाने म्हटले तर, मनुष्यास विकतच घ्यावे लागतात. मुंबई, पुणे वगैरे सारख्या मोठमोठ्या शहरांमध्ये मूठभर माती किंवा शेणाची एक पोयटी म्हटली तर विकत आणावी लागते. हे सर्वांस माहीत आहेच. पंचाचा एक गोंडस मित्र वर लिहिल्या प्रकारच्या एका श्रीमान शहरात राहतो, त्याची प्राप्ती बेताचीच असून, प्राप्तीप्रमाणे खर्चही आहे. तथापि त्याशिवाय अवांतर चैना व विलास हेही यथास्थित चालतात. उदाहरणार्थ, चक्रीदार पगड्या, इस्तरीचे कपडे, नवा करकरीत जोडा, सायंकाळी मोतियाचा गजरा, कानात अत्तराचे फाये व बोळे, गुलकंद, सरबते वगैरे चापायला, मसाल्याची व सुवासिक तेले तीन पावशेर शेंडीस व अच्छेर घेण्यास लावायला आणि एखादे खूपसुरत अडपझडप पात्र विलासोपभोगाला, यामध्ये कधीही कमीपणा नाही व या सर्वांला कधीही एक पैसाही खर्च करावा लागत नाही! छावड्या आहे गोडबोल्या, ज्याच्याशी म्हणून स्नेह पडेल त्याला तो हवासाच वाटतो. माळी, सुगंधी, तांबोळी, परीट, चांभार, शिंपी, पगडबंद आणि विलासवती योषिज्जन या सर्व मंडळींशी बिचाऱ्याचा स्नेह. सर्वांना तो आपला हितेच्छु वाटतो व ते ते सर्वजण त्याजवर आपले प्रेम व भक्ती दाखविण्याकरिता आपआपल्या शक्त्यनुसार त्याला शृंगारून त्याची खुषमर्जी ठेवितात. तेव्हा हे सर्व उपभोग व चैना यांना पैसे खर्च केले असता जितका व्यय होईल तितका जमेस धरीला म्हणजे सर्व मिळून होणारी जी रक्कम ती त्याची प्राप्ती असे म्हटले तर खोटे होईल काय? व या सर्व खाजगी चैनबाजीस बीस रुपये तरी निदान खर्च येईल असा अजमास धरून एकंदर होणाऱ्या रकमेइतकी प्राप्ती आहे असे सांगितले तर ते सांगणे खोटे असे कोणी म्हणेल काय? शिवाय नाटके, छकडी, तमाशे, सर्कसे वगैरे स्वतःस व स्वतःबरोबर आपल्या आवडत्या माणुकासही पाहण्यास बिनखर्चाने मिळतात. त्याबद्दलची ही रक्कम वरील जमेतच धरून एकंदर प्राप्तीची आकारणी नको का करायला? खुद्दांच्या हिशेबनिसाचे तर असेच म्हणणे आहे की, त्या सर्व रकमेची एकंदरी करून तितका पगार आहे असे सांगण्यास काही हरकत नाही. व हेच कलम सर्वांनी ध्यानात धरून याप्रमाणेच प्रत्येकाने आपली प्राप्ती किती होते ती बघून, कोणी विचारल्यास तितक्या एकंदर रकमेचा पगार आहे असे सांगावे म्हणजे (आपापले मोठाले पगार) दिसतील. (ही...) सर्वांना अनुकरणीय आहे.'
(९ एप्रिल १८८५)

कुठल्याही क्षुद्र वा थोर विषयावर आजोबांची चटपटीत लेखणी अप्रतिहत चालत असली तरी कोणाच्याही मृत्यूबद्दल लिहिताना ती साहजिकपणेच थोडी अडखळते. आपल्या राज्यातील तरुण कर्तबगार मुलांना मृत्यू गाठतो तेव्हा आजोबांचे मन फार

कळवळते. थकलेल्या, म्हाताऱ्याकोताऱ्याचे मृत्यू निसर्गक्रमाप्रमाणे असल्याने जरी शांतपणे स्वीकारावे लागतात तरी एखाद्या माणसाचा वियोग ही गोष्ट त्यांना दुःखीकष्टी करून जाणारीच असते. अशा प्रसंगी मृत्युवार्ता लिहिताना आजोबांच्या विनोदप्रधान लेखनशैलीला बऱ्याच वेगवेगळ्या लटपटीही कराव्या लागतात. त्या लटपटी पाहताना आपल्याला थोडेसे जे हसू येते ते या प्रसंगीच्या ठरावीक संकेतांना ते गंमतीदार वळणाने छेद देतात त्याचे !

रा. नाना मोरोजी यांचा अगदी तरुण मुलगा गेला तेव्हा आजोबा लिहितातः 'ही पोरे आपल्या वृद्ध आईबापांचा पूर्वजन्मीचा दावा व वैर उगवतात काय अरेरे ! म्हातारा पंच हा अशा दुःखापत्तींच्या त्रासामुळेच सर्वसंगपरित्याग करून बसला आहे. तरी स्वकीयाचा आणि मित्रगणांचा मायापाश त्याला कोठे तोडवतो आहे ?'

कर्तृत्वाच्या ऐन उमेदीत असलेले विष्णुशास्त्री चिपळूणकर दिवंगत झाल्याचे कळते तेव्हा आपला सख्खा पुतण्याच गेला असे दुःख पंच आजोबांना होते. ते लिहितात :

'पंचाचे कैलासवासी मित्र वे. शा. सं. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे वडील चिरंजीव व पंच सरकारांचा प्रियकर पुतण्या विष्णुशास्त्री चिपळूणकर यांस गेल्या शुक्रवारी सकाळी सन्निपाताने देवाज्ञा झाल्याचे वृत्त खुद्दांस कळल्यापासून पंच-महाराज पुत्रशोकाप्रमाणे विव्हळ झाले आहेत ! हरहर ! या मुलाचे वय केवळ बत्तीस वर्षांचेच की हो होते ! विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला तर सर्व महाराष्ट्रीय जनांस विश्रुत आहेच. या पुरुषाचे लेखनचातुर्य, कोटिक्रम, विद्वत्ता, अर्थबाहुल्य, स्वातंत्र्याभिमान, निगर्विता, मातृभक्ती वगैरे नाना गुण जे पंचमहाराजांना माहीत आहेत त्यावरून असा सुपुत्र फारच थोड्या मातांस होतो असे म्हणण्यास हरकत नाही. पंचाचा वृद्ध मित्र कै. वा. कृष्णशास्त्री चिपळूणकर जितका लोकप्रिय होता त्याचेपेक्षा पुष्कळ पटीने त्याचा हा अल्पायू आत्मज अधिक लोकप्रिय आणि लोकमान्य होता. कधी कधी म्हाताऱ्या पंचकाकांस या पुतण्याचे बालिश व चटोर लेख आवडत नसत तरी त्यांतील माधुर्य, रसिकता वगैरे बिलकुल असेवनीय नसत. पंचांचा हा पुत्रस्थानीय विष्णुशास्त्री, महाराष्ट्र भाषावधूचा चूडामणी होता. बा विष्णुशास्त्री ! तू या वृद्ध काकास सोडून आपल्या ऐन उमेदीत व तारुण्यात स्वर्गसुख भोगण्यास गेलास ! तुला इतक्यातच ह्या हतभाग्य आर्यभूमीचा त्रास आला काय ? अरे बाळा ! तुझी ती सप्तवार्षिकी कन्या निबंधमाला नष्टपितृ झाली ना ? शिव शिव ! काय रे तुझे उद्योग ? काय रे तुझा हव्यास ? काय रे तुझे मित्रप्रेम ? किती रे तुझी देशप्रीती ? आता तुझा केसरी, मराठा, आर्यभूषण छापखाना, चित्रशाळा, किताब-खाना, भोजनगृह, न्यू इंग्लिश स्कूल वगैरे अनाथ झाला ना ? तुझ्या प्रिय मातेचे दुःख कोण शमवील ? बा विष्णो ! अरे विष्णुशास्त्री ! रामराम !'

(२६ मे १८८१)

कालांतराने आजोबांचे दोन जवळचे मित्र दिवंगत होतात तेव्हा ते लिहितात :

'दोघांची वये बरीच पक्व झालेली होती. परंतु ते इतक्यातच देहावसानापर्यंत पावावेत असे कोणीही इच्छित नव्हते. परंतु पंचमित्र यमधर्म याला वरील मित्रद्वय आणखी जास्त दिवस या लोकी राहू द्यावे असे न वाटून...काय करावे? यमधर्म हा असाच नेहमी वृद्ध आजोबांशी दांडगेपणा करतो. पण त्याची पंचमहाराज एकदा चांगलीच गुपचुपपणे खोड मोडणार आहेत!'

'...थेऱ्यांला प्रती आठवड्यास मृत्यूची नोंद करिता करिता ओकारी आली बुवा! सर्वच मरायला का लागलात? अभाग्यांनो! थोडे दिवस वाचा ना! का इतकी मरण्याची गर्दी? का?'

मृत्यूच्या राज्यात (तरी) इंग्रज, आणि भारतीय राजा आणि प्रजा दोघेही समान आहेत यावर एक भारदस्त प्रवचन करून आजोबा काही इंग्रजांच्या मृत्यूचे वर्तमान वाचकांना कळवतात. एकदा एका अंकात तर महत्त्वाच्या घटना लेखी नोंदविण्याच्या इंग्रजांच्या गुणाचे कौतुक करीत इंग्लंडचे कोणकोणते राजे कोणत्या आजाराने कसे मेले याची निवडक यादीच आजोबांनी दिली आहे.

'पहिला वुइल्यम (विजयी) हा अतिशय लठ्ठ होऊन मेद वाढून मद्यपानातिशयाने व विषयातुरतेने मेला...

...पहिला हेन्री अधाशीपणाने अजीर्ण होऊन कालमुखात पडला.

...दुसरा एडवर्ड अत्यंत क्रूरपणे, दुष्टतेने मारेकऱ्यांकडून मारला गेला. हे मारेकरी त्याच्या आईने व तिच्या जाराने संगनमताने घातले.

...पाचवा एडवर्ड यास त्यांचा चुलता तिसरा रिचर्ड याने मनोऱ्यावर फाशी मारले...

...तिसरा जॉर्ज वेड लागून मेला...

या प्रकारची भरपूर मोठी यादी दिल्यानंतर शेवटचे वाक्य येते, '...महाराणी व्हिक्टोरिया चिरायू होवो!'

हिंदुपंचचे मला पाहायला मिळालेले अंक फक्त चौदा वर्षांचे आहेत. (१८८०–१८९८ मधील काही वर्षे वगळून) पहिल्या दहा वर्षांचे (१८७०–१८८०) अंक मिळतील तर मूळ इंग्रजी पंचने प्रारंभी हिंदुपंचला कशी स्फूर्ती दिली हे नेमके समजू शकेल. याच सुमारास गुजरातीत गुजरात पंचही निघत होता असे दिसते. आजोबांचे बडोदा सरकारशी आणि गुजराती समाजाशी बरेच घनिष्ठ संबंध असले पाहिजेत असे या उपलब्ध अंकांवरूनही वाटते.

एकूण एकूणचाळीस वर्षे चाललेले हे साप्ताहिक वरील काळात ठाण्याच्या सूर्योदय

प्रेसमध्ये छापले जात होते असे दिसते. हा सूर्योदय प्रेस ठाणे–बाजार घर क्र. १ येथे होता. कोणी गोपाळ गोविंद दावक हे पंच व सूर्योदय प्रेस या दोन्हींचेही १८९२ पर्यंत 'म्यानेजर' होते. त्यांचे नाव प्रत्येक अंकावर असून संपादकाचे नाव मात्र कोणत्याही अंकावर नाही ! कालांतराने गणेश कृष्ण शहाणे हे सूर्योदय छापखान्याचे मालक झालेले आहेत असेही आढळते.

काशीनाथपंथ फडके यांना वामन बाळकृष्ण रानडे हे हरहुन्नरी गृहस्थ भरपूर प्रमाणात लेखनसाह्य करीत असल्याने अधूनमधून त्यांचा तेवढा नावासह उल्लेख पंचमध्ये येतो. हिंदुपंचचे हे उपलब्ध अंकही नागपूर येथे वास्तव्य करून राहिलेल्या रानडे यांच्या चिरंजीवांकडूनच उपलब्ध झालेले आहेत. वामन बाळकृष्ण हे पुणे–नाशिक येथील वास्तव्यात लोकहितवादींना त्यांच्या लेखन-कामाठीत साह्य करणारे एक अतिशय व्युत्पन्न गृहस्थ होते. लोकहितवादींच्या जीवनाचा 'गोपाळराव हरी' या पुस्तकाच्या निमित्ताने मी जेव्हा मागोवा घेत होते तेव्हा या रानडे कुटुंबाशी माझा थोडा पत्रव्यवहार झालेला होता. त्यांच्याकडील कागदपत्रे महाराष्ट्र सरकारच्या ग्रंथालयाचे डायरेक्टर श्री.कृ. द. पुराणिक यांनी सरकारी ग्रंथालयासाठी आणल्याचे समजले तेव्हा मी श्री. पुराणिक यांची भेट घेतली. त्यांच्या बहुमोल सहकार्यानेच या अंकांचा लाभ होऊ शकलेला आहे.

विनोदी हिंदुपंच आणि गंभीर सूर्योदय ही फडके यांची दोन्ही साप्ताहिके व्यावहारिक बाबतीत एकमेकांच्या आधारे वाटचाल करीत गेलेली असावीत. पण वाङ्मयाच्या व वृत्तपत्रांच्या इतिहासकारांनी हिंदुपंच व अरुणोदय ही एका संपादकाची वृत्तपत्रे आहेत असे म्हटले आहे; आजच्या उपलब्ध अंकांवरून तरी असे दिसते की 'सूर्योदय व हिंदुपंच' हे एकाच्या संपादनाखाली आहेत आणि 'अरुणोदय' हा त्यांचा 'गावातला शत्रू' आहे. अरुणोदयाचा उल्लेख पंचआजोबा 'लंगडा अरुण' असा उपरोधाने करतात; शिवाय सूर्योदय व पंच यांची वर्गणी एकत्रितपणे, आगाऊ दिल्यास सवलतीही मिळतात. पंच सचित्र होण्यासही बराच अवधी लागलेला दिसतो. प्रथम मुद्रणाच्या काही अडचणी आणि नंतर आर्थिक अडचणी आल्याने विनोदी चित्रे १८९३ पासून येऊ लागलेली असावीत. आज उपलब्ध झालेल्या अंकांतही अगदी थोडीच चित्रे आहेत.

हिंदुपंचची वार्षिक वर्गणी आगाऊ दोन रुपये तेरा आणे (टपालखर्चासह) आणि 'सूर्योदय' व 'हिंदुपंच' मिळून दिल्यास ती आगाऊ सात रुपये आहे. किरकोळ अंकांची किंमत बरीच म्हणजे चार आणे आहे. पुष्कळ मंडळी ही एवढी वर्गणीही वेळेवर देत नसल्याने संपादकाला त्यांच्याबद्दल आपल्या खास शैलीने अनेक वेळा 'निवेदने' छापावी लागली आहेत.

वाचकांकडे तुंबलेली वर्गणी मागण्याची पंचआजोबांची पद्धत अशी आहे :

'पाठवा–माहेरवाशिणीला सासरी घाठवा' (पाहा : जज्ज पिन्हे कृत जज्जमेंट) वर्गणी न देणारा कृष्णावलीत. (ब्लॅक लिस्ट) दाखल होईल असे म्हणतो; पण करतो कुठे! वर्गणी पाठवा. पितृपक्ष आला आहे म्हणून पाठवा आमंत्रणे पितरास आणि मारा क्षीरोदनावर हात! पण म्हाताऱ्याची आठवण विसरू नका.'

'...आजपर्यंत एका हातात पंखा आणि दुसऱ्या हातात पंचपत्रिका अशा थाटाने हुश्‌हुश्‌ करीत लोक पहुडले होते. पण आता तो काळ बदलला. जिकडे तिकडे गारीगार होण्याची संधी आली तर मग उशीर का? आता पंचाचे दाम तावडतोब पाठवून उतराई व्हा कसे! आपल्या कार्पण्याचा हुर्डा खात पंचाचे दाम पाठविण्यास चुकाल तर तुमच्या नावाचा हुर्डा होईल हे लक्षात बाळगा.'

'...पंचसरकारांनी आपल्या पत्राचा कागद चांगला घेऊन टाइपही नवे व सुवाच्य घालण्याचे सँक्शन ठरविण्याचा विचार केला आहे. परंतु पंचाचे आश्रयदाते आपल्या शिलकी बाकीचा झपाझप निकाल करण्याची चुणूक दाखवून खुद्दांची तिजोरी तत्त्वमसियुक्त करतील तेव्हा पंचसरकारकडून सांक्शन मंजूर होण्यास एका सेकंदाचा देखील अवधी लागणार नाही असे पंच आजोबा सर्व उदार वर्गणीदारांस लगबगीने सुचवीत आहेत...आजोबास आपल्या वार्धक्यात दूधभात साखरेचे रोजचे मऊमऊ जेवण मिळाले म्हणजे पुरे आहे तरी वाचकांनी झराझरा खिसे खुले करून पोस्ट ऑफिसात मनिऑर्डरी करण्याची गर्दी उडवून द्यावी. म्हणजे अतिशय कामांमुळे सरकारांस ठिकठिकाणी मदत–पोस्टमास्तरांच्या नेमणुका करण्याचे भाग पडावे. म्हणजे सर्व व्यवस्था होणार!'

(२३ मार्च १८८२) खुद्द.

म्यानिया (वेडेपीक)

'एखादी गोष्ट उत्पन्न होऊन जी तिची एकदम भरभर होते तिला म्यानिया म्हणजे वेडेपीक असे म्हणण्याची वहिवाट आहे. मुंबईमध्ये काही वर्षांखाली शेअर म्यानिया (शेअरबाजार) बोकाळलेला पंच वाचकांस खुसखुशीत माहीत असेलच. असे म्यानिया अंगाचे पृष्ठभागावर पुष्कळ माजतात. परंतु त्यांविषयी शेवटी अशी भीती असते की तीच भरभर नेहमी राहात नाही. पगडी म्यानिया, गंगावने म्यानिया, अग्रफुले म्यानिया, मासिक पुस्तके म्यानिया, न्यूजपेपर म्यानिया, केसरी म्यानिया, न्यू स्कूल म्यानिया, रायटर म्यानिया, क्लार्क म्यानिया, म्याजेट म्यानिया, इत्यादी अनेक म्यानिये वेडीपिके उत्पन्न झालेली दिसतात. ही वेडीपिके काही शेअरबाजारासारखी (शेअर म्यानियाप्रमाणे) अनिष्ट नाहीत. परंतु आजोबांना यात मत्सरभाव इतकाच आहे की, असाच म्यानिया आजोबांच्या वर्गणीदारांच्या सब्‌स्क्रिप्शनमध्ये का शिरत नाही आणि एकसारख्या भराभर वर्गण्या येऊन आजोबांना तो पिसाळवून का सोडीत

नाही? हा म्यानिया इतके वर्गणीदारांमध्ये लौकर शिरो अशी थेरड्या-कुबड्या-म्हातारड्याची विशाल पोटाच्या डेरकीपासून इच्छा आहे.'
(२४ जानेवारी १८८४)

समग्र हिंदुपंचांच्या स्वरूपासंबंधी गोविंद वासुदेव कानिटकर (सुधारक, मान्यवर कवी आणि इंग्रजी साहित्याचे एक श्रेष्ठ रसिक) यांचा हिंदुपंचमध्येच व्यक्त झालेला अभिप्राय खालीलप्रमाणे आहे :

' हिंदु पंचकर्ते यांस, वि. वि. आपले पत्र मी आज बहुत वर्षे वाचीत आलो आहे. पुष्कळ लोक हे पत्र ' चावट ', ' फाजील ' या सदरात गणितात. तथापि ' निमज्जतींदोः किरणेष्विवांकः ' या कालिदासोक्तीप्रमाणे आपले पत्रात जरी कधी कधी अश्लीलतेचा प्रकार दृष्टीस पडतो ही गोष्ट खरी आहे, तरी एकंदरीत आपले लेख मार्मिक व रसिकपणाचे असतात हे कबूल केले पाहिजे. या नेवाशापासून चार कोसांवर टोके व प्रवरासंगम म्हणून २ गावे आहेत. यांपैकी प्रवरासंगम येथे हरबाजी म्हणून एक वृद्ध व अगदी जुन्या चालीचे विद्वान सुमारे ७० वर्षांचे शास्त्रीबाबा आहेत. त्यांस आपले पत्र फारच आवडते. हे वृद्ध शास्त्रीबोवा कधी कधी प्रवरासंगमहून आमचे घरी येतात तेव्हा पंच वाचून पोट धरधरून हसतात, व त्या आनंदात म्हातारा फारच तल्लीन होऊन जातो! इतर कितीही पत्रे असली तरी प्रथम हिंदुपंच वाचण्याची उत्कंठा त्या वृद्ध शास्त्रीबोवांस फार असते. त्यांस इंग्रजीचा गंधही नसून हिंदु पंचात येणारी साहेबांची व स्थळांची नावे शुद्ध रीतीने उच्चारिता येत असून ती त्यांस तोंडपाठ येतात. असो.

आपले पत्रात नाटके व कादंबऱ्याही येतात. पैकी दोन तीन वर्षे " कार्पण्यदोषदर्शन " नावाचे जे नाटक येत होते ते मी समग्र वाचिले आहे. ते नाटक एका हिंदू कुटुंबाचे उत्कृष्ट चित्र होय. त्यात नाना प्रकारच्या व्यक्ती ज्या वठविल्या आहेत त्या संसारात आढळण्यासारख्या असून त्यात नाटककाराच्या प्रबळ बुद्धीचाच प्रभाव स्पष्ट दिसतो. ते समग्र पुनः छापवावे अशी माझी इच्छा आहे. असा योग कदाचित आला तर आपण मेहेरबानी करून वर्गणीदाराच्या यादीत माझे नाव घालावे.

अलीकडे बरेच दिवस ' यशवंतराव ' या नावाची जी कादंबरी आत्मचरित-कथन-या रूपाने आपल्या पत्रात येत असते तीही मला फारच आवडते. महाराष्ट्रवाणीचा ज्यास अभिमान आहे व नाट्यादी वाचनाची ज्यांस गोडी आहे अशा सर्व लोकांस ती कादंबरी प्रिय होण्यास सर्वत्र पात्र आहे असे मला वाटते. सदर कादंबरीत यमुना, रघुनाथराव, नाना, विष्णू, नानू वगैरे मूर्ती व त्यांचे भिन्न भिन्न स्वभाव हे वाचकांच्या अगदी डोळ्यांसमोर उभे राहतात, येणेकरून त्या कादंबरीकारास प्रत्यक्ष

विधात्याचीच उपमा योग्य होय. या कादंबरीची भाषा तर फारच गोड आहे. नासिक, पंचवटी इत्यादी स्थळांची वर्णनेही फार चांगली उतरली आहेत. मनुष्याच्या अंतःकरणातील विकार व त्यांचे प्रसंग भिन्नत्वे करून दिसून येणारे खेळ केवळ शब्दसाधनाने प्रत्यक्षवत् भासविणे हे काम फारच कठीण आहे असे मी समजतो. व हे काम जो कवी, किंवा जो कादंबरीकार अथवा नाटककार जितक्या चतुराईने करील तितकी त्याच्या ग्रंथाची सहृदय वाचकास अधिक गोडी लागेल हे उघड आहे. केवळ अंतःस्वरूपाचा विचार करिता हिंदुपंचातील एकंदर लिहिण्यात मुख्य किंवहुना एकच दोष माझ्या दृष्टीने मला बलवत्तर वाटतो आणि असे कळविण्याचा प्रसंग यावा याबद्दल मला दिलगिरी वाटते, आणि तो दोष हा की, 'अश्लीलता'. एवढा दोष जर आपले पत्रातून सर्वथा जाईल तर त्या पत्राचे महत्त्व व योग्यता आहेत व याहून शतपट होतील अशी निदान माझी तरी समजूत आहे.

मला असे वाटते की, खरोखर विनोद म्हणजे ज्यांस Wit किंवा Humour ह्युमर म्हणतात त्याचा अश्लीलतेशी काही एक संबंध नाही. प्रख्यात निबंधकार एडिसन हा मोठा विनोदी असून त्याचे लेख फारच मार्मिक होते. परंतु अश्लीलतेचे वारेही त्याच्या लेखावरून कधी गेले नाही. लेख असे असावेत की, सुशिक्षित स्त्रीपुरुषांस कोणत्याही प्रसंगी ते लेख वाचून लज्जायुक्त उद्वेग किंवा विषाद उत्पन्न होऊ नये. प्रख्यात कादंबरीकार डिकिन्स याची पात्रे अद्यापि अगदी हलक्या व नीच वर्णातील मनुष्यांची चित्रे आहेत तरी देखील निव्वळ अश्लीलतेचा प्रकार त्याने होता होईल तितका टाळण्याचा प्रयत्न केला आहे. विलायतेत हिंदुपंचाप्रमाणे विनोदी पत्र 'London Chariwari' या नावाचे पत्र निघत असते त्याचीही अशीच गोष्ट आहे. सारांश लेख अश्लीलतेच्या व अभद्रतेच्या योगाने सर्वथा नीचत्व पावतात हे आपणास पूर्ण मित्रत्वभावाने मी सांगतो व त्याबद्दल आपण रोष न करावा ही विनंती आहे.'

(११ मार्च १८८६) गोविंद वासुदेव कानिटकर

१९०९ साली हिंदुपंचने ना.गोपाळ कृष्ण गोखले आणि ब्रिटिश सरकार यांच्यावर जोरदार टीकास्त्र सुरू केले. गोखल्यांनी त्याच्यावर बेअब्रूची फिर्याद केली व सरकारने जप्ती आणली असे ना. गोखले यांच्या चरित्रावरून समजते. पुढे हिंदुपंच बंद होण्यास आपण कारणीभूत झालो याची ना. गोखल्यांना हळहळ वाटली आणि त्यांनीच फडके यांना 'वाट चुकलेला एक देशभक्त' असे मानून आर्थिक साहाय्यही केले. इतके झाले तरी पंचआजोबांची लेखनाची हौस काही थांबली नाही. 'विक्षिप्त', 'विनोद' इ. वृत्तपत्रांतून ते लेखन करीतच राहिले आणि मृत्यूपूर्वी त्यांनी स्वतःचे 'विदूषक' हे एक नवे साप्ताहिकही काढले. 'विदूषक'च्या चौदाव्या अंकाची जुळवाजुळव करीत

असतानाच फडके यांना अचानक मृत्यू आला. लो. टिळकांना भेटण्यासाठी ते गायकवाडवाड्यात गेले होते. परंतु विश्रांती घेणाऱ्या टिळकांना थोडीशी डुलकी लागली होती. दारावरच्या माणसाला 'पुन्हा येईन' असे सांगून फडके बाहेर पडले आणि काही मिनिटांतच फडके यांचे प्राणोत्क्रमण झाले. (१९२०)

वाङ्मयेतिहासात नोंदली गेलेली ही हकिगत कितपत खरी हे मला नीटसे समजू शकलेले नाही; कारण फडके यांचे नाव 'काशीनाथ विष्णू' ऐवजी 'कृष्णाजी काशीनाथ' असे लेखकाने उल्लेखलेले आहे! अनेक बाबतींत नेमकी माहिती मिळावी यासाठी मीही प्रयत्नशील आहेच...तूर्त हाती आले आहे ते तेवढेच.

फडके यांच्या मरणाची वर उल्लेखलेली घटना खरी ठरावी असे हिंदुपंच वाचल्यानंतर मनातून वाटत राहते. या भलत्याच लटपट्या, खटपट्या, चलाख, मराठी भाषेचा विलक्षण लवचिकपणे उपयोग करणाऱ्या, वाङ्मय आणि समाजप्रेमी माणसाला मृत्यूही असा आकस्मिक येण्यातच परमेश्वरी न्याय आहे!

६

पुणे पाठशालापत्रक

एखाद्या जुन्या मासिकाचे प्रारंभापासून अखेरपर्यंतचे सर्व अंक एकत्रित स्वरूपात वाचणे हा एक विलक्षण खिळवून ठेवणारा असा अनुभव आहे.

त्या मासिकाचा अस्त झाल्याला मध्यंतरी अनेक वर्षे उलटलेली असतात; जीवनाचे स्वरूप विविध क्षेत्रांत बदलत गेलेले असते. पण ते जुने मासिक मात्र त्याच्या निर्मात्यालाही कल्पना नसेल इतक्या अनेक बारीकसारीक घटकांच्या संदर्भात त्या काळाचे पितृमुखी अपत्य असते. त्याची पाने उलटताना मुखपृष्ठापासून मलपृष्ठा-पर्यंतच्या, त्याच्यातील प्रत्येक घटकाला एक हृद्य असा ऐतिहासिक संदर्भ आपल्या मनात येऊन चिकटल्यामुळे मासिकाचा आकार, छपाई, मांडणी यांसारख्या बाह्य गोष्टीसुद्धा आपल्याला पदोपदी अंतर्मुख करीत जातात. त्या वेळची एखाद्या नव्या पुस्तकाची जाहिरातही आपल्याला नुसती जाहिरात म्हणून दिसत नाही. ती बघताना आठवते ते बदलत गेलेले जाहिरात करण्याच्या पद्धतीचे तंत्र, त्या पुस्तकाचे व त्याच्या लेखकाचे, त्या वेळचे व त्यानंतरच्या काळातील स्थान...त्याच्या व आपल्या भोवतालचे वाङ्मयीन वातावरण...असे कितीतरी अधिक.

जुन्या मासिकांचे वाचन या प्रकारे पृष्ठसंख्येच्या मानाने मनात पुष्कळच विस्तारत जाते. पूर्वकाळात सांस्कृतिक जीवनात धडपडलेल्या आपल्यासारख्या काही पिढ्यांशी त्या निमित्ताने आपला एक संवाद सुरू होतो.

१८६१ ते १८७५ या पंधरा वर्षांच्या काळातील 'पुणे पाठशालापत्रकाचे' दीडशेहून अधिक अंक माझ्या हाती आले तेव्हा ह्याच संवादात मी काही काळ गुरफटून गेले. सुरुवातीच्या अंकांची ती शिळाप्रेसवरची छपाई, हातात घरून वाचण्यास आणि संग्रह करून ठेवण्यास योग्य असा मुद्दाम ठेवलेला त्याचा छोटा पुस्तकासारखा आकार

छापील पुस्तकांबद्दल अपूर्वाई व कुतूहल असणारे त्याचे खेडोपाडी विखुरलेले अल्पसंख्य वाचक...पाने चाळता चाळता मन सव्वाशे वर्षांपूर्वीच्या काळात अडकत चालले....

धूळपाटीवर बाराखड्या शिकण्याचे दिवस...रंगीबेरंगी पगड्या, रुमाल, उपरणी, बारा बंदी यांचे शाळांच्या आसपासचे वातावरण...दरमहा पगारासाठी मास्तरमंडळींना मामलेदार कचेरीत दहा मैल बैलगाडीतून जावे लागायचे, आणि दिपोटींच्या काळातील अजून निश्चित आकार न घेतलेली ती शिक्षणपद्धती...

पाठशालापत्रकाचे हे संच पाहता पाहता मग आठवले ते माझ्या शाळकरी दिवसांत विशेष लोकप्रिय झालेले, केवळ लहान मुलांमुलींसाठी असलेले दुसरे शालापत्रक; या दोन्ही शालापत्रकांचा परस्परसंबंध होता आणि नव्हताही. म्हणजे पहिले निर्माण झाले होते प्रामुख्याने शिक्षक विद्यार्थ्यांसाठी व दुसरे होते शिशुकुमारांसाठी. पहिल्यांदा १८६१च्या मे महिन्यात ते सुरू झाले तेव्हा त्याचे नाव होते 'पुणे पाठशालापत्रक'. लंडनमधील 'पेपर फॉर द स्कूलमास्टर्स'चा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून काढलेले. श्रीकृष्णशास्त्री तळेकर हे त्याचे पहिले संपादक; पुढे विष्णुशास्त्री पंडित, केरो लक्ष्मण छत्रे, कृष्णशास्त्री चिपळूणकर व विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी त्याच्या संपादनाचे काम केले. १८६३ पासून या मासिकाचे नाव नुसतेच शालापत्रक झाले; १८७५ मध्ये विष्णुशास्त्र्यांच्या मिशनऱ्यांवरील टीकेमुळे दुखावलेल्या इंग्रज सरकारने ते बंद करण्याचा निर्णय घेतला. विष्णुशास्त्री १८६८ पासून थोड्या प्रमाणात व १८७१ पासून पूर्णपणे या मासिकाचे काम पाहात होते असे त्यांचे चरित्रकार सांगतात. कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री या साहित्यप्रेमी पितापुत्रांमुळे शालापत्रक केवळ शाळाखात्यातील बदल्या–नेमणुकांचे फतवे काढणारे अखबार राहिले नाही. ते आधुनिक मराठी साहित्याच्या आणि समीक्षेच्या प्रारंभकाळाचा एक महत्त्वाचा घटक होऊन बसले. पुढे १८९० मध्ये पुणे येथील चित्रशाळेने जुन्या शालापत्रकाचे पुनरुज्जीवन केले. वासूकाका जोशी त्याचे संपादक झाले...या मासिकाने बालसाहित्यात फार महत्त्वाची अशी भर दीर्घकाळ घातली.

माझ्या हाती लागले होते ते जुने पाठशालापत्रक. एकूण चौदा वर्षे आणि आठ-महिन्यांची त्याची हयात. त्यांपैकीही अंक मिळाले ते एकशेअठ्ठावनच.

मासिकाच्या पहिल्या अंकात संपादकांनी त्या काळच्या शिक्षणस्थितीबद्दल लिहिले आहे—"महाराष्ट्र देशातील पूर्वीच्या सरकारचे लक्ष्य पारमार्थिक विद्याप्रसाराकडे मात्र असे. व्यवहारोपयुक्त विद्या प्रसाराकडे नसे. पेशवाईमध्ये देशात नाशिक आणि कोपरगाव आणि कोकणात गुहागर या ठिकाणी वेदांच्या सरकारी शाळा होत्या म्हणून ऐकतो. परंतु लिहिणे, वाचणे, हिशेब वगैरे व्यवहारोपयुक्त विषय शिकविण्याच्या सरकारी शाळा कोठे होत्या असे कधी ऐकत नाही. परंतु या देशात इंग्रज सरकारचा अंमल झाल्यापासून व्यवहारोपयुक्त विद्याप्रसार होण्याचे साधनाची स्थिती अगदी निराळी

झाली आहे. कोणत्याही जिल्ह्यात पाहिले तरी जिल्ह्याचे गावी एक मराठी आणि एक इंग्रजी अशा निदान दोन तरी सरकारी शाळा आहेत. याशिवाय जिल्ह्यातील गावात तर बहुतकरून गावोगाव शाळा आहेत आणि नव्याही होत आहेत. ह्यावरून विद्यावृद्धीचे साधन विपुल झाले असे म्हणण्यास चिंता नाही. त्यापासून आपल्या लोकांत विद्येविषयी अभिरुचीही उत्पन्न झाली आणि त्यामुळे सरकारचा आश्रय नसता केवळ लोकांचेच आश्रयावर कित्येक शाळा चालू झाल्या. याशिवाय पाद्री लोकांच्या शाळा आहेत त्या निराळ्याच...तर शाळांची परीक्षा घेऊन त्यास त्यांचे योग्यतेप्रमाणे उत्तेजन देण्यास व त्यांची हरएक प्रकारची तजवीज ठेवण्यास विद्वान व चतुर असे वरती देखरेख करणारेही पाहिजेत. याप्रमाणे सरकारने तेही नेमिले आहेत. परंतु एवढ्यानेही विद्याप्रसार होत नाही. विद्याप्रसारास विद्याखात्यातील लोकांचे विद्याविषयांवरचे जे नवीन विचार असतील तेही परस्परांस समजले पाहिजेत. तेव्हा ह्याच विषयासाठी एक स्वतंत्र पत्र काढणे प्राप्त आहे असे समजून हे पत्र काढण्याचा उद्देश मनात धरला आहे.

...ह्या पत्रात व्याकरण, भूगोल, इतिहास, गणित इत्यादी शाळेतील विषय कसे शिकवावे, शाळा कशी चालवावी इत्यादी विषयांवर निबंध, शाळेतील परीक्षेचे प्रश्न किंवा प्रश्न आणि उत्तरे आणि ज्यांची परीक्षा उतरेल त्यांची नावेही छापली जातील. तसेच मराठीतल्या कठीण शब्दांची व्युत्पत्ती व कित्येक कूटे आणि त्यांच्या लापनिकाही छापल्या जातील व शाळाखात्यात जे फेरफार होतात तेही छापले जातील; म्हणजे शाळांचे संबंधाने जे जे उपयुक्त वाटेल ते ते ह्यात छापले जाईल असे समजावे.

...मराठी शाळांचे शिक्षक आहेत तितके या पत्रात छापावयाकरिता काही उपयुक्त मजकूर लिहून पाठवितील अशी आम्हांस आशा आहे..., त्यांजकडून मजकूर येईल त्याचा अत्यादराने स्वीकार होईल.'

(मे १८६१)

इंग्रजी राज्यात बदललेली शिक्षणविषयक परिस्थिती या निवेदनात संपादक तळेकरांनी सांगितली तर १८६५ मध्ये कृष्णशास्त्र्यांनी नव्या काळात शिक्षणाचा गाभाही कसा बदलला आहे हे अधिक स्पष्ट केले. 'प्राचीन हिंदू लोकांचे ज्ञान व प्रस्तुतचे इंग्रजांचे ज्ञान यामधील भेद' या लेखात ते लिहितात : "आमच्या देशात जी सुधारणा व विद्या होती ती अशा प्रकारची होती की तिचे पाऊल पुढे पडूच नये....पाहा की, ज्या गोष्टी कधी डोळ्याने दिसणाऱ्या नव्हेत व दुसऱ्या कोणत्याही इंद्रियास कदापि गोचर होणाऱ्या नव्हेत (म्हणजे ब्रह्म वगैरे) ह्याविषयी आमच्या शास्त्रात अनेक ग्रंथ आहेत. मोठमोठाल्या बुद्धिमान लोकांनीही तशाच विषयांच्या विचारात व वादविवादात आपली सर्व आयुष्ये घालविली आहेत. त्यांच्या विचाराचे धोरण ऐहिक सुखे वाढविण्याकडे व ह्या सृष्टीतील इंद्रियगोचर पदार्थांचे गुण

समजून त्यापासून आपला फायदा करून घेण्याकडे नसे. तर ह्याहीपेक्षा ज्या विशेष महत्त्वाच्या गोष्टी म्हणून त्यांस वाटत त्याकडे त्यांचे नेहमी ध्यान असे...ह्याचा परिणाम अर्थातच असा झाला की काही सीमेपर्यंत त्यांचे विचार व ज्ञान आल्यानंतर त्यांस पुढे वाढण्यास जागाच राहिली नाही. पाहा की, आत्म्याविषयी अगर ब्रह्माविषयी शेकडो वर्षे विचार करीत बसले तरी काय उपयोग होणार? तद्विषयी कोट्यवधी वादविवाद करून तरी फळ काय? त्याविषयी जितक्या म्हणून मनुष्याच्या मनात कल्पना येण्याचा संभव आहे तितक्या एकदा येऊन चुकल्या म्हणजे नवीन काय निघणार आहेत? बरे, त्यातूनही कोणास कोणाचे मत खोटे म्हणण्याचा अधिकार नाही...तात्पर्य, आमची प्राचीन सुधारणा सर्व ह्या तऱ्हेची होती.

...पूर्वीच्या अनुभवावरून आताच्या लोकांस समजले आहे की, ज्या गोष्टी मनुष्यास समजण्याचा संभवही नाही त्यांचा विचार करून काही फायदा नाही. ह्याकरिता इंद्रियगोचर पदार्थांचे गुण समजून त्यापासून आपली ऐहिक सुखे वाढवावी असा सांप्रतच्या विद्येचा उद्देश आहे. आता इंद्रियगोचर पदार्थांचे व त्यांच्या गुणांचे ज्ञान पाहिजे तितके वाढण्याचा संभव आहे. आज एक नवीन गोष्ट कळली, उद्या दुसरी कळली, ह्याप्रमाणे हे ज्ञान वाढत जाते. ह्याच्या वृद्धीस पारच नाही. ह्यामुळे इंग्रज लोकांचे ज्ञान प्रत्येक दिवशी वृद्धिंगत होत आहे व त्यांची ऐहिक सुखे दिवसेंदिवस वाढत आहेत.व पुढेही किती वाढतील ह्याचा नियम नाही. हा इंग्रजांच्या अलीकडील सुधारलेल्या लोकांच्या विद्येचा प्रकार होय."

(ऑगस्ट १८६५)

पाठशालापत्रकाच्या पहिल्या अंकात श्रीकृष्णशास्त्री तळेकर यांनी भारतीय परंपरेचा आविष्कार करणाऱ्या संस्कृत भाषेची थोरवी वर्णन केली आणि दुसऱ्या अंकात कृष्णशास्त्री भाटवडेकरांनी रसायनशास्त्रविषयक एक लेखमाला इंग्रजी पारिभाषिक शब्द तसेच ठेवून सुरू केली आहे. या प्रकारे प्रारंभीच जुन्या नव्या विद्येच्या समन्वयाचे धोरण सुरू झाले. पण पुढे काही काळ गणित, व्याकरण ह्यावर विशेष भर पडत गेला. कारण या दोन्ही विषयांची परिभाषा अधिक उपलब्ध होती; पण त्याच वेळी शिक्षकांनी मुळाक्षरे कशी शिकवावीत येथपासून कविता कशी शिकवावी येथपर्यंतचे प्राथमिक विषयही मार्गदर्शनपूर्वक संपादक मांडतच होते. या वातावरणात खेड्यातील शिक्षकांना हळूहळू वाचा फुटू लागली. त्यांनी संपादकांना लिहिलेल्या पत्रात शिक्षणाभोवतीची व्यापक समाजस्थिती अप्रत्यक्ष रीतीने प्रगट होत गेली. आपल्या शाळेला भेट देऊन गेलेले मान्यवर लोक, त्यांनी घेतलेल्या मुलांच्या परीक्षा, कौतुकाने भेट म्हणून दिलेली पुस्तके याबद्दल जसे ते लिहीत तसेच शिक्षकांच्या आर्थिक ओढगस्तीबद्दलही! संपादक कधी त्यांचा नाव घेऊन गौरव करीत तर

कधी तेवढ्याच मोकळेपणाने फीचे गोळा केलेले पैसे सरकारी तिजोरीत न भरल्याबद्दल तंबीही देत. या पत्रव्यवहारातून एकमेकांना गणितविषयक कोडी घालण्याचा खेळही काही शिक्षकांनी सुरू केला. त्यावरचे वादविवाद रंगायला लागले. शालापत्रक हा त्यांना जोडणारा दुवा झाले.

या नव्याने लाभलेल्या बौद्धिक वातावरणाचा आनंद के. भ. यांच्या पत्रात पुढीलप्रमाणे व्यक्त झाला—'एखादे विषयावर वादविवाद उभयपक्षांचे चालतात ते वाचण्याची मला फार हौस वाटते. त्यात एकमेकांचे खंडन विचारपूर्वक होते की नाही हे समजून येते. लेखात उपमर्द परस्पर न करता आपला पक्ष युक्तींनी तडीस नेतात की नाहीत हेही कळून येते. महाराज, हा क्रम सुरळीतपणे सात-आठ महिने चाललेला पाहून मलाही इच्छा होऊ लागली की, आपल्या या पत्रकात माझ्या गरिबाच्या चार ओळी कधी कधी प्रविष्ट होत जाव्या. इहलोकीची स्वार्थी राजकीय युद्धे चालतात त्यापेक्षाही ज्ञानवर्धक युद्धे देशास मोठी हितावह आणि परिणामी फलदायक व सुखदायक होत. ज्ञानयुद्धार्थ आपले पत्रक रणभूमी झालेली आहे. कालवशात ते क्षेत्रही, रंगभूमी होईल आणि विद्वत्जन अधिकाधिक तेथे रमूही लागेल.'

शिक्षक के. भ. यांच्याप्रमाणेच विद्यार्थी चिंतामण नारायण माडीवाले आणि पंढरीनाथ श्रीधर हेही 'वृत्तवैभवा'स एक आनंददायक वर्तमान कळवितात; शालापत्रक ते उद्धृत करते :

'रावजी बाळकृष्ण लेले जे पूर्वी त्र्यंबकेश्वरास हेड स्कूलमास्तर होते ते चार-पाच महिन्यांपूर्वी येथील शाळेवर आले आहेत. यांचा स्वभाव, रीतभात आणि शिकविण्याची शैली फारच उत्तम आहे. तेणेकरून आम्हास व आमचे मातापित्यांस परमानंद होत आहे...दर शनिवारी आम्हास काही प्रश्न सांगून त्याची लेखी उत्तरे मागत असतात. तेणेकरून मनात असलेला मजकूर लिहून दाखविता येण्याची शक्ती पूर्वीपेक्षा वाढत जाईल यात संशय नाही. या शनिवारी मास्तरांनी जे प्रश्न काढिले ते सर्व कवितावद्ध आहेत. त्यांचा मासला आपले पत्री छापिला जाऊन सर्व विद्यार्थ्यांच्या दृष्टीस पडावा म्हणून त्यांपैकी काही खाली लिहितो--

प्रश्न	व्याकरण
आर्या—	काळ कशाते म्हणती, दावुनि कथि लक्षण प्रयोगाचे ॥ कोण प्रयोग वदती, व्याकरणी "मोर काननी नाचे" ॥
श्लोक—	'मनात वाटे भय फार त्या मुला' प्रयोग सांगे पुसतो मी हे तुला ॥

इतिहास

साकी— जी जी केली शूरत्वाची, पहिल्या बाजीरावे ।
कृत्ये, कळवुनि मृत्यु तयाचा, झाला कधि सांगावे ॥

भूगोल

दिंडी— स्वीडनाचे कोणते राज्य आहे ?
स्वदेशाधिप कोणत्या स्थळी राहे ?.....

असाच क्रम सुरळीत चालेल तर आमचे कल्याण होईल असे आम्ही मोठ्या आदराने कबूल करतो.
(डिसेंबर १८६७)

पुणे पाठशालेतील किंवा ट्रेनिंग कॉलेजमधील इंग्रज शिक्षकांच्या सोयीसाठी शालापत्रकाच्या अंकावर मराठी व इंग्रजी या दोन भाषांत शीर्षके असतात : ' पत्रे पाठविणारांस उत्तरे–Answer to correspondents ' या शीर्षकाखाली संपादकाचे हरी पांडुरंग या पत्रलेखकास गेलेले एक उत्तर असे आहे :

' तुमचे श्लोक पावले. ते छापण्यात काही अर्थ नसल्यामुळे छापले नाहीत. पुष्कळ प्रास व यमके साधून पद्य कठीण व दुर्बोध करण्यात कितीएक अल्प समजुतीच्या मनुष्यांस मोठा थोरपणा वाटतो. परंतु वास्तविक पाहता ती गैरसमजूत आहे; अर्थ म्हणून ज्यात अत्यंत थोडा व क्षुल्लक असले (त्यासाठी) कठीण श्लोक करण्यात व ती उकलण्यात वेळ घालवणे म्हणजे केवळ कोंडा काढणे आहे. त्या श्रमात काही अर्थ नाही व तसला श्रम कोणी घ्यावा हे आम्हास नीट वाटत नाही. सरस व प्रौढ चातुर्य-भरित अशी पद्ये आम्हाकडे कोणी मित्रांनी पाठविल्यास ती आम्ही संतोषाने छापू. परंतु ज्यात अर्थाचे नावाने शून्य व पदे मात्र अतिशय कठीण, असले श्लोक छापून आमच्या पत्राची जागा व्यर्थ खर्चण्यास आम्ही अगदी खुशी नाही. '
(१ ऑगस्ट १८६५)

आजच्या काळातील संपादक-लेखक संबंधात या प्रकारची देशी, सरळसोट अनौपचारिकता अगदी अभावानेच दिसते. त्यामुळे शालापत्रकातील या प्रकारचा मजकूर वाचताना क्षणभर थोडे दचकल्यासारखेही होते. ' साभार परत 'च्या नाजूक पाश्चात्य संस्कारात आपण लहानाचे मोठे झाल्याचा बहुधा हा परिणाम असावा !

गावोगावी विखुरलेल्या शिक्षकांना आपल्या नव्या पुस्तकाची माहिती व्हावी म्हणून काही लेखक स्वतःच्या पुस्तकाची सविस्तर जाहिरात शालापत्रकातून करतात. ही

जाहिरात म्हणजे त्यांच्या काही साहित्यविषयक विचारांचा परिचयच असतो. आपल्या 'पद्यरत्नावली' बद्दल स्वतः कृष्णशास्त्री चिपळूणकर लिहितात :

'पद्यरत्नावली या नावाचा कवितात्मक नवीन मराठी ग्रंथ सुज्ञ व रसिकजनांच्या मनोरंजनार्थ करून नुकताच छापून तयार केला आहे. या ग्रंथात पाच प्रकरणे आहेत. ती येणेप्रमाणे–मेघदूत, अन्योक्तिकलाप, विद्याप्रशंसा, प्रश्नोत्तरावली व विलाप; ही प्रकरणे कालिदास, भवभूती, विल्हण, जगन्नाथराय इत्यादी अत्यंत रसिक जे प्राचीन कवी त्यांच्या ग्रंथांच्या आधाराने रचली आहेत. या ग्रंथात चमत्कारिक व सुरस वृत्तांचे श्लोक, आर्या, साक्या, दिंड्या इत्यादी वृत्ते योजिली आहेत. या कवितेत शब्दमाधुर्य, अर्थलालित्य, शृंगारकरुणादी रस कितपत उतरले आहेत याविषयी ग्रंथकाराने स्वतः सांगणे बरोबर नाही. ते गुण असतील तर अनुभवाने वाचणारास कळतील. तथापि ज्यांनी अद्यापि तो ग्रंथ पाहिला नाही त्यांच्या माहितीकरिता इतके सांगणे आवश्यक वाटते की, विद्वान व मराठी कवितेचे अभिज्ञ असे जे रा. रा. परशुरामपंत तात्या गोडबोले, रावबहादूर भास्करराव दामोदर वगैरे कितीएक विद्वान गृहस्थ यांनी हा ग्रंथ पाहिला आहे व त्यांनी त्याची उत्कृष्ट तारीफ केली आहे. या ग्रंथातील कठीण शब्दांचे अर्थ समजण्याकरिता व त्यात आलेल्या पुराणप्रसिद्ध गोष्टींची माहिती होण्याकरिता खाली कितीएक टीपा घातल्या आहेत व कठीण शब्दांचा कोश शेवटास दिला आहे. तसेच मराठी कवितेत जे व्याकरणाचे विशेष असतात त्याविषयी एक निबंध शेवटी जोडला आहे.

या ग्रंथाची अष्टपत्री साच्याची एकंदर ९० पृष्ठे आहेत व त्याची किंमत बारा आणे ठेविली आहे. टपालाचे हशील शिवाय पडेल. या ग्रंथाच्या प्रती ज्यांस घेणे असतील त्यांनी पुण्यास ज्ञानप्रकाश छापखान्याच्या मालकाकडे लिहून पाठवावे म्हणजे त्या मिळतील. ता. २९ जुलई सन १८६५.

कृष्णशास्त्री चिपळूणकर

१ सप्टेंबर १८६५

जाहिरात या शीर्षकाखाली लावणी वाङ्मयाचे सुप्रसिद्ध संशोधक शंकर तुकाराम शाळिग्राम कळवितात––

"आजपर्यंत मराठी भाषेत कल्पित कादंबरी रूपाने बरेच ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. तरी हा ग्रंथाचा भरणा युरोपातील सुधारलेल्या भाषांचे मानाने पाहता काहीच नाही! मराठीतील कल्पित कादंबरीची पुस्तके काही अघटित रसाने भरपूर आहेत; व काही सरळ लिहिलेली आहेत. तरी वाचकांस काही थोडे ग्रंथ खेरीज करून हे ग्रंथ इंग्रजी भाषेत लिहिलेल्या "नाव्हल" ग्रंथापेक्षा नीरस वाटतात. याचे कारण असे आहे की, मराठी भाषेत झालेल्या कादंबऱ्या एकाच धाटणीवर होण्याचा हल्ली मार्ग चालू आहे. म्हणजे मुक्तामाला कादंबरी प्रथम झाली तिचेच अनुकरण

पुष्कळ नवीन झालेल्या कादंबऱ्यांत केले आहे. तरी भाषा सुधारण्यास त्या उपयोगी आहेतच.

मी येत्या नवंबर महिन्यात "पद्मनाभ" नावाचे पुस्तक छापून प्रसिद्ध करणार आहे. यात एका तरुण व विद्वान पुरुषाचा इतिहास लिहिला आहे. हा इतिहास माझे एका मित्रापासून मला मिळाला आहे व त्यानेच छापण्यास अनुमोदन दिले आहे. ह्या पुस्तकाची पाने एकशे ऐशीपर्यंत बारापृष्ठी साच्याची होतील. त्याची अगाऊ किंमत एक रुपया, नवंबर सन १८७५ इसवी अखेर ठेविली आहे. ज्यांस अगाऊ वर्गणीदार होणे असेल त्यांनी खालच्या पत्त्यावर अथवा 'पुणे ज्ञानप्रकाश' छापखान्यात किंवा मुंबईत विविधज्ञानविस्तार गृहात पैसा पाठवावा. पुणे व मुंबई खेरीज दुसरे गावचे वर्गणीदारास किमतीशिवाय टपालखर्च दोन आणे पडेल. वरील मुदतीचे पुढे या पुस्तकाची किंमत सव्वा रुपया ठेविली आहे, कळावे ता. २५ सप्टेंबर १८७५.

पुणे कसबा पेठेत जुने तपकीर गल्लीत नगरकरांचे वाड्यासमोर दीक्षितांच्या वाड्यात.

—या जाहिराती आजच्या वाचकाला तत्कालीन जीवनातील संथपणाची आणि मोकळेपणाची प्रतीती फार आल्हाददायक रीतीने देतात. ही जाहिरात करण्याचा उद्देश केवळ स्वतःचा माल खपविण्याचा नाही, तर तिच्या द्वारे वाचकाची अभिरुची घडविण्याचाही आहे. किंबहुना मासिकातील वेगवेगळ्या विभागांना वेगवेगळी शीर्षके असतात ती केवळ सोयीसाठी. अनेकदा एका सदरातील मजकूर दुसरीकडेही वाचावयास मिळतो. पत्र एखाद्या निबंधासारखे असते; कविता समीक्षेसह अवतरते आणि निबंध संवादात्मक नाट्य म्हणून प्रगटतो...

विशेष असे की शालापत्रक वाचताना हा मिश्रणाचा प्रकार आपल्याला अप्रस्तुत वाटत नाही. कारण समग्र मासिकाचे स्वरूपच आजच्या स्पेशलायझेशनच्या युगातील काटेकोरपणापासून फार दूर आहे. त्या स्वैरतेतून त्या काळातील माणसांपुढील शैक्षणिक, सामाजिक समस्या अधिक जिवंतपणाने आपल्या प्रत्ययाला येतात. मग त्याविरुद्ध तक्रार तरी कशासाठी करायची? या काळात वाङ्मयप्रकारांचे निर्माण होत चाललेले संकेत अद्याप स्थिर झालेले नाहीत. मात्र प्रत्येक लेख संवाद साधण्याच्या भूमिकेतून लिहिला जातो आहे त्यामुळे वातावरणात नवे घडवून दाखविण्याचा उत्साह फार जाणवतो.

शालापत्रकाच्या संपादकांनी शिक्षकांना शैक्षणिक बाबतीत मार्गदर्शन करण्याचा हेतू समोर ठेवल्याने अभ्यासक्रमातील भाषा विषयांच्या अनुषंगाने ते साहित्याकडे व साहित्यसमीक्षेकडेही वळले आहेत. मासिकाचा आकार छोटा असल्यामुळे कादंबरी, नाटक, कथा या दीर्घ वाङ्मयप्रकारांना ते स्थान देऊ शकत नव्हते. छोटे निबंध

आणि छोट्या कविता त्यांना हव्या होत्या. त्यांपैकी छोटा निबंध इंग्रजीतील ॲडिसनच्या निबंधाच्या परिचयामुळे भाषांतरित वा रूपांतरित स्वरूपात मराठीत आणणे त्यांना सोपे गेले. कविता मात्र विविध कारणांनी मोरोपंती काळातच रेंगाळत राहिल्याने शालापत्रकाने भर दिला तो इंग्रजी व संस्कृतातील काव्येतिहासाच्या सविस्तर परिचयावर व दोन्ही भाषांतील वेगवेगळ्या काव्यविषयक संकल्पनेवर. मराठी काव्यनिर्मितीत स्थित्यंतर घडवायला त्याची मदत होण्यासारखी होती.

कोणताही विषय–गणित ज्योतिषादी–पद्यातून सांगण्याची आपली परंपरा सर्वांना परिचित असल्याने शालापत्रकाला पहिले कार्य करावे लागले ते सर्व छंदोबद्ध लेखन काव्य असत नाही हे ठासून सांगण्याचे. 'माझा भरत देखिला' या जुन्या चालीवर एखादे शिक्षक लिहून पाठवीत 'जन हो विद्याभ्यास करा। सोडा आळस महा। आळसरिपू हा केवळ काळ। देह मलिन करे जैसा गाळ।' (फे. १८६२) कोणी शिक्षक गद्यप्राय श्रीधरीच्या ओवीच्या धर्तीवर कोणत्या अभ्यासविषयाचा विद्यार्थ्यावर काय परिणाम होईल हे 'बालशिक्षण सुधारणुकीविषयी'च्या रचनेतून शिक्षणावरील श्रद्धेने प्रदीर्घपणे मांडत. कधी शिक्षकांचे लक्ष शैक्षणिक विषयांवरून शिक्षणक्षेत्रातील अधिकाऱ्यांकडे जाई व त्यांची स्तुती ते मोरोपंती पद्धतीच्या आर्येत लिहून पाठवीत. हेन्री कोक हे इंग्रज इन्स्पेक्टर नेटिव्हांना तुच्छ न लेखता शिक्षणाचे महत्त्व खेडोपाडी हिंडून मोठ्या सलगीने लोकमानसात बिंबवीत. 'मास्तरीच्या कामांची परीक्षा घेऊन सर्टिफिकेटस् देण्याचा ठराव'ही त्यांच्याच कारकीर्दीत झालेला. तेव्हा 'करुणाकर देवाने केला तो कोकमानसी प्रेष।' येथपासून त्यांच्या स्तवनाला प्रारंभ झाला आणि पुढील कवितेत 'धर्माचे भोजनगृह' काढण्याची कोकसाहेबांची योजना सविस्तर वर्णन करून सांगितली गेली; पण हेही कमीच वाटल्याने की काय 'सर्वशक्त देव कोकसाहेबास यश देवो' हे विधान प्रतिचरणी एकेक अक्षर साधून बंधात्मक पद्धतीने पुरे केले गेले. अशी रचना करू शकणारा शिक्षक तर स्वतःला चांगला कवी समजत असेच; पण लोकही त्याला फार मानीत. कृष्णशास्त्र्यांचे जॉन्सनच्या 'रासेलस' कादंबरीचे भाषांतर पूर्ण झाले तेव्हा मोरोपंती पद्धतीच्या आर्येतून त्याचा समग्र आशय सांगण्याचा प्रयत्न एका शिक्षकाने केला :

> 'पुष्कळ प्रवास करुनि आली केरोत (कैरोत) सर्व हर्षित ती।
> तेथे जिकडे तिकडे पाहति हर्षित समस्त लोकतती।'

या प्रकारची ही रचना आहे! नव्या पाश्चात्य साहित्याचा होणारा परिचयही काही व्यक्तींना कसा जुन्या पठडीपासून दूर करू शकत नव्हता ह्याचाच हा नमुना आहे. मोरोपंताखालोखाल रामजोश्यांचे कटाव अनेक कवींना या काळात उत्तेजित करून गेलेले दिसतात :

EDUCATIONAL INSPECTOR
ANNA

पुस्तक २. नारीरत्न १ नवंबर सन १८६२ इ. अंक ७

POONA COLLEGE

SCHOOL PAPER

पुणेंपाठशालापत्रक.

मुकामपुणें.

येथें.

बाळकृष्णरामचंद्र शास्त्रीउकार ह्यांच्याछापखान्यांत

छापिलें.

किंमत ६- आणें.

शिळाप्रेसवर सुरु झालेले एक जुने शैक्षणिक मासिक (१८६१–१८७५)

'पावसाळ्यामधी पाणी पडुनी नदीस पूरची येई।
दुथडीला चिखल माती रेती सर्वची होई।.'

ही साकी म्हणजे काव्य नाही हे शालापत्रकाच्या संपादकांनी कठोरपणे जाहीर करून टाकले! कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री या पितापुत्रांना असल्या काव्यनिर्मिती-बद्दल आस्था नाही. त्यांना आस्था आहे ती हरी कृष्ण दामले यांच्यासारख्या कवीची. कुंकवे गावातील नदीला पूर आल्यावर जो हाहाकार उडाला त्याचे वास्तव भावनात्मक वर्णन दामल्यांनी कवितेतून केले तेव्हा कृष्णशास्त्रींनी 'गुणदोषविवेचन' या शीर्षकाचा एक निबंध कवितेशेजारी छापला आहे. त्यात म्हटले आहे—

'प्रस्तुत कवितेसारखी विस्ताराने व योग्यतेने मोठी कविता पुष्कळ दिवसांत आमच्याकडे आली नव्हती;...पद्यरचना गोड, अन्वय सरळ, वर्णन जितक्यास तितके असल्यामुळे वाचकास कंटाळा न येऊन शेवटपर्यंतही वाचल्याखेरीज राहवत नाही. तसेच कवितेत यमक, प्रास आणण्याचा व्यर्थ यत्न न केल्यामुळे अर्थरचना व पदरचना अगदी साधी झाली आहे. मनात अशा प्रसंगी जे विचार सहज रीत्या येण्यासारखे आहेत तेच तशा सहज रीत्या येणाऱ्या शब्दांनी व्यक्त केले आहेत.'

—कृष्णशास्त्र्यांची ही चांगल्या काव्याची कल्पना म्हणजे काही बाबतींत पुढील केशवसुतयुगाची नांदीच आहे.

या काळातील अभ्यासक्रमात संतांची कविता अगदीच क्वचित असे. सरकारी शाळांवरील अधिकाऱ्यास हिंदू धर्मातील गोष्टींचा 'त्रास' असल्यामुळे, संत कविता वगळलीच जाई. राहता राहिली पंडिती कविता. तिच्या स्वरूपातील सांकेतिक अलंकरणाचे शिक्षकांना आकर्षण वाटे व तोच त्यांच्या दृष्टीने रसग्रहणातील महत्त्वाचा घटकही असे. मात्र 'भृंगाविण जशी कमळिणी', 'पद्माविण जसा जलाशय' ही पद्धती पुराच्या हाहाकाराचे वर्णन करणाऱ्या दामल्यांनाही टळलेली नव्हती!

परंतु चिपळूणकर पितापुत्रांना 'कोणत्याही भाषेतील उत्तम व सुरस ग्रंथ म्हणजे कविता होय...' 'दुधास जसे लोणी, झाडास जसे फूल तशी भाषेस कविता होय' असे वाटत असल्यामुळे शालापत्रकात बरेच कविताविषयक लेख आलेले आहेत. हावर्डसाहेबाने अभ्यासक्रमात नाटके, मनोरंजनपर गोष्टी आणल्या तेव्हा त्यांचे आभार मानून संपादक लिहितात—'मराठी भाषेत बालमित्र, थोरल्या माधवरावांचे नाटक हे ग्रंथ पद्यरूप नसतानाही कवितारूप आहेत. ग्रंथास कविता हा शब्द शोभण्यास त्या ग्रंथातील शब्द मनोरंजक, चमत्कारिक असला पाहिजे...काव्यातील अर्थ उपयुक्त किंवा बोधपर असला तर असेल परंतु तो तसा असलाच पाहिजे असा नियम नाही!' ललित साहित्य शिकविल्याने मुलांची नीती बिघडणार नाही हेही त्यांना पटवून द्यावे लागलेले आहे.

इतर काही समीक्षकांप्रमाणे कृष्णशास्त्र्यांचा काव्यविचार स्फुट परीक्षणातून प्रगटला आहे तर विष्णुशास्त्र्यांचा काव्यविषयक दीर्घ लेखमालेतून आलेला आहे. बजाबा रामचंद्र प्रधान यांच्या 'दैवसेनी'चे परीक्षण करताना समीक्षक (हे बहुधा कृष्णशास्त्रीच असावेत) लिहितात–' जसे शेकडो लोक आपणास गाणार म्हणवितात व दुसरेही त्यास गाणार म्हणतात, परंतु वास्तविक पाहता त्यांजपासून गाण्याचे घर फार दूर असते तद्वतच कवितेचे आहे....जशी एखादी सुंदर, शहाणी, चतुर, तरुण स्त्री पुरुषरूप भ्रमरास सर्वांशी आल्हाददायक असते ती जशी त्याच्या दृष्टीस, स्पर्शास, मनास, अकलेस, सर्वांशी सुखदायक असते तद्वतच कविता ही होय. ज्या स्त्रीत पुरुषाचे अन्तःकरण मोहण्याचे सामर्थ्य नाही ती जशी बाहेरून मात्र स्त्री, तशी ज्या पद्याच्या अंगी रसिक वाचणाऱ्यांचे मन हरण करून काही वेळ त्यास इहलोकीच्या साधारण सुखाहून विशेष उंच सुख देण्याचे सामर्थ्य नाही ती बाहेरून दिसण्यात मात्र कविता खरी. ह्यापेक्ष ती अधिक नव्हे....कवी जो आहे त्यास प्रतिसृष्टिकर्ता म्हणतात...मानसिक सृष्टी तो उत्पन्न करतो...आपल्या कल्पनेच्या व वर्णनशक्तीच्या सामर्थ्याने त्याने उत्पन्न केलेला जो मानसिक पदार्थसमुदाय ती एक दुसरी सृष्टीच बनते (असे) म्हणण्यास काय हरकत आहे ? ' या काव्यविषयक भूमिकेतून स्कॉटच्या ' लेडी ऑफ द लेक 'चे भाषांतर करणाऱ्या प्रधानांबद्दल समीक्षक लिहितात : ' प्रस्तुतच्या या लहानशा ग्रंथात फार स्तुती करण्यासारखे जरी काही नाही तरी त्यावरून असे दिसते की ग्रंथकर्ता कवी होण्यास योग्य आहे—त्यांनी ही जी कवितेची सेवा धरली आहे ती न सोडता तशीच चालवावी. '

वि. ज. कीर्तने यांचे ' थोरले माधवराव पेशवे ' हे कृष्णशास्त्र्यांना फार महत्त्वाचे वाटलेले नाटक आहे. त्याच्यावर लिहिलेल्या पत्ररूप परीक्षणात एका लेखकाने नाटकातील कोल्हापूरच्या छत्रपती रामराजाची भाषा अशुद्ध योजल्याबद्दल टीका केली. तेव्हा त्यास उत्तर देताना संपादक कृष्णशास्त्री म्हणतात—' रामराजा सुशिक्षित होता व त्याची भाषणपद्धती इतर श्रीमंत शूद्रांपेक्षा फार शुद्ध होती असे मानण्यास काही सबळ कारण दाखविल्याबाचून कीर्तने यांच्या नाटकास दोष देणे आम्हास बराबर वाटत नाही...हा ग्रंथ फार सुंदर आहे खरा; परंतु ते सौंदर्य त्यास गद्यात्मक असल्याने आले आहे असे आम्हास वाटत नाही. व शुद्ध गद्यरूप ग्रंथ लिहिला एवढ्याने काही मोठी गोष्ट झाली असेही आम्हास वाटत नाही. तसे पत्राचे अखेरीस पत्र लिहिणारे यांनी कितीएक अलीकडे झालेल्या कादंबऱ्यांची नावे लिहून (मुक्तामाला, रत्नप्रभा, राजा मदन, वसंतमाला, सौंदर्यमालिनी, सुलोचना आणि माधव, विचित्रपुरी इत्यादी) त्यांच्या कार्याचे मोठे उपकार मानले आहेत. पण लिहिणारा त्या सर्व कादंबऱ्या उत्तम ग्रंथ समजत असेल तर ते त्याचे मत आम्हास अगदी मान्य नाही. त्या कादंबऱ्यांतून कितीएक अगदी अप्रयोजक आहेत.

'थोरले माधवरावांचे नाटक' या ग्रंथाच्या बरोबरीची किंवा त्याच्या खालोखाल योग्यतेची एकदेखील नाही.'

रावबहादूर मोरोबा कान्होबा यांच्या घाशीराम कोतवाल या कादंबरीचे नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनी केलेले परीक्षण शालापत्रकाच्या फेब्रुवारी १८६६ च्या अंकात आले असून त्यांच्या निःस्पृह स्पष्टवक्तेपणाचा तो एक नमुना आहे. मोरोबा कान्होबा हे सरकारने वरिष्ठ जागी नेमलेले प्रौढ प्रतिष्ठित गृहस्थ आहेत हे हेतुपूर्वक विसरून कीर्तने लिहितात : 'केवळ सर्व एकपक्षीय. मराठे लोकांचे अंगी अज्ञान इतके आणिले आहे की त्यापेक्षा अमेरिकेतील रानटी लोक बरे...नुसते ते केवळ अज्ञानी; इतकेच नाही...जे जे पदार्थ त्यांनी केले तेही निकृष्टच...मुसलमानही विद्येने पाहता ब्राह्मणांहून श्रेष्ठ, असे या पुस्तकावरून दिसते...नॉवेल्स, नाटके, किंवा काव्ये वाचल्यापासून कर्मणूक होते; त्याने लोकांस ज्ञानप्राप्ती होते किंवा झाली पाहिजे असे नाही. त्याचे काम बाह्यसृष्टीचे ज्ञान सांगण्याचे नव्हे. परंतु मानवस्वभावाचे वर्णन त्यात सुरसरीतीने उदाहरणाने असले पाहिजे. त्यात पुष्कळ पात्रे असून ती एकमेकांपासून नीट ओळखता येतील अशी असावी व त्यांच्या बोलण्याचालण्यावरून वाचणाराने पाहिलेल्या प्रकारची एखादी व्यक्ती त्याचे डोळ्यापुढे उभी राहिली पाहिजे. असल्या ग्रंथात शास्त्रीय विषय आणून आपण विद्वान आहोत व लोकांपेक्षा आपणास पुष्कळ समजते, आपण लोकांप्रमाणे ठकलो जाणार नाही अशा प्रकारचा ग्रंथकर्त्याने कधी आव घालू नये. हे समजण्यास ॲरिस्टॉटल यांचे टीका करण्याचे नियम पाठ करण्याची गरज नाही...आमचे असे मत आहे की जो आपले लोकांचे दोष काढितो व प्रीतिपूर्वक ते त्यास सुधारण्यास सांगतो तो देशाचे कल्याण करितो. परंतु त्याचप्रमाणे जो भलतेच आरोप त्यावर आणितो...तो सरळ पुरुष नव्हे...जर रावबहादूर केवळ लोकरंजनार्थ पुस्तक लिहितील व लोकांस ज्ञान शिकविण्याचे वगैरे खोल पाण्यात शिरणार नाहीत तर त्यांचे या देशावर बरेच उपकार होतील.'
(फेब्रु. १८६६)

या परीक्षणात घड ना कादंबरी, घड ना माहितीपर ग्रंथ हे 'घाशीराम'चे स्वरूप अत्यंत रास्तपणे टीकाविषय झालेले आहे. निबंधमालेतील आक्रमक विष्णुशास्त्री आपल्या चांगले परिचयाचे आहेत; पण तत्पूर्वीचे कृष्णशास्त्री आणि नीळकंठराव व विनायकराव कीर्तने मात्र परिचयाचे नाहीत. इंग्रजी राज्याबाबत अतिउत्साही असणाऱ्या काही सुधारकांच्यासंबंधी जी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली ती शालापत्रकातून चांगली समजते. मात्र या ठिकाणी टीकेचा रोख अगदी यथायोग्यरीतीने बाह्यमीन कारणासाठी आहे. राष्ट्रवादी व सुधारक असे दोन स्पष्ट आणि कृत्रिम गट त्यात नाहीत

ते गढूळ वातावरण पुढील काळात निर्माण झाले आणि निबंधमालेने ते अधिक पुष्टही केले.

बा. रा. दोंदे ह्या लेखकांनी चंद्रकांत या कादंबरीचे परीक्षण करताना, प्रारंभी ललितसाहित्याच्या वाचनामुळे होणारे फायदे लिहिले आहेत. ग्रंथ वाचण्यापासून लोकांची करमणूक होते, विचारशक्ती वाढते, जग कळते व त्यामुळे कोत्या समजुती नष्ट होतात इत्यादी फायदे सांगून समीक्षक लिहितात ' – खरोखरी वाचण्याची गोडी लोकांच्या मनात उत्पन्न होणे केवळ उपयोगी ग्रंथापासून होत नाही; तर ती उत्पन्न होण्यास ग्रंथ मनोरंजक असून उपयोगाचे असतील तर फारच चांगले...त्यास प्रथम मनोरंजक व मौजेचे असेच ग्रंथ दिले पाहिजेत ! '

शैक्षणिक जीवनास व लोकमानसात लोकसाहित्याला प्रतिष्ठा देण्याचे शालापत्रकाचे धोरण पुढील काळातील साहित्यविकासाच्या संदर्भात फार महत्त्वाचे आहे. वाङ्मयीन अभिरुचीच्या संदर्भातही शालापत्रक विशेष दर्जेदार आहे. शेक्सपीअरच्या एका नाटकाचा सारांश ' शेरास सव्वाशेर ' वाचल्यावर समीक्षकाला सांगावेसे वाटते की हे पुस्तक वाचल्याने मूळ ग्रंथातील रसांची कल्पना मराठी वाचणाऱ्यांच्या मनात शतांश किंवा सहस्रांश देखील येईल असे आम्हास वाटत नाही...अत्यंत सुंदर मनुष्याचा केवळ अस्थिपंजर पाहिल्याने त्या मनुष्याच्या सौंदर्याची जशी काही कल्पना मनात येत नाही तशी नाटके, काव्ये, कल्पित गोष्टी यांचे संक्षिप्त सारांश वाचून त्या कृतीतील रसाची कल्पना मनात कदापि यावयाची नाही. कधी कधी साधारण वाचणाऱ्यांच्या मनात उलट विपरीत कल्पना येण्याचा मात्र संभव आहे. तेव्हा उमेदवार ग्रंथकर्त्यांनी शुष्क व प्रायः निरुपयोगी कामाकडे वेळ व बुद्धी न खर्चिता दुसऱ्या काही विशेष उपकृत्याकडे त्यांची योजना केल्यास तेणेकरून लोकांस उपयोग व स्वतः त्यास लौकिक ही प्राप्त होण्याचा विशेष संभव आहे. '
(१ सप्टेंबर १८६७).

पुढे १८७२ पासून सुरू झालेल्या इंग्रजी व संस्कृत कवितेविषयीच्या लेखमालेत विष्णुशास्त्री लिहितात :

'...पेशव्यांच्या कारकीर्दीत होऊन गेलेल्या विख्यात पुरुषांवर केलेल्या ज्या लावण्या किंवा पोवाडे आपण ऐकतो तीच वास्तविक पाहता मराठी भाषेची आद्य कविता होय. कारण वामनपंडित मोरोपंतांसारख्या कवींनी जरी मराठी भाषेत आपली कविता लिहिली तरी ती संस्कृत भाषेच्याच केवळ घाटणीवर असल्यामुळे तीस मराठी कविता म्हणण्यापेक्षा संस्कृत कवितेचेच रूपांतर म्हणणे हे बाजवी आहे. कवितेच्या तीन स्थिती होतात : पहिली तिची जी अत्युत्तम अवस्था तीत केवळ अन्तःकरणाचे स्वाभाविक उद्‌गार भकून शब्दांचे वगैरे बाह्यालंकार मुळीच नसतात

.. जेव्हा अन्तःकरणात स्फूर्ती असून कवितेस बाह्यालंकाराचेही साह्य असते तेव्हा तिची दुसरी अवस्था समजावी. परंतु जेव्हा हृदयद्रावक गुण काहीच नसून केवळ अलंकारादिकांचा मात्र भरणा कवितेत केला जातो, तेव्हा ती तिची तिसरी अवस्था होय. या तिसऱ्या प्रकारच्या कवीस वास्तविक पाहता 'कवी' ही संज्ञा मुळीच शोभत नाही...अशांचे माहात्म्य फार दिवस टिकत नाही, ही अंमळ समाधानाचीच गोष्ट होय.' सभोवतीचा आत्यंतिक कृत्रिम कवितेवर हे विष्णुशास्त्र्यांचे एक भाष्यच आहे.

विष्णुशास्त्र्यांचे हे काव्यविषयक सिद्धान्त शालापत्रकोत्तरकाळात मोठे वादविषय झाले. 'उत्स्फूर्त लोककाव्य' वा 'जुनाट' काव्य हेच खरे काव्य या त्यांच्या मताच्या विरोधाला कृष्णशास्त्र्यांचे 'कविता हे संस्कृतीच्या परिपक्वतेचे एक मधुर फळ होय' हे शालापत्रकातीलच विधान ठेवण्यासारखे आहे. मेकॉलेच्या As science advances poetry declines या मताचा विष्णुशास्त्र्यांवरील प्रभाव या विवेचनात स्पष्ट दिसतो.

तथापि, चॉसरपासून टेनिसनपर्यंतच्या इंग्रजी काव्याची विष्णुशास्त्र्यांनी करून दिलेली ओळख त्यांच्या रसिकतेची अनेक ठिकाणी पावती देते; पण संस्कृत कवितेसंबंधीचे त्यांचे लिखाण मात्र रसिकतेपेक्षा पाश्चात्त्यांच्या तुलनेने पौरस्त्यांमध्ये समीक्षादृष्टीचा जो अभाव त्यांना जाणवला त्याचेच अधिक स्पष्ट विवरण करते. विष्णुशास्त्री लिहितात की इंग्रजी राज्यामुळे व इंग्रज विद्वानांमुळेच संस्कृत भाषा व साहित्य जगभर प्रसृत झाली. जुन्या पठडीतील अध्ययनपद्धतीमुळे तिचे सौंदर्य आपले आपल्यालाही कळवून घेता आले नाही. 'घरची माहिती' परस्थ लोकांनी आपल्याला सांगितली आहे. खरे कवित्व ही चीज जशी फार दुर्मिळ आहे तशीच खरी रसिकताही आहे...इंग्रजी शिक्षणाने आमच्या बुद्धीस जी तीव्रता आलेली आहे ती आमच्या गुरूंच्याच गर्वखंडनास अगोदर कारण होईल....एक मोठा उपकार त्यांनी (इंग्रजांनी) आम्हावर केला तो हा की, आमच्याच जुन्या विद्येचे आम्हास यथार्थ परीक्षण करण्यास त्यांनी शिकविले...इंग्रज टीकाकार मूळ काव्यातील रसविशेषात्मक स्थळे, वर्णनाच्या खुब्या वगैरे प्रकार जसे सांगतात तसे वरील (संस्कृत) टीकांतून काही आढळत नाही...आता पुढील निरूपण वर सांगितलेल्या नवीन पद्धतीस अनुसरून केले आहे हे सांगणे नकोच...पहिल्याने प्रत्येक कवीच्या कालाचा निर्णय, पुढे त्यांच्या ग्रंथांचा निर्देश व त्यांचे विवेचन आणि शेवटी उत्कृष्ट स्थलांपैकी काहींचे उतारे असा क्रम ठरविलेला आहे.'

या पाश्चात्त्य समीक्षेच्या पद्धतीने कालिदासावरील विवेचन करीत असताना विष्णुशास्त्री कालिदासाच्या निसर्गवर्णनांची वर्डस्वर्थशी तुलना करू लागतात. लेखाच्या तळटीपांमध्ये होमर, शेक्सपीअर, जगन्नाथपंडितांची अवतरणे देत जातात; त्यामुळे

उत्सुक वाचक विष्णुशास्त्र्यांच्या बहुश्रुततेत अगदी डुबून निघतो. त्यातील मेघदूताचे सौंदर्य सांगताना कशाकशाची निवड सौंदर्य दाखविण्यासाठी करावी ह्याचा पेच विष्णुशास्त्र्यांना पडतो. भवभूतीच्या नाटकाची संविधानके, पात्रांचे स्वभाव, त्याच्या नाटकातील शृंगार, करुण रसाची स्थळे ते विशेष खुलवून सांगतात. आणि त्या लेखाच्या शेवटी चिपळूणकर निष्कर्षाला येतात की, संस्कृतातील अत्युच्च कविवृंदांत कालिदास, भवभूती हे दोघेच काय ते मोडतात. बाकी, बाणभट्ट, सुबंधू, दण्डी हे दुसऱ्या-तिसऱ्या दर्जाचेच कवी आहेत.

विष्णुशास्त्र्यांच्या या लेखाचे महत्त्व असे की त्यात अनेक कवींच्या अनेक कलाकृती नजरेसमोर ठेवून प्रथमच समग्रतेने व तुलनात्मक विवेचन झालेले आहे. उदाहरणे निवडून त्याची समीक्षा देताना समीक्षा कमी व उदाहरणांचा विस्तार अधिक असे जरी त्यात घडले असले तरी जुन्या पठडीच्या रसाच्या व अलंकारांच्या शास्त्रीय चर्चेत ते फारसे शिरलेले नाहीत. आपल्या वाचकाची आस्वादक्षमता जागी करावी हा त्यांचा हेतू लेखनातून स्पष्ट कळतो. ललितसाहित्याच्या वाचनाची गोडी लागणे आणि त्याचे सौंदर्य समजू लागणे या गोष्टीवर त्यांचे सगळे लक्ष केंद्रित झाले आहे. त्यामुळे शालापत्रकाची कामगिरी आठवून पाहताना असे मनात आल्याखेरीज राहात नाही की, हे लेख जर शालापत्रकात आले नसते तर एवढ्या गांभीर्याने वाङ्मयीन समीक्षेच्या दृष्टीने शालापत्रकाचा विचार करायचे फारसे कारणच राहिले नसते. दुर्दैवाने 'मराठी कविता' हा तिसरा विषय शालापत्रकात विष्णुशास्त्री पुरा करू शकले नाहीत. सातशे वर्षांतील मराठी कवितेची वाङ्मयीन समीक्षा झाली नाही, त्यामुळे तिचा विकास झाला नाही हे गृहीत धरून त्यांनी मोठ्या धडाक्याने लिहायला प्रारंभ केला होता. पण मराठी कवितेच्या विरोधकांचा औपरोधिक पद्धतीने परामर्श घेता घेता त्यांना मिशनऱ्यांवर घसरण्याची बुद्धी झाली आणि त्यातच शालापत्रकाची इतिश्री झाली. पुढे निबंधमालेतील मोरोपंतांच्या कवितेवरील लेखातही ते प्रतिक्रियात्मक पवित्रा घेऊनच उभे राहिले. कवितेच्या उत्स्फूर्ततेला सर्वांत अधिक महत्त्व देणारे विष्णुशास्त्री त्याचा पूर्ण अभाव असणाऱ्या मोरोपंतांना महाकवी ठरविण्याच्या ईर्षेला पडले. 'ग्रंथावर टीका' हा निबंधमालेतील निबंध हा आधुनिक समीक्षाविचाराचा प्रारंभ आपण मानतो, परंतु तत्पूर्वी शालापत्रकाने केलेली त्याची पूर्वतयारी ऐतिहासिक दृष्टीने लक्षात घ्यायला हवी. किंबहुना या दोन्ही मासिकांतील लेखन विष्णुशास्त्र्यांचेच असल्यामुळे दोन्ही मासिकांचा सांधा चांगला जुळून गेला. १८७५ मधील दोन्ही मासिकांचे अंक तुलना करून पाहण्यासारखेच आहेत. निबंधमालेतून उद्धृत केलेला 'मनोरंजक व चमत्कारिक' मजकूर शालापत्रकात पुन्हा आढळतो. एका खेडेगावातील शिक्षकाने अत्यंत आलंकारिक शब्दांत केलेली निबंधमालेची स्तुतीही शालापत्रक छापते...ज्या विषयांचे लेखन शालापत्रकात सुरू झाले होते ते (मराठी भाषेची स्थिती, भाषांतर, मराठी कविता, मोरोपंतांची कविता इत्यादी) विष्णुशास्त्र्यांनी

प्रदीर्घ स्वरूपात 'माले'तून पुढे हाताळायला सुरुवात केल्याने ते शिक्षक विशेष सुखावले होते!

...म्हणजे असेही झाले असावे की शालापत्रकाचा मूळ मर्यादित शैक्षणिक हेतू बाजूला जाऊन ते अधिक वाङ्मयीन झाले व संपादकाच्या व्यक्तित्वाचा, विचारांचा जोरदार ठसा प्रगट करू लागले हेही त्याच्या अस्ताला एक निमित्तच झाले असणार. एक दमदार लेखक म्हणून शास्त्रीबुवांची कीर्ती शालापत्रकाने खेडोपाडी पोहोचविलेली असल्याने निबंधमालेला वर्गणीदार मात्र कधीच कमी पडले नाहीत! शालापत्रकाने मराठी लिहिण्या-वाचण्याचा सराव वाढविला इत्यादी श्रेय विष्णुशास्त्र्यांनी त्याल रासेलसच्या प्रस्तावनेत दिलेले आहेच.

शालापत्रकाचा काळ हा अव्वल इंग्रजीचा अखेरचा टप्पा आहे; तेव्हा त्यात भाषांतराला स्थान असणे स्वाभाविकच म्हणायला हवे. भाषांतराचा तात्त्विक विचार करीत त्याचे, व त्यापासून स्फूर्ती घेऊन लिहिलेल्या स्वतंत्र लेखनाचे, काही उत्तम नमुने कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री या पितापुत्रांनी त्यात सादर केलेले आहेत. एखाद्या भाषांतरात मुळातले काही वगळले गेले आणि त्याऐवजी नवे काही मिसळत गेले तरी ते नवे सौंदर्यात भर घालणारे आहे की नाही या निकषावर त्याच्या योग्या-योग्यतेचा निर्णय कृष्णशास्त्री करताना दिसतात. बाळ यज्ञेश्वरशास्त्री दीक्षित यांचे रघुवंशाच्या दुसऱ्या सर्गाचे भाषांतर तपासताना 'राणी' या अर्थी, 'नृपजाया' असा शब्द दीक्षित वापरतात. कृष्णशास्त्री त्यांना 'निजजाया' असा थोडा वेगळा शब्द सुचवून या दुसऱ्या शब्दाने कोणते वाङ्मयीन सौंदर्य निर्माण झाले ते सूक्ष्मतेने उकलून दाखवितात! संस्कृत व मराठी भाषेच्या प्रकृतीमधील फरक ध्यानात घेऊन ते लिहितात 'संस्कृत पद्याचे मराठी पद्यात्मक भाषांतर करू लागले असता बहुत-करून मराठी पद्याचे वृत्त मोठे धरावे लागते...किती एक ठिकाणी संस्कृतात एका शब्दाने जो अर्थ दाखविता येतो तोच अर्थ दाखविण्यास मराठीत एकापेक्षा अधिक शब्द घालावे लागतात...'शरण आल्याचे रक्षण करणारा' इतका अर्थ 'शरण्य' या एका संस्कृत शब्दात येतो....मूळच्या ग्रंथात जे मुद्दयाचे शब्द असतात त्यांचा अर्थ त्याने गाळता उपयोगी नाही...' या परीक्षणाच्या शेवटी पद्यास पद्य उतरण्याच्या खटपटीत न पडता, प्रास व लांब लांब यमके साधण्याविषयी तादृश प्रयत्न न करता, मूळ ग्रंथातील मार्मिक व मुख्य अर्थ सरळ व रसिक भाषेने मराठीत आणण्याचे मुख्य धोरण ठेवून, दीक्षितांनी कालिदासादी प्रख्यात कवींच्या छंदोबद्ध रचना मराठीत आणाव्यात असा उत्तेजनपर अभिप्राय कृष्णशास्त्र्यांनी दिलेला आहे.

जे इतरांना सांगितले ते वैपुल्याने कृष्णशास्त्रींनी प्रत्यक्ष करून दाखविले आहे.

किंबहुना स्वतः मोठे प्रतिभावंत असूनही ते भाषांतरात फारच रमले असा, त्यांच्य समग्र वाङ्मयीन कर्तबगारीवर पुढील समीक्षकांचा विरोधी अभिप्रायही आहे. पद्य रत्नावलीच्या प्रस्तावनेत (१८६५) मोठ्या आत्मविश्वासाने कृष्णशास्त्र्यांनी मात्र म्हटले आहे : 'In fact I wish that my work should be regarded as an independent Marathi production...' शालापत्रकात आलेली 'रासेलस'ची डॉ. जॉन्सनलिखित कथा कल्पित व कादंबरीरूप आहे. पण 'ही कादंबरी केवळ मनोविनोदनार्थ नसून मनुष्यास संसारात प्राप्त होणाऱ्या किती एक अवस्थांविषयी, किती एक चमत्कारिक व मार्मिक विचार तिच्यात प्रकट केले आहेत' म्हणून त्यांना महत्त्वाची वाटलेली आहे. कृष्णशास्त्र्यांच्या मृत्यूनंतर रासेलस पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली तेव्हा विष्णुशास्त्र्यांनी अभिमानाने तिच्या प्रस्तावनेत लिहिले आहे, 'मराठी भाषेच्या सरणीस इंग्रजी ग्रंथातील विचार कसे उतरावे—म्हणजे मुळातील अर्थात उणे अधिक कोठे मानावे, कोणत्या ठिकाणी कसा फेरफार करावा वगैरे ज्या नानाप्रकारच्या युक्त्या भाषांतरकर्त्यास प्रसंगवशात् लढवाव्या लागतात त्यांची समजूत पुढील ग्रंथावरून बरीच पटेल असा भरवंसा आहे. तसेच शब्दांचे व अर्थाचे सौष्ठव हीही मराठी अभ्यास करणारास लक्षपूर्वक वाचनांती कळण्यासारखी आहेत.'

ॲडिसनच्या ललित निबंधांचे पहिले भाषांतर शालापत्रकातून प्रसिद्ध करताना (१८६८) कृष्णशास्त्री लिहितात, 'आजच्या अंकात जो निबंध दिला आहे त्यात मानवी आयुष्याचे रूपकातिशयोक्तिरूपाने चमत्कारिक व खुबीदार वर्णन केले आहे व मानवी संसार जरी दुःखमय व क्षणभंगुर दिसतो तरी त्यावरून त्याची योजना करणारा जो ईश्वर त्याचा वाईटपणा सिद्ध होत नाही असे दाखविण्याविषयी ग्रंथकाराने यत्न केला आहे.' या प्रास्ताविकानंतर ॲडिसनच्या 'व्हिजन ऑफ मिर्झा' या निबंधाचे असे भाषांतर वाचकास वाचावयास मिळते, की हे भाषांतर आहे हे तो विसरूनच जातो. अनादी असा काळ, त्यात अडकलेले व्यक्तिव्यक्तींचे संबंध व लोभ, मोह, क्रोध आदी भावनांचे त्यावरील वर्चस्व, यांचे विवरण या निबंधात मिर्झा व यक्ष यांच्या संभाषणातून होत जाते. अमानवी योनीतील यक्षाची गाठ पडण्यासाठी ॲडिसनने मिर्झाला बगदादच्या निसर्गरम्य टेकडीवर जावयास लावले आहे याकडे कृष्णशास्त्री आपले लक्ष मुद्दाम वेधतात.

—या टेकडीचे वर्णन वाचताना पुढील काळात शि. म. परांजपे यांनी शिवाजीविषयक लिहिलेल्या 'एक रात्र आणि एक पहाट' या निबंधाची आपल्याला आठवण होते. किंबहुना अशा प्रकारचे शालापत्रकाचे स्मरण पुढे वेगवेगळ्या लेखकांच्या बाबतीत बऱ्याच वेळा होत जाते. व्यंकटराव रामचंद्र मास्तर यांचा 'कीर्तीची आवड' हा निबंध वाचल्यावर निबंधमालेतील 'गर्व' हा निबंध आठवल्याखेरीज राहात नाही. माणसांच्या अनेक मनोविकारात त्यांना आयुष्यात

MARATHI
SCHOOL-PAPER.

मराठी

शालापत्रक.

पुस्तक १२] [अंक ९.

सप्टंबर १८७२.

अनुक्रमणिका. CONTENTS.

	पृष्ठ.		Page
"नौकानयनाचा इतिहास" ह्या पुस्तकावर अभिप्राय.		A Review on 'The History of Navigation.'	
कविता (संस्कृत)	१०३	An essay on Poetry (Sanscrit)	103
पत्रे....	११०	Letters	110

पुणें

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

किंमत दोन आणे.

पुरुषार्थ करायला लावण्याची प्रेरणा असते हा अर्थ दोहोंमध्येही समानच आहे. हाच विचारांचा धागा पुढे श्री. म. माटे यांच्या निबंधात्मक लिखाणातही दिसतो. 'स्तुतिस्पृहा' हा एक स्वतंत्र निबंध त्यानंतर शालापत्रकात प्रसिद्ध झाला तेव्हा त्याची सुरुवातच अशी झाली :

'वास्तविक पाहता मनुष्याची कर्तृत्वशक्ती ती किती ? ज्ञान ते काय ? त्याच्या अंगी गुण किती थोडे ? मनुष्य असा–क्षुद्रप्राणी असता व स्वतःचे अल्पशक्तित्व, अज्ञान, गुणहीनत्व हे तो पक्केपणी जाणत असताही त्याने प्रशंसेची इच्छा धरून तदर्थ उद्योग करीत असावे हे किती अप्रयोजक वाटते ?'

या प्रारंभानंतर आपल्या देशातील व पाश्चात्त्य देशांतील अनेक थोर मंडळींच्या स्पृहणीय कार्याची ओळख करून देऊन लेखक समारोप करतो, 'एकंदरीत विचार पाहता, स्तुतीच्या इच्छेने व निंदेच्या भयाने मनुष्ये जशी प्रवृत्त किंवा निवृत्त होतात तशी पापपुण्याच्या विचाराने किंवा कायद्याच्या भयाने होत नाहीत.'

'समुद्र' या विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या गाजलेल्या छोट्या लेखावरही ही इंग्रजी ललितनिबंधांची छाप आढळते. सागराला उद्देशून स्वतःशीच ते बोलत आहेत. सागरावर येणाऱ्या व विरणाऱ्या लाटा पाहून माणसांच्या येणाऱ्या जाणाऱ्या पिढ्या त्यांना दिसतात. किनाऱ्यावरून पाहणाऱ्या माणसाला सूर्योदयाचे व सूर्यास्ताचे आकाश सुंदर दिसते. पण प्रचंड वादळात सापडणाऱ्या खलाशाला मात्र जेव्हा आकाश व पाणी एकच होऊन जाते तेव्हा त्यात प्रत्यक्ष मृत्यूचेच रूप दिसते. सागराच्या पोटात जे विस्तीर्ण राज्य दडलेले आहे त्याची कल्पनाच करता येत नसल्यामुळे सागर परिचित असूनही गूढ वाटत राहतो. समुद्रावरून चालणारा व्यापार अनेक देशांना जोडत जातो...विष्णुशास्त्र्यांच्या मनात जागे झालेले हे भावविश्व आत्मपर, अंतर्मुख लेखनपद्धतीतून प्रगटल्यामुळे मोठे काव्यमय वाटत राहते. समुद्रदर्शनाने मनात निर्माण झालेली विचारवलये वाचकाच्या अनुभवांशी संवाद साधतात. या लिखाणात उणीव एकच असते की आविष्कारात एक प्रकारची त्रुटितता असते. त्याचे कारण निबंधातील 'मी' आवश्यक तेवढा मोकळा झालेलाच नसतो. आत्मपरतेच्या दिशेने वाटचाल होते पण सगळ्या लेखनाचा 'स्व' हा केंद्रबिंदू मात्र होत नाही.

या पद्धतीचे विष्णुशास्त्र्यांचे छोटे निबंध पुस्तकरूपाने प्रसिद्ध करताना, संपादक खंडो भिकाजी बेलसरे यांनी त्यांना 'बहुश्रुतपणाचे निबंध' असे साधे नाव दिले आहे. शास्त्रीबुवांच्या मोठ्या निबंधांपेक्षा हे छोटे निबंध त्यांचा मनोविकास कसा कसा होत गेला याचे नेमके निदर्शक आहेत असेही त्यांना वाटते.

मराठीतील भाषिक आविष्काराच्या विविध तऱ्हा एकाच वेळी शालापत्रकात आढळतात. काही लेखक 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतारच दाखवितात, काही संस्कृतप्राचुर्याने वाचकाला दडपून टाकतात तर काही साध्या बोली भाषेला आवश्यक तेवढी संस्कृत शब्दांची जोड देऊन मनातील आशय योग्य अशा प्रौढ पद्धतीने प्रगट करतात. काही भाषांतरे, भाषांतरे वाटू नयेत इतकी मराठी वळणाने गेलेली असतात आणि काही स्वतंत्र लेखही भाषांतरे वाटतात—इतकी अवजड, बोजड वाक्यरचना त्यांची असते. जुन्या पिढीतील कृष्णशास्त्री त्यांच्या पुढच्या पिढीतील विष्णुशास्त्र्यांपेक्षा मराठी बोलीचे वळण अधिक सहजतेने साधतात. दोघांच्याही वाङ्मयप्रेमाचा उल्हास त्यांच्या सळसळत्या भाषेतून वैशिष्ट्यपूर्णतेने जाणवत राहतो शालापत्रकातील विष्णुशास्त्री शेवटी शेवटी 'निबंधमालाकार' होऊ लागल्याचेही आपल्याला जाणवते. विशेषतः राज्यकर्ते, मिशनरी व नवे सुधारक आदींच्यावर हल्ले करण्यासाठी त्यांची लेखणी व्यंग्योक्ती, वक्रोक्तीचे अलंकार परिधान करू लागते तेव्हा! शालापत्रकाची अखेर त्यातूनच ओढवते. सरकारी आश्रयावर चालणाऱ्या मासिकात सरकारवर येणारी प्रखर टीका थांबवणे शाळाखात्याच्या डायरेक्टरला आवश्यकच होऊन बसते.

शालापत्रकाच्या शेवटच्या अंकात संपादक लिहितात, 'हा अंक प्रस्तुत मासिक पुस्तकाचा शेवटचा असणार हे आमच्या वाचकांपैकी कित्येकांस माहीत असेलच; तर आता या शेवटल्या प्रसंगी आपल्या देशात नुकतेच येऊन गेलेले जे युवराज आलबर्त प्रिन्स ऑफ वेल्स त्यांच्या निमित्ताने झालेल्या महोत्सवाचे वर्णन आमच्या प्रिय वाचकांकरता दिले असता अप्रासंगिक होणार नाही असे आम्हास खचित वाटते. तर ते सदरील अंकात घालून या आमच्या ग्रामस्थ शिक्षकास युवराज दर्शनाचा महालाभ साक्षात घडला नाही त्यास तो असा प्रकारांतराने आम्ही घडवितो. शिवाय प्रकृत लेखाने आमच्या आज पंधरा वर्षे चाललेल्या शालापत्रकाचा शेवटही गोड झालासा होईल!'

ह्याच अंकाच्या पुढील भागात मात्र हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीबद्दलचे भि. ग. आठवले या शिक्षकांनी लिहिलेले एक प्रदीर्घ नीरस काव्य विष्णुशास्त्र्यांनी छापले आहे. अशी काव्ये व पत्रे आजवर न छापल्याने शिक्षकवर्गाची ओढवून घेतलेली नाराजी त्यातून त्यांना कमी करावयाची आहे. काव्याच्या प्रारंभी मराठ्यांच्या अभिमानास्पद पूर्वेतिहासाचे वर्णन आहे तर उत्तर भागात देशाच्या सध्याच्या दारिद्र्याचे, शोचनीय अवस्थेचे चित्र रेखाटलेले आहे. या काव्याद्वारे युवराजांच्या कानावर 'अर्जी' घातलेली आहे.

—पुन्हा उरलेल्या पानांवर युवराज-स्वागत-समारंभ आहेच—तोही ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिकेतून उतरून घेतलेला!

शालापत्रक बंद होताना विष्णुशास्त्र्यांना खरी रुखरुख वाटली ती एकाच गोष्टीची. प्रथमपासून शिक्षकांना स्वतःलाच आपल्या कामाची थोरवी वाटावी यासाठी त्यांनी ग्रीक व रोमन इतिहासातील आदर्श शिक्षकांचे दाखले त्यांच्यापुढे ठेवले होते. —आता त्या शिक्षकांची गाठभेट या मासिकाच्या माध्यमातून होणार नव्हती.

o

परिशिष्ट

'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' हा रा. के. लेले यांचा ग्रंथ १९८४ मध्ये प्रसिद्ध झाला असून त्यात 'हिंदुपंच'संबंधी काही अधिक माहिती प्रसिद्ध झालेली आहे. (कॉन्टिनेंटल् प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे ३०. पृ. १८०–१८९) ही माहिती हिंदुपंचव्यतिरिक्त अनेक तत्कालीन व उत्तरकालीन वृत्तपत्रांच्यामधून त्यांना उपलब्ध झालेली आहे. श्री. लेले यांनी हिंदुपंचच्या अंतरंगाची करून दिलेली ओळख माझ्या ललित मासिकाच्या १९७८ मधील दिवाळी अंकामध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखावर आधारलेली आहे, हे दोन्ही लेखांतील साम्यांवरून वाचकांच्या लक्षात येईलच. (मात्र श्री. लेले यांनी ग्रंथात तसा उल्लेख केलेला नाही.) ललितमधील लेखच या 'संक्रमण पुस्तकात पुनर्मुद्रित होत असल्याने हा खुलासा करणे मला आवश्यक वाटते.

श्री. लेले यांनी दिलेली हिंदुपंचसंबंधित वेगळी अशी माहिती सारांशरूपाने पुढीलप्रमाणे आहे: प्रथमतः 'अरुणोदय' हे साप्ताहिक-वृत्तपत्र काशीनाथ विष्णू फडके यांनी, ठाणे येथे २२ जुलै १८६६ रोजी सुरू केले; तत्पूर्वी १८६५ च्या सुमारास त्यांनी 'अरुणोदय' हा शिळा प्रेस काढलेला होता. पहिली चार-पाच वर्षे अरुणोदय वृत्तपत्र त्या शिळा प्रेसवर छापले जात असे. रघुनाथ शंकरशास्त्री हे त्याचे सुरुवातीचे संपादक होते. परंतु १८७७ नंतर शास्त्रीबुवांचे नाव वृत्तपत्रावरून गेले व काशीनाथपंतांचे छापले जाऊं लागले. १९०३ मध्ये काशीनाथपंत वारले. १९०३ ते १९०९ या काळात म्हणजे हिंदुपंच बंद पडेपर्यंत त्याचे संपादक काशीनाथपंतांचे चिरंजीव धोंडोपंत हे होते.

अरुणोदयानंतर १८६७ मध्ये ठाण्यातच निघालेले दुसरे वृत्तपत्र होते सूर्योदय गोपाळ गोविंद दाव्रक हे या पत्राचे मालक व चालक होते. सुरुवातीपासून अरुणोदय

व सूर्योदय एकमेकांवर टीका-प्रतिटीका करीत असत. या सूर्योदयाच्या चालकांनीच स्वतःच्या संपादनाखाली २१ मार्च १८७२ पासून हिंदुपंच सुरू केले.

या मराठी हिंदुपंच पूर्वी 'दी इंडियन पंच' असे एक इंग्रजी व्यंगचित्रपत्र भारतात प्रसिद्ध होऊ लागले होते. (१३ जून १८५८) त्याचप्रमाणे भारतातील वेगवेगळ्या भाषांमधून हिंदुपंचच्या आगेमागे अनेक विनोदप्रधान व व्यंगचित्रप्रधान साप्ताहिके निघालेली आहेत. (अवध पंच, दिल्ली पंच, पंजाब पंच, मुंबई पंच, तेलगू पंच, गोवा पंच, पारशी पंच, पंचाबंद इत्यादी) ह्या सर्वांत १८७२ साली देशी भाषेत प्रथमच निघालेल्या हिंदुपंचची कामगिरी विशेष महत्त्वाची ठरते. त्याचे हिंदी भाषांतर काशी येथून पं. गोविंदशास्त्री दुगवेकर प्रसिद्ध करीत असत. ल. ना. गर्दे यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या या भाषांतरित आवृत्तीला हिंदी वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासात विशेष मानाचे स्थान आहे.

ठाण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या हिंदुपंचला सुरुवातीपासून. वामन बाळकृष्ण रानडे (१८५४–१८९९) या हरहुन्नरी लेखकांचे विशेष साह्य होते. १८९२ मध्ये गो. गो. दावकांनी आपली दोन्ही पत्रे सूर्योदय व हिंदुपंच गणेश कृष्ण शहाणे व अप्पाजी गोपाळ गुप्ते यांच्याकडे सोपविली. त्यांनी १९०४ च्या सुमाराम या दोहोंची मालकी त्यानंतर मुळापासून एकमेकांच्या विरोधात असणाऱ्या अरुणोदयाच्या संपादकांकडे, म्हणजे धोंडोपंताकडे सोपविली. स्वतः धोंडोपंत अरुणोदयाची व्यवस्था पाहात व त्यांचे एक बंधू कृष्णाजी काशिनाथ ऊर्फ तात्या फडके हिंदुपंचची व्यवस्था पाहात; सूर्योदय मात्र ह्या सुमारास बंदच पडले होते. या बदलानंतरच हिंदुपंच गुरुवार ऐवजी रविवारी निघू लागला व त्यात चित्रेही येऊ लागली. तो लोकप्रिय तर प्रथमपासून होताच.

जहाल राजकारणाच्या युगात, मुळची अरुणोदयाची जहाल परंपरा पाठिशी घेऊनच आलेल्या तात्या फडक्यांनी हिंदुपंचाला नेमस्त मवाळांवर टीका करण्याचे एक प्रखर हत्यार बनविले. नामदार गोखल्यांवर त्याचा विशेष रोख होता. १९०६ मध्ये लो. टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली तेव्हा त्या शिक्षेस नामदार गोखले जबाबदार आहेत असे हिंदुपंचने सुचविल्यामुळे नाइलाजाने ना. गोखल्यांनी हिंदुपंचला कोर्टात खेचले. तात्या फडके यांनी कोर्टात माफी मागितली पण सरकारने खटला पुढे चालविला व एका जहाल पत्राची अखेर करण्याची संधी साधली. पुढे तात्या फडके यांना बोलावून घेऊन ना. गोखल्यांनीच त्यांना मदतही केली. हिंदुपंचची परंपरा काही प्रमाणात पुढे संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकरांनी चालविली.

ही अधिक माहिती देताना रा. के. लेले यांनी अच्युत बळवंत कोल्हटकरांनी लिहिलेला तात्या फडके यांचा मृत्युलेखही उद्धृत केलेला आहे. त्यात अच्युत बळवंत म्हणतात—'हिंदुपंचाचा सुरुवातीचा व भरभराटीचा काळ हा हिंदी किंवा

महाराष्ट्रीय सार्वजनिक आयुष्यातील मध्यकाल होता.त्या वेळी अनेक नवनव्या कल्पनांचा, मतांचा व चळवळींचा उपक्रम होऊन गेलेला होता. पण त्या सध्याइतक्या स्थिर झालेल्या नव्हत्या. ह्यानंतरचा काळ फारच झपाट्याने बदलत गेला आणि त्यावरोबरच एकंदर महाराष्ट्राची वाचनाभिरुचीही पुष्कळच बदलली. तरीपण इतके मात्र खरे की त्या वेळचा तो हिंदुपंचाचा प्रसार, दरारा, वाचकवर्गामधील त्याचा सुस्वभाव व प्रेम ही सर्व काही कोणाही लेखकास अभिमानास्पद व स्पृहणीय होती यात शंका नाही. सुशिक्षितांस हिंदुपंच वाचावासे वाटे, हिंदुपंचातील हास्यचित्रे सुशिक्षितांस पाहावीशी वाटत व अशिक्षितांस तर ते एक अत्युत्कृष्ट शिक्षणच होत .असे व आवडत असे. त्या वेळच्या नवीन राजकीय चळवळीला हिंदुपंचाच्या अशा या दुधारी लोकप्रियतेमुळे फारच उपयोग झाला व लोकजागृतीचे पुष्कळसे श्रेय त्यास मिळाले...त्यांनी हास्यचित्रांना केवळ इंग्रजी वळणावर न नेता त्यांना स्वतंत्र वळण लाविले... विक्षिप्त कल्पना व वस्तुस्थितिदर्शक चित्रे (व्यंगचित्रे नव्हे) ह्यांचा उत्कृष्ट मिलाफ त्यांनी घातला होता.'

●

महत्त्वाचे संदर्भ

(१) उपासनेला दृढ चालवावे

कै. ग. ल. चंदावरकर यांनी सांगितलेल्या आठवणी : १९७८–७९
प्रार्थनासमाजाचा इतिहास : द्वा. गो. वैद्य, १९२७
सर नारायण चंदावरकर (चरित्र) : द्वा. गो. वैद्य, १९३७
न्या. मा. गो. रानडे (चरित्र) : न. र. फाटक, १९२४
रवीन्द्रनाथ (चरित्र) : गं. दे. खानोलकर, १९६१
माझ्या आठवणी (आत्मचरित्र) : ग. य. चिटणीस, १९५५
विचारविहार : वा. म. जोशी, १९४४
Six Months in India : Mary Carpenter, 1868

(२) एका सामाजिक शोकनाट्याची भूमिका

महाराष्ट्राची तेजस्विनी : पंडिता रमाबाई – दे. ना. टिळक, १९६०
स्त्रीधर्मनीति : पं. रमाबाई, १८८२
इंग्लंडचा प्रवास : पं. रमाबाई, १८८४
ज्ञानदीपमधील लेखमाला : पं. रमाबाई, १८८४–१८८६
युनायटेड स्टेटस्‌ची लोकस्थिती व वृत्तांत : पं. रमाबाई १८९८
The High Caste Hindu Woman : Pandita Ramabai
American ed. : 1887
Australian ed. : ed. 1903 by Manorama Medhavi
Letters and Correspondence of Pandita Ramabai
Compiled by Sister Geraldine
ed. by Prof. A. B. Shah, 1979
आमच्या आयुष्यातील काही आठवणी : रमाबाई रानडे, १९१०
कै. श्री. रमाबाई रानडे यांचे चरित्र : उमाकांत, १९२५
पंचहौदमिशनचे त्रैमासिक अहवाल : १८८२–१८८९
लो. बाळ गंगाधर टिळक यांचे चरित्र : न. चिं. केळकर, १९२३
हरि नारायण आपटे : कु. वेणूबाई पानसे : १९३१
आत्मवृत्त : धोंडो केशव कर्वे, १८२८
माझे पुराण : सौ. आनंदीबाई कर्वे, १९४४
शेतकऱ्यांचा आसूड : जोतीराव गोविंदराव फुले, १८८५

सत्सार : जोतीराव गोविंदराव फुले, १८८५
आगरकर लेखसंग्रह भाग १ (१९३७) संपा. : आळतेकर
नामदार गोपाळ कृष्ण गोखले (चरित्र) : न. र. फाटक, १९६७
सेवासदनचे अहवाल : १९१०-११
श्रीमती काशीबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र : रूपां. सरोजिनी वैद्य १९८०
पं. रमाबाई : प्रबोधनकार ठाकरे, १९५०
Pandita Ramabai Sarasvati : Clementina Butler, 1922
Pandita Ramabai . Helen Dyre
Pandita Ramabai : Barbara Underhill
Pandita Ramabai : Nicol MacNicol, 1929

(३) त्रिशंकू

माझा समुद्रप्रवास : गोपाळराव जोशी यांची केसरीतील लेखमाला, १८९२-९३.
श्री. सुंदराबाई लिमये यांनी सांगितलेल्या आठवणी १९७८.
ग. वि. केतकर यांचे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात उपलब्ध झालेले दप्तर व त्यांच्याशी केलेला पत्रव्यवहार १९७८.
Life of Dr. Anandibai Joshee : Catherine Dall 1889.
काही आंबट काही गोड : शकुंतला परांजपे १९७९.
पंचहौदमिशनचे वार्षिक अहवाल १८९०-९१, १८९१-९२.
मामा परमानंद : पु. वा. कुलकर्णी १९६३.
डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र : काशीबाई कानिटकर दुसरी आवृत्ती १९१२.
वासुकाका जोशी : काल आणि कर्तृत्व : व्यं. र. देवगिरीकर १९४८.
व्यक्ती आणि विचार : य. दि. फडके १९७९ (आगरकर व गोपाळराव जोशी यांची पत्रे)
वसंत व्याख्यानमालेचा इतिहास : म. श्री. दीक्षित यांची टिपणे.
नाट्यछटाकार दिवाकर यांची रोजनिशी (प्रादेशिक ग्रंथालय, मुंबई)
श्री. श्यामसुंदर आढाव यांच्या संग्रहातील कार्पेंटर यांचे पत्र.

(४) त्रिदल

श्री. अ. गो. कानिटकर, अनुबाईसाहेब घोरपडे इचलकरंजीकर इत्यादी कानिटकरांच्या नातेवाइकांनी लिहून दिलेल्या आठवणी (१९७५-७८)
कानिटकरांच्या घरातील कागदपत्रे.

हरिभाऊंची पत्रे : संपा. काशीबाई कानिटकर १९२९.
डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र : दुसरी आवृत्ती १९१२.
स्त्रियांची परवशता (भाषां.) गोविंद वासुदेव कानिटकर १९०२
चांदण्यातील गप्पा : प्रस्तावना लक्ष्मण गणेशशास्त्री लेले,
लेखिका : काशीबाई कानिटकर १९२१.
हरिभाऊ आपटे यांचे त्रोटक चरित्र : काशीबाई कानिटकर
वि. विस्तार, मार्च १९२१.
हरि नारायण आपटे यांच्याविषयी वेणूताई पानसे (१९३१), बा. मा. आंबेकर (१९३१), नी. म. केळकर (१९६४) आदींनी लिहिलेला चरित्र व आठवणींपर मजकूर
वसंत व्याख्यानमालेचा इतिहास : म. श्री. दीक्षित यांची टिपणे
गो. वा. कानिटकर : हरिभाऊ आपटे म. सा. पत्रिका १९१८

(५) पंचआजोबा

(१) हिंदुपंच या साप्ताहिकाचे १८८८–१८९८ चे अंक.
(२) वाङ्मयेतिहास खंड–५ भाग १ पृ. १५७.

(६) पुणे पाठशालापत्रक

(१) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय व महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या ग्रंथालयात उपलब्ध झालेले १८६१ ते १८७५ मधील एकशे अठ्ठावन्न अंक.
(२) विष्णु कृष्ण चिपळूणकर यांचे किरकोळ निबंध :
खंडो भिकाजी वेलसरे १८९६.
(३) विष्णुशास्त्री चिपळूणकर काळ आणि कर्तृत्व :
ग. त्र्यं. माडखोलकर १९५४.
(४) पद्यरत्नावली : कृष्णशास्त्री चिपळूणकर १८७८.
(५) रासेलस : कृष्णशास्त्री चिपळूणकर १९२९.

REFBK-0024668

महत्त्वाच्या दुरुस्त्या

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	१४	अलिप्तपणाही	अलिप्तपणही
४	२४	१८८३	१८३३
१२	१६	अनवतरतेने	अनावरतेने
२८	२०	असहाय्यताही	असाहाय्यताही
३०	७	निवासशास्त्रींचा श्री	श्रीनिवासशास्त्रींचा
३०	८	वर्स	सर्व
३२	१३	डॉ. रिचर्ड बॉडले	डॉ. राशेल बॉडले
३५	२३	डॉ. रिचर्ड बॉडले	डॉ. राशेल बॉडले
५०	५	एके ठिकाणी	ज्ञानदीपमधील पत्रात
५१		अवतरण पंधराव्या ओळीत पूर्ण न होता विसाव्या ओळीत होते;	
५२		अवतरण पंधराव्या ओळीत पूर्ण न होता पुढील पृष्ठावर पहिल्या ओळीत पूर्ण होते.	
६०	१३	या आरोपाला...निघाले.	निघाले होते (१८८४)
६०	१५	इल्ले केले	केले होते.
६१	२४	अचुकपणे	अचूकपणे
१००	१५	वाटेवर	लाटेवर
१०६	२९	सेनानिवृत्त	सेवानिवृत्त
१६१	६	कुंकुवे	कुकुंवे

सत्सार : जोतीराव गोविंदराव फुले, १८८५
आगरकर लेखसंग्रह भाग १ (१९३७) संपा. : आळतेकर
नामदार गोपाळ कृष्ण गोखले (चरित्र) : न. र. फाटक, १९६७
सेवासदनचे अहवाल : १९१०-११
श्रीमती काशीबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र : रूपां. सरोजिनी वैद्य १९८०
पं. रमाबाई : प्रबोधनकार ठाकरे, १९५०
Pandita Ramabai Sarasvati : Clementina Butler, 1922
Pandita Ramabai . Helen Dyre
Pandita Ramabai : Barbara Underhill
Pandita Ramabai : Nicol MacNicol, 1929

(३) त्रिशंकू

माझा समुद्रप्रवास : गोपाळराव जोशी यांची केसरीतील लेखमाला, १८९२-९३.
श्री. सुंदराबाई लिमये यांनी सांगितलेल्या आठवणी १९७८.
ग. वि. केतकर यांचे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात उपलब्ध झालेले दप्तर व त्यांच्याशी केलेला पत्रव्यवहार १९७८.
Life of Dr. Anandibai Joshee : Catherine Dall 1889.
काही आंबट काही गोड : शकुंतला परांजपे १९७९.
पंचहौदमिशनचे वार्षिक अहवाल १८९०-९१, १८९१-९२.
मामा परमानंद : पु. वा. कुलकर्णी १९६३.
डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र : काशीबाई कानिटकर दुसरी आवृत्ती १९१२.
वासुकाका जोशी : काल आणि कर्तृत्व : व्यं. र. देवगिरीकर १९४८.
व्यक्ती आणि विचार : य. दि. फडके १९७९ (आगरकर व गोपाळराव जोशी यांची पत्रे)
वसंत व्याख्यानमालेचा इतिहास : म. श्री. दीक्षित यांची टिपणे.
नाट्यछटाकार दिवाकर यांची रोजनिशी (प्रादेशिक ग्रंथालय, मुंबई)
श्री. श्यामसुंदर आढाव यांच्या संग्रहातील कार्पेंटर यांचे पत्र.

(४) त्रिदल

श्री. अ. गो. कानिटकर, अनुबाईसाहेब घोरपडे इचलकरंजीकर इत्यादी कानिटकरांच्या नातेवाइकांनी लिहून दिलेल्या आठवणी (१९७५-७८)
कानिटकरांच्या घरातील कागदपत्रे.